स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणें
विषय क्र/२५
सं. नं. १६४
१९८२८

…नित्य नवे
…हि प्रबंध होआवे

—ज्ञानेश्वर.

# रेंदाळकरांची कविता

## द्वितीय खंड

संग्राहक

वामन जनार्दन कुंटे

( सर्व हक्क संग्राहकाचे स्वाधीन )

REFBK-0003696

…मत दीड रुपया

१९२८

म्हणोनि माझे नित्य नवे
श्वासोच्छ्वासहि प्रबंध होआवे

—ज्ञानेश्वर.

५८८२

# रेंदाळकरांची कविता

## द्वितीय खंड

३६९६

संग्राहक
वामन जनार्दन कुंटे

REFBK-0003696
REFBK-0003696

( सर्व हक्क संग्राहकाचे स्वाधीन )

किंमत दीड रुपया

१९२८

प्रकाशक
वामन जनार्दन कुंटे, बी. ई.
कुंटे यांचा वाडा.
सांगली

# रेंदाळकरांची कविता
## तृतीय खंड
लवकरच प्रसिद्ध होईल

'रेंदाळकरांची कविता द्वितीय खंड' पृष्ठें १-१५६ व 'दोन शब्द' पृष्ठें १-२
हीं अनंत विनायक पटवर्धन यांनीं आर्यभूषण छापखान्यांत छापिलीं
'रेंदाळकरांचें अल्प चरित्र' पृष्ठें १-३१ व 'रेंदाळकरांचे
दूषक' पृष्ठें १-१९ अनंत सखाराम गोखले यांनीं
विजय प्रेसमध्यें छापिलीं.

# दोन शब्द.

के. रेंदाळकरांच्या कवितेचा प्रथम खंड प्रसिद्ध झाल्यास जवळ जवळ चार वर्षें झालीं. आज त्यांच्या कवितेचा द्वितीय खंड प्रसिद्ध करून आम्ही हा मित्र-ऋणाचा दुसरा हप्ता भरीत आहों. शेतकी कायद्यानें एकदां हप्तेबंदी झाली म्हणजे जन्मभर हप्ते भरले तरी कर्जमुक्तता होत नाहीं. त्याच कायद्याचा जणों कांहीं आम्हीं उपयोग करून घेतला असें मोठ्या कष्टानें मान्य करणें भाग आहे. कारण हा दुसरा लहानसा हप्ता भरण्यास आम्हांस जवळ जवळ चार वर्षांचा दीर्घावधि लागला; व पुढील हप्ता भरण्यास आम्ही केव्हां समर्थ होऊं तो कालही आजच सांगण्याची आमची पात्रता नाहीं. असो. ही आडवळणाची भाषा सोडून स्पष्टपणें सांगावयाचें म्हणजे हा लहानसा दुसरा खंड इतक्या अवधीनंतर प्रसिद्ध करणें व त्यांतही राहिलेल्या सर्व कवितेचा समावेश न होतां बऱ्याचशा कवितेस तृतीय खंडाचा वायदा सांगण्याची पाळी येणें ही कांहीं आम्हांस मोठी अभिमानाची गोष्ट नाहीं. तरी प्राप्त झालेल्या परिस्थितींत आम्ही शक्य तेवढें आमचें कर्तव्य पार पाडण्यास झटलों एवढेंच समाधान आम्हीं मानून घ्यावयाचें आहे.

प्रथम खंडांत बहुतेक सर्व स्फुट कविता प्रसिद्ध करण्यांत आली आहे. या द्वितीय खंडांत सर्व खंड काव्यें छापण्याचा प्रथम हेतु होता. पण प्रथम खंडाच्या बहुतेक सर्व प्रति आर्यभूषण छापखान्याच्या भयंकर आगींत जळून गेल्यामुळें द्वितीय खंडाच्या प्रसिद्धीस मोठीच अडचण उत्पन्न झाली. म्हणून ‘ मोहिनी ’ ‘ विरहिणी राधा ’ यासारख्या पूर्वींच पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालेल्या खंडकाव्यांचा यांत समावेश न करितां त्यांना तिसऱ्या खंडाकरितां राखून ठेवण्यांत आलें आहे.

या खंडांत ‘ यमुनागीत ’ ‘ जाधवाची मंजुळा ’ वगैरे कोणत्याही नियत-कालिकांत पूर्वीं प्रसिद्ध न झालेलीं काव्यें अगदीं प्रथमच प्रसिद्ध होत आहेत. बाकीचीं ‘ रतिविलाप ’ ‘ विज्ञानसार ’ वगैरे पूर्वीं करमणुकींत प्रसिद्ध झालेलीं आहेत.

मागील खंडांत के. रेंदाळकरांचें चरित्र व त्यांचें छायाचित्र घालतां आलें नाहीं. या दोन्ही उणीवा या खंडांत भरून काढल्या आहेत. आमचे व के. रेंदा-

ळकरांचे परमस्नेही रा. नागेश गणेश नवरे यांनीं मुद्दाम या पुस्तकाकरितां लिहिलेलें अल्पचरित्र व प्रस्तावनारूप लिहिलेला ' रेंदाळकरांचे दूषक ' हे दोन्ही लेख या खंडास जोडले आहेत. हे लेख प्रथम रत्नाकरांत प्रसिद्ध करून पुस्तकाच्या आकारांत छापून दिल्याबद्दल 'रत्नाकरा'चे चालक रा. अनंत सखाराम गोखले यांचे आम्ही फार आभारी आहोंत.

रा. सा. विष्णु गणपतराव च-हाण व रा. रघुनाथ श्रीपाद कुलकर्णी, शिवराम श्रीपाद वाशीकर रा. बाळकृष्ण महादेव गद्रे व रा. नागेश गणेश नवरे हे कै. रेंदाळकरांचे व आमचे स्नेही या कार्यांत आमचे सहकारी असून त्यांच्या वतीनेंच हे दोन शब्द आम्ही लिहीत आहों. तृतीय खंड लवकरच प्रसिद्ध करण्याची आमची इच्छा परमेश्वर पूर्ण करो अशी प्रार्थना करून वाचकांची रजा घेतों.

मिरज
२-५-२८ } वामन जनार्दन कुंटे.

---

# अनुक्रमणिका


| वि. | | पृ. |
|---|---|---|
| १ | यमुनागीत. | १ |
| २ | कादंबरी रूपांतर. | ३९ |
| ३ | शांतिसोपान. | ६० |
| ४ | रतिविलाप | ६० |
| ५ | विज्ञानसार. | ७४ |
| ६ | श्री अवधूतगीता. | ८६ |
| ७ | गंगालहरी. | ९६ |
| ८ | शंकरविजय. | ९९ |
| ९ | शिरक्यांची तारा. | १०२ |
| १० | जाधवांची मंजुळा—प्रास्ताविक | १०९ |
| ११ | जाधवांची मंजुळा—वृत्तकथन. | १२० |
| १२ | जाधवांची मंजुळा— पूर्व वृत्तकथन | १३० |
| १३ | जाधवांची मंजुळा— पूर्ववृत्त कथन. ( पुढें चालू ) | १४२ |
| १४ | बाष्पबिंदु. | १४३ |
| १५ | पद्यपुष्पांजली. | १५० |

# कविवर्य रेंदाळकर यांचा अल्पपरिचय

कविवर्य रेंदाळकर दिवंगत होऊन सुमारें सात वर्षांवर काळ मागें पडला. तथापि, त्यांच्या काव्यालापांचा मधुर ध्वनि रसिक जनांचीं हृदयें अजूनही निनादित करीत आहे. त्यांच्या कवितेच्या वैजयंतीनें एके काळीं स्वतःच्या सौगंधित वैभवानें सहृदयांचीं हृदयें दरवळून सोडलीं होतीं. सन १९१० ते १९१४ हा वर्षचतुष्टयात्मक काल त्यांच्या कलावैभवाचा वासंतिक काल होय. या वेळीं, त्यांच्या काव्यलौकिकाचा सूर्य आकाशाच्या ऐन मध्यावर तळपत होता. तथापि, ही परिस्थिति पुढें अनेक कारणांनीं कायम टिकूं शकली नाहीं. प्राप्त परिस्थितीशीं समरस होऊन खुषमस्करी करीत जीवितसमापन करणारा मनुष्य जगाच्या अदालतींत आपला फैसला अनायासें जिंकतो; परंतु, ही वृत्ति रेंदाळकरांत सुरवातीपासूनच नव्हती. ते खरे कलावान् होते. निंदास्तुतीची फारशी परवा न करितां त्यांनीं आपला मनःपूत मार्ग आमरण चोखाळला. कृत्रिम व्यवहारांतच आयुष्याचें सारसर्वस्व वेंचूं पाहणाऱ्या समाजाला त्यांनीं आपल्या काव्यांतून जोराचे धक्के दिले. ते त्याला रुचले नाहींत, सहन झाले नाहींत. त्यांच्या कवितेचें नियमकत्वही त्यांना मागें खेंचावयास कांहीं अंशीं कारणीभूत झालें. या प्रकारामुळें, लोक त्यांना बंडखोर म्हणूं लागले व या बंडाचा बीमोड करण्यासाठीं टीकाकारांचीं पथकें एकामागून एक निर्माण होऊं लागून त्यांच्या कवितेवर वेळीं-अवेळीं तीक्ष्ण प्रहार करूं लागलीं. फार कशाला, रेंदाळकर कैलासवासी झाल्यानंतर सुमारें चार वर्षांनीं त्यांचे प्रियमित्र श्री० वामनरावजी कुंटे बी. ई. यांनीं त्यांच्या समग्र कवितेचा प्रथम खंड प्रसिद्ध केला. या संधीचा फायदा घेऊन एक-दोन लेखकांनीं त्यांच्या कवितेवर यथेच्छ तोंडसुख घेतलें आहे. इतकेंच नव्हे, तर त्यांच्या निर्मल खासगी आयुःक्रमावरही शिंतोडे उडविण्यास त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. मृताच्या पश्चात् त्याच्यावर वार करण्यांत मर्दपणा तर नाहींच, पण त्यांत माणुसकीही नाहीं, हें ते विसरले! असो. या सर्व कारणपरंपरेमुळें, खुद्द रेंदाळकर व त्यांची काव्यकृति यांविषयीं सामान्य जनांचा बराचसा अकारण गैरसमज झाला आहे. प्रस्तुतच्या त्यांच्या कवितेच्या दुसऱ्या खंडाच्या सुरुवातीस त्यांच्या जीवितक्रमाचा वाचकांस अल्प परिचय करून दिल्यास

वरील गैरसमज कांहीं अंशीं तरी दूर होतील, अशा अपेक्षेनें मी या कार्यास प्रवृत्त होत आहें.

सन १९१० सालच्या सुरवातीस मी धंद्यानिमित्त कोल्हापुर येथें आलों. तत्पूर्वी रेंदाळकरांविषयीं मला कांहींच माहिती नव्हती. एके दिवशीं मी सहजगत्या बाहेर निघालों असतां, वर्तमानपत्राचा एक लहानसा तुकडा रस्त्याकडेला पडलेला मला आढळून आला व त्याच्यावर कांहीं कवितेचे चरण मुद्रित केलेले असावे, असेंही दिसलें. स्वतःला थोडासा कवितावाचनाचा नाद असल्यामुळें, उत्कंठापूर्वक तो तुकडा हातीं धरून पाहतां, कविनामनिर्देशासह त्यावर खालील पदपंक्ति मुद्रित केलेल्या दिसून आल्या.

हाय ! तरिहि न मम शांत होय राग,<br>
प्रिया होती जरि बघत सानुराग<br>
क्षणामध्यें प्रेमौघ तिचा वेगें,<br>
अश्रुरूपें धावला नेत्रमार्गें !<br>
नेत्र आले मम भरुनि आसवांनीं,<br>
मनोद्रावक तो समय कोण वानी ?<br>
प्रियाश्रूंशीं मम अश्रु तैं मिळाले,<br>
देह भिन्नहि आमुचे एक झाले !<br>
अश्रुबिंदू जे तेधवां गळाले,<br>
रूक्ष माझें मन त्यांहिं आर्द्र केलें<br>
प्रीतिलतिका उगवली त्यांत कालें,<br>
तिला ऐसें हें रम्य कुसुम आलें !

—रें. प्र. खं. पृष्ठ ६७

प्रस्तुत संगीतांतील सर्वांगीण सौंदर्यानें हृदयाला मुग्धता येऊन या काव्यदेवीच्या प्रतिभाशाली उपासकाची महनीय भेट आपणाला होईल काय, अशी प्रबल उत्कंठाही मनांत उदय पावली. पुढें थोड्याच दिवसांनीं, त्या वेळीं येथें अस्तित्वांत असलेल्या 'विजयी मराठा' नामक छापखान्यांत स्वतःच्या सहसंपादकत्वाखालीं चालू असलेल्या 'धर्मविचारा'चीं मुद्रितें शुद्ध करीत असलेले रेंदाळकर मला एके दिवशीं अभावितपणें पहावयास मिळाले ! भाग्यवशात् त्यांच्याशीं पुढें परिचय होऊन त्याचें थोडक्याच मुदतींत दृढ मैत्रींत पर्यवसान झालें. त्यांचें जीवंत बुद्धि-

मत्तेचें दर्शक भव्य कपाळ, पाणीदार डोळे, प्रमाणबद्ध निरोगी शरीरयष्टि आणि अत्यंत सफाईदार भाषा, या सर्व गुणसमुच्चयाचा त्यांच्या पहिल्याच भेटींत माझ्या मनावर जो अत्यंत अनुकूल परिणाम झाला तो मी केव्हांही विसरणार नाहीं. रेंदाळकर कैलासवासी होऊन आज सात वर्षें झालीं. तथापि, त्यांनीं आपल्या प्रेमळ वर्तनानें व शरच्चंद्रिकातुल्य शुद्ध आचरणानें आपल्या जिवलग मित्रांच्या हृदयसिंहासनावर सुरू केलेलें प्रेमाचें अधिराज्य आजही त्याच रुबाबानें चाललें असून यापुढेंही त्यांत रतिमात्रदेखील खंड पडणें शक्य नाहीं.

असो. कोल्हापुर संस्थानांतलि रेंदाळ गांव ही यांची जन्मभूमि. येथील हे वतनदार कुळकर्णी, जातीनें ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. सदर गांवचें कुळकरण हिस्सेरशीप्रमाणें यांच्या घराण्यांत चालू असे. कौटुंबिक विभक्तपणाबरोबरच मूळ वतनांतही लहान-मोठे विभाग पडून सांपत्तिक दृष्ट्या जीं कित्येक घराणीं खालावतात, त्यांतच प्रस्तुत चरित्रनायकाच्या घराण्याचाही समावेश करावयास हरकत नाहीं. सांपत्तिक स्थिति समाधानकारक नसल्यामुळें, चरित्रनायकाचे वडील पांडुरंगपंत हे रेंदाळ गांवांतच एका व्यापाऱ्याकडे नौकरीला राहून प्रपंचाचा गाडा हांकीत असत. कुरुंदवाड येथील रामचंद्र महिपत कुन्नूर यांच्या सुशील कन्येशीं पांडुरंगपंत विवाहबद्ध झाले असून त्यांच्या कुटुंबाचें रंगूबाई असें नांव होतें. रंगूबाईचें माहेरचें घराणें कुलीन, बालबोध व वळणदार असें असून सासरीं येतांना, त्यांनीं हे महनीय गुणही बरोबर आणिले होते. त्यामुळें, त्यांच्या गरिबीच्या व वाढत्या प्रपंचांतही शांति, समाधान व आनंद हीं अखेरपर्यंत टिकून राहिलीं. आपल्या प्रेमळ मातेचा उल्लेख करतांना कविवर्य रेंदाळकर अत्यंत सद्गदित होऊन म्हणत कीं, 'माझें हें वाङ्मयसेवेचें छोटेखानी मंदिर माझ्या प्रेमळ आईच्या प्रोत्साहनाचीच एक मूर्त खूण आहे. तिचें प्रोत्साहन नसतें तर तें कदाचित् अस्तित्वांतही आलें नसतें !' पांडुरंगपंतांपासून रंगूबाईंना पांच मुलगे व दोन मुली, मिळून सात अपत्यें झालीं. त्यांपैकीं आज श्री० वासुदेवराव, दिगंबरपंत व नारायणराव असे तीन चिरंजीव विद्यमान असून ते रेंदाळ गांवींच विभक्तपणें राहतात. यांपैकीं थोरले वासुदेवराव हे दत्तक गेलेले आहेत. कविवर्य एकनाथपंत हे पांडुरंगपंतांचे कनिष्ठ पुत्र होत. यांची जन्मतिथि आषाढ शुद्ध ११ शुक्रवार शके १८०९ (ता. १ जुलई १८८७) ही होय. त्यांच्या बाल्याचा कांहीं काल कुरुंदवाड येथें आजोळीं व कांहीं रेंदाळ येथें गेला. त्यांना थोडेंसें कळूं लागल्यावर ते स्वयंप्रेरणेनेंच रेंदाळ

येथील प्राथमिक शाळेंत दाखल झाले. त्यांच्या बाल्याचा हा काल म्हणजें रस्त्यांतील धुळींत किंवा गांवठाणानजीकच्या शेतांतून स्वैरवृत्तीनें वागडण्याचाच होय. परंतु, हा बाल्यसुलभ मोह त्यांच्या जन्मजात विद्याप्रवण वृत्तीला स्पर्श करूं शकला नाहीं ! अभ्यासांतून शिल्लक राहिलेला त्यांचा काल, तसल्या अल्लड वयांतही काव्य, नाटक, कादंबरी इत्यादि ललित-वाङ्मयाच्या वाचनांत अव्याहतपणें निघून जात असे. आणि त्यामुळें 'अरे, डोळे फोडून घेशील' वगैरे शब्दांनीं घरांतील वडील मंडळीचें त्यांना कैक वेळां रागेंही भरून घ्यावें लागे. परंतु त्यांच्या या वर्तनक्रमांत कधींच खंड पडला नाहीं. कदाचित्, याच ललित-वाङ्मयाच्या फलकावर त्यांच्या भावी कवियशोवैभवाची अव्यक्त रूपरेखा रेखिली गेली असण्याचा संभव आहे. जन्मजात कवीचें हृदय स्वाभाविक रीत्याच भावनाप्रवण व लहरी असें असतें. अर्थात्च या गोष्टीला ते मुळींच अपवाद नव्हते. बालवयांतही हे दोन गुण त्यांच्या अंगीं बऱ्याच अंशीं डोकावत असत. एकाद्या कल्पनातंरगाची उपज त्यांच्या हृदयांत जितक्या वेगानें प्रवृत्त व्हावी, तितक्याच वेगानें तिच्या कार्यवाहीसही त्यांनीं उद्युक्त व्हावें, असा प्रकार कैक वेळां होत असल्यामुळें, घरांतील वडीलधाऱ्या मंडळीकडून हट्टी, हेकेखोर, नादिष्ट वगैरे शब्दांनीं त्यांना संबोधण्यांत येत असल्यास फारसें नवल नाहीं. परंतु हाच नादिष्ट मुलगा भावी कालांत आपलें कुल, कलासंपन्न संगीताच्या मधुर नादानें निनादित करून सोडणार आहे, अशी कल्पना या वडीलधाऱ्यांच्या मनांत त्या वेळीं अस्पष्टपणें तरी डोकावली असेल काय ? त्यांच्या वडिलांना वेदान्त विषयाची थोडीफार गोडी असल्यामुळें, त्यांच्या घरीं ज्ञानेश्वरी, अमृतानुभव वगैरे ग्रंथांची थोडीफार चर्चा होत असे. त्यांच्या कोमल मनावर तिचा इष्ट परिणाम झाल्यावांचून कसा राहील ? ते मोठेपणींही स्वस्थ असले म्हणजे त्यांच्या हातांत ज्ञानेश्वरीचें पुस्तक असल्याचें दिसून येत असे. ज्ञानेश्वरीसारखा सर्वांगपूर्ण ग्रंथ अद्यापि मराठींत झालेला नाहीं, असें ते म्हणत असत.

रेंदाळ येथें मराठी चवथी इयत्ता पूर्ण झाल्यावर ते इंग्रजी शिक्षणाकरितां कागल संस्थानांत येऊन राहिले. येथेंच त्यांचा श्री० (हल्लीं रावसाहेब) व्ही. जी. चव्हाण बी. ए. एल्‌एल्. बी.; डिस्ट्रिक्ट जज्ज कोल्हापूर यांच्याशीं वर्गबंधु या नात्यानें स्नेह जुळला व तो अखेरपर्यंत कायम राहिला. गणमात्राशीं खेळण्याचा नादही त्यांना याच संधिकालांत लागला असावा, असा तर्क

आहे. दुर्दैवानें त्यांची त्या वेळची कविता आज उपलब्ध नाहीं. कांहींशा लहरी स्वभावामुळें व कांहीं परिस्थितिभेदामुळें, त्यांनीं आपलीं कित्येक काव्यपत्रें नष्ट करून टाकलीं होतीं. त्यांचें 'देवगिरी' नामक ७।८ शें श्लोकांचें एक ऐतिहासिक काव्य त्यांनीं कांहीं कारणामुळें जाळून टाकलें ! उपरोक्त कालांतील कवितांचा तसाच प्रकार झाला असल्यास सांगवत नाहीं. कागल येथें इंग्रजी चवथ्या इयत्तेत असतां, त्यांचे वृद्ध वडील निवर्तले व त्यांचा जिव्हाळयाचा एक आधार कायमचा नाहींसा झाला. या गोष्टीचा त्यांच्या भावनापूर्ण व निसर्गकोमल मनावर फारच तीव्र परिणाम होऊन त्यांना चालू जीवनक्रमांत मौज वाटेनाशी झाली. त्यांच्या हृदयांत या प्रसंगानें एकप्रकारची वैराग्यबुद्धि जागृत होऊन फावल्या वेळांत तुकारामाचे अभंग वाचावे, देवाचीं संस्कृत-प्राकृत स्तोत्रें म्हणावीं आणि अशा रीतीनें आयुष्याचा वेंच करावा, असें ठरवून तो प्रकार त्यांनीं आचरणांतही आणला ! याच संधीस शाळेंतील मुख्य अध्यापकानें त्यांना स्कॉलरशिप देण्याच्या कामीं पक्षपात केल्याचा त्यांना संशय आल्यावरून त्यांच्या विरक्तींत अधिकच भर पडली व इंग्रजी चार इयत्ता पूर्ण झाल्यावर त्यांनीं शाळेची कायमची रजा घेतली. मनाच्या शांतीसाठीं ते नरसोबाच्या वाडीस जाऊन दत्तसेवेला लागले. सकाळीं देवासमोर गुरुचरित्राचें पारायण करावें, दुपारीं साधुसंतांचे ग्रंथ वाचावेत व रात्रौ देवाचा स्तोत्रपाठ गावा, असा त्यांचा तेथील वर्तनक्रम असे. त्यांचा वर्तनक्रम पाहून त्यांचे आप्तेष्ट म्हणत कीं, हा दुसरा एकनाथमहाराज होणार ! अशा रीतीनें थोडासा काल मागें पडल्यावर वरील ठिकाणींच त्यांच्या कुटुंबापैकीं एक व्यक्ति एकाएकीं निवर्तल्यामुळें, त्यांचें मन तेथेंही रमेनासें झालें. लागलीच पुन्हा कागल येथें येऊन त्यांनीं व्हर्नाक्युलर फायनल परीक्षेची तयारी जोरानें चालविली. शेवटीं सदर परीक्षेंत उत्तीर्ण होऊन कोल्हापूर केंद्रास त्यांचा क्रमांक पहिला आला !

वरील अभ्यासक्रम चालू असतां त्यांची कवितादेवीची उपासना थोड्याफार प्रमाणांत चालूच होती. तिला पूर्ण वाव मिळण्याचा हा संधिकाल होता. आधुनिक भिन्न भिन्न कवींच्या काव्यकृति गाव्या, त्यांचा तौलनिक पद्धतीनें आपल्या मनाशींच विचार करावा, त्यांतच रममाण व्हावें आणि त्याच आनंदवैभवांत स्वतःही कांहीं लेखन करावें, अशी आयुष्याची निरामय वसंतश्री त्यांच्या हृदयपीठावर हळुहळू विराजमान होऊं लागली होती. परंतु, 'सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः' या न्यायानें

त्यांना आतां तनुनिर्वाहाचें साधन पहाणें अवश्य होतें. त्यासाठीं त्यांनीं अल्प-वेतनाची शिक्षकाचीच नौकरी पसंत करून ते सुमारें १९०५ सालीं चिकोडी तालुक्यापैकीं कुन्नूर गांवीं मराठी शाळेंतील असिस्टंट मास्तराच्या जागेवर हजर झाले. अल्पवेतनी शिक्षकाची जागाच पसंत करण्यांत त्यांचा हा हेतु होता कीं, नौकरीचा मर्यादित काल भरून दिल्यावर आपला आवडीचा काव्यव्यासंग निरा-बाधपणें चालूं शकेल. खऱ्या कलावंतानें अर्थदास होतां कामा नये. जो तसा होऊन स्वतःच्या कलेशीं पराङ्मुख होतो, तो खरा कलावंतच नव्हे, असें त्यांचें प्रारंभींच मत बनलेलें असून तें शेवटपर्यंत तसेंच होतें. आणि, या बाबतींत त्यांची वर्तणूकही आमरण तदनुषंगीच होती. अर्थदास होऊन स्वतःच्या काव्यकलेला पाठमोरे झालेल्या कविजनाबद्दल आपलें मत त्यांनीं एके ठिकाणीं खालीलप्रमाणें व्यक्त केलें आहे:

कोणी विश्रम सोडुनी अनुदिनीं द्रव्यार्जनीं गुंगले
कोणी स्वोदरपोषणांतच सदा मोहान्धसे राहिले
कोणी क्षुद्र नटांसवें विहरुनी कालव्यया साधिती

*　　　*　　　*

मी त्यांना न म्हणें कवी, रति नसे स्वीयोधर्मीं ज्या जनां

*　　　*　　　*

ज्यांना अल्पहि मोह दूर करितो श्रीशारदासेवनीं
त्यांना केंविं म्हणूं कवी ! उघड तीं धिक् धिक् पिशाचें जनीं !

वरील पदपंक्तींतील सडेतोड अभिप्राय कांहींसा कठोर दिसत असला तरी तो खऱ्या कलावंतांच्या दरबारांत मंजूर झाल्याशिवाय राहणार नाहीं, असें वाटतें.

कुन्नूर येथील सुमारें दोन वर्षांच्या अवधींत त्यांनीं आपला काव्यलेखनाचा व्यवसाय मोठ्या उत्साहानें सुरू केला. परंतु, त्यांत त्यांचें पूर्ण समाधान होईना. कारण, संस्कृत भाषा ही आधुनिक मराठी भाषेची साक्षात् किंवा परंपरेनें जननी असून तिचा अल्पमात्र तरी प्रसाद स्वतःला मिळाल्याशिवाय आपली कविता भाषावैभवाच्या दृष्टीनें सर्वांगीण होणार नाहीं, असें त्यांच्या मनानें घेतलें. एकादी गोष्ट मनांत आल्यास तिच्या कार्यवाहीस उशीर लावणें, हें त्यांच्या गांवींच नव्हतें. लागलीच सुमारें दोन वर्षांची बिनपगारी रजा घेऊन ते तडक सांगली येथील संस्कृत पाठशाळेंत प्रविष्ट झाले. येथें त्यांनीं रघुवंशादि पंचमहाकाव्यांचा प्राचीन

पद्धतीप्रमाणें अभ्यास करून वैयाकरण सिद्धान्तकौमुदीचाही बराचसा भाग आत्मसात् केला. सांगली येथें असतांना, त्यांना त्यांचे वडील बंधु नारायणराव यांची बरीचशी आर्थिक मदत होत असून रा०सा०चव्हाणही स्वतःला मिळणाऱ्या शिष्यवृत्तीमधून त्यांना मधून मधून द्रव्यसाहाय्य करीत ! याच सुमारास, इंचलकरंजीचे विद्वान् अधिपति श्री० बाबासाहेब घोरपडे यांना त्यांनीं संक्रांतीच्या निमित्तानें कविताबद्ध तिळगूळ पाठविला होता. श्रीमंतांना या नवकवीचा काव्यविषयक अभिनिवेश विशेष पसंत पडून त्यांनीं त्याला शिष्यवृत्तीवजा कांहीं मदत देण्याचें अभिवचन दिलें व तें कार्यवाहींतही आणिलें. या गुणगौरवानें रेंदाळकरांना सात्त्विक आनंद वाटणें सहजसुलभ आहे. ते सांगली येथें श्री० कुंटे यांच्या वाड्यांत राहात असत आणि, तेथेंच त्यांचा श्री० वामनरावजी कुंटे यांच्याशीं स्नेहसंबंध जुळून येऊन तो त्यांच्या पश्चात्‌ही एकसारखा वर्धिष्णुच होत आहे !

पुढें १९०९ सालच्या सुरवातीस कांहीं अडचणीमुळें त्यांना सांगली सोडावी लागून ते कोल्हापुर येथें येऊन राहिले. तेथील व्याकरण व वेदान्त विषयांतील जाडे पंडित व त्यांचे आप्त कै० बाळशास्त्री हुपरीकर, राजाराम कॉलेजांतील संस्कृत विषयाचे प्रोफेसर यांच्यापाशीं वै० सि० कौमुदीचा उर्वरित भाग त्यांनीं वाचून पुरा केला. संस्कृत भाषेविषयींची तीव्र लालसा अशा रीतीनें पूर्ण झालेली पाहून त्यांना किती आनंद वाटला असेल, हें कल्पनेनेंच जाणलें पाहिजे. असो- इतक्या अवधींत शास्त्रीबुवांना रेंदाळकरांच्या पदलालित्यादि गुणांनीं मंडित झालेल्या कवितेचा बराचसा परिचय झाला होता व ते त्याबद्दल वारंवार प्रशंसोद्गार काढून त्यांना अंतःकरणपूर्वक प्रोत्साहन देत असत. रेंदाळकरांच्या काव्यगुणा-विषयीं या जाड्या पंडिताचा अभिप्राय काय होता, हें पाहाणें झाल्यास, तो १९१० सालीं खुद्द रेंदाळकरांनीं प्रसिद्ध केलेल्या 'मंदार-मंजरी'त पाहावयास मिळतो. विस्तारभयास्तव तो येथें देतां देत नाहीं, याबद्दल वाईट वाटतें.

या वेळीं 'विजयी मराठा' नामक एक साप्ताहिक पत्र कोल्हापुरांत प्रसिद्ध होत असे. त्यांत 'मंदार' या टोपण नांवानें रेंदाळकर आपल्या कविता बहुतेक प्रत्येक आठवड्यास प्रसिद्ध करीत व मधून मधून कांहीं गद्यलेखही लिहीत. हीच स्फुट कविता संकलित करून त्यांनीं १९१० सालीं आपली 'मंदार-मंजरी' प्रसिद्ध केली. याच सालीं, येथील शंकराचार्यपीठामार्फत 'धर्मविचार' नांवाचें मासिकपत्र काढण्याचें ठरून त्याच्या सहसंपादकाच्या जागीं कै० बाळशास्त्री हुपरीकर यांच्या शिफारशीनें

त्यांची योजना करण्यांत आली. मुख्य संपादक जरी वेगळे होते, तरी मासिकाचें लेखनविषयक सर्व उत्तरदायित्व कै० रेंदाळकर यांच्यावरच होतें व तें त्यांनीं अत्यंत समाधानकारक रीतीनें पार पाडिलें, यांत शंका नाहीं. प्रस्तुत मासिकांतील त्यांचे 'वैदिक स्त्रिया' 'स्त्रियांची परवशता' 'शकुंतला आणि मिरांडा' वगैरे चिंतनीय लेख त्यांच्या भविष्यत्कालीन कीर्तिमंदिराला निःसंशय आधारभूत झालेले आहेत. वरील लेखांबद्दल कांहीं तत्कालीन विद्वान् लोकांकडून त्यांना आलेलीं प्रशंसापूर्ण पत्रें प्रस्तुत लेखकानेंही पाहिलीं असून सदर लेखांतील कांहीं महत्त्वाचीं अवतरणें मुंबई येथील 'सुबोधपत्रिके'नें उद्धृत करून आपल्या वाचकांस नजर केलीं होतीं ! या सुमारास त्यांच्या काव्यगंगेचाही प्रवाह अदम्य वेगानें वाहूं लागला होता. त्या वेळचें कोणतेंही एकादें नियतकालिक चाळून पाहिल्यास, त्यांत रेंदाळकरांची काव्य-कृति आलेली नाहीं, असें वहुशः आढळणार नाहीं. त्यांच्या अंगचें हें गद्यपद्य-लेखनविषयक जन्मजात नैपुण्य पाहून त्या वेळचे जगद्गुरुपीठाचे अधिपति अत्यंत खुष झाले व त्यांनीं त्यांना एक जाहीर समारंभ करून महावस्त्रासह **कविभूषण** ही सार्थ पदवी बहाल केली ! तथापि, त्यांनीं या पदवीची आपल्या नांवामागें किंवा पुढें केव्हांच जोडणी केली नाहीं, ही गोष्ट त्यांच्या लौकिक कीर्तिविषयक प्रतियोगितेची सामान्यपणें गमक आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

असें उत्साहपूर्ण व आनंदमय वातावरण चौफेर पसरलें असतां उपरोक्त सालींच ते विवाहसूत्रानें वद्ध झाले. पतिपत्नीप्रेम हा अखिल प्रेमजाताचा सम्राट् असून त्यांतच परमेश्वरी निरामय आनंदमयतेचीं प्राथमिक चिन्हें अधिष्ठान पावलेलीं असतात. स्त्रीपुरुषांचीं भिन्न हृदयें वैवाहिक विधीनें विशिष्ट प्रमाणांत परस्परांच्या शेजारीं उभीं करून व त्यांना निर्मल प्रेमाच्या टिकाऊ पदपथांची कायमची जोड देऊन विधात्यानें ही एक चिरंतन सोपानपरंपराच बनविली असून, अखिल मानववंशानें तिच्यावर चढून ईश्वराच्या परमोच्च आनंदमंदिरांत प्रविष्ट व्हावें असाच त्याचा उदात्त अभिप्राय असला पाहिजे. रेंदाळकरांच्या भावनागर्भ व स्वभावप्रेमळ हृदयाला या गोष्टीची जाणीव कां बरें नसेल ? शारदेच्या रम्य उपवनांत विहार करूं लागल्यानंतर त्यांच्या मनाला हा कालपावेतों दुःखाचा वारा तिळमात्रही लागला नव्हता. सारी सृष्टि अव्यंग आनंदानें व अकृत्रिम सौंदर्यानें नटली असून तिचा एकमात्र उपभोक्ता मीच आहें, असें त्यांना वाटे. त्यांची 'माझ्याच सुखासाठीं' (प्र.खं. पृ.१०) ही कविता या दृष्टीनें एकवार अवश्य वाचनीय आहे. अर्वाचीन कविकुलगुरु केशवसुत यांच्या

कवितेचे ते एकनिष्ठ चहाते होते. त्यांचीं दुःखपर्यवसायी गीतें वाचून त्यांचें हळवें मन कळवळून जाई. अशा प्रसंगीं ते म्हणत कीं, 'अशीं शोकपूर्ण संगीतें कवीला कशीं लिहितां येतात, ईश जाणे. आपणाला तर हीं मुळींच साधणार नाहींत. आपण एकादे वेळीं अशी कविता लिहावयास घेतली तर ती न कळतच आनंदपर्यवसायी होते !' पण, हाय,– ही त्यांची आनंदी वृत्ति अखेरपर्यंत अशीच टिकून राहिली असेल काय ?

'धर्मविचार' मासिक सुमारें दोन वर्षे चालून अखेर बंद पडलें. त्यामुळें, रेंदाळकरांना आपली सोय अन्यत्र पाहाणें भाग होऊन त्यांनीं कै० का० र० मित्र यांस पत्र पाठवून याविषयीं विचारिलें. कै० मित्रांना त्यांच्या गुणांचा अगोदरच परिचय झाला असल्यामुळें, त्यांनीं त्यांना आपल्याकडे तत्काल बोलावून घेतलें. मुंबई म्हणजे पुण्याप्रमाणेंच विद्वान् लोकांचें जवळजवळ माहेरघर, आणि मनोरंजन म्हणजे शुक्लेंदुवत् प्रतिक्षणीं वृद्धिंगत होणारी एक वाङ्मयविषयक वजनदार संस्था ! अशा स्थलीं व अशा संस्थेंत राहण्याची संधि स्वतःला मिळाली, याबद्दल त्यांना आनंद वाटणें साहजिक होतें. शिवाय, आपल्या आवडत्या ललितवाङ्मयसेवेच्या स्थिरविकासाला यापेक्षां दुसरें चांगलें क्षेत्र क्वचित्च मिळूं शकेल, असेंही त्यांना वाटल्यास फारसें नवल नाहीं. असो. कार्यकर्तृत्वाच्या नव्या दमानें ते वरील संस्थेंत दाखल झाले खरे; परंतु, तेथें 'मनोरंजना'चीं मुद्रितें शुद्ध करण्यांतच बराचसा काल जाऊं लागल्यामुळें, त्यांची वृत्ति थोडीशी बेचैन झाली. तथापि, त्यामुळें त्यांचा काव्यलेखनाचा जोम मुळींच मंदावला नाहीं. त्यांच्या कवितेच्या प्रथम खंडांत 'काव्यकुसुममाला' व 'कर्णमंगल' या शीर्षकांखालीं मुद्रित केलेली स्फुट कविता त्या वेळींच लिहिली गेली आहे. आंग्लकवि टेनिसन् यांच्या एका काव्यप्रकरणावरून रूपांतरित केलेलें 'सारजा' नामक सुरस खंडकाव्यही याच संधीस जन्म पावलें. मध्यंतरीं बंद पडलेला 'धर्मविचार' पुनः कोल्हापुरास सुरू झाला. त्यालाही नेहमींचा व्यवसाय संभाळून गद्यपद्यात्मक लेखांनीं ते निरपेक्षपणें वारंवार मदत करीत. त्यांचा अदम्य कार्याभिनिवेश पाहून कै० मित्रांनीं पुढें लौकरच त्यांना 'मनोरंजना'चे साहाय्यक केलें.

याच सुमारास निर्यमक कवितेविषयीं वाद उत्पन्न होऊन त्याला बरेंचसें तीव्र स्वरूप प्राप्त झालें. सन १९१० सालीं प्रसिद्ध झालेल्या 'मंदार-मंजरी'त व त्यापुढील एक दोन वर्षांच्या मुदतीनें 'मनोरंजन' 'विविध–ज्ञानविस्तार' वगैरे वजनदार

नियतकालिकांतून त्यांची वरीचशी नियमक कविता प्रसिद्ध झाली होती; परंतु त्या वेळीं या वादाला मुळींच तोंड लागलें नव्हतें. किंवहुना, त्यांच्या एकंदर काव्यकृतीची वहुतांशीं सर्वत्र वाहवाच होत होती. ते 'मनोरंजन'कार्यालयांत राहूं लागल्यावर, मनोरंजनांत प्रसिद्ध होणाऱ्या कवितांची निवड करण्याचें काम के० मित्रांनीं सर्वस्वीं त्यांच्यावरच सोंपविलें. 'पाठविलेल्या कवितेला प्रसिद्धिस्थल देऊन नवकवीला उत्तेजन द्या' अशी याचना करणाऱ्या खंडोगणती हंगामी कवींशीं त्यांचा येथें साक्षात्, परंपरेनें वा पत्रद्वारें वारंवार संबंध आला. ज्याची कविता नापसंत ठरून संपादकांकरितां ते स्वतःच्या स्वाक्षरीनें आभारपूर्वक परत करीत त्या सर्व कविरायांचीं हृदयें त्यांच्याविषयीं संतप्त होत ! परंतु, ऋजुस्वभावी रेंदाळकरांना या गोष्टीची गंधवार्ताही नव्हती ! तथापि, याचा परिणाम असा झाला कीं, त्यांचें वैरिवृंद ग्रीष्मकालांतील मत्कुणांच्या अलोट विणीप्रमाणें एकाएकीं चौफेर पसरलें आणि, या वैरापोटींच नियमक कवितेचा अर्थशून्य वाद जन्मास आला ! प्रस्तुत वादाच्या उत्पत्तीचा इतिहास हा असा आहे. रेंदाळकरांनीं या वादाविषयींचें आपलें प्रांजल व निर्भीड मत फक्त एकवारच प्रसिद्ध केलें असून तें 'विविध-ज्ञानविस्तारा'च्या तत्कालीन अंकांत आलेलें आहे. त्यानंतर ते या शुष्क वादांत कधींही पडले नाहींत. त्यांचें या बावतींत असें स्पष्ट मत होतें कीं, नियमक कवितेचें वैपुल्य हेंच रिकामटेकड्या टीकाकारांचीं तोंडें वंद पाडण्याचें मुख्य हत्यार होय. लोकप्रियतेला वळी न पडणारा असा एकादा दुसरा हत्यारवंद शिपाईदेखील हें हंगामी काहूर शांत करण्याच्या कामीं पुरेसा आहे ! त्यांच्या या म्हणण्यांत अर्थ नाहीं, असें त्यांच्या अकारण हितशत्रूंवांचून दुसरा कोणी सहसा म्हणेल, असें निदान मला तरी वाटत नाहीं. ते पुढें आणखी कांहीं काल जगते तर त्यांनीं आपलें मत खास अर्थगामी करून दाखविलें असतें. कारण, त्यांचा काव्यनिर्माणविषयक जबरा व्यासंगच या विधानाला ढळढळीत पुरावा आहे. फार कशाला, त्यांनीं आपल्या अल्प जीवनकालांतही प्रज्वलित करून ठेविलेली नियमक कवितेची विद्यमान दीपिकाच, कवितेविषयीं त्या नमुन्याचा प्रयत्न करूं इच्छिणाऱ्या भविष्यत्कालीन कविजनांना त्यांच्या मार्गांत बहुतांशीं मार्गदर्शक होईल, यांत तिळप्राय संशय नाहीं. मग हें मत कोणाला मान्य होवो वा न होवो. माझे विद्वान् मित्र श्री० ग. त्र्यं. माडखोलकर यांनीं, 'रेंदाळकरांच्या कविते'च्या प्रथम खंडास जोडलेल्या प्रस्तावनेंत या मुद्द्यासंबंधानें सांगोपांग विवेचन

केलें असून तें पूर्वग्रहदूषित न झालेल्या शिष्टजनांना सर्वांशीं संमत होईल, अशी आशा आहे.

रेंदाळकरांचा 'मनोरंजना'शीं ऋणानुबंध सुमारें तीन वर्षेंच टिकला. युरोपांतील त्या वेळच्या दीर्घकालीन महायुद्धाचा वणवा अधिकाधिक भडकत जाऊन त्याची तीव्र आंच हिंदुस्थानांतील लहानमोठया कारखान्यांना थोडयाफार प्रमाणांत लागूं लागली. अर्थातच 'मनोरंजना'सारख्या चिमुकल्या संस्थेलाही ती लागल्याशिवाय राहिली नाहीं. त्यामुळें, कै० मित्रांना काटकसरीकडे लक्ष देणें भाग पडून त्यांनीं आपल्या कारखान्यांतील कांहीं लोक कमी केले व त्या प्रसंगींच त्यांना रेंदाळकरांनाही मोठया नाखुषीनें रजा द्यावी लागली. प्रस्तुत परिस्थितीमुळें त्यांचा व मनोरंजनसंस्थेचा संबंध जरी कायमपणें तुटला तरी कै० मित्रांविषयीं त्यांना वाटणारा स्नेहादर व त्यांच्याविषयीं मित्रांना वाटणारा आत्मीयभाव हे दोन अखेरपर्यंत कायम राहिले, हें प्रस्तुत लेखकाला पूर्णपणें माहीत आहे. असो. पुढें थोडयाच दिवसांनीं त्यांना पुण्याच्या 'करमणूक' पत्राचें संपादकीय काम मिळून ते त्यासाठीं पुण्याला निघून गेले. 'करमणुकी'तील लेखनाचें बहुतांशीं सारें उत्तरदायित्व कै० हरिभाऊ आपट्यांनीं त्यांच्यावरच सोंपविल्यामुळें, त्यांना निरतिशय आनंद वाटून या चिरवांच्छित वाङ्मयसेवेच्या परिपूरक विस्तृत क्षेत्रलाभानें त्यांच्या जन्मजात उत्साहांत अधिकच भर पडली. याच वेळीं, महाभारतकालीन समाज, त्याची धार्मिक, सामाजिक, राजकीय वगैरे परिस्थिति इत्यादि गोष्टींचा निदर्शक असा एक विस्तृत ग्रंथ, महाभारताधारेंच लिहावयाचें हरिभाऊंच्या मनांत घोळत होतें, म्हणून त्या दृष्टीनें महाभारतांतील त्या त्या विभागांचीं टांचणें करण्याचें महत्त्वाचें कामही त्यांनीं रेंदाळकरांवरच सोंपविलें. हरिभाऊंच्या अनपेक्षित निधनानें हा ग्रंथ पाहाण्याचें भाग्य आमच्या वांट्यास आलें नाहीं हा भाग वेगळा; परंतु येथें निर्दिष्ट करावयाची गोष्ट ही कीं, सदरचें किचकट काम व दर आठवड्यास प्रसिद्ध होणाऱ्या'करमणुकी'ला वेळच्या वेळीं लेख पुरविण्याची जबाबदारी हें द्विविध कार्य संभाळूनही त्यांनीं आपला आवडता काव्यव्यासंग मोठया सपाटयानें चालू ठेविला होता. त्यांच्या कवितेच्या प्रथम खंडांत 'काव्यगुंफा' या शीर्षकाखालीं मुद्रित केलेलीं संगीतें याच वेळीं लिहिलीं गेलीं असून मायकेल मधुसूदन दत्तांच्या 'व्रजांगने'चें 'विरहिणी राधा' या नांवानें प्रसिद्ध झालेलें सुंदर रूपान्तरही याच कालांत जन्म पावलें आहे. वंगनाटयकवि द्विजेन्द्रलाल रॉय यांच्या 'चंद्रगुप्त' नाटयकृतीचें

'सैर्यविजय' नामक नाटयरूप रूपान्तर त्यांनीं 'करमणुकीं'तून खंडशः प्रसिद्ध केलें असून तेंही अर्थात् याच कालांत लिहिलें गेलें आहे. प्रस्तुत नाटकाच्या व्यवस्थित मांडणीचें यश जरी मूळ वंगकवीला असलें तरी, रेंदाळकरांनीं त्याच्यावर मराठी भाषेचा चढविलेला ठाकठिकीचा पेहराव महाराष्ट्रवाङ्मयांत बराचसा चिरस्थायी होईल, यांत शंका नाहीं. माझे मित्र नाटयकलाविशारद श्री० गोविंदरावजी टेंबे यांच्या त्या वेळीं विद्यमान असलेल्या श्रीशिवराज संगीत नाटक मंडळींनीं प्रस्तुत नाटक रंगभूमीवर आणण्याचें निश्चित केलें होतें. परंतु, नाट्यकलेच्या दुर्दैवानें, त्याच सुमारास त्यांचा वरील मंडळींशीं संबंध सुटला व त्यावरोबरच प्रस्तुत नाटकाचा प्रश्नही जागच्या जागींच राहून गेला. परंतु, अजूनही या नाटकाविषयीं प्रसंगोपात्त प्रश्न निघाल्यास, असलें सुंदर नाटक रंगभूमीवर आणावयाची संधि स्वतःला घेतां आली नाहीं, याबद्दल ते मनःपूर्वक खेद प्रदर्शित करतात. कुशल नाटककार, जाणता नट व रंगभूमीचा खरा अंतरंगज्ञ या त्रिविध नात्यानें लोक-विश्रुत असलेल्या या गृहस्थांचा वरील अभिप्राय प्रस्तुत नाटकाच्या चांगुलपणाचा निदर्शक नाहीं, असें कोण म्हणूं शकेल ! असो. कोल्हापुर येथें असतां, त्यांनीं बंगाली भाषेचें ज्ञान संपादिलें होतेंच. आणि, आतां येथें इंग्रजी भाषेचा व्यासंगही त्यांनीं जोरांत सुरू करून त्यांतही ते यशस्वी झाले. या उभयविध भाषाज्ञानाचा त्यांना 'करमणुकी'च्या लेखनकार्यांत फार उपयोग झाला.

पुढें करमणूक पत्रही बंद पडलें. यालाही कारण, युरोपांतील कुजत पडलेलें महायुद्ध व तज्जन्य भीषण महर्घता हेंच होय. शिवाय, करमणुकीचें काम पुष्कळ अंशीं समाधानकारक होत असल्याचें पाहून हरिभाऊंच्या शिणल्या भागलेल्या लेखणीनें याच संधीस विश्रांति घेण्यास प्रारंभ केला. व या गोष्टीचाही थोडाबहुत परिणाम या पत्रावर झाला असावा असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. अखेर पुरेशा लोकाश्रयाभावीं 'करमणूक' कायमची बंद करावी लागली. तथापि, हरि-भाऊंना रेंदाळकरांची कार्यकुशलता व अंगीकृत कार्याविषयींची निरलसवृत्ति पूर्ण पटली असल्यामुळें, त्यांनीं महाभारतावरील ग्रंथलेखनाच्या कार्यांत साहाय्यक म्हणून आपल्याजवळ रहावयास त्यांना मनःपूर्वक सांगितलें. परंतु, रेंदाळकरांच्या मानी व निःस्पृह वृत्तीला तें बरें न वाटून, त्यांनीं हिंगणें येथील महिलाश्रमांत शिक्षकाची नौकरी मिळविली व ते तेथें रहावयाला गेले. त्यांच्या कवितेच्या प्रस्तुतच्या खंडांत प्रथमच प्रसिद्ध होत असलेलें 'यमुना' नामक खंडकाव्यही या ठिकाणींच अवतीर्ण झालें

आहे. हिंगणें येथें त्यांना वर्ष दीडवर्षावर रहातां आलें नाहीं. तेथील मलेरिया त्यांना व त्यांच्या कुटुंबांतील माणसांना स्वस्थ बसूं देईना; त्यामुळें, तेथील संबंध सोडणें भाग पडून ते पुनः कै० हरिभाऊंनीं फार आग्रह केल्यामुळें, त्यांच्याजवळ येऊन राहिले. परंतु, पुढें थोड्याच महिन्यांनीं हरिभाऊ दिवंगत झाल्यामुळें, त्यांना अन्यत्र व्यवसाय पाहाणें भाग पडून ते मुंबई येथील लक्ष्मीनारायण प्रेसमध्यें नौकरीनिमित्त येऊन राहिले. परंतु, येथेंही त्यांना २।३ महिन्यांवर रहातां आलें नाहीं. हिंगणें येथें जडलेल्या मलेरियानें मुंबईस एकाएकीं विशेष जोराची उचल खाऊन त्यांना अंथरुणास खिळवून टाकिलें. त्यामुळें, ते मुंबईस कायमचा राम राम करून औषधोपचारासाठीं म्हणून इचलकरंजी येथें सहकुटुंब येऊन राहिले. येथें आल्यावर डॉक्टरी तपासांत स्वतःच्या देहांत दुस्साध्य क्षयरोगानें ठाणें दिलें असल्याचें त्यांना समजून चुकलें. तथापि, त्यांच्या मुद्रेवर नेहमीं खेळणाऱ्या अकुतोभय वृत्तींत, या प्रसंगींही तिळमात्र फरक पडला नाहीं. त्यांचीं दोन गोजिरवाणीं अर्भकें व बहुतेक आप्त-स्वकीयांच्या रोषास पात्र झालेली त्यांची पत्नी, या साऱ्यांचा भार सर्वस्वीं त्यांच्यावरच होता. अशा स्थितींतही त्यांच्या मनाची साम्यावस्था पूर्ववत् टिकलेली पाहून त्यांच्या जवळच्या मंडळींला आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

इचलकरंजी येथें अनुकूल हवापाणी, वैद्यकीय योग्य उपचार व जिवलग मित्रांचें भरींव साहाय्य यांच्या योगानें त्यांच्या प्रकृतीस आरंभीं चांगलाच आराम वाटूं लागला. पुढें २।३ महिन्यांच्या अंतरानें, आपल्या नेहमींच्या बाणेदार वृत्तीस अनुसरून त्यांनीं सांगलीच्या एका परिचित वजनदार गृहस्थाच्या ओळखीनें सांगली येथेंच शाळाशिक्षकाची नौकरी मिळविली; परंतु ती त्यांना दोन महिन्यांवर पचवितां आली नाहीं. योग्य औषधोपचार व अनुकूल हवा यांच्या जोरावर जरी त्यांना सकृद्दर्शनीं कांहींसा आराम वाटला तरी तो टिकाऊ नव्हता. त्यांची शरीरयष्टि अविश्रांत शारीरिक श्रमांनीं व स्वसंवेद्य मानसिक यातनांनीं आंतून बाहेरून एकसारखी पोखरली जाऊन कायमची जर्जरित झाली होती. त्यामुळें, येथील शिकविण्याचे श्रम तिला सहन न होऊन त्यांचा थोडासा दबलेला आजार पुन्हा डोकें वर काढूं लागला. त्यामुळें, ते पुनः पूर्ववत् इचलकरंजी येथें येऊन राहिले. याच सुमारास त्यांचें कुटुंब स्वर्गवासी झालें. रेंदाळकरांना साऱ्या आयुष्यांत त्यांच्या रेखीव काव्यमय कल्पनेप्रमाणें त्यांच्या कुटुंबाकडून सुख मिळालें नाहीं. किंबहुना त्यांच्या विचित्र स्वभावामुळें, त्यांना हरेक घडीला त्रासच सोसावा लागला आणि

-यामुळें ते प्रपंचांत नेहमीं उदासीनच असत. तथापि, कुटुंबाचा हा कायमचा वियोग त्यांच्या शिरीषकोमल हृदयाला जाणवल्याशिवाय कसा बरें राहील ?

पुढें थोडेंसें बरें वाटूं लागल्यावर, त्यांचे मित्र रा० सा० चव्हाण यांच्या आग्रहाच्या बोलावण्यावरून पेटा गडइंग्लज येथें ते आपल्या दोन मुलींसह जाऊन राहिले; परंतु पुढें थोड्याच दिवसांनीं तेथें मुसळधार पाऊस सुरू झाला. तो त्यांच्या अंतःक्षीण प्रकृतीला बिलकूल मानवला नाहीं. त्यांचा आजार एकाएकीं उलटून आशेचें आकाश निराशेच्या ढगांनीं चौफेर काळवंडून गेलें. अशा कष्टमय स्थितींत ते कांहीं दिवसांनीं कोल्हापुर येथील टेंबलाई टेकडीवर क्षयी लोकांकरितां बांधलेल्या सॅनिटोरिअम्‌मध्यें सुमारें १५ दिवस येऊन राहिले. परंतु, ताप, खोकला व घर्मस्राव या त्रिविध विकारांच्या संधीभूत आक्रमणानें केवळ अस्थिमात्रावशेष झालेल्या त्यांच्या जर्जरित देहाला हा उपचार फारच उशिरां मिळाल्यामुळें, त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं, रक्तशोषणामुळें हलक्या झालेल्या देहानें व निराशादि आत्यंतिक कष्टांनीं भारावलेल्या हृदयानें आपली जन्मभूमि जो रेंदाळ गांव तेथें ते निघून गेले आणि हाय, हाय ! ते तेथेंच कायमचे राहिले. अखेर तो भीषण वज्रघाती दिवस उगवला. ता. २२ नोव्हेंबर १९२० हा तो दिवस होय. विकराल कालकीटानें मानसिक व शारीरिक तीक्ष्ण वेदनांच्या सहस्रावधि दंतांनीं आंतून-बाहेरून पोखरून व कुरतडून टाकलेली त्यांची शरीरयष्टि, या दिवशीं दुपारीं २–२॥ वाजण्याच्या सुमारास चिरशांत झाली. सर्वस्वीं त्यांच्यावरच अवलंबून असलेलीं त्यांचीं आत्मनिर्विशेष 'लिली–माली' हीं अजाणतीं दोन अर्भकें कायमचीं पितृहीन झालीं. त्यांच्या मित्रमंडळाचें हृदयाकाश पूर्ण निराशेच्या ढगांनीं काळवंडून जाऊन त्यांच्या नेत्रमार्गानें अश्रूंच्या पर्जन्यधारा अविरत वाहूं लागल्या. त्यांची प्राणज्योति परंज्योतींत कायमपणें विलीन झाली खरी; परंतु, महाराष्ट्र-शारदेच्या विलासमंदिरांतील एक भव्य दालन कायमचें ओस पडलें. सरस्वतीदेवीच्या कंठांतील रत्नमाला भंग पावून तिच्यांतील एक अनर्घ्य रत्न सदांचें हरपलें आणि कविता-वधूच्या शिबिकेपुढें उजळणाऱ्या अनंत दीपिकांमधून अखंडपणें उजळणारी एक ज्वलद्दीपिका कायमची मालविली गेली !

रेंदाळकरांना दोन मुली व एक मुलगा अशीं तीन अपत्यें झालीं. पैकीं आज दोन मुली विद्यमान असून त्या त्यांचे चुलते श्री० नारायणराव रेंदाळकर यांच्यापाशीं असतात. आपल्या मुलींना आपण आर्यस्त्रियांचा एक सर्वांगीण नमुना करणार

अशी महत्त्वाकांक्षा ते व्यक्त करीत. पण, ती त्यांच्या शरीराबरोबरच अदृश्य झाली. प्रो॰ कर्वे यांच्या महिलाश्रमांत या दोन्ही मुलींना ठेवण्याचा त्यांच्या मित्रांचा विचार आहे.

संस्कृत कवींपैकीं कालीदास व बाण आणि पाश्चात्यांपैकीं वर्डस्वर्थ व शेले त्यांना फार आवडत असत. प्राचीन मराठी कवींपैकीं ज्ञानेश्वर व मोरोपंत त्यांना अनुकरणीय वाटत. आधुनिक कवींपैकीं केशवसुत त्यांचे सर्वस्वी प्यार होते. रे॰ टिळकांच्या प्रासादिक वाणीनें ते फार खूष होत. शिवाय, त्यांच्या कवितेच्या प्रथम खंडांत 'सत्कविवंदन' ( पृष्ठ ५१ ) व 'सत्कवि माधवानुज यांचा मृत्यु' ( पृष्ठ २०२ ) या शीर्षकांखालीं लिहिलेल्या गीतांत त्यांनीं कित्येक आधुनिक कवींचा प्रेमातिशयानें उल्लेख केला आहे, तेही त्यांना प्रिय होते. त्यांची काव्यसंपत्ति भरपूर आहे. मनांतील कल्पना शब्दसृष्टींत उतरविण्यास त्यांना लवमात्रही श्रम पडत नसत. मनांत कल्पना उठतांच ते रात्रीं बेरात्रींही उठून लिहावयास बसत. त्यांचें 'बाष्पबिंदु' खंडकाव्य हें रात्रींच जन्मास आलेलें अपत्य होय. त्यांची 'सारजा' पुरी झाली नाहीं. बाणाच्या कादंबरीचें भाषांतरही अपुरेंच राहिलें. स्वतःची कविता आपल्या देखरेखीखालीं मुद्रित व्हावी, अशी त्यांची मनीषा होती, तीही अपूर्णच राहिली. पण, आतां तिच्या प्रकाशनाचें श्रेय त्यांचे मित्र श्री॰ वामनरावजी कुंटे यांनीं घेतलें असून त्यांनीं आपल्या दिवंगत मित्राचें अंशतः आनृण्य जोडलें आहे.

रेंदाळकर खरे खरे जन्मसिद्ध कवि होते. याचा अर्थ असा कीं, त्यांचें हृदय उपजतच काव्यमय होतें. प्रतिभाशक्तीच्या दृष्टीनें तत्समकालीन कवींत त्यांच्यापेक्षां कांकणभर अधिक भरणारे कवि कोणी नव्हते. असें नाहीं; परंतु, कोणत्याही सुखदुःखात्मक प्रसंगीं त्यांच्या हृदयांतील जिवंत काव्यसंगीत बिलकूल सुप्त झालें नाहीं. अंतःकरणांतील तत्त्वनिष्ठ काव्यव्यापारांचें मूर्त प्रतिबिंब बाह्य जगाच्या व्यावहारिक दर्पणांतही यथावत् उमटूं शकेल आणि तेणेंकरून या विषम जगांतही स्वर्गसाम्राज्य नांदूं लागेल, असें त्यांचें ध्येयवादी मत होतें. परंतु, केवळ बाह्य औपचारिक वर्तनक्रमांतच स्वसुख वेंचूं पाहणाऱ्या या जगांत प्रस्तुत ध्येयवादाला मुदलीं जागाच नाहीं! मनांत एक, वचनांत दुसरें व जनांत भलतेंच ही वर्तणूक जरी शिष्टसमाजांत गर्हणीय ठरली तरी तदनुसार व्यवहार न ठेवणारी व्यक्ति त्या समाजांतही नालायक ठरल्याशिवाय राहात नाहीं व या गोष्टीची सत्यासत्यता ज्यानें त्यानें स्वतःच्या

हृदयांतच शोधून पहावी. रेंदाळकरांना जगाचा हा 'वदतो व्याघात' स्वरूपाचा विपर्यस्त वर्तनक्रम ठाऊक नव्हता, असें थोडकेंच होतें! त्याची त्यांना पूर्ण जाणीव होती. तथापि, त्यांचें ध्येयनिष्ठ हृदय स्वतः आंखलेल्या मार्गापासून अखेरपर्यंत च्युत झालें नाहीं. पण त्याचा परिणाम असा झाला कीं, त्यांना या जगामध्यें निव्वळ औपचारिक व्यवहारानें लाभणारें सुख केव्हांच घेतां आलें नाहीं. किंबहुना, वेळोवेळीं दुःखाचे तीव्र कशाघातच सोसावे लागले. जगामध्यें जिकडे तिकडे केवळ उपचारांचेंच प्राबल्य झाल्यामुळें, अखिल मानवजाति स्वतःच्या माणुसकीलाही पारखी झाली असून तिच्या सामान्य व्यवहारांतही लफंगेगिरीचा शिरकाव झाला आहे, हें अत्यंत तिरस्करणीय होय; परंतु खऱ्या कविहृदयानें या लपंडावी वृत्तीपासून कोणत्याही बऱ्याबुऱ्या प्रसंगीं अलिप्तच राहिलें पाहिजे; मनांत एक व जनांत भलतें, ही वागणुकीची तऱ्हा भामट्यांच्या बाजारांत फार तर खुशाल वावरो; परंतु, कवींच्या साम्राज्यांत तिला क्षणमात्रही थारा मिळतां कामा नये, असें त्यांचें मत होतें. व तें त्यांनीं त्यांच्या समजुतीप्रमाणें शेवटपर्यंत आचरणांतही आणिलें. ते म्हणतातः

> आहे एक मनांत, तेथ भलतें दावावया लागतें—
> तो मोठा हतभाग्य! सर्वच परी आहेत लोकीं तसे
> कां लोकीं उपचार-बंड इतकें सांगा असें माजलें
> कां आचाररुचींत भेद इतका होतो? कुणाच्या बळें?
> आहे काय जनस्वभावच असा सर्वत्र घाणेरडा?
> नाहीं आत्मिक धैर्य, नीतिबलही, वागोत कैसेहि ते
> धीरांनीं पण निंद्य रूढिस पदीं संचूर्णिलें पाहिजे
> आहे आंत जसें तसेंच दिसणें, हें केवढें भूषण!

—रें. प्र. खं. पृष्ठ १४३

तत्त्वनिष्ठ व ध्येयवादी मुशाफराचें मार्गक्रमण नेहमीं अक्षुण्ण मार्गानेंच चालू असतें; पण, परंपरेच्या चाकोरींतूनच स्वतःचा गाडा हांकणाऱ्या सामान्य जनांना तें सहसा पटत नाहीं व कदाचित् पटल्यास पचवितां तरी येत नाहीं. आणि म्हणून बहुजनसमाजाची दृष्टि असल्या व्यक्तीकडे तिरस्कारगर्भ होऊन पाहूं लागते. ध्येयाच्या ध्रुवताऱ्याच्या रोंखानें पायांखालील दऱ्याखोरीं, माळरानें व कडेकपारीं बेहोषपणें तुडवीत जाणाऱ्या या प्रवाशाच्या आचार-विचारोच्चारांत समस्त

अव्यवहार्यतेचा समावेश झालेला आहे, असें अलम् दुनियेचें कायमचें मत असून ती तदनुसार त्याच्यावर वेळीं-अवेळींही कोरडे ओढण्यास मार्गेपुढें पहात नाहीं. या निंद्य प्रकारामुळेंच;—

जन विषयांतील किडे, त्यांची धाव बाह्याकडे !

*Bee*

किंवा

दुनिया कोणाची कोणाची ?
जो अपुली म्हणेल, त्याची !
गोविंदाग्रज मानी दुनिया बोटावरची थुंकी !*

अशा तऱ्हेचें आपलें स्पष्ट मत अभिजात कवींना व्यक्त करावें लागलें आहे. कै० रेंदाळकरांना जगाचा हा कटु अनुभव पदोपदीं आलेला असून तो त्यांच्या काव्यकृतींतून ठिकठिकाणीं नजरेस पडतो. परंतु, अशा तऱ्हेच्या जननिंदेनें विवश होऊन त्यांनीं आपला ध्येयनिष्ठ स्वभाव कधींच विचलित होऊं दिला नाहीं. एकादी गोष्ट स्वतःच्या मनाला पटल्यावर तिचा उच्चार व लागलीच आचार करण्याच्या कामीं त्यांनीं मार्गेपुढें कधींच पाहिलें नाहीं, व त्यामुळें, निव्वळ व्यवहारसंपादनांतच सर्व सुखाचें वैभव गोळा करूं पाहणाऱ्या उत्तान लोकांच्या दृष्टीनें त्यांचा सारा आयुःक्रम पूर्णपणें वंचित झाला आहे. परंतु त्याची त्यांनीं केव्हांच तमा बाळगिली नाहीं. आपल्या अप्रार्थित टीकाकारांना त्यांनीं खालीलप्रमाणें रोखठोक उत्तर दिलें आहे:

नाहीं पायधुळींत दीनसम मी त्यांच्या कधीं लोळलों
जे उन्मत्त म्हणून मानिति मला, गर्वांध हा जाहला;
केली न स्तुति केधवां भलतिशी सत्यार्थ संगोपुनी
माझे सद्‌गुण हेळतीं म्हणुनि जे,—धिक्कार त्यांना असो.
त्यांचें दर्शनही नको, त्यजुनियां संबंध त्यांचा, त्वरें
मी जाईन सुखें लतातरुगणीं व्यापून गेल्या वनीं
नाहीं भ्रष्ट कधीं विचारशुचिता होणार त्या सुस्थळीं
कोणी दुष्ट न दाखवील अपुलें केव्हांच काळें मुख.

---

* हे चरण भाषणप्रसंगीं गडकरी म्हणत, असें रेंदाळकर सांगत.

स्वार्थी विश्व करावया व्यथित हें येणार नाहीं कधीं
विश्वाचा न कधींहि येइल तिथें द्वेषाग्निफूत्कार तो !

—रें. प्र. खं. पृष्ठ ३६२

दिखाऊ औपचारिक वागणुकीपासून अलिप्त असलेला त्यांचा स्वभाव ज्यांना फारसा माहीत नाहीं, असे लोक त्यांच्या प्रथम भेटींत कांहीं अंशीं त्यांच्यावर असंतुष्ट होत, हें कांहींसें खरें आहे; परंतु सुदैवेंकरून पुढें परिचयांत भर पडत गेल्यास त्यांच्या स्वभावांतील उमदेपणा व सरळ भाव त्यांच्या अनुभवास आल्याशिवाय रहात नसे. त्यांच्या मित्रमंडळाला तर त्यांच्या स्वभावांतील या गुणांचा गोड अनुभव नेहमींचाच होता. परंतु, ज्याला आपण विक्षिप्त किंवा लहरी समजत होतों, तो खरोखर तसा नसून खरा प्रेमळ व मोकळ्या अंतःकरणाचा आहे, असें अनुभवांतीं समजणारे व त्याप्रमाणें इतरांना सांगणारे रेंदाळकरांचे कित्येक दृढ परिचित गृहस्थ आज हयात आहेत. किंबहुना, असेंही म्हणावयास हरकत नाहीं कीं, या गुणांच्या फाजील अतिरेकानेंच त्यांच्या भावनाप्रवण हृदयाचा जवळ जवळ सारा प्रांत कायमचा वैराण होऊन गेला ! स्वतःच्या दिलदार व ऋजु अंतःकरणाप्रमाणें आपणाशीं संबद्ध असलेल्या किंवा होणाऱ्या जनांचेंही अंतःकरण आहे, अशा भोळ्या समजुतीनें त्यांच्या कित्येक गोष्टी होत व त्यांत त्यांना कित्येक वेळां मानसिक यातनाही सोसाव्या लागत त्यांच्या या सात्त्विक वृत्तीचा पुष्कळ लोकांनीं अवास्तव फायदा घेतला होता व शेवटीं त्यांची फसवणूकही केली होती. परंतु त्यांचा स्वभाव निसर्गतःच तत्त्वप्रेमी व प्रांजल असल्यामुळें त्यांचा आत्मविश्वास नेहमीं जागरूक असे आणि म्हणून त्यांनीं त्याबद्दल केव्हांही दुःखोद्गार काढले नाहींत. इतकेंच नव्हे तर, त्यांचे जिवलग स्नेही अशा प्रसंगीं त्यांचें समाधान करण्यास प्रवृत्त झाले असतां, आपली प्रात्याहिक निरामय स्थिति आपल्या मित्रांच्या नजरेस आणून ते त्यांना गप्प बसवीत ! हा सर्व प्रकार जरी खरा असला, तरी वारंवार सहन कराव्या लागणाऱ्या जगाच्या कटु अनुभवाचा परिणाम त्यांच्या पार्थिव देहावर न घडणें अपरिहार्य होतें; आणि म्हणूनच त्यांच्या जीवितसंगीताचा प्रवाह फारच लौकर कोरडा पडला, असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. मधुर कल्पनांच्या स्वर्गीय हिंदोळ्यावर प्रेमानें झोंके दिलीं जाणारीं हृदयांतील गोड आशांचीं चिमणीं अर्भकें, उत्पत्तीबरोबरच निराशेच्या खोल खांचेंत गाडून टाकण्याचा कष्टप्रद प्रसंग वारंवार पत्करावा लागल्यामुळें, त्यांचें नवनीततुल्य हृदय शतधा विदीर्ण होत असे व

अशा प्रसंगीं, मृत्यु हेंच खरें शांतिनिकेतन होय, असेंही त्यांना वाटल्याशिवाय रहात नसे. खालील पद्य या दृष्टीनें लक्ष्यांत घेण्याजोगें आहे:

वांच्छा अल्पहि पूर्ण होत न कदा, नैराश्य वाटे सदा
नाहीं सौख्यलव क्षणैकहि कधीं या दुर्भगा लाधला।
चिंताविह्वल तीव्रदुःखगरलव्यामूढ होऊन मी
मृत्यो! शांतिनिकेतना! करिं तुझें सोत्कंठ मार्गेक्षण.

—रें. प्र. खं. पृष्ठ १६५

रेंदाळकर विवाहरज्जूनें बद्ध झाले असल्याचें मागें एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. पत्नीचें पाणिग्रहण करीत असतां, त्यांच्या भावनाशील हृदयांत भविष्यत्कालिक कौटुंबिक सौख्याविषयीं किती रम्य व आदर्शीभूत कल्पना उदित झाल्या असतील व कवीच्या काव्यमय संसाराचा परममंगल व मर्मग्राही चित्रपट कसा रंगविला गेला असेल, हें कल्पनेनेंच जाणावयास पाहिजे. जेथें तुकोबासारखा उपजत भक्तदेखील 'सर्व हा संसार सुखाचा करीन । आनंदें भरीन तीन्ही लोक' अशी गृहस्थाश्रमाबद्दल गोड कल्पना व्यक्त करितो, तेथें उजाड मैदानालाही नंदनवनाचें नेत्रसुभग स्वरूप देऊं पाहणाऱ्या रेंदाळकरांसारख्या ऐहिक विचारशील कवीला, पतिपत्नीप्रेमाच्या अभेद्य परंतु स्वभावकोमल कवचांत राहून निराबाधपणें सतत वृद्धिंगत होणाऱ्या भविष्यत्कालीन संसारसुखानें किती मोहून टाकलें असेल, हें काय सांगावयास पाहिजे? पतिपत्नीप्रेम व गृहस्थाश्रम या संस्थांची थोरवी त्यांनीं आपल्या कवितांतून कैक ठिकाणीं गाइली आहे. 'मंगलपंचक' नामक कवितेंत तर त्यांनीं तद्विषयक आदर्शच वाचकांपुढें धरिला आहे. 'स्वर्णभूषेनें हिऱ्याला, विद्युत्समागमानें मेघाला, पुष्पित वेलीनें वृक्षाला ज्योत्स्नेनें नील आकाशाला आणि नीतीनें आचाराला जशी शोभा येते, तसाच वधूसमागमानें वराच्या जीवितकमाला-सौन्दर्यसंपदेचा चिरलाभ होत असतो. सात्त्विक प्रेमबंधानें एकसंस्थ झालेल्या पतिपत्नीला दयामय विश्वपित्यानें सदा मांगल्यदान करावें, त्यांच्या सर्व आपदा दूर व्हाव्या, आनंदसागराच्या तरंगांवर त्यांनीं नेहमीं तरंगत असावें, सौख्याची चिरवर्तिनी स्मितमयी उषा त्यांच्या सन्निध सदोदित नांदावी आणि बुधसभेनें प्रशंसिलेला प्रेमाचा मार्ग त्यांनीं अनुदिन आदरावा! ईश्वरानें अनुशासिलेल्या मार्गानें जाऊन जगाला आनंदमयत्व देणें आणि त्यांतील समस्त दुःखतिमिराचा आत्मिक बलानें निरास करणें, हें गृहस्थाश्रमींच्या कर्तव्यांपैकीं एक प्रमुख कर्तव्य होय. कारण, हा प्रपंच निव्वळ

स्वार्थपरिपूर्तीकरितां विलकुल अस्तित्वांत आलेला नाहीं. नेहमींच्या सहजाचाराला दिव्यत्व व जुन्याच दिवसाला स्वतःच्या प्रेममय आचरणानें रम्यत्व व नव्यत्व देऊन भूमीचाही स्वर्ग करण्याचें शक्तिमत्त्व पतिपत्नींनीं संपादन केलें पाहिजे. ज्याच्या भेटीनें ही जगत्स्वरूपी मुग्ध कलिका सहसा प्रफुल्ल होते, तो वसंतऋतु पतिपत्नींच्या उज्ज्वल गुणवैभवानें या लोकीं बारा मासही राहूं शकतो! विश्वांतील विशाल कंटकवनाला तत्काल विध्वंसून हास्यविभूषित धरेला नेहमीं पुष्पशय्येवर ठेवण्याचा मोठा मान पतिपत्नींच्याच वांट्याला आलेला आहे'. असें सांगून ते शेवटीं म्हणतातः

'मांगल्यैकनिधान, साधु म्हणती, आहे गृहस्थाश्रम
हा हा अज्ञजनां घरी अनुदिनीं होती अनंत श्रम
नित्य स्वादुसुधारसा पिउनियां सोत्कंठ हांसा, रमा,
सौख्याचीं अमृतप्रवाहि कुसुमें वाहील तुम्हां रमा !'

—रें. प्र. खं. पृष्ठ १८५

खऱ्या गृहस्थाश्रमाचें हें परममंगल आलेख्य, रेंदाळकरांनीं स्वतःच्या हृदय-पटावर रंगविलें खरें; परंतु, दुर्दैवानें त्यांना तें स्वतःच्या घरांतील दिवाणखान्यांत प्रमुखस्थानीं उभें करून ठेवण्याची संधि उभ्या जन्मांत मिळाली नाहीं. फार काय, वरील आनंदप्रसवी पद्याचा द्वितीय चरणच त्यांच्या गृहस्थाश्रमांतलि आत्यंतिक दुःखगर्भस्वरूपाचा स्पष्ट सूचक दिसतो. त्यांची संसारविषयक सात्विक महत्त्वाकांक्षा आणि काव्यमय मनोराज्यें प्रतिकूल परिस्थितीनें जागच्या जागींच स्थगित झालीं. विसदृश हृदयें एकत्र आलीं म्हणजे जो एक उद्वेगजनक प्रकार घडून येतो, तो त्यांच्या घरांत बहुशः चालू असे. त्यांच्या पत्नीचा मूळांतच विक्षिप्त किंवा वेडसर असलेला स्वभाव हिस्टेरियाच्या विकारानें अधिकच तऱ्हेवाईक बनला होता व त्यामुळें त्यांच्या प्रपंचांतील राम कायमचाच वनवासी झाला—नव्हे, त्याची त्यांना अखेरपर्यंत भेटच झाली नाहीं! परंतु, सात्विक प्रेमानें नटलेल्या या जन्मसिद्ध कवीनें आपल्या पत्नीची स्वप्नांतही अवहेलना केली नाहीं. प्रपंचांतील नेहमींच्या तीव्र अस्वास्थ्यामुळें,—

गात्रें गळलीं, शक्ती सरली,
प्राणज्योती नेत्रीं ठेली

दैवा ! काय असे मम भाळीं ? ।
गळाला धीर, चालले प्राण बाहेर !

रें. प्र. सं.- पृष्ठ १८४

३६९९

अशी जरी त्यांची शोचनीय स्थिति होती, तरी ते पत्नीविषयक कार्य बजावण्यास नेहमीं कसे बद्धपरिकर असत, या गोष्टीची स्पष्ट साक्ष देणारे कित्येक लोक आज हयात आहेत. मुंबई येथें असतांना, त्यांच्या पत्नीला हिस्टेरियाचा आजार एकाएकीं जडला व त्याचें स्वरूपही सुरवातीस फारच भीषण दिसूं लागलें. या वेळीं, त्यांनीं आपल्या पत्नीची आत्मनिरपेक्षपणें केलेली सेवाशुश्रूषा प्रस्तुत लेखकानें प्रत्यक्ष पाहिली असून त्यांच्या सत्त्वसंशुद्ध व कर्तव्यनिष्ठ हृदयाबद्दल त्याला आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं. आजाऱ्याला वागविण्याच्या बाबतींत याप्रसंगीं त्यांना मिळालेल्या डॉक्टरी सल्ल्यांत, आजाऱ्याला शक्य तितकी मोकळी हवा व लहरीप्रमाणें वागूं देणें, या दोन गोष्टींचा प्रामुख्यानें समावेश करण्यांत आला होता. त्याला अनुसरून ते पत्नीला घरीं वागवीत व सायंकाळीं समुद्रावर मोकळ्या हवेसाठीं फिरावयासही नेत. मूळांतच विक्षिप्त आणि चालू आजारानें अधिकच हट्टी व लहरी बनलेला त्यांच्या कुटुंबाचा स्वभाव येथेंही उघडा होई व त्यायोगें या प्रसंगीं रेंदाळकरांची घरिस्थिति फारच अवघड होत असे, व ती ते शांतपणें सहनही करीत असत. परंतु, अलीकडे १०।१२ वर्षांत बहुतेक सर्वत्र, पण विशेषेंकरून मुंबईकडे जो एक अधम लेखकवर्ग उत्पन्न झाला आहे, त्यापैकींच कोणा एका 'नलिनीकांत रॉय' नांवाच्या हंगामी लेखकानें या गोष्टीचा अवास्तव फायदा घेऊन, स्वतःच्या हीन अभिरुचीचें प्रदर्शन करणारा एक उपरोक्त प्रकाराचा सूचक लेख, त्या वेळीं चालू असलेल्या 'ज्ञानांजन' नामक मासिकांत खरडिला होता, असें म्हणतात. फार कशाला ?—सुमारें २।३ वर्षांपूर्वी पुण्याच्या 'महाराष्ट्र शारदा-मंदिरा' मार्फत प्रसिद्ध झालेल्या 'काव्यचर्चा' नामक पुस्तकांत पुणें येथील श्री० द. अ. आपटे म्हणजे अनंततनय या गृहस्थांनीं, 'रेंदाळकर आणि त्यांची कविता' या शीर्षकाखालीं, लेखनकलेच्या दृष्टीनें कमालीचा गचाळ व लेखकाच्या अधम मनोवृत्तीचा उत्कृष्ट नमुना असा एक विषारी लेख खरडून कै० रेंदाळकरांच्या त्या त्या वर्तणुकीबद्दल शक्य तितकी टवाळी केली आहे व अशा रीतीनें आपल्या हीन अभिरुचीची पुरती हौसही भागवून घेतली आहे. श्री० अनंततनय साठीच्या घरांत प्रवेश करूं पाहाणारे एक बुड्ढे गृहस्थ असून ते स्वतःला कवि म्हणवितात ! लेखकाची व विशेषें-

करून कवीची जबाबदारी काय असते, त्या गोष्टीची जाणीव वस्तुतः त्यांना असावयास पाहिजे होती. रेंदाळकरांचे कित्येक आप्तस्वकीय व जवळचे मित्र आज विद्यमान आहेत. त्यांच्याकडे थोडासा शोध केला असता, तर त्यांना त्यांच्या-विषयींची संपूर्ण माहिती मिळावयास फारसे श्रम करावे लागते ना. पण, त्यांच्या असदभिरुचीला हा सीधा मार्ग रुचावा कसा ? असो. अनंततनयांच्या या खोडसाळ लेखाचा अन्यत्र स्वतंत्रपणेंच विचार करावयाचा असल्यामुळें, ही गोष्ट येथेंच सोडून देणें भाग आहे.

वर दर्शविल्याप्रमाणें पत्नीच्या दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या तऱ्हेवाईक स्वभावा-मुळें, जरी रेंदाळकर सर्वतोपरी गांजून गेले होते व त्यामुळें, त्यांच्या सर्व प्रापंचिक आशांची जरी भीषण थडगीं उभारलीं गेलीं होतीं तरी जेणेंकरून आपल्या पत्नीला थोडें तरी सुख मिळेल अशी गोष्ट करावयाची संधि त्यांनीं आमरण गमावली नाहीं. स्वतःच्या सान्निध्यांत तिला सुख लाभत नाहीं; दुर्विदग्ध हृदयाचेंही अनुनयपूर्वक वशीकरण करावयाची जी एक कला असते, ती कदाचित् आपल्या अंगीं नसेल आणि त्यामुळें पत्नीत्वाच्या नात्यानें ईश्वरानें आपल्या संगतीस पाठविलेला हा जीव दुःखीकष्टी होत असेल; अशा सात्त्विक कल्पनांनीं त्यांनीं तिला इष्टमित्रांकडे पाठवून स्वतःपासून दूरही ठेवून पाहिलें. परंतु, त्यांतही त्यांची अखेर निराशाच झाली. प्रस्तुत लेखकालाही दोन महिन्यांच्या मुदतीनें त्यांच्या कुटुंबाला स्वतःच्या घरीं ठेवून घेण्याचा मान एकवार मिळाला होता. परंतु, कसाबसा एक महिना पूर्ण होतो न होतो तोंच ते त्याला नेण्यासाठीं उपस्थित झाले व 'असें कां ?' म्हणून विचारतां त्यांनीं थोडक्यांत दिलेलें उत्तर अत्यंत करुणाजनक आहे. ते म्हणाले, " निदान तुझें तरी घर तिला पुन्हा यायला शिल्लक असूं दे. माझ्या व तिच्या आप्ते-ष्टांचीं घरें तिला कायमचीं पारखीं झालीं आहेत, हें तुला ठाऊक नाहीं ? मग कसें बरें, तुझ्या व तुझ्या घरच्या मंडळींच्या सहनशीलतेचा दोन महिन्यांपर्यंत पुरता अंत पाहणें, हें मला पुरवेल ?" सुमारें १९१९ सालच्या सुरवातीस हिंगण्याची कांहीं दिवसांकरितां रजा घेऊन ते आपल्या गरोदर पत्नीसह तिच्या बाळंतपणा-करितां म्हणून कोल्हापुरीं येऊन राहिले होते. त्या वेळींही त्यांची प्रकृति मले-रियाच्या आजारानें थोडीशी अस्वस्थच होती. त्यांच्या दोन्ही मुली याच संधीस इन्फ्लुएन्झानें अत्यंत आजारी होत्या. आणि याच बिकट परिस्थितींत त्यांचें कुटुंब प्रसूत झालें. तथापि, मनाची शांति लवमात्रही ढळूं न देतां, त्यांनीं या प्रसंगीं

आपल्या कुटुंबाशी, त्याच्या हट्टी व हेकेखोर स्वभावाकडे सपशेल दुर्लक्ष्य करून जी आत्मनिरपेक्षपणें सेवा बजाविली ती त्यांच्या निकटवर्ती मित्रांच्या व सर्वसाक्षी ईश्वराच्या सन्निध कायमची रुजू आहे. ईश्वरानें आपल्या संगतीस पाठविलेला प्राणी कसा आहे, या गोष्टीकडे फारसें लक्ष न देतां, त्याला आपणाकडून अधिकाधिक सुख कसें मिळेल, याबद्दल खऱ्या कवीनें नेहमीं चिंतन करून तदनुसार कृति करीत असावें व त्यांतच समाधानाचा एकादा कण मिळाल्यास पाहिजे तर हुडकून घ्यावा, असें ते आपल्या मित्रांपाशीं वारंवार म्हणत. त्यांची पत्नी आर्यस्त्रीच्या दृष्टीनें अत्यंत सोज्ज्वल परंतु माणुसकीच्या बाजूनें अगदींच तऱ्हेवाईक. त्यामुळें, त्यांचें सारें काव्यमय जीवित धुळीस मिळालें व इहलोकची यात्राही फारच जलद संपवावी लागली. दुर्दैवी रेंदाळकर निदान या बाबतींत तरी खरेखुरे हुतात्मे होते, यांत शंका नाहीं. ते आपल्या पत्नीला बरोबर वागवीत नव्हते, असे निरर्गल प्रलाप काढणाऱ्या त्यांच्या अकारण वैऱ्यांच्या तोंडास हात कोणीं लावावा? तुकोबासारख्या भगवद्भक्तासही निंदकांच्या साडेसातीनें सोडलें नव्हतें, तेथें बिचाऱ्या रेंदाळकरांचा पाड काय ? परंतु या बाबतींत तेच काय म्हणतात तें पहा.

निंदो कुणास सगळें जग तुच्छ मानो
त्याच्यावरी खल रचोत अनंत दोष;
निःशंक त्यांत नसतें पण लेश सत्य
लोकप्रवादरत होउं नये कुणीही !

—रें. क. प्र. खं. पृष्ठ १५८

कै० रेंदाळकर जरी समाजसुधारक म्हणून गाजले नसले तरी त्यांचीं सामाजिक मतें अत्यंत दिलदार होतीं. भिन्न भिन्न जातींचे व पंथांचे हिंदी लोक शेजारीं शेजारीं रहात असूनही परस्परांतील रीति, वेश, आचारविचार, सुखदुःखांच्या जाणिवी व हितसंबंध या सर्व गोष्टींना त्यांचीं हृदयें आघाततः पारखीं झालीं आहेत. आणि त्यामुळें, आपल्या जातीच्या किंवा पंथाच्या स्वार्थी उच्चनीच भावनांनीं सर्वांच्या मनाला सामान्यतः घेरलें असून हिंदी समाजाच्या प्रस्तुतच्या सार्वत्रिक अधःपाताला हाच प्रकार कारणीभूत झालेला आहे, असें त्यांचें प्रामाणिक मत होतें. ईश्वराच्या न्यायी दरबारांत मंजूर नसलेले अनंत जातिभेद व अगणित रूढिबंधनें हिंदी समाजाच्या चालू प्रगतीला वेळीं अवेळीं पायबंद लावीत असल्यामुळें, त्यांच्या समूळ नायनाटाच्या कामीं समाजाच्या प्रत्येक सुजाण घटकानें अहर्निश प्रयत्न केला

पाहिजे, असा त्यांचा स्पष्ट अभिप्राय असून ते व्यवहारांत त्याप्रमाणेंच वागत. ज्यांत वैयक्तिक उत्कर्ष किंवा समाजाची धारणपोषणा तिळमात्र भासमान होत नाहीं अशा अवास्तव कर्मकांडाचा त्यांना मनापासून तिटकारा असे. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीला हे कर्मकांडवादी ढोंगीच अकांडगलग्रह असून त्यांच्या जात्यांतून आमचा अज्ञान समाज एकसारखा पिसून निघत आहे व त्यामुळेंच, हिंदी समाजांत सर्वत्र असंतोष, असुख व निराशा यांचें साम्राज्य माजलें आहे, असें त्यांना वाटे. व्यक्तिस्वातंत्र्याचे ते एक कट्टे पुरस्कर्ते होते. एकाद्या स्वातंत्र्यप्रिय व्यक्तीचें हृदय वेळीं अवेळीं तुडवून तिच्यावर आपल्या मताचा जुलूम समाजसुस्थितीच्या पोकळ सबबीखालीं समाजाकडून कित्येक वेळां केला जातो, तो त्यांना विषतुल्य वाटे. नीतिमत्तेला स्मरून ज्याला जसें वाटेल त्यानें तसें वागावें; समाजाला त्यामध्यें लुडबुडण्याचें मुळींच कारण नाहीं. जगांत दुःखबीज प्रथमतः अंकुरित व्हावयाला जीं अनेक कारणें झालीं असतील, त्यांत पहिला क्रमांक या व्यक्तिस्वातंत्र्याच्या अपहारालाच दिला पाहिजे, अशी त्यांची समजूत होती. दंभाचार व अशास्त्रीय रूढि यांची दुधारी तलवार हातीं धरून जगांत थैमान घालणारा जुलमी समाज आणि स्वातंत्र्याची एकनिष्ठ उपासक असहाय व्यक्ति या दोहोंत झगडा चालू असतां, ते आपल्या हृदयाला कसले पाठ देतात, तें पहाः

एकांतीं बसुनी विचार करुनी जें सिद्ध केलें मत
तें जातें सहज क्षणांत उडुनी वाऱ्यावरी पर्णसें !
जी सत्ता तुडवी शहाणपण; ती मानील कोणी बुध ?
बोलो कांहिं समाज, मान हृदया ! जें आपुलें तें खरें !
तूं जें शांतपणें मनीं ठरविलें, धिक्कारिलें तें कुणीं
त्याची कींव करून वाग, तुजला स्वेच्छें जसें आवडे
लोकांतील सुधारणा घडतसे व्यक्तीमुळें, सर्वदा
एकाद्यासच लाभतो चुकुनियां स्वर्गीय संदेश तो !

—रें. प्र. खं. पृष्ट १४८

व्यक्तिस्वातंत्र्याप्रमाणेंच स्त्रीस्वातंत्र्याचेही ते एकनिष्ठ पुरस्कर्ते होते. पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांनाही समाजांत पूर्ण वांव मिळावा व तेणेंकरून, आज दृग्गोचर होणारें हिंदी राष्ट्राचें विकलांगत्व दूर होऊन त्यालाही सुधारलेल्या राष्ट्रांच्या पंक्तींत बसावयाचा बहुमान मिळावा, अशी त्यांची महत्त्वाकांक्षा असे. स्त्रीवर्गाच्या बुद्धि-

मत्तेचें प्रमाण पुरुषवर्गाच्या तोडीचेंच असल्यानें, त्यांच्या शिक्षणाचें प्रमाणही त्यांच्याइतकेंच असलें पाहिजे. सुधारणेच्या शिखरावर विराजमान झालेल्या पाश्चात्य राष्ट्रांतून स्त्रिया पुरुषांइतक्याच शैक्षणिक वैभवानें संपन्न झालेल्या असून त्या जर आपला प्रपंच नीटनेटका करूं शकतात, तर मग आमचाही स्त्रीसमाज त्याच धर्तीवर शिक्षणसंपन्न झाल्यास तो तसा कां करूं शकणार नाहीं ? असंस्कृत परंपरेच्या अंधपटलानें आमची दृष्टि व्याप्त झाल्यामुळें, विसाव्या शतकांतील स्त्रीवर्गाविषयींही आमचीं मनें साशंक होतात, हें मोठें दुर्भाग्य होय. राष्ट्रपुरुषाची स्वारी उत्क्रांतीच्या रोखानें एकसारखी चालली असून, नवीन आचार, नवीन विचार, नवीन भावना, इत्यादि गोष्टी प्रतिक्षणीं जन्म पावत आहेत. विचारी गृहस्थांना एतद्विषयक जाणीव पूर्णपणें असणें अगदीं अगत्याचें असून त्यांनीं या सर्व प्रकाराचें आत्यंतिक प्रेमानें व कौतुकानें आदरातिथ्य केलें पाहिजे. परिस्थितिभेदामुळें, एकेकाळीं 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' यासारखीं स्मृतिवचनें शिष्टसंमत झालीं असतील. पण, चालू काळींही तोच कित्ता डोळ्यापुढें ठेवून स्त्रीसमाजाला तसें वागविणें किंवा त्याच्याविषयीं तसे उद्गार काढणें, हा एक प्रकारचा स्त्रीजातीचा उपमर्द असून तो परिणामीं अनिष्टावह झाल्याशिवाय राहणार नाहीं. स्त्रीवर्गावरील पुरुषजातीच्या अनियंत्रित बंधनामुळें, त्यांच्या अंगीं फाजील विनय, अप्रस्तुत लज्जा व जीवितोद्यानाचें जीर्णारण्य करणारी स्वतःविषयींची साशंकवृत्ति, इत्यादि दुर्गुण कायमचें ठाणें देऊन बसले असून ते राष्ट्रहिताच्या दृष्टीनें अत्यंत विघातक होत. पुरुषांच्या बरोबरीनेंच स्त्रियांनाही समाजांत वावरावयास पूर्ण मोकळीक मिळाल्यास नीतिमत्तेला धक्का बसेल वगैरे आक्षेप निव्वळ हेत्वाभासमूलक असून उलट स्त्रीपुरुषांच्या नेहमींच्या निकट सहवासानें अनैतिक कल्पनांचें क्षेत्र साहजिकच मर्यादित होईल, व तेणेंकरून खऱ्या नीतिमत्तेच्या वाढीला तें एकपरीनें परिपोषकच होईल, यांत शंका नाहीं, असें त्यांचें ठाम मत होतें. भिन्न भिन्न सामाजिक बंधनांनीं नियंत्रित केलेल्या स्त्रीवर्गाविषयीं त्यांनीं आपलें मत खालीं दर्शविल्याप्रमाणें नमूद करून ठेविलें आहेः

सौन्दर्यसार गुणकेलिनिकेतनास
योषिज्जनास बुध झांकुनि ठेविती कां ?
ठेवूनि बंधनिं कशी गुणवृद्धि व्हावी,
साधेंच तत्त्व, पण हें न कळे कुणाला !

सांगा जरी विसळली वनिता समाजीं
होईल काय तरि फार असा अनर्थ ?
नाहीं कदापि मुख दाखविलें कुणाला
स्तंभ प्रचंड उठतो मग नीतिचा का ?
या बंधनीं अमित हानि घडून आली
स्त्री जाहली खचित कीं पशुहून नीच
या काममूढ पुरुषांहि खराच केला
स्त्रीवर्ग सर्व अपुल्या विषयास पात्र !
देवा ! अधोगति कधीं वद ही सरेल ?
योषित्समूह कधिं होइल बंधमुक्त ?

—रें. क. प्र. खं. पृष्ठ १२१

धार्मिक बाबतींतील त्यांचीं मतें सर्वसंग्राहक स्वरूपाचीं आहेत. त्यांची धर्मनिष्ठ' ही कविता ( प्र. खं. पृष्ठ १९० ) या दृष्टीनें अवश्य वाचनीय आहे. ते म्हणतातः " हिंदु, जैन, बौद्ध, ख्रिश्चन अथवा इस्लाम या धर्मांपैकीं मी कोणत्याही एका धर्माचा नाहीं. परंतु ते सारे मला मान्य असून ते माझेच धर्म होत, असें मी स्पष्ट सांगतों. कारण ही अफाट पृथ्वी, रुचिकर जलांनीं भरलेल्या नद्या, समुद्र, आकाशांतील तेजस्वी नक्षत्रें व ग्रहगोल, शांत नीलाकाश आणि प्राणधारक वायु हे जसे विशिष्ट जाति-व्यक्तीपुरतेच नसतात तसे धर्मसंस्थापकही होत. 'अमुक धर्म माझा' असें साभिमान सांगणारे लोक, मूळ बिंबाला मुकून प्रतिबिंबालाच कवटाळतात ! अनंत नक्षत्रांची प्रभा एकच, असंख्य मेघांचें उदक एकच, असंख्यात चंद्रिकाकिरणांचा जनक चंद्र एकच; त्याप्रमाणें नाना धर्मांतील सद्भावना एकाच स्वरूपाची आहे. बुद्धादि महात्मे एकाच तत्त्वासाठीं अवतरलेले आहेत. पण, त्यांच्या अजाण अनुयायांनीं मागाहून भेदभावांचीं कुंपणें घालून धर्मांचे व त्याबरोबरच नरजातीचेही तुकडे करून टाकले' असें सांगून ते पुढें म्हणतातः

आतां काल परी असे बदलला, आत्मीयता वाढली
सारें विश्वकुटुंब एक बनलें, माझें-तुझें लोपलें
तेथें हा 'परधर्म' ही मनिं कशी येईल दुर्भावना ?
ब्रह्माण्डासह धर्मपंथ सगळे झाले अहा ! आमुचे !

—रें. प्र. खं. पृष्ठ १९२

रेंदाळकरांच्या नैतिक आचरणाला उपमाच द्यावयाची झाल्यास, निर्मल व प्रशांत शारदीय गंगाजलाची देणें सर्वथा उचित होईल. त्यांच्या कांहीं 'अकारणाविष्कृत वैरदारुण' हितशत्रूंनीं त्यांच्याविषयीं सामान्य जनांचा गैरसमज होईल, अशा तऱ्हेच्या कांहीं निराधार बातम्या खासगी व उघड रीतीनेंही पसरविण्याचा प्रयत्न केला असल्याचें प्रस्तुत लेखकास माहीत आहे; परंतु, त्यांत काडीचेंही सत्य नाहीं, हें पुराव्यानिशीं सिद्ध करून देतां येईल. प्रपंचांतील नेहमींचा उद्वेगजनक प्रकार, परिस्थितिभेदामुळें वारंवार करावीं लागणारीं स्थलांतरें व त्यामुळें सोसावी लागणारी दगदग आणि विशिष्ट ध्येयाच्या मागें लागल्यामुळें, वरच्यावर होणाऱ्या अनंत मानसिक यातना इत्यादि प्रतिकूल परिस्थितीचा वरवंटा त्यांच्या साऱ्या आयुष्यक्रमावरून एकसारखा फिरला होता. तथापि, त्यांच्या चित्तांतील नीतिमत्तेची बैठक लवमात्रही ढळूं शकली नाहीं. त्यांच्या नीतिविषयक कल्पना व तदनुसार सबाह्य आचरण यांची यथावत् माहिती असलेले कित्येक सद्गृहस्थ आज विद्यमान असून ते त्यांच्या गंगाजलवत् विशुद्ध वर्तनाबद्दल अजूनही आश्चर्य प्रकट करितात. रेंदाळकरांचे जिवलग स्नेही परंपरेचे घरंदाज व पदवीधर असून ते त्यांना आपल्या कुटुंबांतील एक व्यक्ति मानीत. त्यांच्या मित्रांना चुकूनसुद्धां त्यांच्या असदाचाराचें ओझरतेंही दर्शन झालेलें नाहीं. कोणताही आडपडदा न ठेवतां, ते आपलें हृदय आपल्या मित्रांजवळ आविष्कृत करीत व त्यांचे मित्रही त्यांच्यापाशीं तसेच वागत. त्यामुळें, परस्परांतील जिव्हाळा, आत्मीयत्व व पूर्ण विश्वास अखेरपर्यंत टिकला. इतकेंच:नव्हे, तर तो त्यांच्या पश्चात्‌ही दैनंदिनगतीनें वृद्धिंगतच होत आहे! बाह्यतः शृंगारिक दिसणारी आपली कविता वस्तुतः तशी नसून ती निःसंशय भक्तिरसप्रधान आहे, असें त्यांनीं आपल्या 'मोहिनी' नामक खंडकाव्याच्या प्रस्तावनेंत दर्शविलें असून तें इतरेजनांना जरी पटलें नाहीं तरी त्यांच्या मित्र-मंडळीला पूर्णपणें पटलेलें आहे, यांत मुळींच संशय नाहीं. त्यांची पावित्र्याची कल्पना अत्यंत जाज्वल्य होती. मनाच्या विटाळानें देहही विटाळतो, असें त्यांचें मत असून तें त्यांनीं खालीं दर्शविल्याप्रमाणें व्यक्त केलें आहेः

मनावरी तनुची पावनता, तनु भ्रष्टली मन भ्रष्टतां!

—रें. प्र. खं. पृष्ठ ३१

त्यांच्या सामाजिक मतांबद्दल नुकताच उल्लेख येऊन गेला आहे. अर्थात्च विधवाविवाहाची अशास्त्रीयता त्यांना मान्य नव्हती, हें सांगावयास नकोच.

रेंदाळकरांच्या प्रेमविषयक कल्पना अत्यंत भारदस्त व उदात्त स्वरूपाच्या होत्या. व्यक्तिभेदाबरोबर प्रेमभावनेंतही भिन्नभाव प्रतीत होतो, हें मत त्यांना मुळींच संमत नव्हतें. प्रेम ही चीज वस्तुतः सर्वत्र सारखीच असून तिचें एकजिनशीपण फक्त पाहणाराच्या दृष्टिकोणावर अवलंबून आहे असें त्यांचें म्हणणें असे. शारीरिक सुखाची परिपूर्ति ही प्रेमपरीक्षेची खरी कसोटीच नव्हे, तर जेथें पार्थिव सुखांच्या कल्पनेचा पूर्ण लय होतो, जेथें सुखोपभोग परिणामविरस होऊं शकत नाहींत आणि ज्यांत हृदयाचें आसेचनकत्व प्रतिक्षणीं प्रतीत होतें, तेंच खऱ्या प्रेमाचें आदिनिधान होय, अशी त्यांची प्रेममीमांसा होती. एकाच वस्तूमध्यें प्रेमविषयक सर्व विभावानुभावांची मधुर अनुभूति घ्यावयास अंगीं जें एक शक्तिमत्त्व हवें असतें, तें त्यांच्यामध्यें ओतप्रोत भरलेलें होतें, यांत संशय नाहीं. ते एके ठिकाणीं म्हणतातः 'स्त्रीच्या विशदस्मितयुक्त मधुर अधरपल्लवापासून सत्प्रेमाचा उद्भव होतो, हेंही मला खरें वाटत नाहीं. कारण, माझ्या जिवलग मिलांत त्यांची मला पूर्ण साक्ष पटते. तर मग काय शारीरिक सुखाच्या परिपूर्तींत प्रेमाचा संभव होतो ! छे, मुळींच नाहीं ! कारणः

भगिनीप्रेम—सुधारस सेवुनि, कितीकदां मी गेलों मोहुनि !
तो तरि निपजे पावित्र्यांतुनि ! अनुभव मज आहे !"

—रें. प्र. खं. पृष्ठ ३१

आपल्या मैत्रिणींकडे पाहण्याची त्यांची दृष्टि अशी होती. श्रीकृष्ण-द्रौपदीचें एकमेकांवरील निष्काम प्रेम हा अखिल स्त्रीपुरुषांमध्यें संभवणाऱ्या बंधुभगिनी-प्रेमाचा निर्मल आदर्श असून त्यांत प्रत्येक प्रेमपिपासु व्यक्तीनें काळजीपूर्वक आपला चेहरा पहावा व त्यावर अमंगल विषयवासनेची धूळ बसून तो मलिन झाल्याचें दिसून आल्यास अगोदर चांगला स्वच्छ करावा आणि मगच स्त्रीवर्गाकडे उजळ-माथ्यानें पाहावें, असें त्यांचें म्हणणें असून ते स्वतः तसे वागले. त्यांच्या हृदयाच्या दैवी संपत्तीची त्यांच्या मित्रांना व मैत्रिणींना पूर्ण साक्ष पटली होती, व ते आणि त्याही त्यांच्याकडे तशाच थोर व प्रेमप्रकृष्ट दृष्टीनें पहात व अजूनही पहात आहेत. त्यांच्या सामान्यतः शृंगारिक दिसणाऱ्या कवितांकडे सहृदय वाचकांनीं अशा दृष्टीनें पाहिल्यास त्यांना एक प्रकारची नवी मौज वाटल्याशिवाय राहणार

नाहीं. त्यांची 'शृंगार' शीर्षकाखालीं लिहिलेली कविता या दृष्टीनें विशेष उद्बोधक होईल. ते तींत काय म्हणतात पहाः

देवी ! स्तोत्रें रचुनि तुजवरी तव चरणीं वाहिलीं
काय तीं विषयविषें व्यापिलीं ?
पावनतेची गोड परा तूं सीमा, तव दर्शनें
लोपती दुर्वांछा शोभने !
सर्व गुणांची माती झाली काय तुझ्या स्त्रीपणें,
माजलीं कां हीं भलतीं रणें ?
रम्याद्भुत जें दिव्य ललित तें भोग्यच सारें असें
म्हणावें साधुजनांनीं कसें ?
विषयलालसेविण दुसरें का पवित्र नातें नसे ?
करिति कां दूषक अपुलें हंसें ?
हीन विकारां पाठ फिरवुनी शुचि-प्रीतिवर्धनें,
कुणाचीं तरी हांसतिल मनें !
करीं खराटे घेउनि सजलां धावयास लोटुनी,
इंद्रधनु तें हें समजा मनीं !

—रें. प्र. खं. पृष्ठ ३१४

हृदयाच्या अंतरंगांत प्राणापलीकडे जतन करून ठेविलेल्या ध्येयाची मनुष्याला एकाच जन्मांत गांठ पडली असती तर किती बहार होती ! पण, ईशसंकेत तसा कोठें आहे ? बहुत जन्म घ्यावे, बहुत यातना सोसाव्या, हृदय वेळीं अवेळीं कांट्यावर घालावें आणि मगच ध्येयलाभाचें परममंगल सुख अनुभवावें, अशी ईश्वराची इच्छा दिसते. 'बहूनां जन्मनामन्ते योगवान्मां प्रपद्यते' या भगवदुक्तींतील रहस्य तरी हेंच होय. ध्येयाचा पाठपुरावा करीत, जागतिक दृष्टीनें आयुष्याची धुळधाण करून घेतलेले हुतात्मे पूर्वी काय कमी होऊन गेले ?—आणि आज तरी काय कमी आहेत ? ही परंपरा अखंडपणें पुढेंही चालू राहणारच ! या हुतात्म्यांच्या आयुष्याच्या मातींतच मागाहून सामान्य जनांना ही सोन्याची खाण सांपडते. गत व विद्यमान जगाचा इतिहास तरी आपणाला हेंच शिकवितो कीं नाहीं ? ध्येयनिष्ठ हुतात्म्यांच्या पुण्यप्रद पदस्पर्शाचा लाभ भूतलाला न लाभता तर त्याची आज काय अवस्था झाली असती, हें कल्पनाचक्षूंनींच जाणण्यांत

विशेष सौंदर्य आहे. मानवी हृदयांत प्रतिक्षणीं वर्धिष्णु होणारी ताजी आशा, हें हुतात्म्यांच्या दिव्य पराक्रमाचें अमूर्त चिन्ह असून जगांतील आनंद व सुख, हीं त्यांच्या यशस्वी सजावटीचीं पुण्यपावन आणि अमर अशीं ताम्रपत्रकेंच होत! आमचे रेंदाळकर महाराष्ट्रशारदेचे एक साधेच पाईक आणि त्यांचा आयुष्यक्रमही गुंतागुंतीचा असला तरी एकंदरींत साधाच; परंतु, ध्येयाला बळी पडलेले ते एक हुतात्मे होते हें मात्र निःसंशय. त्यांचें साग्र चरित्र लिहावयाचा काल अद्यापि बराच दूर आहे. तो जवळ आल्यावर एकादा तत्समानधर्मा उत्पन्न होईल व त्यांच्या रहस्यपूर्ण परंतु हृदयदाहक जीवितग्रंथाचें निवेदन करून त्याच्याबरोबरच त्यांच्या ध्येयाचेंही मूर्त चित्र रसिकांच्या निदर्शनास आणील, अशी आशा करणें, हेंच आपलें आजचें प्रेमळ कर्तव्य होय. तरी पण, त्यांच्या तेजस्वी ध्येयाची कांहींशी कल्पना त्यांच्या 'माझें राज्य' या शिरोलेखाखालीं लिहिलेल्या गोड संगीतानें वाचकांना आल्याशिवाय राहणार नाहीं 'जगांतील लहानमोठे सर्व पदार्थ मर्यादेनें जखडून गेले असून स्वातंत्र्याच्या वाऱ्याची झुळूक कोठेंच वाहात नाहीं. म्हणून अशा विषम स्थितींत काल कंठण्यापेक्षां हें पार्थिव जग सोडून तुम्ही माझ्याबरोबर चला', असें सांगून ते पुढें म्हणतातः

तेथें नाहीं भीति तेथें नाहीं बंध, बसून स्वच्छंद गाणीं गावीं
मर्यादा सोडून हासावें नाचावें, अनंतांत जावें मिळोनियां
कुणाच्याही गळां घालोनिया हात, गुंगत डोलत विहरावें!
माझें—तुझें तेथें नाहीं भेदभाव, एकत्वीं एकत्व लीन आहे.
सोडा वंद सारे घाणेरडे पाश; माझे राज्यीं चला उठा वेगें!

—रें. प्र. खं. पृष्ठ १६४

पण, हें राज्य त्यांना लाभलें काय? नाहीं. कदाचित् त्याकरितां ते अनंत जन्म घेतील व तें ते खास मिळवितील, असेंच आपण म्हणत राहूं या. सत्यपालना-साठीं केलेलें धर्मयुद्ध अयशस्वी झाल्यास शहाणें जग त्याला बंड म्हणतें आणि जुलूम जबरदस्तीसाठीं माजविलेलें मोठें बंड यशस्वी झाल्यास तें त्याला धर्मयुद्ध समजतें. परिणामवादी जगाघरचा असा हा उलटा न्याय आहे. रेंदाळकर सत्या-साठीं निसर्गाशीं अहर्निश झगडले. परंतु त्यांत ते या जन्मीं अयशस्वी ठरले. म्हणून जग म्हणतें कीं, रेंदाळकरांनीं बंड केलें! केलेंही असेल कदाचित्, नाहीं

कोणी म्हणावें ? सारांश, अशा रीतीनें प्रतिकूल निसर्गाशीं झगडून शिणला भागलेला त्यांचा आत्मा अखेर काय म्हणालाः

अजुनि चालतोंचि वाट, माळ हा सरेना
विश्रांतिस्थळ केव्हां यायचें कळेना !
त्राण न देहांत लेश, पाय टाकवेना
गरगर शिर फिरति भुवीं होय पुरी दैना !
दिन गेले, मास तसे, वत्सरेंहि गेलीं
निकट वाटतें जीवनसंध्या ही आली
कुठुनि निघालों, कोठें जायचें न ठावें
मार्गांतच काय सकळ आयु सरुनि जावें !
काय निरुद्देश सर्व जीवन मम होतें
मरुसरितेपरि अवचित झरुनि जायचें तें !
पुरे पुरे ही असली मुशाफरी आतां
या धूळित दगडावरि ठेविलाच माथा !

—रें. प्र. खं. पृष्ठ ४०९

हाय ! हाय ! या दुर्दैवी जीवाचा हा दुःखदग्ध माथा ता. २२ नोव्हेंबर १९२०या दिवशीं वर वर्णन केलेल्या कारुण्यमय स्थितींतच कायमचा धुळीस मिळाला !

दा. क्र. ३६९६

# रेंदाळकरांचे निंदक*

अर्धावृत भू तेजोतिमिरें,
सुधा हलाहल समुद्रगर्भी,
कंटक मधु सौरभ्य गुलावा.

—रें. प्र. खं. पृ. १२७

पृथ्वीचा एक गोलार्ध प्रकाशानें तर दुसरा काळोखानें व्यापलेला असतो. समुद्राच्या पोटांतून मृतसंजीवक अमृतावरोबर प्राणघातक कालकूटालाही जन्म लाभला आणि गुलावाच्या मधुर सुगंधाच्या पाठीला पाठ टेंकूनच कंटकसृष्टिही अवतीर्ण झाली, असा वरील पदपंक्तींचा भावार्थ आहे. याच कल्पनेचा आणखी थोडासा विस्तार केल्यास, आपणांला असें म्हणतां येईल कीं, राजकिरीटावर चकाकणाऱ्या हिऱ्याच्या शेजारींच कोळशाची उपज झाली, कोकिलेच्या पंचमालापांबरोवरच कावळ्याची कर्णकटु कर्कर अस्तित्वांत आली. मोराच्या सप्तरंगी पिसाऱ्यानें खुलून दिसणाऱ्या गंभीर तांडवासमवेतच लांडोरीच्या बीभत्सपूर्ण नग्न नृत्यास अवसर मिळाला. सुवासिक पुष्पमालेच्या साहचर्यानेंच खापरकिंमतीच्या दोऱ्याला साधु-हृदयावर विराजमान होण्याची बहुमोल संधि मिळाली आणि रहस्योद्ग्राही विधायक टीकाकाराबरोवरच स्वतःच्या अधम मनोवृत्तींचा शेणसडा घालणाऱ्या विध्वंसक टीकाकाराच्या साडेसातीचाही पांढरा पाय वाङ्मयाच्या पवित्र क्षेत्रांत कायमचा दृढमूल झाला! हे विचार सुचण्याचें कारण, शके १८४७ सालीं पुण्याच्या महाराष्ट्र-शारदा-मंदिरामार्फत प्रसिद्ध झालेलें 'काव्यचर्चा' नामक पुस्तक व त्यांतील श्री० द. अ. आपटे ऊर्फ अनंततनय यांचा 'रेंदाळकर आणि त्यांची कविता' या शीर्षका-खालीं प्रसिद्ध झालेला लेख हें होय.

भिन्न भिन्न विद्वान् लेखकांच्या काव्यचर्चात्मक लेखांच्या एकत्रीकरणानें वरील पुस्तक प्रकाशित करण्यांत आलें असून त्याचे संपादक श्री० ना. म. भिडे, बी. ए. व श्री० अनंततनय हे दोन गृहस्थ आहेत. पैकीं श्री० भिडे ह्यांच्याविषयीं मला

---

* हा व यापूर्वीचा हे लेख अल्प फरकानें पुणें येथील 'रत्नाकर' मासिकांत प्रसिद्ध झाले होते.

फारशी माहिती नाहीं. तथापि त्यांचे त्या त्या नियतकालिकांमधून भिन्न भिन्न विषयांवर वेळोवेळीं प्रसिद्ध झालेले लेख थोड्याबहुत प्रमाणांत माझ्या नजरेखालून गेले असून त्यांवरून ते एक सदभिरुचीचे चहाते असावेत, असा माझा ग्रह झालेला होता व तो आजही कायम आहे. परंतु अनंततनयांशीं मात्र कविमित्र या नात्यानें माझा फारा दिवसांचा परिचय असून ते एक सात्त्विक मनोवृत्तीचे गृहस्थ असावेत, असा माझा तर्क होता. परंतु, प्रस्तुत पुस्तकाच्या शालजोडीला तरटाच्या ठिगळाप्रमाणें जोडलेला त्यांचा 'रेंदाळकर आणि त्यांची कविता' हा अधममनोवृत्तीचा लेख वाचून तो सर्वस्वीं अस्थानीं होता, असें आतां मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. तिसऱ्या किंवा चौथ्या वर्गांतील गणमात्रा जुळविणारे एक पद्यलेखक म्हणून अनंततनयांची थोडीबहुत प्रसिद्धि आहे; लेखक म्हणून नाहीं. 'काव्यचर्चे'तील निबंधकलापांचे जनक, साहित्यरत्न तात्यासाहेब केळकर व कोल्हटकर, प्रो० लक्ष्मणशास्त्री लेले, कविभूषण खापर्डे, श्री० वा. अ. भिडे, प्रो० सबनीस, श्री० शं. के. कानेटकर, श्री० माडखोलकर, प्रो० मा. त्रिं. पटवर्धन इत्यादिकांसारखे असून ते कमीजास्त प्रमाणांत वाङ्मयसमरभूमीवरील धीरोदात्त वीर आहेत, यांत शंका नाहीं. परंतु, त्यांच्या रांगेंत अनंततनयांसारखा शेंदाड शिपाई लेखक म्हणून उभा राहिलेला पाहून--

विचारवान्पाणिनिरेकसूत्रे श्वानं युवानं मघवानमाह

या सुभाषितार्धाची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. नाणावलेल्या लेखकाच्या लिखाणांत ज्या व्याकरणशुद्धि, सुसंगत मांडणी, आटोपशीरपणा, स्पष्टार्थकथन इत्यादि गोष्टी दिसून येतात, त्यांचा अनंततनयांच्या लेखांत बहुतांशीं अत्यंताभाव दिसत असल्यामुळें, चालू शतकांतील सर्वतोपरी हिडीस लेखाचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून होतकरू लेखकांपुढें तो उदाहरणादाखल ठेवावयास फारशी हरकत नाहीं, असें माझें प्रांजल मत आहे. आणि प्रस्तुत लेखाच्या सुरवातीचा दृष्टान्तकलापही मीं याच अभिप्रायानें उपयोजिला आहे, हें उघडच होय.

'काव्यचर्चे'तील प्रस्तुत वादविषयीभूत लेख श्री० अनंततनय यांनीं अत्यंत नाखुषीनें लिहिला आहे. मधुकरीवृत्तीनें आपल्या लेह्यांसोबत्यांकडून पैदा केलेल्या वस्तूंचीं रुचिकर पक्वान्नें तयार करून बुभुक्षित मित्रांना व त्यांच्याबरोबर इतरे जनांनाही पोटभर जेवूं घालण्याची या बल्लवाचार्यांची मूळची सात्त्विक इच्छा. तदनुसार त्यांनीं पात्रासादन केलें. आपापल्या पानावर बसून आतां 'सुखेनैव भोक्तव्यम्'

असेंही त्यांनीं पंक्तिबारगिरांना विनविलें. आणि आतां 'यंतु नदयो' संपवून त्यांच्या भोजनभाऊ मित्रांची हातातोंडाशीं गांठ पडणार, इतक्यांत त्यांचे एक सहकारी त्यांना 'तगादा' करून म्हणाले, 'भाऊ तुम्हीही लगेच बसून घ्या'. 'अनेक प्रकारें (कविरायांची भाषाशुद्धि वाचकांनीं ध्यानीं घ्यावी.) काकुळतीला येऊन' त्यांनीं 'त्यांना सांगितलें कीं, माझी प्रकृति बरी नाहीं; शिवाय, आपण सर्वांनीं बसून भागणार नाहीं; होय, नाहीं, नको, नलगे हें पहावयास तरी कोणी पाहिजेना ? तेव्हां तुम्हीच सारेजण जागा मिळेल तसे बसून घ्या. मी मागाहून पाहीन'. परंतु, त्यांचे सहकारी पडले फार छट ! 'हरहर महादेव' झाला तरी 'भाऊ आपले उभेच': ते कांहींकेल्या पानावर येऊन बसेनात. हा प्रकार पाहून अनंततनयांचे सहकारी आपलें सोंवळें-भांडें बगलेंत मारून 'त्याच पावलीं परत फिरले !' मग बिचारे अनंततनय 'घाईघाईनें त्यांच्या मागें' गेले 'व मोठ्या मिनतवारीनें त्यांना' त्यांनीं 'माघारे वळवून आणलें; पण ते' त्यांच्या 'शिवाय जेवावयास बसेनात. इतक्यांत' सर्वांनीं 'पुनः आग्रहाची उचल केली' व 'कोणाचें मन दुखवावयाचें नाहीं' (काव्य-चर्चा, पृष्ठ ४७०) या ध्येयाला अनुसरून 'बसावयास मोकळी-चाकळी जागा नसतांही दाटीवाटींत' त्यांना 'जेवावयास बसणें भाग पडलें !' केवढी बरें अनंततनयांवर त्यांच्या मित्रांनीं आपत्ति आणिली ही ! एकाद्याच्या भिडस्त स्वभावाचा फायदा घ्यावयाचा झाला तरी त्याला कांहीं मर्यादा आहेच कीं नाहीं ! त्यांची 'प्रकृति बरी नाहीं' हें नको होतें का त्यांनीं विचारांत घ्यायला ? त्यांच्या वयाची गाडी उतारास लागलेली; आणि ती आपल्याबरोबरच जोरानें दामटून पळविली तर कदाचित् अजीर्ण होऊन मोडून भंगून जायची ना ! पण, हा साधाही विचार त्यांच्या आग्रही मित्रांना राहिला नाहीं. ते त्यांच्या तोंडांत घासांवर घास कोंबूं लागले. 'कोणाचें मन दुखवावयाचें नाहीं' हें पडलें अनंततनयांचें ब्रीद ! मग ते काय करतील बिचारे ! त्यांनीं ते घास निमूटपणें गिळिले; पण, 'प्रकृति बरी' नसल्यामुळें, ते त्यांना पचले नाहींत. त्यांना लौकरच भडाभड वांत्या झाल्या आणि त्यांचीच दुर्गंधी 'रेंदाळकर आणि त्यांची कविता' या लेखरूपानें 'काव्यचर्चे'च्या पवित्र भोजनमंडपांत चौफेर पसरली ! श्री० ना. म. भिडे हे 'काव्यचर्चे'चे एक संपादक खरे; पण ते बिचारे राहिले भोरला. गोड 'काव्यचर्चे'च्या शेवटीं प्रस्तुत कवि-रायांचा कटु व अमंगळ लेख मुद्रित झालेला पाहून ते जागच्या जागीं स्थगितच झाले असतील !

सहारा वाळवंटांत ठिकठिकाणीं विखुरलेल्या मोहऱ्या वेंचणें पुरवलें; परंतु, अनंततनयांच्या प्रस्तुत लेखांतील मंडूकवत् इतस्ततः असंबद्ध रीतीनें उड्या मारणारे मुद्दे हुडकून काढण्याचा प्रसंग येणें, यासारखें दुसरें दुर्दैव नाहीं. तथापि, खलकृत असदारोपानें माझ्या दिवंगत मित्राच्या तळतळणाऱ्या आत्म्याला अंशतः तरी शांतिलाभ व्हावा, अशा भावनेनें प्रेरित होऊन मी या खडतर दुर्दैवाचाही राजी-खुषीनें स्वीकार करीत आहें. माझ्या अल्प समजुतीप्रमाणें अनंततनयांच्या लेखांतील खालीं दर्शविल्याप्रमाणें मुद्दे आहेत: [१] कवीच्या काव्यकृतीबरोबर त्याचें चरित्रही पवित्र असावयास पाहिजे; रेंदाळकरांचें तसें नव्हतें. [२] त्यांची ध्येयात्मक कविता म्हणजे उन्मत्तप्रलपित होय. म्हणून केशवसुत, टिळक, गोविंदाग्रज इत्यादिकांच्या अशा स्वरूपाच्या कवितांप्रमाणें त्यांचीही कविता विफल झाली. [३] ते दुसऱ्याचा उपचार करीत नसत पण, त्यांचा मात्र दुसऱ्यांनीं करावा, असें त्यांस वाटे. [४] त्यांची प्रेममीमांसा चुकीची होती. [५] त्यांनीं स्वतःच्या पत्नीला नीट वागविलें नाहीं व त्यांची एक अज्ञात अशी व्यक्ति होती व तिच्या पायीं त्यांच्या संसाराची माती झाली; इ० इ०.

आतां या मुद्द्यांचा क्रमशः विचार करूं. कवीच्या किंवा कलावंताच्या कृती-बरोबर त्याचें चरित्रही पवित्र असावयास पाहिजे, असा अनंततनयांचा हटवादी आग्रह आहे. कलावंताच्या बऱ्यावुऱ्या चरित्रक्रमाकडे फारसें लक्ष न देतां, फक्त त्याच्या हृदयंगम कृतींचें सहृदयपणें कौतुक करून त्यांतच समाधानसुख मानून घेणाऱ्या रसिकांना आमचे भोजनचतुर अनंततनय उत्तर देतात कीं, "पडसें आल्यामुळें, मसणवटींतील धुरानें वासाळलेल्या तांदुळांचा तुला वासच ( घाण नव्हे बरें; कवीचा वाक्संप्रदाय हा ! ) येत नसेल त्याला कोण काय करणार ? " खरेंच का हें, कीं मसणवटीच्या शेजारीं पिकून तयार झालेल्या तांदुळांच्या भाताला मढ्याच्या चरबीची घाण येत असेल ! स्वतःला जाडे समजणाऱ्या कविरायांनीं दिलेलें उत्तर ! मग तें का कधीं खोटें ठरणार ? आतां लोकांनीं खुशाल समजावें कीं, त्रिखंडकीर्ति कालीदासाचीं संपूर्ण काव्यें नीरस व अमंगल होत. कारण तो रंगेल होता, असें म्हणतात. जगन्नाथरायांचे भामिनीविलासादि ग्रंथ तंतोतंत भ्रष्ठ होत. कारण, त्यांनीं यवनीपरिग्रह केला होता. साधुश्रेष्ठ रामदासांचे दासबोधादि ग्रंथ घरांतून हुसकून देण्याच्या लायकीचे; कारण, एका शिष्येच्या बाबतींत त्यांचा तत्समकालीन अनंततनयी वृत्तीच्या प्राण्यांनीं बोभाटा केलाच होता कीं नाहीं ?

लॉर्ड बेकन व बायरन् हे अनुक्रमें लांचखाऊ व विषयलंपट होते, ही गोष्ट समजल्यावर आतां कोणता सदभिरुचीचा माणूस त्यांचे नितांत हृदयंगम गद्यपद्यात्मक ग्रंथ दृष्टीपुढे धरील ? वरील व्यक्तींच्या चरित्रांतील खरेखोटे दोष ठाऊक असतांही आजपर्यंत सर्व लोकांनीं त्यांच्या कृति शिरोधार्य मानल्या ही मोठीच चूक झाली ! पण, आतां—

ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न च कश्चिच्छृणोति माम्

असें कळवळून सांगणाऱ्या प्रस्तुत कविरायांच्या अमोघ वाचेकडे लक्ष्य देऊन त्यांनीं ती शक्य तितक्या लौकर सुधरावी व अनंततनयांच्या कवितेचीं चोपडीं खरेदी करून, वरील अधम ग्रंथकारांच्या 'मसणवटींतील धुरानें वासाळलेल्या' ग्रंथांऐवजीं त्यांचाच नित्यपाठाकडे उपयोग करावा ! आणि, याप्रमाणें वागतील ते भाग्यवंत व न वागतील ते कपाळकरंटे होत. परंतु, अशाच कपाळकरंट्यांचा भरणा वाचकवर्गांत फार आहे व पुढेंही असणार, त्याला काय उपाय ?

कै० रेंदाळकर हीनचारित्र्याचे होते, हा चालू मुद्दयांतील उत्तरार्ध. रेंदाळकरांचा व माझा जवळ जवळ एक तपाचा सहवास होता. परंतु, या दीर्घकालीन सहवासांत ज्या गोष्टींविषयीं मला व त्यांच्या निकट मित्रांनाही नुसता ओझरताही संशय आला नाहीं, तो वयोवृद्ध अनंततनयांना आलेला पाहून माझें मन आश्चर्यानें थक्कच झालें ! मला वाटलें कीं, खुद्द रेंदाळकरांचा किंवा त्यांना 'दुसरी'कडून आलेला एखादा रहस्यमय लेख त्यांच्या हातीं लागला असावा किंवा रेंदाळकरांच्या खासगी वर्तनावर, यक्षाप्रमाणें चोरटी दृष्टि ठेवणाऱ्या एखाद्या रिकामटेकड्या चित्रगुप्ताची तरी त्यांना भेट झाली असावी. परंतु, त्यांचा प्रस्तुत वादविषयीभूत लेख आमूलाग्र वाचून पाहिल्यावरही मला अशांपैकीं कांहींच आढळून आलें नाहीं. तर मग अनंततनयांच्या या धाडसी व अत्यंत संतापजनक विधानास आधार तरी कोणता?— तर खुद्द रेंदाळकरांचीच कविता ! रेंदाळकरांच्या असच्चारित्र्याच्या पिशुन म्हणून अनंततनयांनीं ज्या कांहीं त्यांच्या कवितेंतून आदिमध्यत्रुटित पद्पंक्ति उद्धृत केल्या आहेत, त्या सर्व त्यांनीं आपल्या हयातींतच पुस्तकरूपानें किंवा मासिकपुस्तकद्वारा प्रसिद्ध केल्या आहेत. स्वतःच्या मरणोत्तर अनंततनयांसारख्या वृद्धकपींची आपल्या कवितेशीं गांठ पडून तो तिच्याबरोबर भलत्याच चेष्टा करूं लागेल, अशी जर त्यांना जिवंतपणीं अंधुक कल्पना येती, तर त्यांनीं आपल्या पद्यलेखांबद्दल कदाचित् विशेष दक्षता बाळगिली असती. परंतु, स्वतःच्या ध्यानीं मनींही

नसलेली गोष्ट पुढें एका अधमाकडून उच्चारली जाणार आहे, हें त्या बिचाऱ्यांना अगोदरच कसें कळावें ? रेंदाळकरांच्या असच्चरित्रसूचक म्हणून ज्या पदपंक्ति ते पुढें करितात त्या येणेंप्रमाणेंः—

चारुत्व पावित्र्य वंद्य सर्वकाल, पण पापमूल झालें आहे !
अशा या विषम स्थितींत कशाला, रहातां ? चला हो माझ्या संगें
समीरलहरीवरी ताराशय्या, तीवर साम्राज्य माझें आहे.
तेथें नाहीं भीति, तेथें नाहीं बंध, बसून स्वच्छंद गाणीं गावीं.
मर्यादा सोडूनी हंसावें नाचावें, अनंतांत जावें मिळोनियां
कोणाच्याही गळां घालोनियां हात गुंगत डोलत विहरावें !
माझें तुझें तेथें नाहीं भेदभाव, एकत्वीं एकत्व लीन आहे !

आपण रेंदाळकरांना दुराचारी कां म्हणतों, हें पुरतेपणीं पटविण्याकरितां कविरायांनीं वरील काव्यभाग वाचकांपुढें धरला आहे. परंतु, त्यांतून त्यांचा मतलब कसा बाहेर पडतो, हें मात्र आमच्यासारख्या सामान्य जनांना समजणें फार मुष्किलीचें आहे. उपरिनिर्दिष्ट काव्यभागांतील—

कोणाच्याही गळां घालोनियां हात, गुंगत डोलत विहरावें !

या ओळीवर कविरायांचा विशेष कटाक्ष आहे. " वाटेल त्या स्त्रीच्या गळ्यांत हात घालून गुंगत डोलत चैन करावी " अशा नमुन्याचा ते या चरणाचा अर्थ करितात! व त्यावर पुढें असें भाष्य रचितात कीं, रेंदाळकरांसारखा कवि " असें जर म्हणेल कीं,...स्वपरभावाच्या अभेद बलावर एकाद्याच्या कुटुंबाच्या गळ्यांत हात घालून गुंगत डुलत विहार करीन तर मग मात्र 'ऊंहूं ! शुनः कपाले लगुडप्रहारः'च होणार, हें काय निराळें सांगावयास पाहिजे ? " हें नको निराळें सांगावयास हें कबूल; पण, रेंदाळकरांच्या उभ्या आयुष्यांत असा प्रसंग अमुक एके ठिकाणीं आला होता, हें तरी सांगावयास पाहिजे कीं नाहीं ! मग तेंच तेवढें सांगावयाचें वगळून अनंततनय वायफळ वाष्कळपणा कां बरें करितात ? वस्तुतः पाहिलें तर वरील कवितेंत अथपासून इतिपर्यंत स्त्रीदर्शक नामाचा उल्लेखही नाहीं ! प्रस्तुत कविता 'रेंदाळकरांची कविता' प्रथम खंड–पृष्ठ १६४ वर 'माझें राज्य' या शीर्षकाखालीं आलेली आहे. ती जिज्ञासूंनीं तपासून पाहिल्यास त्यांस माझ्या म्हणण्याची साक्ष तत्काळ पटेल. " नको त्या ठिकाणींही मर्यादेचा तट उभा करून स्वातंत्र्येच्छु जीवाच्या मार्गक्रमणांत वेळीं अवेळीं अडथळे आणणाऱ्या या जगांत रहाण्यापेक्षां आपण सर्व माझ्या

साम्राज्यांत चला. वायुलहरीवर पसरलेल्या तारांच्या शय्येवर माझें साम्राज्य असून तेथें कोणाचें भय वा बंधन नाहीं. तेथें स्वच्छंदपणें संगीत गात कालक्रमणा करावी ! माझ्या साम्राज्यांत प्रत्येकाला पूर्ण स्वातंत्र्य असल्यामुळें, तेथें मर्यादेला वावच नाहीं. तर स्वसंवेद्य आनंदानें हंसत नाचत प्रत्येक जीवानें शेवटीं अनंतत्वांत मिळून जावें, शिवाय येथें जगांतल्याप्रमाणें वैरभावाला अवसरच नसल्यामुळें एकमेकांचे एकमेक सहभव मित्र असून त्यांतील कोणीं कोणाच्याही गळ्यांत हात घालावा आणि खुशाल गुंगत डोलत आनंद लुटावा. येथें 'माझें' 'तुझें' हें लोपलें असून जिकडे तिकडे अद्वैत पसरलें आहे ! " असा प्रस्तुत कवितेचा सविस्तर निष्कर्ष आहे. जन्मजात सभ्य लोकांना यांत बदफैलीपणाची घाण येईल अशी कल्पनाही करवत नाहीं. मग अनंततनयांना ती कशी आली, हें एक भगवान् जाणे ! रेंदाळकर माझे जिव्हाळ्याचे स्नेही होते, हें मला कबूलच आहे. परंतु त्यामुळें, त्यांच्या सूक्तासूक्त वर्तनक्रमाचेंही समर्थनच करीत सुटावयाचें, अशी अंधवृत्ति माझ्या वांट्यास आलेली नाहीं. परंतु, ज्याला सुपारीच्या खांडाचेंही मरेतोंपर्यंत व्यसन नव्हतें त्या रेंदाळकरांवर त्यांच्या मरणानंतर एकाद्या चंचीबहाद्दरानें वाटतील तसले खोटेनाटे आक्षेप घेतलेले पाहून अंतःकरण तळतळल्याशिवाय कसें राहील ? अनंततनयांची बेशरम मनोवृत्ति पुढें काय म्हणते पहा. "बोलून चालून ज्या अंधारांतल्या गोष्टी असतात, त्या खऱ्या असल्या तरी त्यांची शाबिती करतां येत नाहीं. ...... बरं, मी म्हणतें, असलं कांहीं, म्हणून काय झालं ? तें कांहीं चिरंतन नाहीं. त्यांच्याबरोबरची पिढी संपली म्हणजे त्या गोष्टींना आयतीच मूठमाती नाहीं का मिळायची? ...शिवाय असं पहा 'वळ ज्याचें त्यास तें !' " अरेरे ! 'काव्यचर्चे'च्या पवित्र मंदिरांत काय हें नग्न नर्तन ! दे०भ० तात्यासाहेब केळकर, साहित्यरत्न तात्यासाहेब कोल्हटकर वगैरे सदाश्लाघनीय शारदोपासकांनीं आपापल्या गोंडस लेखांच्या सजावटीनें वजनदार केलेल्या 'काव्यचर्चे'त अनंततनयांसारख्या तमासगिराच्या तमाशेवजा लेखाला स्थान मिळावें, यापरतें दुर्दैव कोणतें असणार ? आपापल्या वाग्गंगेच्या शेजारींच अनंततनयांच्याही घाणीचा कुजट नाला वहात असलेला पाहून 'काव्यचर्चे'तील अभिजात लेखकवर्गानें आपापल्या माना सात्त्विक लाजेनें खालीं घातल्या असतील ! मी अनंततनयांना असें स्पष्ट सांगतों कीं, तुमच्या या विषदिग्ध प्रलापांना उत्तर द्यावयास अगर तुमच्यावर कायदेशीर इलाज करावयास रेंदाळकर आज हयात नाहींत; अशी संधि साधून त्यांच्याविषयीं भलतींसलतीं

नामर्दपणाचीं विधानें करावयास तुम्ही प्रवृत्त झालांत, हें कांहीं बरें केलें नाहीं. 'काव्य-चर्चेंतील सदभिरुचीच्या विद्वान् लेखकबंधूंनीं व इतर विद्यमानकालिक शारदोपासकांनीं प्रस्तुतच्या त्रिकालगर्हणीय लेखाबद्दल जरी तुम्हांला जाब विचारला नाहीं तरी तो परलोकांतील न्यायनिष्ठुर अधिकाऱ्यापुढें द्यावा लागेलच लागेल, यांत काडीचीही शंका नाहीं.

वस्तुत: विचार केल्यास फक्त कविकृतीवरून कविचरित्र रंगविण्याचा मार्ग स्वीकारणें, हें अत्यंत धाडसाचें व धोक्याचें होय. कविकृतींतील पूर्वापरसंदर्भरहित मधलाच त्रुटित भाग उद्धृत करून चरित्रलेख तयार करूं गेल्यास, आमच्या सन्माननीय प्राचीन कविमहाशयांवर केवढा अनर्थ ओढवेल, हें पहाणें थोडेंसें मनोरंजकच होईल; मासल्याकरितां दोन तीन उदाहरणें घेऊं.

कविकुलचक्रवर्ती कालीदासाचें मेघदूत काव्य रसिकजनविश्रुत आहे. त्यांत खालील चरण आढळतें—

ज्ञातास्वादो विवृतजघनां को विहातुं समर्थः ?

निव्वळ मराठी वाचकांना वरील चरणाचा अर्थ ध्यानांत येणार नाहीं, हें कळत असूनही तो मला येथें देतां येत नाहीं, याबद्दल दिलगिरी वाटते. सदर चरणार्थ लक्षांत घेऊन त्याचा कविचरित्राशीं संबंध जोडावयाचा झाल्यास, असेंही भरमसाट विधान करतां येईल कीं, कालीदास परस्त्रीधर्षणप्रसंगानें जबरीसंभोगाच्या गुन्ह्यांत सांपडून त्याला शक्य तितकी कडक शिक्षा भोगण्याचा प्रसंग आला असावा. कारण, त्याचें उपरोक्त कविताचरणच इतकें आततायी व अतिप्रसंगी आहे कीं, एकाद्या सोंवळ्या चरित्रलेखकाला त्याच्या वाचनानें हिंवच भरावें !

पतित मी पापी शरण आलों तुज

हा तुकोबाचा अभंगचरण बहुतेक सर्वांच्या परिचयाचा आहे. यांत तुकोबांनीं स्वतःच्या पातित्याची व पापीपणाची स्वमुखानें कबुली दिली असून जगांतील बहुजनसमाज त्यांच्या दुराचरणानें संतप्त झाल्यामुळें, ते शेवटीं निराशेनें विठोबाला उद्देशून म्हणाले कीं, 'देवा ! मी तुला शरण आलों'. मंबाजीबुवानें केलेल्या त्यांच्या छळांतील रहस्य झालें तरी तें या पातित्यांत व पापीपणांतच असलें पाहिजे, हें उघड होय ! 'आधीं केलें, मग सांगितलें' अशा बाण्याच्या श्रीरामदासांनीं, आपल्या ग्रंथांत—

आधीं प्रपंच करावा नेटका

असें सांगितलें आहे. अर्थात् ते विवाहसूत्रानें बद्ध झाले असलेच पाहिजेत. कारण 'आधीं केलें, मग सांगितलें' असें तेच सांगतात ! एवंच, ते आमरण ब्रह्मचारी होते ही निव्वळ दंतकथा असून इतिहासभक्तांनीं आतां या गोष्टीचें अशा दृष्टीनें संशोधन करणें फार फार अगत्याचें आहे. रामदासांना प्रपंचांत फार सुख मिळालें नसावें, असें दिसतें, ते एके ठिकाणीं म्हणतातः—

शक्ति नाहीं युक्ति नाहीं, बुद्धि नाहीं विवेकिता !

प्रापंचिक कष्टांनीं त्यांची शक्ति गळाली, कष्टनिवारणार्थ त्यांना युक्ति सुचेना, त्यामुळें त्यांच्या बुद्धीला मांद्य येऊन ते पुढें अविवेकीही ठरले. हा अविवेक पुढें इतक्या थराला पोंचला कीं, ते सर्वथा जडवादीच बनले. आणि या गोष्टीचें स्पष्ट गमक म्हणजे त्यांचेंच 'यत्न तो देव जाणावा' हें वचन होय ! ब्रह्मादि देवता सोडून नुसत्या यत्नालाच देवतात्व देणें म्हणजे जडवाद नव्हे तर काय ? ही झाली रामदासांची कथा. पण कविवर्य मोरोपंत तरी काय कमी पातकी होत ! नेहमीं 'कोटी अपराध रचणाऱ्या' या कवीनें स्वोद्धारार्थ गंगेपाशीं गाऱ्हाणें घातलें असतां, तिनें काय केलें ? तर तेच सांगतात—

कर श्रवणिं ठेविते, नुघडि नेत्र घे भीतिला !

बरें, एवढेंच करून ती स्वस्थ राहिली ? छे ! मुळींच नाहीं. कवीचीं पातकें श्रवण करून ती शेवटीं—

म्हणे, 'अगइ ! ऐकिलें नच कधीं असें पाप गा !'

खुद्द कवीचाच हा कबुलीजबाब असल्यानें मोरोपंताच्या हीन चारित्र्याविषयीं आतां शंका कोठें राहिली ? सारांश, कवीच्या चारित्र्याची पारख करण्याची जी कसोटी अनंततनयांनीं स्वीकारली आहे तिच्या योगानें एकतरी मराठी किंवा संस्कृत कवि किंवा संत सच्चरित्र ठरेल किंवा नाहीं, कोण जाणे !

अनंततनय आपला लेख लिहीत असतां, मध्येंच त्यांच्या मनाच्या दोन शक्ति उठून बसल्या ! पैकीं एकीचें नांव तारक व दुसरीचें नांव मारक. आपण सोईकरितां पहिलीला तर्कटी व दुसरीला मर्कटी म्हणूं. प्रस्तुत वादविषयीभूत कवितेवर 'गंधर्वनगरा'चा म्हणजे असत्यकथनाचा छाप मारून मर्कटी तर्कटीला विचारते, "कसल्या ग बाई या कविता ?" या व अशासारख्या कवितांच्या "नुसत्या आठवणीनें अंगावर अगदीं कसा कांटा उभा राहतो !" अनंततनय पडले तत्त्व-

वेत्ते कवि ! त्यांना असल्या भावनाप्रधान कविता कशा बरें परवडाव्या ? मनुस्मृति, मुहूर्तमार्तंड, पद्यात्मक भूगोल इत्यादि धार्मिक, ज्योतिषविषयक किंवा भौगोलिक पद्यलेखांत उत्कृष्ट कवितेची खाण पैदा करण्याचें त्यांच्या अंगीं ओतप्रोत सामर्थ्य ! अर्थात्, हीं 'गंधर्वनगरें' त्यांना किंवा त्यांच्या तर्कटी-मर्कटींना त्याज्य वाटल्यास नवल कसलें ? पण, त्यांना कालीदासाचें मेघाला दूत बनवून त्याकरवीं संदेश पाठविणें खरें वाटतें. आपल्या एखाद्या मित्राला 'परीक्षेंत उत्तीर्ण हो' हा दोन शब्दांचा निरोप सांगावयास ते जगवंद्या श्रीशारदामातेला आपली मोलकरीण (श्रीशारदादूतिका) बनवितात; तिला खंडाळ्याच्या घाटांत हंस भेटवितात व त्यांचा 'वंजुलकुंज' राधेबरोबर माणसाप्रमाणें बोलतो ! अनंततनयांच्या मर्कटीला यांत कांहीं असत्यकथन दिसत असेल तर शपथ ! अनंततनय स्वतांला कवि म्हणवतात. पण, ते कविहृदयाला पुरते पारखे झाले आहेत, असें मोठ्या नाखुषीनें म्हणावें लागतें. त्यांची गाजरपारखी रसिकता लक्षांत घेऊन त्यांना खालील सुभाषिताचा अहेर करावयाचा मोह कांहीं केल्या आवरत नाहीं.

अरसिकजनभाषणतो—
 रसिकजनैः सह वरं कलहः
लंबकुचालिंगनतो—
 लिकुचकुचापादताडनं श्रेयः

आतां त्यांचा पुढचा आक्षेप, रेंदाळकरांची ध्येयात्मक कविता म्हणजे उन्मत्तप्रलपित असून केशवसुत, रे० टिळक, गोविंदाग्रज, ठोंबरे इत्यादिकांच्या एतत्स्वरूपक कवितांप्रमाणेंच तीही अखेरीस निष्फल ठरली, हा होय. केशवसुतांची 'तुतारी', टिळकांचें 'पुरें जाणतों मीच माझें बल', गोविंदाग्रजांचा 'दसरा', ठोंबऱ्यांचा 'धर्मवीर' आणि रेंदाळकरांचें 'शिंग' या साऱ्या कविता विफल झाल्या, असें शिरा ताणून सांगणाऱ्या या गृहस्थाला कोणतें उत्तर दिलें असतां, या जरठ मार्जाराची नवकवींच्या पाठीमागची कायमची पीडा सरेल, हें नीटसें कळत नाहीं. ते काय म्हणतात, पहा: " जुनीं समाजबंधनें नष्ट करून त्यांच्या जागीं नवीन सुरू करावयास लागत असलेलें सामर्थ्य केशवसुत, रे० टिळक, गोविंदाग्रज, रेंदाळकर यांपैकीं एकाच्याही अंगीं नसल्यामुळें, 'शब्द बापुडा केवळ वारा, अर्थ वागतो मनांत सारा', अशी त्यांची स्थिति होऊन त्यांचीं वाद्यें अखेर पिपाण्याच ठरलीं ! " आणि ब्रह्मकटाह फोडणारे नगारे म्हणून कोण ठरले ? तर अलौकिक सामर्थ्यसंपन्न अनंत

सं.क्र.१०७ २०



तनयांच्या तर्कटी-मर्कटीची ओंगळ खरकटीं ! 'मुखमस्यास्तीति वक्तव्यम्' या न्यायानें बरळत सुटणाऱ्या प्रस्तुत अहंमन्य कविपुंगवाच्या उपरोक्त धाडशी विधानाकडे केशवसुत, गोविंदाग्रजादि प्रातःस्मरणीय कवींच्या भक्तगणांचें लक्ष वेळींच जावें, अशी इच्छा प्रदर्शित करून पुढील आक्षेपांचा विचार करण्याकडे वळतों.

रेंदाळकर दुसऱ्यांचा उपचार करीत नसत. पण त्यांचा मात्र दुसऱ्यांनीं करावा, असें त्यांस वाटे, हा अनंततनयांचा तिसरा आक्षेप. याचा खरेपणा सिद्ध करण्यासाठीं त्यांनीं दोन उदाहरणें पुढें केलीं आहेत. तीं अशीं:—[१] रेंदाळकर 'करमणुकी'करितां गोविंदाग्रजांकडे कविता मागावयास कमींत कमी आठ वेळां तरी गेले होते. परंतु, निरनिराळया सबबींवर त्यांनीं त्यांना कविता अशी दिलीच नाहीं व त्यावद्दल रेंदाळकरांना अखेरपर्यंत अपमानदुःख होत होतें. [२] पुण्याचे रा० ब० आगाशे यांच्या भेटीस रेंदाळकर एकदां गेले असतां, निर्यमक कवितेवद्दल आगाशे त्यांना अतिशय टाकून बोलले. तेव्हां अनंततनयांना भेटून रेंदाळकर असें म्हणाले कीं, 'मी माझ्या पायांनीं त्यांच्या घरीं गेलों म्हणून त्यांनीं माझा असा उपमर्द करावा काय ?' व याबद्दलही त्यांना शेवटपर्यंत अपमानदुःख होत होतें, वगैरे. अनंततनयांनीं पुढें केलेलीं वरील दोन पोरकट उदाहरणें लक्षांत घेतलीं तरी त्यांच्यावरून रेंदाळकरांनीं वरील व्यक्तींचा उपमर्द केला, असें तर निष्पन्न होत नाहींना ? रेंदाळकर ही मनुष्यकोटींतील व्यक्ति होती; साधुकोटींतील नव्हे. एकाद्या गृहस्थानें त्यांचा विनाकारण अपमान केला तरी त्यांनीं स्वतःजवळही त्यावद्दल दुःख करूं नये तर काय आनंद मानीत बसावें ? मनुष्यस्वभावाला हें शक्य तरी आहे काय ? अद्वैतमार्गप्रवर्तक आद्य शंकराचार्यांनीं देखील 'माझ्या अंगावरील छाटी तुझ्या बापालाही मिळावयाची नाहीं', असें मंडनमिश्राला वादप्रसंगीं चिडून उत्तर दिलें होतें. तेथें बिचाऱ्या रेंदाळकरांच्या भावनामय हृदयाची कथा काय ? गोविंदाग्रज व आगाशे यांनीं भिन्न भिन्न तऱ्हेनें केलेला अपमान उणें अधिक न बोलतां निमूटपणें गिळून स्वतःशींच दुःख करीत राहणाऱ्या रेंदाळकरांच्या सात्त्विक हृदयाचीच यांत विशेष थोरवी दिसून येते. शिवाय, अनंततनयांनीं स्वमतपुष्ट्यर्थ साक्षीदार म्हणून ज्या व्यक्ति पुढें आणल्या आहेत त्या साऱ्या, त्यांचा प्रस्तुत वादविषयक लेख लिहिण्यापूर्वी दिवंगत झाल्या आहेत. रेंदाळकर पुणें येथें असतां, त्यांना दृढपरिचित झालेल्या कित्येक वाङ्मयसेवक व्यक्ति आजही पुण्यांत रहात असून त्या अनंततनयांच्या

ऱ्हाट ओळखीच्या नाहींत, असें नाहीं. असें असून मृत साक्षीदारांचीं भुतें वाचकांच्या अदालतीपुढें उभीं करण्यांत या अधम कविलेखकाचा हेतु किती नीचपणाचा आहे, हें उघड होत नाहीं काय ?

रेंदाळकरांना प्रेम म्हणजे काय, तें शेवटपर्यंत समजलें नाहीं, या आक्षेपाचा आतां विचार करूं. अनंततनयांच्या आक्षेपाचा आशय असा आहे कीं, 'रेंदाळकर स्वतःच्या कवितांतून निष्काम प्रेमाची तळी उचलून धरतात; परंतु, त्यांच्याच दुसऱ्या कांहीं कवितांमधून कामुक प्रेमाचा वास आल्याशिवाय रहात नाहीं'. काव्यविवेचक दृष्टीनें ते असें म्हणते तर त्याला उत्तर देण्याच्या भानगडींत मी पडलों नसतों. कारण, कोणत्याही वाङ्मयात्मक ग्रंथावर विवेचक किंवा परीक्षक बुद्धीनें स्वमत-प्रदर्शन करावयाचा कोणाही विद्वानाला पूर्ण अधिकार आहे. पण, अनंततनयांची बुद्धि अशी मुळींच नसल्यामुळें, यक्षबलिन्यायानें या आक्षेपालाही उत्तर देणें क्रमप्राप्त आहे. 'प्रेम हें प्रेमाकरतांच असतें; स्वार्थादि हेतूंनीं कलंकित झालेलें प्रेम हें मुदलीं प्रेमच नसून तीं एक प्रकारची आसक्तिच होय', अशी रेंदाळकरांची प्रेमविषयक मीमांसा होती. त्यांच्या प्रेमविषयक काव्यकलापांत या गोष्टीची खूण वाचकांस ठिकठिकाणीं पटते. अनंततनयांना ही व्याख्या पसंत नाहीं. कारण, ती 'स्वपरवंचक' होय, असें त्यांचें मत आहे. ते आपली व्याख्या मैत्रेय मुनीच्या मुखानें 'प्रीति जी दुज्यावरि मोठी, सर्वहि ती अपुल्यासाठीं' अशी देतात. आणि पुढें म्हणतात. "प्रीतीकरितां प्रीति म्हणजे काय ! याला कांहीं अर्थ आहे काय ? किंवा त्यांनीं ( रेंदाळकरांनीं ) ... Love for love's sake अशा प्रकारचे कांहीं इंग्रजी शब्दसमूह वाचून किंवा ऐकून (कारण, त्यांना इंग्रजी येत नव्हतें !) तदनुरूप वरील उत्तर केवळ काव्यापुरतें बनविलें ! " आतां या निरर्गल कर्करीला शहाण्यानें काय उत्तर द्यावें ! 'शुभवोल रे नाऱ्या' असें म्हणतांक्षणींच आपल्या सौभाग्यसंपन्न मातेला 'बाबांप्रमाणें तूंही क्षुराकर्माला प्रवृत्त कां होत नाहींस' असें विचारणाऱ्या खुळ्या कार्ट्याची आठवण प्रस्तुत प्रसंगीं झाल्याशिवाय रहात नाहीं ! पूर्वापर संबंध लक्षांत न घेतां भलतीच गोष्ट भलत्याच ठिकाणीं घुसडून देण्याची अनंततनयांची प्रवृत्ति त्यांच्या योजकतेचा कंगालपणा मात्र दाखविते. प्रेम ही चीज फक्त आपल्यासाठीं म्हणजे स्वतःच्या स्वार्थसाधनासाठींच आहे, ही कल्पना गृहीत धरल्यास केवढा अनवस्थाप्रसंग येईल, या गोष्टीची कल्पना अनंततनयांच्या काव्यहीन स्वार्थी हृदयाला सहजासहजीं होणार नाहीं, हें मुकाट्यानें कबूल करणें

भाग आहे. तथापि, ती इतरांनाही येणार नाहीं, असें समजण्याचें कांहींच कारण नाहीं. 'प्रीतीकरितां प्रीति' किंवा 'कर्तव्याकरितां कर्तव्य' अशासारख्या कल्पना साऱ्या पाश्चात्य आणि म्हणून त्या सपशेल अरोचक, अशी समजूत करून घेऊन त्यांच्यावरून कोणीं कितीही नासांदोलन केलें तरी त्याचा काडीचाही उपयोग नाहीं. प्राचीन व अर्वाचीन भारतीय इतिहासाकडे लक्ष दिल्यास, वरील कल्पनांचीं स्पष्टार्थ-निदर्शक अशीं शेंकडों उदाहरणें देतां येतील. विश्वसंत्रासक वृत्राच्या वधासाठीं स्वतःचीं हाडें आपखुषीनें इंद्राच्या स्वाधीन करून जिवंतपणींच राष्ट्रस्वास्थ्याकरितां आत्मबलिदान करणारा दधीचमहामुनी स्वार्थी प्रेमाचा लंपट होता, असें कसें म्हणतां येईल ? केवळ पित्राज्ञापरिपालनार्थ राज्यत्यागपूर्वक वनवास स्वीकारणारा राम व केवळ बंधुप्रीतीसाठीं स्वतःची माता व अयत्नलभ्य राज्यवैभव या दोहोंचा-ही राजीखुषीनें त्याग करून चौदा वर्षें संन्यस्त वृत्तीनें राहणारा भरत यांचें प्रेम काय स्वार्थलंपट होतें ? शतपुत्रांचा घात झालेला प्रत्यक्ष पहात असतां, विश्वामित्रा-विषयीं परमशांति धारण करणाऱ्या वसिष्ठमहर्षीचें शांतिप्रेम स्वार्थमूलक होतें, असें कोण म्हणूं शकेल ? भावी अनर्थाची स्पष्ट कल्पना येत असूनही जन्मसहभव कर्णकुंडलांचें दान करणाऱ्या कर्णाचें त्यागप्रेम त्यागाकरितां नव्हतें, तर तें कशासाठीं होतें ? पापी दुर्योधन सुख भोगतो व धर्मनिष्ठ तुम्ही दुःख भोगतां. तेव्हां खरा धर्म तरी कोणता, अशा आशयाच्या द्रौपदीच्या प्रश्नास धर्मानें दिलेलें उत्तर सदा-चिंतनीय आहे. धर्म म्हणाला—

नाहं धर्मफलाकांक्षी राजपुत्रि ! चराम्युत
अस्तु वाऽत्र फलं मा वा कर्तव्यं पुरुषेण यत्
गृहे वा वसता कृष्णे ! यथाशक्ति करोमि तत्

धर्मफलाच्या वासनेनें मी धर्माचरण करीत नसून मनुष्याचें किंवा गृहस्थाचें जें कर्तव्य तें मी साधेल तितकें करितों. फलाभिनिविष्ट होऊन धर्माचरण करणें ही निव्वळ वाणिज्यवृत्ति होय, असा धर्माच्या म्हणण्याचा अभिप्राय आहे. धर्माकरितां धर्म, कर्तव्याकरितां कर्तव्य किंवा प्रीतीकरितां प्रीति, याच कल्पनेचा पुरस्कार, प्रस्तुत अभिप्रायांत केला असल्याचें दिसून येत नाहीं काय ? अर्वाचीन इतिहासांतही या नमुन्याचे दाखले कमी आहेत, असें नाहीं. पावनखिंडींत आत्मबलिदान करणाऱ्या बाजी प्रभूंची स्वामिनिष्ठा, शारीरिक, मानसिक, आर्थिक व कौटुंबिक अहर्निश अनंत यातना सोसून देशकार्यार्थ चंदनाप्रमाणें

झिजणाऱ्या लोकमान्यांचें राष्ट्रप्रेम आणि देशबंधु दासांचा राष्ट्रार्थ संपत्तिसंन्यास स्वार्थकलंकितच होता, असें कोणता सहृदय माणूस म्हणूं शकेल ? असो. अनंततनयांनीं केलेली किंवा संमानिलेली ही प्रेमव्याख्या त्यांच्या मित्रांनीं नेहमीं लक्षांत ठेवावी, हें येथें जातां जातां सुचविणें अगत्याचें वाटतें.

रेंदाळकरांनीं स्वतःच्या पत्नीला बरोबर वागविलें नाहीं व त्यांची अज्ञात अशी एक व्यक्ति असून तिच्या पायीं त्यांच्या संसाराची अखेर माती झाली, असे शेवटचे दोन आक्षेप अनंततनय पुढें करितात. पैकीं पहिल्या आक्षेपाचें सविस्तर उत्तर अल्पपरिचयांत मीं ओघानें दिलेंच आहे. त्यामुळें, येथें त्याबद्दल लिहिण्याचें तादृश कारण नाहीं. दुसऱ्या पोरकट व निर्मूल आक्षेपालाही उत्तर देणें म्हणजे व्यर्थ कालक्षेपच होय. कारण, ही तिसरी 'अज्ञात' व्यक्ति कविरायांनीं रेंदाळकरांच्या कवितांवरूनच निर्माण केली आहे! आणि, निव्वळ कवीच्या काव्यावरून कल्पना लढवावयाच्या झाल्यास कसा अनवस्थाप्रसंग प्राप्त होतो, हें मागें एके ठिकाणीं विशद झालेंच आहे. तथापि, या आक्षेपाचें सरळ उत्तर द्यावयाचें झाल्यास एवढेंच देतां येईल कीं, त्यांची तशी व्यक्ति कोणीच नव्हती ! परंतु, अनंततनयांना दुसऱ्याच्या घरालगतच्या खातेऱ्यांत तोंड बुडवून सूकरवृत्तीचें प्रदर्शन करावयाचें असल्यास, त्यांना तसें करावयाची मोकळीक देऊन आपण मुकाट्यानें पुढें निघून जाणें, हेंच सर्वथा सभ्यवृत्तीचें निदर्शक होय.

आतां अनंततनयांच्या इतर सटरफटर आक्षेपांना संक्षेपानें एकत्र उत्तर देऊन हा बराच लांबलेला लेख पुरा करितों. रेंदाळकरांची बरीचशी कविता शृंगाररसप्रधान आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. पण त्यामुळें घात असा काय झाला तें मात्र समजण्यास मार्ग नाहीं. 'मराठीहून इतर भाषेंत जरी कमालीची शृंगारिक कविता खपली तरी ती मराठींत खपावयाची नाहीं. किंबहुना, महाराष्ट्रकवींचें व त्यांच्या काव्याचें हेंच तर वैशिष्ट्य आहे' असें ते म्हणतात. पण, तें सर्वस्वीं बरोबर आहे, असें मात्र नाहीं. प्राचीन वामन मयूरादि कवींच्या काव्यांतून इतर रसांसमवेतच शृंगारालाही पूर्ण वाव मिळाला असल्याचें मराठी वाचकांस फारसें अपरिचित नाहीं. फरक एवढाच कीं, सदर कवींनीं देवादिकांच्या प्रतिमा डोळ्यापुढें ठेवून शृंगाररसवर्णनाची हौस भागवून घेतली, इतकेंच ! पण, हा द्राविडी प्राणायामाचा मार्ग सोडून आधुनिक कवि सरळ मार्गानेंच शृंगाराची सजावट करावयास प्रवृत्त झाले तर त्यांत बिघडलें कोठें ? कीं मराठी भाषेंतून शृंगाराची सपशेल उचल-

वांगडीच झाली पाहिजे, असें आक्षेपकांचें म्हणणें आहे ? रेंदाळकरांच्या कवितेवर कांहींतरी टीका ही केलीच पाहिजे, एवढ्याच भावनेनें अनंततनयांनीं हें कांहींतरी खरडलें आहे. पण, खुद्द त्यांच्याच पायाखालीं काय जळतें आहे, इकडे त्यांचें लक्ष आहे काय? मराठींत जर सामान्य शृंगारही खपत नाहीं तर खुद्द त्यांनींच कालीदासाच्या शृंगारतिलकाचें मराठी पद्य-भाषांतर का बरें केलें आहे ? शृंगार-तिलक हा अध्यात्मविद्येचा ग्रंथ आहे, अशी कां त्यांची समजूत आहे ? पण ही झाली थोडीशी शिळी गोष्ट ! परंतु परवां परवां खुद्द त्यांनींच जयदेव कवीच्या गीतगोविंदाचें पद्यात्मक मराठी भाषांतर एका मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध केलें आहे, तें कां म्हणून ? कीं शृंगारतिलकाप्रमाणेंच हाही ग्रंथ वेदांतविद्यानिदर्शक आहे असें ते मानतात ? मराठींत सामान्य शृंगारही खपत नाहीं, असें म्हणणारे हे 'सोवळे' साव गीतगोविंदाचें मराठी भाषांतर करितात, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. गीत-गोविंदांतील पराकाष्ठेच्या शृंगाराचा सर्वांगीण नमुना म्हणून चारच ओळी खालीं देतों.

किसलयशयननिवेशितया, चिरमुरसि ममैव शयानम्
कृतपरिरंभणचुंबनया, परिरभ्धकृताधरपानम्;
सखि ! हे केशिमथनमुदारम्-
रमय मया सह भावितया सहकारम्.

प्रस्तुत पद्याचा वाचकांनीं जरूर अर्थ लक्ष्यांत घ्यावा व 'सोवळे' अनंततनय अशा ग्रंथाचें स्वतः भाषांतर करून पुन्हा दुसऱ्याची शृंगाररस वर्णिल्यामुळें, टवाळी करावयास प्रवृत्त होतात, यांतील इंगित काय असावें, तें त्यांनीं आपल्या मनाशीं ताडून पहावें. स्वसमकालीन किंवा त्यापेक्षां अलीकडच्या कवींवर कांहींतरी कुसपट काढून वाटेल तसा ताशेरा झोडण्याची अनंततनयांना भारी खोड ! आणि ती काय म्हणून ?–तर त्यांच्याविषयीं त्यांच्या मनांत सदोदित पेटणारा मनस्वी मत्सर ! कानामागून आली नि तिखट झाली, असें त्यांना नवकवींबद्दल वाटतें, त्याला ते तरी 'काय करणार बिचारे ! त्यांचा हा अव्यापारेषु व्यापार पाहून खालील सुभाषितार्धाची आठवण होते—

प्रायः शुष्कस्तनी नारी कंचुकीमेव निंदति !

रेंदाळकरांच्या कांहीं कविता परकल्पनापुष्ट व कांहीं भाषांतरित आहेत, असें सांगून अनंततनयांनीं उदाहरणार्थ म्हणून परकल्पनापुष्ट अशा कांहीं कवितांची

जंत्रीही दिली आहे व तींत आपल्याही एका कवितेची वर्णी लाविली आहे. भिन्न भिन्न कविकृति तुल्यकल्पनांकित दिसल्यावरोबर त्यांच्यावर परकल्पनाचौर्याचा आळ आणणें, यासारखें मूर्खपणाचें लक्षण कावित्व्च असूं शकेल. शिशुपालवध व किरातार्जुनीय या महाकाव्यांचे जनक अनुक्रमें माघ व भारवि यांच्या वरील काव्यांत कांहीं ठिकाणीं व विशेषेंकरून तिसऱ्या सर्गाच्या सुरवातीस इतकें कल्पना-साम्य दिसतें कीं, या दोहोंपैकीं कोणीं कोणाची कल्पना उचलली असावी, हेंच कळत नाहीं. पण, विचारांतीं असें वाटतें कीं, महाकाव्य प्रसवणाऱ्या या कवींस एकमेकांची उसनवारी करावयाची गरज काय ? कारण, एकासारखीच दुसऱ्यालाही कल्पना सुचणें, यांत अशक्य असें काय आहे ? रेंदाळकरांचीही काव्यसंपत्ति विपुल असून ती अवघ्या दहा किंवा अकरा वर्षांच्या मुदतींतच संपादिलेली आहे. ते जर उसनवार कवि असते तर त्यांच्या हातून इतक्या अल्पावकाशांत एवढी कामगिरी खास होतीना. त्यांची कांहीं कविता भाषांतरित आहे; पण त्याबद्दल हिणवण्यासारखें असें काय आहे ? खुद्द अनंततनयांचा दुसरा 'हृदयतरंग' त प्रायशः भाषांतरात्मकच आहे ! असें असून या बाबतींत त्यांची मर्कटी काय म्हणते पहा—" त्यांनीं आपलं चांगलं भाषांतर केल्याबद्दल फार तर चाळीस टक्के गुण देईन." पण बाई, तुझ्या चाळीस टक्क्यांना भीक घालतोय् कोण आणि तूं देणार तरी कोण ? वामनपंडितादि कवींची बहुतेक कविता भाषांतररूपांतरात्मक आहे, म्हणून त्यांना आतां आमचे कवि-धटिंगण 'फार तर चाळीस टक्के गुण' देणार ! आणि शिल्लक राहिलेल्या साठांची वाट ? ते त्यांनीं सगनभाऊकरितां राखून ठेविले असतील, कारण, त्याची सर्व कविता स्वतंत्र आहेना ! रेंदाळकरांना इंग्रजी येत नव्हतें हेंही लिहावयास अनंततनय विसरले नाहींत. पण, एकाद्याला इंग्रजी आलें नाहीं म्हणून तो काय पंचमहापातकी ठरतो ? अनंततनयांना संस्कृत येत नाहीं, म्हणून त्यांना दोषी कोण ठरवील ? 'केन जानीमहे' (म्हणजे कोणीं जाणावें ? काव्यचर्चा पृष्ठ ४८३) 'सृजन' (म्ह. उत्पादन; हा शब्द पाणिनीचा साक्षात् जन्मदाताच होय ! काव्यचर्चा, पृष्ठ ४८९) वगैरे शब्दसमूह व मराठींत भाषांतरित झालेल्या गीताशाकुंतलादि ग्रंथांतील कांहीं संस्कृत श्लोक ते आपल्या प्रादेशमात्र लेखांतही हौसेनें उद्धृत करतात हें खरें; पण तो त्यांचा निव्वळ लडिवाळपणा होय ! सारांश, एकाद्याला एकादी भाषा येत होती वा नव्हती, असें सांगून स्वतःचा हीनपणा कां बरें व्यक्त करावा ? शिवाय, " Love for love's sake " हृ वाक्य

वाचण्याइतकें व त्याचें मर्म समजण्याइतकें इंग्रजीचें ज्ञान कै० रेंदाळकरांच्या अंगीं होतें ही गोष्ट अनंततनयांनीं मुद्दाम दृष्टिआड केली होती असेंही सिद्ध करतां येण्यासारखें आहे. रेंदाळकरांचा इंग्रजीचा व्यासंग कसा चालू असे, हें त्यांच्याच एका पत्रावरून दिसून येणारें असल्यामुळें त्यांतील सुरवातीचा विशेष खासगी मजकूर गाळून तें समग्र येथें देतों. त्यावरून वाचकांस जरूर ती कल्पना येईल.

"हल्लीं माझें वाचन चांगलें चाललें आहे. मोर्लेच्या विद्वन्मण्डळांतील ( men of letters ) लँडॉरचें चरित्र संपत आलें आहे. आतां बायरनचें चरित्र वाचणार. टेनिसनच्या Idylls of king मधील कांहीं प्रकरणें वाचलीं. त्यांचीं एकदोन नाटकेंही वाचलीं. हल्लीं जेन आस्टेनचें नॉर्देजर ॲबे वाचीत आहें. काल चार्लस किंग्सलेचें एक नॉव्हल Four years ago विकत घेतलें. तेंही चांगलें वाटतें. कादंबऱ्या नुसत्या वाचण्यास आणि कांहीं विषय अभ्यासास निवडीत आहें. तूर्त रस्किन, मेकॉले यांचे दोन सुंदर निबंध आणि मिलचें Subjection of Women हें पुस्तक त्यासाठीं निवडलें आहे. सर्वच पुस्तकें नेहमींच शेवटपर्यंत वाचीन असें नाहीं. पण अशा प्रकारच्या उद्योगांत प्रत्यहीं कांहींतरी वेळ मात्र नियमानें खर्च करणार. या सर्व उद्योगांत कशानें व्यत्यय येत असेल तर तो अशक्तपणामुळें. पण ही तक्रार लवकर मिटेल असें नाहीं. एकंदरींत चालू आयुःक्रम मला फार पवित्र आणि सुखाचा वाटतो. घरचें काम बरेंच करावें लागतें. पण तें मला कबूलच आहे. त्याचा त्रास होत नाहीं."

आनंदाश्रम, पुणें<br>
ता. २४-१२-१८.

तुझा<br>
**एकनाथ.**

असो. अनंततनय भर्तृहरीचा अधोलिखित श्लोकार्ध लक्षांत ठेवून, जर यापुढें वागतील तर त्यांच्या स्वतःवर व त्याबरोबर इतरांवरही मेहेरबानी केल्याचें त्यांना श्रेय मिळेल. तो श्लोकार्ध हा—

विशेषतः सर्वविदां समाजे<br>
विभूषणं मौनमपंडितानाम्.

अनंततनयांचा अभिजात वाङ्मयाला कायमचें डांबर फासणारा प्रस्तुताचा लेख वाचून मी मोठ्या आशेनें, प्रो० श्री. नी. चापेकर यांच्या 'काव्यचर्चे'ला जोडलेल्या प्रस्तावनेकडे पाहूं लागलों. आशा ही कीं, या सदभिरुचीच्या जाड्या

शारदोपासकानें तरी आपल्या या विदूषकी मित्राचा थोडासा तरी कान पकडला असेल. पण वाचकहो, हे जाडे शारदोपासक काय म्हणतात तें वाचा: “ कवींच्या समालोचनांच्या बाबतींत प्रत्येक लेखकास आपापलीं मतें आपल्या रीतीनें व्यक्त करण्याचें पूर्ण विचारस्वातंत्र्य ठेवणेंच इष्ट असल्यामुळें, या विभागांतील निरनिराळ्या विवेचनांत काव्यप्रसिद्ध नवरसांपेक्षां लौकिक भोजनांतील षड्रसयुक्त चमचमीत-पणाचाच ( ब्राह्मणो भोजनप्रियः! ) **प्रसंगविशेषीं जरा झणझणीतपणाचाही** आस्वाद रसिक वाचकांस घ्यावयास सांपडेल.” तथापि, अशा समालोचक लेखांत कांहीं फिरवाफिरवी करूं गेल्यास लेखक आपल्यावर रागावले असते, अशी भीति प्रदर्शित करून प्रस्तावनाकार चापेकर शेवटीं म्हणतात: “ यास्तव आम्ही जाणून-बुजून त्या भागाकडे वळण्याचें मुळींच टाळलें आहे.” बरें केलेंत टाळलेंत तें, नाहीं तर एखाद्या ग्रंथकाराच्या चोपड्याला त्याला हवी तशी प्रस्तावना लिहून देण्याचा आपला धंदा जोरांत कसा चालता ?

“ रेंदाळकरांचे निंदक ” या नात्यानें प्रो० सबनीस यांचें या प्रसंगीं स्मरण झाल्याशिवाय कसें राहील ? त्यांचा १९२५ सालांतील वि. ज्ञा. विस्तारांतला ‘रेंदाळ-करांच्या कविते’वरील परीक्षणात्मक लेख मीं त्या वेळींच वाचला होता. कवितेच्या परीक्षणापेक्षां त्यांनीं कविचरित्राचेंच परीक्षण केल्याचें मला दिसून आलें. पण, असें करणें उचित नव्हे. कारण, त्यांच्यासमोर कविकृति होती; कविचरित्र नव्हतें, हें ते विसरले. तथापि, प्रोफेसर मजकुरांबद्दल मी अजूनही सश्रद्ध आहें. कारण, ते तरुण आहेत ! आणि म्हणून त्यांची बुद्धि अद्यापि नाठाळ झालेली नाहीं. सबब, त्यांना यापुढें परीक्षणात्मक लेख लिहावयाचा झाल्यास तो त्यांनीं अशा दृष्टीनें लिहावा, मग तो कितीही तीव्र असो, अशी सविनय विनंति करून त्यांची रजा घेतों.

असो. आजकाल सर्वत्र अश्लील वाङ्मय बोकाळलें असून नवीन पिढीच्या अभिरुचीला त्यानें वाईट वळण लागत आहे, अशी सर्वत्र हकाटी चालू आहे. विचारी लेखक व गृहस्थ आपापल्या लेखन-भाषणांतून या गोष्टीचा शक्य तितक्या तीव्रभाषेंत निषेध करीत आहेत, हें अत्यंत आशाजनक होय. परंतु, ‘काव्यचर्चे’-च्या पवित्र—स्फटिकशिलामय भूमिभागावर अनंततनयांनीं. स्वतःच्या मित्रांच्या अनुमतीनेंच सुरवातीस व अखेरीस स्वलेखरूपानें सांडिलेला श्लेष्मा कोणीं पाहिला आहे काय ? ‘काव्यचर्चे’तील विद्वान् लेखकांना व इतर साहित्यभक्तांनाही माझी अशी नम्र विज्ञापना आहे कीं, आपण एकवार तो लेख नजरेखालीं घाला व त्याचा

निषेध करणें योग्य वाटल्यास आपण तसें करावयास मागें पुढें पाहूं नका. सन्माननीय साहित्यभक्तांनो, रेंदाळकर आतां कायमचे गेले आहेत. पण, ते तुमच्यापैकीं, —म्हणा पाहिजे तर शारदामंदिराच्या शेवटच्या पायरीवर बसलेले, कारण भावी काल काय तें ठरवील,—एक होते, हें आपण विसरूं नका. आणि आपल्या सद्भिरुचीला जें पटेल तें करा, अशी विनंति करणें एवढाच माझा अधिकार आहे.

शेवटीं, खालील पद्यांत बऱ्याच लांबलेल्या या लेखाचा उपसंहार करून, पुन्हा जरूर लागेतों वाचकांची विश्रांति घेतों.

हतः खट्वारूढः कविकुलविनिन्दैकमतिमान्<br>
वितंडामार्तंडो **भुजगसुतको** दुर्जनवरः<br>
इतो दत्तं गृण्हन् दयित ! सुहृदा वाङ्मयजलं<br>
त्वदात्मा संशांतो भवतु खलवाग्वंन्हिनिकृतः

कोल्हापूर,<br>
वर्षप्रतिपदा शके १८५० } **नागेश गणेश नवरे**


दा. क्र. ३६९६

कै० कविवर्य एकनाथ पांडुरंग रेंदाळकर



जन्म सन १८८९

मृत्यु सन १९२०



2

सांगेल व्यवहार, दैव अथवा,
प्रत्यक्ष वा ईश ते,
व्हावें मुक्त निबंधनामधुनि त्या
प्राणी सदा इच्छितो;
हा का दोष ? असे महागुणचि तो
वास द्रुमानें जनीं :
झाले धन्य कितीक लोक मधुरें !
निःश्रेय संपादुनी ! १०
जेथें ठेविल दैव तेथ वसणें—
शोभे जडांनाच तें,
राहे जीव न शांत, विश्वपतिची
इच्छाच ती वाटते !
कोठें सह्यगिरीं प्रवासि जन हा ?
वात्सल्य कोठें तुझें ?
यत्नांवांचुनि काय लाभ तव हा
होता मला शैलजे ? ११
केलें वंचित मी तयास म्हणुनी
संतप्त होवो विधी
केला मी व्यवहार तुच्छ म्हणुनी

कै० रेंदाळकर यांचें हस्ताक्षर.

# रेंदाळकरांची कविता.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ३८९६

## यमुनागीत.

लाडकें पहिलें--नावडतें झालें
दुसरें तें न करीं आलें.
तुटलेला तारा--गती तशी झाली
न कळे काय पुढें भालीं !

* * *

जेथें रूक्षच माळरान भरलें, ओसाडशा टेकड्या,
ठावा ग्रीष्मऋतूविणें न दुसरा सत्काल ज्याला कधीं,
ज्याचें जीवन चाललें अजवरी कुल्यांबुबिंदूवरी,
त्याला सुंदर हा प्रवाह यमुने! आला दिसोनी तुझा. १

तोय स्वादु तुझें पिऊन, करुनी स्नान प्रवाहांतरीं
झालों मी गतपापताप, महिमा वानूं किती देवते ?
हें देखून तरंगखेलन तुझें, नाचे प्रहर्षें मन,
आनंदा भर येउनी झरझरा तो वाहतो लोचनीं! २

ऐकोनी कलमंद्र गान तव हें वेडावलों मानसीं,
केलें शीततुषारवाहि पवनें धन्य त्रिलोकीं मला!
पाहोनी वपु शामसुंदर तुझें मोहून गेलों तटीं
कालातिक्रम जाहला, पद न गे हाले परी येथुनी! ३

बघुनि तुजसि देवी हर्षला अंतरात्मा,
क्षणभर भवदुःखें सर्व लोपून गेलीं,
म्हणुनि तुजसि वाही दास हा भक्तिभावें
तव चपल तरंगीं चार हे अश्रुबिंदु! ४

झाडें डोलति तींच, नाचति लता त्या त्याच हर्षाकुल,
पुष्पें हांसति तींच, गीत न नवें गातें खगांचें कुल,
जें अन्यत्र दिसें तसेंच यमुने! तीरीं तुझ्याही असें,
होतें मानस हृष्ट आकुल परी त्वद्दर्शनें कां असें ? ५

त्वत्तीरावरि वाहतो पवन जो नाहीं कुठें का तसा ?
कां तत्सेवनकामलोल मग गे हा प्राण होतो असा ?
देवी तोय तुझें दिसे वर तरी सामान्य तोयापरी
तत्पाना मन होत चंचल परी, खोटी न ही वैखरी ! ६

आलोकीत तरंगनर्तन शिलाखंडावरी बैसुनी
जावें आयु तुझ्या तटावरि अशी सोत्कंठ वांछा मनीं;
वातें मंद तुषार शीत तव जे येतील अंगावरी
त्यांनीं होइन मी सुधन्य यमुने! सत्य त्रिलोकांतरीं! ७

लाटांनीं तुझिया शिरीं मिरविलें कल्हार देखोनियां
किंवा क्षुद्रच वालुकाकण तटीं तोयार्द्र पाहूनियां
हेवा वाटतसे तदीय यमुने! भारीच माझ्या मनीं
दैवीं भाग्य न तें म्हणून जन हा गे जाय वेडावुनी! ८

* * *

झालीस प्रिय तूं मला गुणवती! आश्चर्य याचें नसे,
जें जें कांहीं असे तुझें, तुजमुळें तें तें गमे प्रेयसें!
साधें नांव तुझें तदन्वित परी ज्या योषिता भेटती
त्याही तूजपरी अतीव यमुने! मातें प्रिया वाटती! ९

होतो खेद गतेतिहास तव गे येतां परी मानसीं
आर्ये! कालियसंगमें विषयुता होतीस झाली कशी?
साधूंनीं निज शील वैभव गुणें साधू करावें खला
कीं व्हावें खल सांग आपण, कसा हा मार्ग तूं सेविला? १०

केलें दूषणधाम दुष्ट भुजगें स्वीय प्रभावें तुला,
नाहीं त्वद्गुणराशि थोर कमती थोडाहि गे जाहला !
संमोहून तयामुळेंच हरिनें दंडून दुष्टाहितें
केलें तोय तुझें पवित्र अजुनी तें दुर्जना तारितें ! ११

चंद्राची किरणावली निशिं तुझ्या लाटांवरी लोळतां
देवी ! हास्य तुझें विमोहक भरी सर्व स्थळीं दिव्यता !
तेव्हां या मम दग्ध मानसिं कसें होतें कथाया न ये
मेलेली गत वासना उठुनियां थैमान घाली स्वयें ! १२

संसारीं मिळणार हें न, तमकें नाहींच होणार तें,
आहे तें तर कीं अशक्य, म्हणुनी संदग्ध वांछाशतें
झालीं, तीं सगळींच दर्शनिं तुझ्या ठेली नवीनापरी
हा सारा महिना तुझा, समजुनी आहेच मीं अंतरीं ! १३

* * *

झालें क्लांत मन प्रसन्नसलिले ! संसारतापें अती
तेव्हां विश्वसुनी तुझ्यावर, तुझ्या मी येत तीराप्रती
तूंही धीर दिलास कोमलरवीं आश्वासिलें या जना,
आतां तूंच पहा स्वकीर्तिमहिमा, व्हावी न ती वंचना ! १४

हांसोनी मधु गोड शब्द वदुनी तूं चित्त आकर्षिलें,
प्रेमाचें रमणीय दृश्य पुढतीं प्रेमाकुले ठेविलें;
आतां तूं करशील दूर मजला सारी दया सोडुनी
कोणी तूज पुढें विचारिल तरी ? हें नीट आणीं मनीं १५

तूं प्रेमांशही दाविला तरि तुझी स्तोत्रावली गाउनी
केला नादित विश्वगोल सगळा हें ज्ञात आहे जनीं;
आतां तूं करशील हृत्तनयने ! माझी उपेक्षा अशी
गीताभाविं मदीय कीर्ति तव ती राहील सांगे कशी ? १६

* * *

कोठें तूं वसतेस दूर यमुने ! मीही रहातों दुरी,
देवी ! दैवबलें चुकून पडल्या या आज गांठी; तरी–
मी जाईन कुठें न सोडुनि तुला, या रम्य तीरावरी
माझ्या अस्थि पडोत, आस दुसरी नाहींच चित्तांतरीं ! १७

*  *  *

झालों शाहिर गायिलीं अजवरी गाणीं किती प्रीतीचीं,
होता एकच रंग त्यांत भरला, त्याचीच वाटे रुची;
देवी! या तव दर्शनें समजली देवेंद्रचापप्रभा
आतां काव्य मदीय वाचुनि नवें डोलेल विद्वत्सभा ! १८

त्वन्मंजुस्वनसंगतीं निपजते जी दिव्य गानावलि
तीच्याशीं अपुलीहि गायनकला मी ताडुनी पाहिली;
कोठें रम्य निसर्ग वैभव, कुठें ती मानवी चातुरी,
देवी ! स्पष्टच हें दिसून अगदीं मीं लाजलों अंतरीं ! १९.

काव्यें खिन्न मनें मदीय सगळीं मीं त्वज्जलीं फेकिलीं
तीं तूं स्वीय करीं उदार हृदयें काढून मातें दिलीं
पाहें तों दिसलीं नितांत मधुर स्वर्गीय संगीतकें !
हा साराहि तुझा प्रभाव ! यमुने ऐशीं तुझीं कौतुकें ! २०

*  *  *

कांटेरी झुडपेंहि तीरगत तीं, त्यांची कितीशी कथा,
देशी आश्रय त्यांसही स्वहृदयीं तूं देववृंदस्तुता !
आला भक्तिभरें तटावरि तुझ्या धांवोनि जो दीनसा
त्याला तूं करिशील दूर–भलता संदेह यावा कसा ? २१

नोहे शीलच तें तुझें, त्रिभुवनीं हें ख्यात नाहीं कुणा ?
प्रेमाच्या दिसतात मंगलमयी ! सर्वत्र सद्भावना !
काळा फत्तरही तटावरिल त्या अंभःकणीं सेचिसी,
अव्हेरीशिल या जना भगवती ! शंकाहि यावी कशी ? २२

*  *  *

देवी ! जन्म तुझा असून घडला अत्युच्चअद्रीवरी
आहा ! धांवत पातलीस सदये, तूं खालती भूवरी;
दीनोद्धारणलालसे ! उपकृती ही निश्चयें निस्तला !
हें आश्चर्य न ! येति अश्रु नयनीं पाहोनिया गे तुला । २३

गे लोकव्यवहार सर्व म्हणजे निःशंक बाजार हा;
मोलावांचुनि देवघेव न चले ही येथली कीं रहा.
मी ऐसा गुणहीन; कोण जवळी घेतें अपंगास या ?
होती कीं अपुरेच शब्द, तव हे आभार मानावया ! २४

किंवा यांत तवोपकार कसले ? सामान्य मी का असे ?
प्रेमाचा निधि थोर मन्मनिं वसे ठाऊक सर्वां असें.
त्या प्रेमास्तव तूं मला स्वहृदयीं आहेस जागा दिली,
स्वार्थें केवळ मंगले उपकृती आहे तुझी जाहली ! २५

कोठें फत्तर, कंटकाकुल वनें, ओसाड रानें तशीं,
होता यांतुनि ओघ वाहत तुझा, हें ज्ञात आहे मशीं.
या माझ्या मृदु मानसापरि तुला केव्हांहि कोठें तरी
सांगें सांपडलें दुजें स्थळ, पहा चिंतून चित्तांतरी. २६

* * *

मी ऐसा गुणहीन कीं मजकडे पाहून रानांतलीं
कांटेरीं भलतीं फुलेंहि न कधीं आनंदुनी हांसलीं;
देवी ! या तव चंचलोर्मिवरुनी चाळोनियां अंगुली
काढी विश्वविमोहन स्वनतती ती शारदा माउली ! २७

झालों मीहि तरंग कां न तव गे ? लोकत्रयीं शोभने
होतों ख्यात नितांत, खास असती आकर्षिलीं सन्मनें !
ओढा क्षुद्रहि भेटुनी तुज पहा त्वद्रूप होतो क्षणीं,
व्हायाचा न कृती अधन्य जन हा तो योगही साधुनी ! २८

कां शंका पण या वृथा ? मज असें तूं ‘ आपला ’ मानिलें
त्याचें दर्शक हें तुषारकणही माझ्यावरी फेकिले;
आतां सोडुनि खेद सर्व, सदये आनंदितें मानसें
गातों त्वत्स्तुतिगीतिका, फुलवितों मी सन्मनःसारसें ! २९

*　　　*　　　*

गंगेची स्तुति ऐकिली अजवरी, सीमाच नाहीं जिला
नाहीं लेश जनास या तिजमधें तथ्यांश कीं वाटला;
ती भक्तां करि पूर्णकाम, करिती तेही तयेची स्तुति,
हा सारा व्यवहार, यांत कसली प्रौढी तिची मानिती ! ३०

झाले सागर दग्ध, सद्गति तया द्यायास यावें तिनें
हें तों स्त्रीजनशील, यांत उरली जागा कुठें प्रार्थने ?
नाहीं स्वर्गविहारलोभ सुटला ज्या राजसेला परि
व्हावी सांग कशी प्रसन्न तिजला वर्णावया वैखरी ! ३१

झाला सिद्ध यदीय दर्पदलना प्रत्यक्ष गौरीपती,
तींचे ते विषलिप्त सद्गुण वृथा कां लोक संमानिती?
विष्णूच्या नखिं संभवे म्हणुनियां गातात तीची स्तुति,
तो विष्णू तुझिया तटीं विहरला, हें कां कवी नेणती ? ३२

वेणू त्वत्तटिं वाजवीत बसला आनंदुनी तो तदा
क्रीडांतींहि सुखावला मधुर हे प्राशून पाणी मुदा
साक्षी होतिस रंगतां हितगुजीं गोपींसवें तो हरि,
हें त्वद्वैभव केवढें ! स्मरुनिया ये नीर नेत्रांतरीं ! ३३

देवी ! ही तव थोरवी असुनियां, सारून बाजूस ती,
तूं गेलीस पुढें स्वतांच मिळण्या त्या दृप्त गंगेप्रती;
हें शालीन्य तुझें बघून असलें लोकोपकार प्रिये !
त्वत्पादीं स्तुतिपुष्पदान ! यमुने मीं केविं अर्पूं नये ? ३४

किंवा ती हिमशैलजा प्रिय अती झाली कुणाला जरीं
होवो ती यमुने ! विषाद मजला वाटेल कां अंतरीं ?
नाहीं प्रेम पहात दोष, दिसती विस्तारुनी त्या गुण
देवी ! नातरि कोण मी ! - मजवरी जें लोभलें त्वन्मन; ३५

केली येथवरी तुझी स्तुति तिला तूं योग्यही वाटसी;
आर्ये मी तुज योग्य काय ? न मनीं शंकाहि आली कशी ?
किंवा हे भलते विचार असले येती कशाला मनीं ?
तूं केव्हांच मला ‘ स्वकीय’ गणिलें, ठावें न कोणा जनीं ! ३६

झालों मी यमुने ‘ तुझा ’ गमतसे यामाजि जी धन्यता,
स्पर्धा तीसह जो करील जगतीं आनंद तो कोणता ?
वाटे तुच्छच राजवैभवहि तें, बैसोनियां त्वत्तटीं
रम्योर्मी बघतां तुझ्या सुखततीं मावे न कीं हृत्पुटीं ! ३७

होता खिन्न हिमाद्रि फार, विरहें कादंबिनीच्या, मनीं
तीही उत्सुक मानसें त्वरित दे आश्लेष त्या धांवुनी;
तन्नेत्रांतुनि लोटला प्रबळ तैं हर्षाश्रुचा पूर जो
ती ही श्रीयमुना ! जनार्तिहरणा कां ती न सांगा सजो ? ३८

प्रेमापासुनि होय संभव तुझा, प्रेमींच आहे स्थिति
प्रेमाचेच तरंग हे तुजवरी उत्तुंग हेलावती
तैसें प्रेम तुझें जल, द्रवुनियां प्रत्यक्ष झालें जणूं !
शुद्धप्रेमतरंगिणी तुज असें देवी न कां मी म्हणूं ? ३९

* * *

ती तूं फेकिसि आपुल्या मजवरी प्रेमोर्मि याच्यामुळें
झालों दिव्य, कुतूहलें जन मला आलक्षिती ऊर्मिळे
होती रंजित अभ्रखंड गगनीं दृष्टीस संमोहिती,
त्यांचें गौरव काय ? सुंदर उषा धन्योत्तमा एक ती ४०

* * *

माझी जीवनबांसरी अजवरी होती पडोनी कुठें
ती कोणी धरिली करीं न, चढलीं हा ! हा ! धुळीचीं पुटें !
देवी ! सूर तिच्यांत काय असतीं कोणीं न हें पाहिलें
कोणीं मारुनि फुंक, बेसुर असे नाना ध्वनि काढिले ! ४१

झाली तुच्छ जनांत, आदर कुणा वाटेच ना लेशही
विस्तीर्णा असुनी जणों विधिबलें शून्याच झाली मही !
गानाचे जलसे जगांत झडती, सर्वत्र हास्योत्सव,
माझी जीवनबांसरीच पडली कोणान्तरीं नीरव ! ४२

आली कर्णपथीं तुझी स्तुति गडे ! आशा मनीं वाटली,
ती मी त्वत्तटभूवरीं सकुतुक प्रेमोदयें टाकिली,
आशा ही–मृदु वात वाहत तुझ्या ओघावरूनी सदा
त्यानें होइल ती निनादित अहा ! नाचेन मीही मुदा ! ४३

देवी ! होउनि तूं प्रसन्न अपुल्या घेशील हस्तांतरीं
ही आशा भलतीच केवि मम या चित्तांत यावी तरी ?
तें प्रत्यक्षच जाहलें, धरुनि तूं ती स्वीय रम्याधरीं
केला धन्यच दास हा भगवती ! साऱ्याहि लोकांतरीं ४४

तूं स्वीयाधरिं बांसरी न धरिली तों मंजु मंजुस्वन
विस्तारून पळांत विश्व सगळें कीं जाय नादावुन !
तो मद्गौरव मानुनी मजवरी पूर स्तुतीचा वळे
तूं स्तुत्यर्ह, परंतु सत्य जगतीं थोड्याच लोकां कळे ! ४५

* * *

'तूं माझाच !' असें विशंक वदले जे लोक उच्चस्वरें
ज्यांचे प्रेमळ बोल दग्ध हृदया झाले सुखाचे झरे,
येतां दारुण काळ ते सकळही हा ! हा ! दुरी राहिले
द्याया खिन्न मनास शांति न कुठें कोणीच कीं आढळे ! ४६

अश्रूंचे अविराम पूर उठतां ते मीं पुसावे करीं
द्यावा धीर तसा फुटूंच बघतां चित्तास कैसा तरी
माझें तें मजला मिळेलच, सुखी होईन लोकीं तदा
ही आशा त्यजिली न काळ कटु तो कंठीत होतों सदा ! ४७

शब्दांनीं पण कोरड्या न घडतीं केव्हांच कार्यें जनीं,
आशेच्या वचनींच जीव कुठला राहील गे लोभुनी ?
अंतीं होउनिया निराश यमुने ! खेदातिरेकामुळें
येऊनी तव या तटावरि तुला मीं वाहिलीं दृग्जलें ! ४८

देवी ! तूं मृदुमानसा द्रवुनियां गेलीस चित्तांतरा
कारुण्यें जलबिंदुही उधळिले सप्रेम माझ्यावरी
नेले अश्रु पुसून वायुलहरी प्रेरोनिया प्रेमले,
तैसें स्वीय तरंगमंजलरवें चित्तास आश्वासिलें ! ४९

नाहीं ज्यांस कुणी जगांत, पडला जो एकटा त्यावरी
केल्या तूं गुणशालिनी उपकृती ऐशाच नानापरी
प्रेमानें तुझिया द्रवून म्हणुनी मी गातसें संप्रति
स्तोत्रें पावन भावगद्गद अशीं घे मानुनी मान्य तीं ५०

संसारांतिल बंधनें सकळही तीं दूर मी सारितों
सोडा नाद मदीय, मी उघड हें सर्वांसही सांगतों
आली पावन ही दिसून यमुना, बैसेन येथेंच मी,
मित्रांनो ! मज न्यावया परतुनी होऊं नकाच श्रमी ! ५१

कोठें आढळतील वल्लि इथल्या वल्लींपरी ते कथा,
लाभे पुष्पसमूह हा न इतर स्थानीं कुठें सर्वथा !
हा वायू तर जीवनानिल असें राहूं कसा त्याविण ?
आणि श्री यमुना !—तिच्याविण—नको तो शब्दही दारुण ! ५२

प्राणांवाचुनि हें शरीर, यमुनेवीणें तसा हा जन,
सोडोनी तिजला जगांत तरि या जाईन कोठेंच न!
जैसा चारु तरंग हा तिजवरी शोभे तसा मी असें,
जाणा निश्चित, मी न, एक यमुनौघांतील बिंदू असें! ५३

* * *

माझ्या जीवननिर्झरास भरती ज्या अंबुदें आणिली
केलें गंधित तोय वाहुनि फुलें ज्या वेलिनें आपलीं
वारंवार जलांश अर्पुनि तया क्षेत्रांहि ज्या वर्धिलें
सर्वांचे उपकार मी नत शिरें आहेतही मानिले. ५४

तो हा निर्झर आज जाय यमुनातोयामधें लोपुनी
श्रेष्ठांनों! म्हणुनी न चित्त तुमचें जावोच खेदावुनी!
हा सत्संगम पाहुनी, उसळुनी हर्षाश्रु नेत्रांमध्यें
आशीर्वादशतीं अम्हांवरि करा मांगल्यवृष्टी मुदें! ५५

हा प्रेमोत्सवकाल बेसुर इथें गाणें निघाया नको!
किंवा नीरस बोधवर्षण तसें व्हायास आतां नको!
ही चाले मृदु-लास्य-रम्य यमुना हास्य-प्रभा फेकित,
राहावें सकलांहि जोडुनि करा तीच्याकडे पाहत! ५६

तद्गाना परिसूनि कर्णमय कां झालों न येतें मनीं?
तत्सौंदर्य बघून नेत्रमय कां झालों न येतें मनीं?
देखोनी गुणही तसे, गमत कां झालों न जिव्हामय?
ती होतां यमुना प्रसन्न, कुठलें तें संसृतीचें भय? ५७

* * *

सद्भाग्योदय हा मदीय असुनी दैवांत अद्यावधि
होतों निर्मित मी विषण्ण हृदयें उष्णाश्रुचा अंबुधि;
जें आकाश रविप्रभा पसरुनी होणार तेजोन्वित
अंधारांत बुडून तेंच बसलें ताराश्रुंतें ढाळित! ५८

दुःखावांचुनि मानवा न कधिंही गोडी सुखाची कळे,
चिंतोनी पण पूर्व दुःख मन हें अद्याप शोकें जळें !
कां नाहीं दिसलीस तूं भगवती ! आधींच थोडी मला ?
कां तीव्राग्निकणांतरीं अजवरी त्वद्भक्त हा टाकिला ? ५९.

मी जो दारुण दुःखताप साहिला त्याला न जोडी कुठें
दुर्दैवींहि तयांत त्यास दिधलीं नाना विषाचीं पुटें !
झालें दुर्बल त्यामुळें मन अती, शंका किती दाटती,
तूं प्रत्यक्ष पुढें, परंतु मज ही वाटे न सत्य स्थिति ! ६०.

गला न क्षण एकही मम कधीं उष्णाश्रुवृष्टीविणें
नैराश्यानलिं पोळलों, ढकलिलें क्लेशांत सारें जिणें;
वेढी श्री यमुना तयाच मजला प्रेमोर्मिमालांतरी
हें प्रत्यक्ष असून सत्य हृदया वाटेल कैसें तरी ? ६१.

किंवा विस्मय यांत काय ? जगतीं आहेत देवी अशा,
पात्रापात्र न पाहती म्हणुनि ही स्वर्गापरी हो रसा;
हें साधें डबकें तयांत कुतुकें तारा करी क्रीडन
देवी ! भेसुर डोंगरावरि करी ज्योत्स्ना सुधावर्षण ! ६२

* * *

होवो रात्र, घनांधकार पसरो, पर्वा न त्याची तुला,
विश्वोद्धारनिमग्न ओघ तव हा आहे पुढें चालला;
हो अस्तंगत भानु, मेघशयनीं गेला शशी लोपुनी
तूं आहेस तरी नितांत निरता देवी जगत्सेवनीं ! ६३

केलें प्रेम दुज्यावरी अजवरी खोटें न हें वाहिनी
यावें प्रेम करावया तुजवरी हा हेतु होता मनीं !
प्रेमाचेच धडे सदा गिरविले, तें तेंच अभ्यासिलें,
त्याचें सत्फळ हें तुझें सुरुचिरे ! सान्निध्य कीं लाभलें ! ६४

केलें गायन, आज सूर तुझिया गानास ये द्यावया,
झालोंही कवि, आज सद्गुण तुझे येतात वानावया,
झालों वाक्पटु, आज ये रिझवितां संभाषणें त्वन्मना !
देवी ! सर्व अजाणतांच फळलें त्वच्चित्त संतर्पणा ! ६५

माझे जे गुण वाटले अजवरी अन्यत्र दोषास्पद
झाले सांप्रत तेच केवळ तुझ्यायोगें सुसौख्यप्रद !
होता जो दिवसा शशांक गमला व्योमांगणीं व्यर्थसा,
रात्रीं मग्न करीत तोच सहसा सौख्यांत सारी रसा ! ६६

होतों गंजुनि चाललोंच, नव्हती माझी अपेक्षा कुणा
‘ देवा, भार कशास हा अवनिला ! ’ केली अशी प्रार्थना
कोणी ना ‘ मम ’ होय, मानि मजहि कोणी न कीं ‘ आपला ’
शब्दांचे बडिवार मात्र उठले, हा जीव वेडावला ! ६७

वाग्जालांतच काय नित्य गढुनी जाणें नशीबीं असे,
दोषावें विधिलाच, काढुनि मनीं उद्गार नाना असे !
देवी ! रात्र सरेल ही न, न तमें जातील, ऐसें मनीं
होतें चिंतित खिन्न त्याच कमलीं आली प्रभेची धुनि ! ६८

गाऊं काय तुझी स्तुती भगवती ! एका मुखानेंच या,
वाणीही मृत ही न भाव शकते सुस्पष्ट दावावया;
प्रेमें चित्त थरारुनी ठिबकती नेत्रांमधें आंसवे
कैसें व्यक्त करूं तदा मम मनीं सत्काव्य जें संभवे ! ६९

तीं काव्यें जर सर्वही प्रगटतीं, गुंफून तीं त्वद्गुणीं
तन्माला तर अर्पुनी तव पदीं मी धन्य होतों जनीं !
दैवी भाग्य न तें, नसो, हृदयिंचें तूं सर्वही जाणसी
त्यावांचून सुमंगले पसरती त्वत्कीर्ति लोकीं कशी ! ७०

* * *

झालें दर्शन या जनास पहिलें देवी ! तुझें जेधवां
वर्णूं केविं मम स्थिति भगवती जी जाहली तेधवां !
झालों मुग्ध परंतु बोलुनि कुणा नाहींच तें दाविलें
तूतेंही कथिले न दोष न कळे देशीलसें वाटलें ! ७१

पूर्वींचे सगळेच सोडुनि असे संबंध एका क्षणीं
जावें काय विचारशील मनुजें कोणासही मोहुनी !
ऐसें बोलुनि त्या मदीय सरसी तैसेच ओढे झरे
दोषोनी मज निंदितील गमले, भेदोनिया वाक्शरें ! ७२

त्यांची ती कृति होयं योग्यचि, नसे चांचल्य हें चांगलें,
ऐसें कल्पुनि मींहि बंधन तदा माझ्या मना घातलें;
दृष्टि जी जडली परंतु यमुनें ! तेव्हां त्वदूर्मीवरी
काढाव्या पडले प्रयास किति गे, खोटी न ही वैखरी ! ७३

‘ नाहीं प्रेम हिच्यावरी तव मुळीं’, चित्तास मीं सांगतां
झाल्या आंतर वृत्ति विव्हल अती, विस्तारली खिन्नता
नेत्रांतून उठूनियां प्रबळशी उष्णाश्रुची वाहिनी
वाटे सर्वहि भूप्रदेश तिमिरें कीं जाय संव्यापुनी ! ७४

नाहीं प्रेम तुझ्यावरी-गुणवती ! ही केवढी वंचना !
कां गेलों तुज मोहुनी-विफळ हें वर्णून सांगूं कुणा ?
भक्तिप्रीतिसुधातरंगिणि ! जगीं तूं एकली प्रेमला,
आहे विस्मय यांत काय तुज जों हा जीव वेडावला ? ७५

*　　　*　　　*

माझी निर्झरिणी--तिच्यावर मुदा गाणीं किती गाइलीं
तीर्थें, सागर, निम्नगा तिजपुढें मीं तुच्छशीं मानिलीं;
केव्हांही न तिच्यावरील मम ही प्रीती उणी जाहली
तीचीही दृढभक्ति संतत अहा ! माझ्यावरी राहिली ! ७६

विद्युद्दामविलास जेविं न घनीं झांकोनिया राहिले
तीचें प्रेम तसें जगीं विलसलें, नाहीं उणें जाहलें;
येतां त्वत्तटिं भासलें विहरतें माझीच येथें झरी
हें पाहून विचित्र साम्य उठल्या हर्षोर्मि चित्तांतरीं ! ७७

तीचें रूप विशाल तूं! तव तसा संकोच तो ती असे!
याचा प्रत्यय येउनी मन भरे आनंदलीलारसें!
तूं माझीच झरी उगाच यमुना नामें तुला बोधिती !
कां कीं ही रसमाधुरी न अगदीं भिन्ना कशी वाटती? ७८

* * *

" तारे होतिल निष्प्रभ, द्युमणिही होईल कीं शीतसा,
माझें प्रेम तरी ढळेल न, सुखें लावून पाहीं कसा !"
केल्या आजवरी गडे कितिकदां प्रेमप्रतिज्ञा अशा
गेल्या लोपुनि त्या वृथैव वदनाबाहेर आल्या तशा ! ७९

'घ्याहो प्रेम कसें तरी करुनि हें' मीं प्रार्थिलें यापरीं
कोणी निष्ठुर मानसें अजवरी ना घेतलें तें परी !
जातां धांवत इंद्रचाप म्हणुनी मी शैलशृंगावरी
देवी! कंटक तीव्र मात्र भरले या श्रांत पादांतरीं ! ८०
ईशें स्थान मदीय अन्य सृजिलें होतें, मनोहारिणी !
लाभावा भलत्या स्थळीं मग मला आधार कैसा जनीं
गेला काल सुदीर्घ हा तरि तटीं आलों तुझ्या शेवटीं
प्रेमालेख्य मनोज्ञ काढिन मम स्वच्छंद चेतःपटीं ! ८१

सारे उज्वल रंग एकवटुनी आलेख्य तें चित्रितां
लोकाचार भिकार ठेविन तदा बाजूस ते सर्वथा !
नीतींचे भलतेच बंध न मुळीं पाळीन मी त्या स्थळीं
शुद्ध प्रीतिच मात्र जाइल तिथें सुस्पष्टशी दाविली ! ८२

आत्मस्फूर्त मनोविकार शुचितेपासून जे जन्मले
लोकांतील विचित्र नीतिकडुनी ते हाय ! धिक्कारिले.
देवी ! पातकलिप्त नीति असली ती ठेवितों मी दुरी
त्वत्प्रीती अमला कसास तिचिया लावूं कसा गे तरी ! ८३

*　　　*　　　*

येतां रम्य उषा क्षणांत सगळें व्योम प्रभेनें भरे
तूं येतांच दिसून तेविं हृदयीं हर्षच्छटा विस्तरे !
आला कंठ भरून शब्द न फुटे, अश्रूदकें लोटलीं
गीतें मूक तदा तुझ्यावरुनि मीं नेत्रीं किती गायिलीं ! ८४

तीं गीतें इतरा कुणा न कळतां कर्णीं तुझ्या पोंचलीं
आर्ये ! आठवतें तदा तव मनोवृत्ती कशी जाहली !
होता ओघ वहात मंथरगतें स्वच्छंद नित्यापरी
गीतें तूं पण फेकिलीं मजवरी आमंद मंजुस्वरीं ! ८५

माझें भाग्यच थोर कीं असुनिया तूं देवावृंदस्तुता
केलें तूं मजला समीप, न तुला प्रेमास या तत्त्वतां !
आहे हा हलका, तसाच भलता तो नीच आहे जनीं,
हा लोकव्यवहार, न स्थल मिळे त्या देवतांच्या मनीं ! ८६

*　　　*　　　*

माझें प्रेम तुझ्यावरील नव्हतें ठाऊक कोणा गडे
झाला विस्मय त्यांस-कां बघत मी त्वद्वीचिलास्याकडे
पाहोनी प्रजलाश्रुबिंदुहि तदा नेत्रामधें सांचले
कांटेरी झुडपें स्मरून रडतों, त्यांना असें वाटलें ! ८७

शय्या कंटकमंडिता, उपवनीं ज्याच्या डुले बाभुळ,
तेथें बैसुनि गावया शिकविलें मीं वायसांचें कुळ,
ओढ्याचें जल जो कषाय पिउनी आनंदुनी नाचला,
त्या माझ्या नशिबांत पावनि, तुझा हा योग होता भला ! ८८

मी हा दीन कुठें, कुठें भगवंती तूं ! साम्य थोडें तरी !
त्वत्तीरीं रमलों अतीव गमलें आश्चर्य त्यां अंतरीं !
“ वेड्या हा भलताच नाद कसला तूं बैससी घेउनी ? ”
त्यांचे ऐकुनि बोल हे शुचितमे ! मीं पाहिलें हासुनी. ८९

मीं जेव्हां कथिली तयांस सगळी त्वत्प्रीतिवार्ता गडे,
तूंही होतिस मंजुगानानिरता प्रत्यक्ष त्यांच्यापुढें,
आश्चर्यातिशयें क्षणैक अगदीं ते स्तब्धसे जाहले,
आर्ये ! काय कथूं तुला, मज तदा धन्यत्व जें वाटलें ! ९०

*　　　*　　　*

जाती वाळनियां फुलें, हळु हळू ज्योत्स्ना क्षया पावते,
नाहीं एकहि वस्तु या जगतिं तें केव्हां न जें नाशतें !
आहे प्रेमच एक मात्र तव, जें याला विरोधी असे,
येतो त्या भर नित्य नूतन, उणें केव्हांच झालें नसे ! ९१

दिव्ये ! कां मग मीहि लोलुप असा होणार नाहीं बरें ?
कां नाहीं नव गायनें तुजवरी गाणार भावस्वरें ?
शोभे जें क्षणमात्र इंद्रधनु त्या सूरी किती वानिती,
रम्या इंद्रधनुःशताधिक अशी तूं प्रेमलीलावती ! ९२

काव्याला अनुरूप सांग तुजसें वस्तू तरी कोणतें ?
वाणीचे सुविलास सुंदर कुठें अन्यत्र गे शोभते ?
तूं स्तुत्यर्ह, तुझ्यावरीच वळतो पूर स्तुतीचा सदा,
गातां अंतरही प्रसन्न डुलतें, कीं एक तूं प्रेमदा ! ९३

*　　　*　　　*

गेली गंजुनी तार, बेसुर असा काढी सतार ध्वनि,
होतों मोहुनि ज्या उषेवर कुठें ती जाय गे लोपुनी
गेली पुष्पतती सुकून नुरला गंधांशही थोडका,
गेलें सर्व, सयत्न मीं जमविलें होईलसें जें सुखा ! ९४

आर्ये ! केवळ नाचवीत लहरी वर्षीत गीतावलि
प्रेमें पाहत या जनास अजुनी आहेस तूं एकली !
सर्वांनीं मजला कठोर हृदयें जेव्हां दिलें टाकुनी
तेव्हांही मज न्हाणिलेंस मधुरे ! तूं दिव्य भावाश्रुंनीं ! ९५

देवी ! भेसुर रुक्ष शैल नसती साधीं तृणेंही जिथें
दैवें तेथहि रम्य वासवधनु:खंडप्रभा शोभते;
माझा आणि तुझा असाच घडला हा योग भासे मना,
आम्हां पाहुनि कौतुकें करिति गे ताराहि या नर्तना ! ९६

अश्रू ढाळित धांवतात गगनीं उन्मत्त अंभोधर,
टाकी निःश्वसनें पळे पवनही सैराट खालीं वर;
देवी ! प्रेमनिराश होउनि जगीं थोडे न झाले पिसे,
माझें भाग्यच एवढें न कळतें आलें फळाला कसें ? ९७

किंवा होउनियां प्रसन्न सहसा सानंद मंद स्मितीं
स्वप्रेमामृत सारखी मजवरी झालीस तूं वर्षती,
आर्ये ! सांग तदा मदीय, कसलें, भाग्यास राहे उणें ?
हा सारा महिमा तुझा, न फिटती हीं केधवाही ऋणें ! ९८

केले तूं उपकार गुप्त, तव हें औदार्य मोठें असे,
मींही गुप्तपणें परंतु यमुने ! घ्यावे तरी ते कसे !
गीतें यास्तव गात हीं, यश तुझें कीं ज्ञात व्हावें जनां
होवो मान्य मदीय हेतु तुज हा, यावीण न प्रार्थना ! ९९

झालों मी तुजला प्रियोत्तम, असे मोठें मला भूषण,
आर्ये ! तूं तरि सांग तें स्वसदनीं ठेवूं कसें झांकुन !
द्यावा हर्ष सुहृज्जना स्वविभवें दुःखी रिपू लोटुनी
देवी तूं, प्रिय हें तुला न, परि तें सामान्य आहे जनीं ! १००

* * *

तूं आहेस तुझ्यासमीप असतां सौख्यप्रदायी जशी
दूरूनीहि तशीच सौख्यद मला प्रेमेश्वरी ! वाटसी.
जेव्हां बैसुनि टेकडीवर तुझा सौंदर्यसारौघ हा
मी पाहें, वदवे न, सौख्य गमतें तेव्हां मना जें अहा ! १०१

नाचे चंचल रम्य वीचिवरुनी सायंप्रभा कोमला
तेव्हां वासवकार्मुकें पसरलीं सर्वत्र, भासे मला !
हर्षें तीरलतांसवें हितगुजें जीं जीं तुझीं चालती
तीं येतां श्रवणीं समीर गतिनें वृत्ती सुखीं पोहती ! १०२

कांची तूं रमणीय या अवनिची वैदूर्यरत्नांकिता
किंवा सांजन बाष्पराशिच दुजा आहे इथें वाहता !
सुस्निग्धे ! उपमा तरी न कळते द्यावी कशाची तुला !
मोहभ्रांतच चित्त होय दिसतां तूं ही पुढें ऊर्मिला ! १०३

तारा एकच कीं विशाल गगनीं यावी दिसूनी जशी,
या ओसाड महीवरी विलससी तूं दर्शनीया तशी !
देवी ! तूं नसतीस, या जगिं तरी ओसाड माळावरी
कैसें खिन्न निराश दुर्वहच हें आयुष्य जातें तरी ! १०४

ज्यानें जन्म दिला तुला हिमगिरी तो धन्य लोकीं खरा,
जी अंकीं तुज वाहते शुचितमे ! धन्याच तीही धरा;
मी धन्योत्तम, आपुला मज तुवां आहेस कीं मानिलें !
सारें विश्वच धन्य धन्य तुझिया योगें असे जाहलें ! १०५

धन्योद्गार अशा स्थितींत वदनीं येतां रहावे कसे !
प्रेमें पाझरतां कसें हृदय हें राहील गे शांतसें !
येतां माधवकाल नूतन कळ्या वेलीवरी शोभती,
आर्यें ! तेवि मुखांतुनी उसळती गीतें तशीं संप्रती ! १०६

काव्याला रसतत्व निश्चित असे जीच्यामुळें पातलें
ती तूं जाहलिस प्रसन्नसलिले ! माझी विधीच्या बळें

तेणें भासति हीं मदीय वचनें साधींहि सत्काव्यशीं
सूर्याची करपंक्ति कांति रुचिरा चंद्रास देते जशी ! १०७

गेलें दैव ठरून कीं पिउनियां खारेंच पाणी सदा
एका नीरसवापिकातटिंच मीं आयुष्य न्यावें मुदा;
राहील स्थिर चित्त केविं भलत्या बंधांत ऐशा गडे ?
मोहव्याकुल होउनी तुजकडे घे धांव तें बापुडें ! १०८

झाला आतुर व्हावया दृढ जगद्बंधांतुनी मोकळा
निर्बंध व्यवहार हाहि टकली त्याच्यावरी आगळा !
डोकें त्याचमुळें भणाणुनि जगद्रीती पदीं मर्दुनी
आलों मी तव तीरभूमिवरती धांवून कल्लोलिनी ! १०९

सांगेल व्यवहार, दैव अथवा, प्रत्यक्ष वा ईश तो,
व्हावें मुक्त निबंधनामधुनि त्या प्राणी सदा इच्छितो;
हा का दोष ? असे महागुणाचि तो या सद्गुणानें जनीं
झाले धन्य कितीक लोक मधुरे ! स्वश्रेय संपादुनी ! ११०

जेथें ठेविल देव तेथ वसणें—शोभे जडांनाच तें,
राहे जीव न शांत, विश्वपतिची इच्छाच ती वाटते !
कोठें सह्यगिरींद्रवासि जन हा ? वास्तव्य कोठें तुझें ?
यत्नावांचुनि काय लाभ तव हा होता मला शैलजे ? १११

केलें वंचित मी तयास म्हणुनी संतुष्ट होवो विधि
केला मी व्यवहार तुच्छ म्हणुनी क्रोधें भरो मंदधी
झाला लाभ तुझा, प्रसन्न नयनें तूं पाहसी या जना,
वाटे सार्थक हें, जुमानित न मी विश्वांत आतां कुणा ! ११२

जाणें थोर तुझा प्रभाव विधिही होईल आनंदित,
उद्यांचा व्यवहारही स्तुति मला अर्पील गे संतत !
तें होईल कसें तरी, न परवा त्याची मला वाटते
भावी वैभव चिंतुनी तुजकडे आलों न मी देवते ! ११३

झालें दैव न सुप्रसन्न, न दिसे आतांहि तें त्यापरी !
निंदील व्यवहार, तो स्तवि कुठें आम्हास आतांतरी ?
माझी हानि घडेल काय यमुने ! मातें तरी नाकळे
जों रम्योर्मिविलास चंचल तुझे आहेत हे चालले ! ११४

लोकांची, विधिची न विश्वपतिची मातें अपेक्षा मुळीं,
राहें केवळ सुप्रसन्न मजला तूं मंगले ! एकली !
यावे शीत तुषार हे मजवरी आमंद वायूसवें
भक्तीनें बहु मीहि वाहिन तुझ्या तोयांतरीं आंसवें ! ११५

* * *

नाहीं ईश्वरपूजनांत मजला शांती कधीं वाटली,
तत्त्वग्रंथहि वाचुनी न हंसली केव्हांहि चेतःकली !
झाली कीर्ति जगांत, त्यांत न गमे अत्यल्प जादू मना,
प्रीती एकच आवडे ! विरस तें सारें तियेच्याविना ! ११६

प्रीतीनें तुझिया मला शिकविलें आहे जगीं ईश्वर,
प्रीतीनें तुझिया दिलें मज नवे सद्बोधही सुंदर;
प्रीतीनें तुझियाच—काय करिती झाली नसे ती परी ?
आहे आज जिवंत मी तिजमुळें, खोटी न ही वैखरी ! ११७

प्रेमाला वश होउनी जन अधोगामी किती जाहले
पुण्याला मुकले, म्हणून सुजनीं प्रेमास निर्भर्त्सिलें !
त न प्रेम, असे विकार भलता जो वाममार्गास ने,
प्रेमाचा नच दोष यांत, विलसे संशुद्ध तें शोभने ! ११८

शुद्ध प्रेम नरास नेत सुपथीं झाडून सारा मल,
त्याचें चित्त करी पवित्र, पसरी सद्भावना कोमल;
पापी दुष्ट विचार पाहति कधीं ढुंकून ना त्याकडे,
दिव्य प्रेम असे ! अवन्ध मग तें होईल कैसें गडे ? ११९

जाती सात्विक भावना पसरुनी, हर्षांत वृत्ती बुडे,
होतें मानस शांत भंगुनि महा दुःखाचलाचे कडे
आनंदें मन राहतें सुखरसस्त्रोतामधें पोहत,
येतो प्रत्यय हा सदैव ! नच मी कांहीं तरी बोलत ! १२०

शुद्ध प्रेम असें गडे ! वितरुनी तूं धन्य केलें मला,
प्रेमाचा बदलून अर्थहि तुवां लोकांतला टाकला !
ठेवोनी अनुराग उत्कट, कसें वैराग्य घ्यावें मनीं
हें सारें शिकवून तूंच दिधलें प्रत्यक्षही दावुनी ! १२१

* * *

गावे काय म्हणून ? गायनकला थोडीहि मातें नसे,
अर्थव्यंजक शब्द योजिति कवी, ठावें न, केव्हां कसे !
नाहीं उज्ज्वल कल्पनाहि जवळी गातों तरी प्रत्यहीं
देवी ! ऐकासि आदरें, मम वसे चित्तांत जाणीव ही ! १२२

वाटे हर्ष तुला मदीय कवनीं, गातों म्हणूनी सदा,
प्रेमानें हंसतेस मंगलमयी ! गातों म्हणूनी सदा,
वाटो काव्य भिकार हें मम, परी निःशंक यांच्यामुळें
प्रेमाचा तव दिव्य लाभ घडला आहे मला ऊर्मिळे ! १२३

व्हावी कीर्ति जगांत, मान पसरो विद्वज्जनीं, पावनि !
हेतूनें असल्या नसे शिणविली केव्हांच मीं लेखनी !
माझें काव्य तुझ्यावरून लिहिलें तूतेंच तें अर्पिलें,
हो संतोषित तूंच तें निरखुनी, सारें मला पावलें ! १२४

सारे लौकिक पाश दूर करुनी निःशंक जीं गायिलीं
त्या गीतांतिल भावना मतिबलें कोणीं बरें जाणिली ?
प्रेमानें हृदय द्रवून निघती आलाप बाहेर जे
जाणायास तदर्थ गूढ यमुने ! पांडित्य सारें थिजे ! १२५

नाहीं मीं लिहिली तदर्थ परि ही वाचून गीतावलि
येऊनी पुसतात लोक–" न कळे ही कल्पना आपली ! "
मीही त्यां म्हणतों हंसून- ' गगनीं तारा किती शोभती,
नांवें काय तदीय ? गूढच वसो माझी तशी ही कृती ! ' १२६

गायाची भलतीच हांव नसती माझ्या मनीं जन्मली,
सारा दोष तुझा ! सुमूर्ति तव ही कां दृक्पथीं पातली ?
कां हें मानस नादपूरित असें केलेंस मंजुस्वरीं ?
आतां यांतुनि सारखे उसळती गीतध्वनी अंबरीं ! १२७

* * *

माझें मानसपद्म हें भगवती ! आहे तुला अर्पिलें,
त्याचीं सौरभशालि कोमल अशीं राहोत सारीं दलें.
यासाठीं झटतों सदा, मधुरिमा त्याचा न व्हावा उणा
कां कीं आवडलें तुला जगतिं जें न प्रेय झालें कुणा १२८

झाले नीतिविचार वंद्य मजला कां कीं तुला ते प्रिय !
झाला धर्महि आदराई रुचिरे ! कां कीं तुला तो प्रिय !
तूं जेथें वसणार तें स्थळ सदा ! देवी असावें शुचि
यासाठीं झटतों, कधींहि तुज हो बाधा न दुष्टोक्तिची ! १२९
तूं लोकस्तुत, मी तुझा, म्हणुनियां लोकापवादा भितों
माझें दुर्यश तो कलंक तुज, हें जाणूनिया वागतों.
मी तों क्षुद्रच, कोठलें भय मला निंदास्तुतीचें असे ?
लागो दोष न तूजला मजमुळें चित्तांत येतें असें ! १३०

* * *

" सारे सोडुनि कामधाम बसला हा या ठिकाणीं पिसा,
जायाचा तरि केधवां, न कळतें, उन्माद याचा कसा ? "
देवी ! कार्य असे जगीं सकाळिका हें मीहि जाणें पुरें,
आहे भेसुर कायदाच, करितां कामें मरावें नरें ! १३१

स्निग्धे ! आजवरी परंतु सगळें देणें जगाचें दिलें
त्यांचें सांप्रत द्यावया मजकडे कांहीं नसे राहिलें;
आतां शांतमनें, त्यजून सगळी चिंता प्रपंचांतली
पाहावें तव रूप हीच इतुकी आशा मनीं राहिली ! १३२

तूं आहेस पुढें, कशी मग बरें कामें सुचावीं तरी ?
कैसा राहिल सांग देवि ! चढतां उन्माद चित्तांतरीं ?
दिव्याला बघुनींहि मोहित जरी होऊं नये मानवें
त्या बंधास असो दुरूनच नती ! आम्हां न तो मानवें ! १३३

नाहीं सुंदरता जगांत अगदीं जन्मास आली वृथा
व्हावी प्राप्ति तिची म्हणून यमुने ! आम्ही मरूं सर्वथा !
नाहीं व्यर्थच सद्गुणोच्चय जगीं निर्माण तो जाहला
सांडूं प्रेममयी ! तयास्तव अम्ही हा प्राणही आपला ! १३४

होतों गुंगत काव्य–कल्पित–सुखीं चिंतून कांहीं तरी
तें रूपें तुझिया असें प्रगटलें प्रत्यक्ष या भूवरी !
आतां सोडुनियां तुला खलभयें जाईन मागें जरी
नाहीं गे तरि मंदभाग्य मजसा या सर्व लोकांतरीं ! १३५

* * *

कोणा आवडलीं गुलाबसुमनें कोणास तो मोगरा,
सर्वांनीं अवहेळिला भगवती ! दुर्भाग्य हा धोतरा !
नाहीं सौरभ, चारुताहि अथवा घे कोण याला करी ?
हा ! हा ! जाइल धूलिमाजि सुकुनी स्वीकार याचा करीं ! १३६

चित्ताकर्षण जें करील- असती त्याचे जगीं सर्वहि
सर्वांनीं त्यजिलें तया जवळ तूं घेसीं असे ख्याति ही ?
या ख्यातीवर विश्वसून जवळीं आलों तुझ्या मंगले !
आतां कार्य पुढील तें तुजवरी सारें असे राहिलें ! १३७

* * *

" झाली आवडती तुला जिजवरी तूं प्राण ओवाळिले,
कां गाणें तिचियावरून अजुनी नाहींस तूं गायलें ? "
हें कोणी म्हणतां हटास चढुनी वीणा करीं घेतली
तारा लावुनि पंचमांत पहिली मीं तानही फेकली ! १३८

नाहीं शब्द परंतु एकहि मुखीं आला, मुका जाहलों,
येतां रूप तुझें मनांत, बुडुनी हर्षांत मी राहिलों !
प्रेमाश्रू नयनांतुनी घळघळा वाहावया लागले,
गाणें पाहुनि हें मदीय भलतें श्रोते तदा हांसले ! १३९

आर्ये ! तूं तरि सांग, मूर्ति तव ही दृष्टीपुढें नाचतां
ना मोहीं पडतां धजेल जगतीं गायास तो कोणता ?
धांवे मंजुरवप्रवाह मधुरे! जो हा त्वदूर्मींतुनी
तो ऐकूनहि धृष्ट कोण गगना कोंदील रुक्ष स्वनीं ? १४०

ऐकावें तव गान, मंजुल रवीं जावें विरोनी, अशी
वांछा उत्कट ही अहर्निश वसे सोत्कंठ मन्मानसीं.
आलों सर्वहि पाश तोडुनि तुझ्या तीरीं म्हणोनी असें,
नाहीं मीं गाणिलें मुळींच जरिही लोकांत झालें हंसें. १४१

प्रेमाची न जयांस ओळखहि, जे स्वार्थीं बुडाले पुरे
ज्यांची नीतिहि सारखी करितसे नाना अवस्थांतरें,
देवी ! ज्यां मळल्या पथाविण दुजा ठावाच नाहीं पथ,
थोडें कांहीं कुठें नवीन दिसतां ते राहती हांसत ! १४२

खालीं घालुनि मान लोकपथ मी तो तोच चोखाळितों
होतों मान्य तरी, भिकार पण मी ती मान्यता मानितों !
कीर्ती फोलच ती, सुहासिनि ! तिच्या मागें पळावें कुणीं ?
आलों मी म्हणुनी इथें, असासि कीं तूं मंगलांची खनि ! १४३

* * *

संसारीं सुखलेशही मज नसे पोळून चिंतानलीं
वर्षे पूर्ण उमेदिचीं ढकलिलीं तारुण्यकालांतलीं,
नाना लोक दुजे सुखांत गढले, हा भेद येतां मनीं
दैवा दूषण लाविलें निशिदिनीं अश्रू किती ढाळुनी ! १४४

‘ नाहीं काय जगांत ईश्वर ? वृथा मातेंच तो कां छळी ? ’
आले शब्द असे मुखांत, पुढली नाहीं स्थिती जाणिली;
जन्माला विटुनी निराश हृदयें इच्छीं मरायाप्रती
त्या माझ्यावर सौख्यपूर वळला आहे गडे संप्रती ! १४५

सिद्धि क्षुद्र जशा तपश्वरजनां मोहामधें घालिती,
तैशी संसृतिसौख्यलाभ घडुनी होती जरी मास्थिति
येतों मी मग कोठुनी तुजकडे ? प्राप्ती तुझी कोठली ?
काराबद्धच राहतों, न मिळती ताजी हवाही खुली ! १४६

तूं माझी म्हणुनी प्रमुग्ध नयनें कैसा पहातों बरें ?
तूं माझी म्हणुनी नभास भरितों कोठून गीत स्वरें ?
आलें गौरव विश्वविस्मयकर प्रेमेश्वरी जें मला
सांगें सत्यच लाभता तरि कधीं अल्पांशही त्यांतला ? १४७

होतें तें बरवेंच हें समजुनी आलें मला निश्चयें,
दृष्टी ठेवुनिया उद्यांवर, जनें निर्विण्ण होऊं नये;
गेला जीवनमार्ग कष्टतर तो आतां सुखाचा दिसे,
कां कीं त्याचमुळें तुझ्याजवळ मी आलों असें राजसे ! १४८

* * *

होतों मी अपुल्यास मानित सुखी, कोठें न दुःखच्छटा,
होतों मानित, हर्ष सर्व जगतीं मी भोगितों एकटा !
कर्णीं रम्य तुझा निनाद पडतां झालें कसेंसें मला,
त्वन्मूर्ती तर पाहतांच अगदीं गर्वांशही लोपला ! १४९

माझें सौख्य किती भिकार धरुनी त्यालाच मी बैसलों,
सर्वांना अवहेळिलें समद, तें येतां मनीं लाजलों !
नाहीं नाहिंच रत्न उज्ज्वल असें माझ्या घरीं एकही,
देवी ! स्पष्ट दिसून हें विफळशी सारीहि वाटे मही ! १५०

तूं झ.लीस परी कृपामय मनीं स्वीकारिलें या जना,
देवी ! धीर दिलास मंगल तुझ्या गाया यशोगायना !
'तूं माझी' म्हणुनी जगीं मिरविणें ही केवढी थोरवी,
सद्योवैभव चिंतुनी मम मनीं सौख्योर्मि येते नवी ! १५१

*　　　*　　　*

माझें गायन ताल सूर नसतां कैसें तरी चाललें,
माझें काव्यहि बंध फेकुनि दुरी कैसें तरी निर्मिलें !
नाहीं व्यंजन वा न आढळतिल प्राया अलंकारही
उत्कंठा भरली तुझ्या विषयिंची सर्व स्थलीं एक ही ! १५२

आहे काय कृतींत या, म्हणुनिया पृच्छा करावी जनीं,
नाहीं काय कृतींत या, पुसत मी तूतेंच कल्लोलिनी !
प्रेमाची लहरी उठे प्रतिपदीं, तीच्यापुढें कोणतीं
रत्नें वा भलत्या अलंकृति तुझ्या चित्तास जीं मोहिती ! १५३

माझें प्रेम तुला कळो म्हणुनिया हें गान मी गातसें,
ठावें हें मज, गायकाग्रणि कुणी प्रेमात्मिके ! मी नसें.
मी साधा, मम गानही भगवती ! साधेंच आहे खरें
त्याची स्फूर्ति परी विशुद्ध हृदयापासून होते बरें ! १५४

*　　　*　　　*

नाहीं पावानि ! योग्यताहि अपुली चित्तांत मीं आणिली,
प्रीती ही तुजला मदीय पहिल्या भेटीस मीं वाहिली,
तूं होशील मला प्रसन्न, न दुरी देशील कीं लोटुनी,
आशा बाळगिली, वृथैव ठरली नाहींच ती स्वामिनी ! १५५

होतों मी नच पूर्णकाम तरिही चिंतीत तूतें मनीं
मी प्रेमेश्वरि ! कंठितों सकळही भावीं अहर्यामिनी !
ना आलें यश मंगले ! तरि तुझ्यासाठीं मराया मिळे
हें का गौरव सान ? तें तरि किती लोकांस गे लाभलें ? १५६

*　　　*　　　*

यत्नानें घरिं तेलवात करुनी मीं लाविले दीप ते
थोडें तेल कमी पडो, क्षणभरें होतील कीं लोपते !
ज्या स्थानीं नुसता प्रकाश भरिला त्यांनीं प्रभा प्रेरुनी
तेथें धूरच टाकितील यमुने ! घाणेरडा कोंदुनी ! १५७

तूं तारा गगनांतली, न कधिंही कांती तुझी हो उणी
व्हायाच्या प्रणयोर्मि नष्ट न तुझ्या निंदो स्तवो वा कुणी !
लोभें प्रेम करीत विश्व, तुजला कांहींच नाहीं कमी,
देवी ! भाग्यवती दुजी न तुजशीं देऊं तुला काव्य मी ! १५८

प्राणांचें नव पद्म पंचदळ हें देवी ! तुला वाहतों,
ही रम्या तव मूर्ति दृष्टि भरुनी सोत्कंठ मी पाहतों,
स्तोत्रें गात तुझ्यावरून यमुने ! उन्मुक्त भावस्वरीं
नेतों आयु समस्त बैसुनि तुझ्या तीराद्रिकुंजांतरीं १५९

गातो कोकिल हा उगा, शिकवितों नामावली त्या तुझी,
घ्याया साथ मधुव्रतांस कथितों जे गुंजती अंबुजीं,
या साऱ्या वनदेवता, पवन जो स्वच्छंद धावे वनीं
यांनाही वळवून मग्न करितों त्वन्नामसंकीर्तनीं ! १६०

तूं व्हावीस जिथें तिथें सुमहिता, विश्वें नमावें तुला,
तूं व्हावीस जगांत गीत, धरितों चित्तांत या हेतुला;
भक्तांचा तुजभोंवती अनुदिनीं संमर्द व्हावा असा
कीं व्हावें न मलाहि दर्शन तुझें, ही अंतरीं लालसा ! १६१

चेतश्चंद्रकले ! अनंत गगनीं तारे असावे सदा,
मध्यें इंदुकला जशी चमकुनी सर्वांस दते मुदा,
तैशी तूंहि विराज; राहिन सुखें कोठेंहि कोणांतरीं
देवी एकच पूजकें भगवती ! शोभेल केव्हां तरी ! १६२

आहे प्रेम तुझें अगाध, मजला हें पूर्ण ठावें असे,
आले भक्त कितीहि, त्यांस पुरुनी राहील तें राजसे !
सिंधूच्या उदरामधें जळचरें थोडीं न कीं राहती,
नक्षत्रें तर अंबरांत भरलीं नाहींच त्यांना मिती ? १६३

एकासाठिंच विश्वमंगल अशा वस्तू न येती जनीं,
सर्वांना अधिकार हा, बघुनियां जावें तया मोहुनी !
आली रम्य उषा कुणास्तव ? कुणासाठीं विधूची कला ?
एकासाठिं ? कसें वदूं वितथ हें ! विश्वार्थ तूं मंगला ! १६४

कांटेरी दृढ कुंपणें रचुनियां सर्वत्र लोभी जनीं
केली दारुण शोभने ! सुखमयी ही मूळची मेदिनी !
विश्वात्मैक्य जगास तूं पटवुनी देशील थोडें तरी
होतों लीन तुझ्यापुढें धरुनियां आशा अशी अंतरीं ! १६५

* * *

गेली सर्व उमेद, चित्त अगदीं निर्विण्णता पावलें;
गेला काव्यतरू सुकून, मनिंचे गीतध्वनी लोपले;
आतां आयु असेल तोंवर जगीं राहून कैसें तरी
व्हावें शून्यविलीन नंतर, अशी ही भावना अंतरीं ! १६६

देवी यापरि जो हताश बनला त्या मंदभागी जना
होतां दर्शन हें त्वदीय सहसा आली नवी चेतना !
झालें खिन्न मन प्रसन्न, कवितावृक्षा फुटे पालवी,
आलीं शीघ्र मुखांतुनी उसळुनी अज्ञात गाणीं नवीं ! १६७

हर्षाच्या लहरी अनंत उठल्या वेगें तयांनीं, किती
काव्यें सुंदर फेकिलीं चहुंकडे साश्चर्य होते मति!
घ्यावें मीं उचलून एक तंव त्या ठायीं दिसावें दुजें
झालों विस्मित, केवढें विभव हें माझें तरी शैलजे! १६८

किंवा वैभव हें मदीय म्हणजे सारी तुझी देणगी,
हें औदार्य तुझेंच—आज बसलों आहे सुखाच्या नगीं!
येथें मी लिहितों त्वदीय उठती जे जे तरंगध्वनि,
मी संदेशहर, प्रसिद्ध परि गे शाहीर झालों जनीं! १६९

कोठें दूर वनांतरीं सुमतती हास्योत्सवातें करी
येतो तेथुनि तो सुगंधि म्हणुनि हो स्तुत्य वायू पुरीं;
पुष्पश्री स्तुतिपात्र, वायु नुसता तो भारवाही असे,
वाणी त्या न, परी गडे वद तुझें मी श्रेय घेऊं कसें! १७०

द्यावें श्रेय तुझें तुला, दगड मी आहें दिसावा तसा
हा हेतू; महिमा तुझा मजवरी लादून घेऊं कसा?
केला तूं उपकार गुप्त परि तो जाहीर मी सांगतों,
जैसा सागरदत्त इंदुस शिरीं गौरीपती वाहतो १७१

* * *

फंदी होय असा म्हणून करिती क्रोधें कुणी हेळणा
कोणी हा व्यवहारशून्य म्हणुनी गे चालवी, जल्पना;
बोलूं काय तयांसवें ? करुं कसें त्यांचें समाधान मी ?
देवी व्यर्थ तव स्तुती कथुनि त्यां होऊं कशाला श्रमी ? १७२

निंदो विश्व सुखें, न सौख्यलवही माझा तयाच्यावरी,
खावो कूट सदा, शिवेल न मला खेदांशही अंतरीं !
निंदोनी करणार काय तरि हें माझें, न मातें कळे,
आहें जों प्रणयोर्मिमंडळिं तुझ्या मी वेष्टलों प्रेमळे ! १७३

गेलों पोळुनि जेधवां भगवती ! संसारदावानलीं,
या तापत्रयिं सांपडून तनुची झाली अती काहली,
' धांवा हो ! ' म्हणुनी तदा सकरुणे ! सर्वांस मीं बाहिलें,
कोणीही तुजवांचुनी द्रवुनियां नाहीं परी पातलें ! १७४

हांसाया नुसतेंच ज्यास सुचतें त्यांना भिऊं कासया ?
योग्य प्रेमचरित्र निर्मल तुझें त्यांना न सांगावया !
चाराया सजलों सकौतुक जरी मुक्तावली वायसा
व्हायाचा उपयोग काय तरि त्यापासून देवी कसा ? १७५

आधीं सोडुनिया जगास, रत मी झालों तुझ्या सेवनीं,
आतां केवळ तूंच पुण्यचरिते ! आधार मातें जनीं !
तुच्छ, प्रेमबलावरी तव, गडे लेखीन इंद्रासही,
स्वर्गा आणिन खालती, चढविन स्वर्गामधें ही मही ! १७६

* * *

एका रुक्ष महीवरी गुणवती मी एकदां कौतुकें
नेवोनी तव तोय अंजुलिपुटीं संप्रोक्षिलें सारखें
कांहीं काल असाच जाउनि पुढें जों पाहिलें त्या स्थलीं
तों आश्चर्य ! नवीन कोमल तृणें होतीं किती वाढलीं १७७

तोयाचा महिमा तुझ्या न असल्या गोष्टीवरोनी कळे,
होतो स्पष्टच तो तटांवरुनि या सर्वांसही ऊर्मिळे
सारा प्रांत उजाड, वृक्षलतिकासंमर्द येथेंच हा !
न्यावें आयु इथें अशी मम मनीं होते म्हणोनी स्पृहा १७८

जी रुक्षस्थल टाकिते नटवुनी निर्मोनि ताजीं फुलें,
सांनिध्यें जिचिया सुशीतल जनां ग्रीष्मर्तुही भासले !
माझ्या दग्ध हताश रुक्ष हृदयक्षेत्रांत मंदस्मितीं
सांगा अंकुर एकही नच कशी होईल ती निर्मिती। १७९

* * *

व्हावी प्राप्ति तुझी म्हणून झटले ठावें मला हें किती,
देवी ! वाग्विभवी कवीशहि किती अर्पीत होते स्तुती ?
माझी दाद तिथें कलिंदतनये ! लागावयाची कशी ?
होतों बाजुसि बैसलों म्हणुनि मी खेदावुनी मानसीं ! १८०

कांहीं त्या स्थळिं शोकगीत मुखिं मी कैसें तरी गायिलें,
अश्रूंनीं भरले म्हणून सहजी मन्नेत्रही झांकले,
पाहें जों घटिकाभरें वरि तदा तूं मंगले सास्मित
गे होतीस उभी प्रसन्न नयनीं दीनास या पाहत ! १८१

याचा विस्मय वाटला सकळिकां आश्चर्य याचें नसे,
कां कीं हें मजलाहि गूढ गमतें अद्यापही राजसे !
किंवा प्रेम विशुद्ध हेंच हृदया जीच्या समाकर्षितें ?
तीची ही कृति सर्वथैव उचिता ऐसें मना वाटतें ! १८२

*　　　*　　　*

झाली व्यक्त जगामधील सगळी अज्ञातही चारुता,
सारे रागहि मंजुल प्रगटिले वीचिस्वनीं सर्वथा,
फेकोनी जलबिंदु शीत करिसी हा, दास रोमांचित,
राहावें तरि मी कसें गुणवती ! झाल्याविना मोहित ? १८३

ज्या सामान्यहि मोहविव्हल करी, ना सारितां ये दुरी,
मोहागारचि त्यापुढें उघडितां व्हावें कसें त्या तरी !
जो एका जलबिंदुनेंच अगदीं वाहूनियां जातसे
येतां सांग तयावरी सुरधुनी त्यानें करावें कसें ? १८४

ज्या त्या मागुनि धांवतों सतत मी आशाळभूतापरी,
हें खोटें न; मला श्ववृत्ति असली ठाऊक आहे पुरी !
मोहाया झटलीस तूंहि, मजला हेंही नसे; कां खरें
ज्योत्स्नेला बघुनीहि शांत जलधी राहील कैसा बरें ? १८५

*　　　*　　　*

ज्या सौख्यें नवसस्यमंडित मही होवोनियां डोलते,
ज्या सौख्यें मधुतारकांकित असें आकाशही हांसतें
ज्या सौख्यें भरती लतातरुंवरी पुष्पें वसंतांतरीं,
ज्या सौख्यें उसळे उषःसमयिं गे सौरभ्य पद्माकरीं १८६

तीं सारींहि सुखें मिळून हृदयीं माझ्या अहर्यामिनी
हे बाहेर मुखांतुनी पसरती उद्दाम गीतध्वनी;
विश्वाला रमणीयता अनुपमा जीच्यामुळें लाभली
माझी झालिस तीच तूं, म्हणुनि ही रम्य स्थिती पातली! १८७

लीलेनेंच जिच्या विशुष्क तरुला येते नवी पालवी
ती तूं गे झटसी सकौतुक जरी मातें कराया कवी
होण्यावीण कवी न मार्ग दुसरा देवी; मला राहिला
लोकींही तुझियाकडेच बघुनी हा दास संमानिला! १८८

टाकी डोंगर रुक्ष कोमल तृणीं झांकून मेघावली,
किंवा भानुकरांहिं इंद्रधनुषें शून्यांवरी शोभलीं,
तैसा गायक मी असा तुजमुळें ये आळ माझ्यावरी
लोकांना परिसापरी गमत, मी आहें परी खापरी! १८९

* * *

लाटा आपटतां तटावर तुझ्या जे वर्षती सीकर,
होती व्यक्त कितीक इंद्रधनुषें त्यांतून चेतोहर
साध्याही दगडासभोंवतिं तुझें संगीत जें चालतें
होती व्यक्त न राग सांग यमुने त्यांतून ते कोणते? १९०

जैशी चंद्रकलेमुळेंच रजनी ज्योतिष्मती मानिली
तैशी सृष्टि मनोहरा तुजमुळें आहे खरी जाहली,
देवी नातरि रुक्ष हें पसरलें मैदान चोहोंकडे
जीवांनीं वसणें तिथेंच म्हणजे मोठेंच हें सांकडे! १९१

फंदी ईश्वर तो पुरा, जग तयें जें एकदां निर्मिलें
नाहीं त्याजकडे फिरून अगदीं त्यानें कधीं पाहिलें,
गेलें गंजुनि चक्र तें, दिसतसे सर्वत्र ही दुःस्थिती
शोकाचे ध्वनि अंबरीं पसरती, उष्णाश्रुही लोटती, १९२

झांकायास तदीय दोष, सुखही द्यायास गे दुःखिता
प्रेमानें झटतात कोमलमना कांहीं अशा देवता,
त्यायोगेंच अम्हांस जीवित गमें थोडेंतरी सह्यसें,
देवी! हे उपकार थोर तुमचे वर्णूं तरी मी कसे? १९३

वाणी दुर्बळ ही, पुरें न पडतें पांडित्यही मानवी,
आम्हीं मूकच बैसतों म्हणवितों लोकीं जरी सत्कवि.
वाटे भीति मना—कृतघ्न तरि तूं आम्हां न कीं लेखिसी?
वा सर्वज्ञच तूं, तुझ्याविषयिं ही शंका धरावी कशी? १९४

शब्दांचे बडिवार जेथ ठरती देवी! अति व्यर्थसे,
प्रेमाधीश्वरि! मूकगीत अमुचें निःशंक आहे असें!
जेव्हां भक्तिभरें अम्ही तुजकडे सोत्कंठ गे पाहतों
आहे अर्थ तरी जगांत कसला हो जो न तैं व्यक्त तो १९५

आहे गीत असें तुझ्यावरुनि मीं अद्यावधी गायिलें,
तूंही तें कुतुकें पुनःपुनरपी आहेस गे ऐकलें,
माझा गानमहोत्सव प्रगटला तेंव्हां त्वदर्थंच तो,
अस्पष्ट प्रतिनाद हा गुणवती पद्यांत या गुंफितों. १९६

हीं गीतेंहि जनां न आज यमुने संम्याव्यशीं वाटती,
त्यांचा दोष न तो, सुखानुभव हा कोठून ये त्यांप्रती!
माझें तें मधु मूकगीत पहिलें सुव्यक्त होतें जर
देवी नाकळतें स्थिती तरि कशी होती तयांची तर? १९७

* * *

गेले दुर्विधिनें सदा तुडविला जो हा अभागी पदीं
गेला गांजुनि जो अहर्निश गडे वेढून नानापदीं
त्यानें स्वप्रणयोपहार तरि तो द्यावा तुला कोणता ?
कोठें दुर्बळ दास हा भगवती तूंही कुठें देवता ! १९८

नाहीं एकहि वस्तु संनिध जिला माझी म्हणावी अशी,
पूजा सादर मी तुझी वद तरी आतां करावी कशी ?
आहे एकच वस्तु–दग्धहृदय प्रेमेश्वरी ! हें असें
भावें तेंच तुझ्या समर्पित पदीं स्वीकार तें राजसे ! १९९

आशा एकहि जाहली न पुरती जाळी निराशानल,
झाला प्राप्त न सौख्यलेश अगदीं केव्हांच विश्वांतिल
त्यानें हें अनुरात्र होरपळलें गेलें जळोनी पुरें
तें तीरीं तव फेकिलें, शमवि त्या शीतांबुच्या सीकरें २००

दुःखें व्याकुळ होउनी अनुदिनीं निःश्वास मी सोडितों
तैसा होउनि बावरा सतत मी उष्णाश्रुही वर्षतों,
माझें जें म्हणवेल तें भगवती आहे खरें एवढें
तें हें सादर आज जाण तुझिया मीं ठेविलेंसे पुढें ? २०१

* * *

केले तूं उपकार थोर कविते ! जे नित्य माझ्यावरी
आहे जागृत सर्वदाहि मधुरे त्यांची स्मृती अंतरीं,
आली ही त्वदनुग्रहेंच मजला कांहींतरी योग्यता,
मातेहून तुझेंच वाटति मला आभार हे तत्त्वता ! २०२

दोषांचे पडदे हळू उकलुनी केलें मला तूं गुणी,
पावित्र्यावरि तूंच कीं जडविलें माच्चित्त रात्रंदिनीं,
प्रेमाचें रमणीय रूप मजला स्वर्गीयसें दावुनी
तत्प्राप्त्यर्थ विनिर्मिलें भगवती ! औत्सुक्य माझ्या मनीं ! २०३

आशीर्वाद तुझा शिरीं धरुनियां मीं यत्न केले किती,
लाभोनि यश सर्वदा तव कृपें झालों खरा मी कृती !
जन्मा येउनि जें नरास मिळणें तें तें मिळालें मला
ऐसें मानुनि दास हा सुखभरें आनंदुनी झोंपला ! २०४

कांहीं दिव्य अपूर्व मोहन असें स्वप्नांत तो पाहुनी
झालों जागृत राहिलों उठुनिया सावेश वेडावुनी
दृष्टी जों उघडून मीं बघितलें तों काय सांगूं तुला
होतें दृश्य पुढें अपूर्व असें हा जीव भांबावला २०५

ज्याची सत्यच कल्पनाहि नव्हती तें मूर्त होतें पुढें
घे, स्वीकार मला, असेंहि वदतें आश्चर्य हें केवढें !
झाला लाभ मला तदीय, पण मी जाणून आहे मनीं
कीं ही निश्चित देणगी तव असें आहें तुझा मी ऋणी ! २०६

पाही भीतिच रानफूल भवतीं माळावरी एकलें,
मुक्ताहार तयावरी नव उषःश्रीनें करीं वाहिले,
भारी लज्जित या अपूर्व विभवें झालें बिचारें मनीं
माझीही स्थिति त्यापरीच घडलीं आतां असे पावनी ! २०७

तूं जेव्हां दिसलीस गे प्रथम तें झालें मला कौतुक,
केव्हां ये नच कल्पनाहि परि कीं देशील ऐसें सुख ;
ठेवावा उचलून सुंदर खडा बालें, निघावा हिरा
झालें तेंवि, कशा न होतिल बरें वृत्ती सुखीं निर्भरा ! २०८

लागे नाद तुझा, न कारण मला ये सांगतां दृश्यसें
त्या नादीं व्यवहार मीं दुखविला झालें म्हणोनी हंसें !
केली कींव कुणीं कुठें पसरिली निंदाहि तोंडावरी
नाहीं आप्तगणांत मान उरला, मी लाजलों अंतरीं ! २०९

शब्दागोचर सौख्य जें मज घडे देवी ! तवोपासनीं
सांगूं तें वद केंवि त्यांस ? बसलों मी मूकता सेवुनी;

होतें जें तुजपासुनी सुख मला तें लभ्य अन्यां नसे,
त्यानीं तुच्छच लेखिलें तुज तरी मी त्यांस दोषूं कसें ! २१०

आतां होउनि तूं प्रसन्न मजला ही सर्वचेतोहरा
दिव्याश्चर्यखनी दिलीस यमुना ! मी धन्य झालों खरा !
माझ्या सर्वहि निंदकांस कविते ! सोत्कंठ दावीन ती,
तूं मांगल्यखनी म्हणून तुजला त्यांनीं करावी नती ! २११

गीतें तुच्छ कशीं ? श्रवून भुलतो गीतेंच तो श्रीहरी,
गीतें तुच्छ कशीं ? फुटे द्रव झणीं पाषाणचित्तांतरीं
गीतांनीं—पण मी कशास दुसरे दृष्टांत देऊं वृथा ?
गीतांनीं मजला प्रसन्न यमुना झाली असे सर्वथा ! २१२

होती फेकित जी तरंग अपुल्या नादामधें चालली
माझें ऐकुनि गीत ती थबकुनी भ्रांतापरी राहिली;
अश्रू वर्षित तेधवा विनविलें मी उत्कट प्रीतिनें
फेकोनी जलबिंदु शीतल मम स्वीकार केला तिनें ! २१३

* * * *

आलों लावित दृष्टि इंदुकलिका पाहोनि उन्मीलिता
गेलें तद्दल एक एक गळुनी हा ! हा ! नुरे चारुता !
नेत्रानंदकरी नभस्तळवटीं तारा न जों देखिली
तों ती कोसळुनी क्षणांत पडली कोठेंतरी भूतलीं ! २१४

लोभावें मन त्या उषेवर न तों ती लोप पावे जवें
संध्याराग तमःपटांत दडुनी सारेहि जावे नवे;
मोहावे नव पारिजातकुसुमा तों तें गळावें त्वरें
मुक्ताकार हिमांबुबिंदु धरितां जावे मिळोनी धरे ! २१५

कांहीं भास मनांत दिव्य उठतां वेडावुनी तत्क्षणीं
बैसावें नवकाव्यलेखनिं, परी ते चालले लोपुनी !

जें जें सुंदर भव्य त्यास बघुनी मी नित्य वेडावलों
त्याचा लाभ न जाहला म्हणुनि मी मागून पस्तावलों ! २१६

नित्याचा परिणाम हा मम मनीं होऊनियां जागृत
तूंही होशिल दूर काय म्हणुनी हें चित्र हो कंपित !
तूं नाहींस कठोर, हा जन परी आहे अभागी अती
होतां स्पर्श मदीय दग्ध न कळे होईल मुक्तातति ! २१७

* * *

माझी दारुणता मला शुचितमे ! ठाऊक होती पुरी
पूर्वीचें विसरून सर्व तुजला मी मुग्ध झालों तरी;
याला कारण एक—तें तुजसिही न ज्ञात का पावनि ?
तूं मांगल्यखनी ! अमंगल कसें होईल माझे जनीं ? २१८

हस्तस्पर्श मदीय जो धजतसे मुक्तेस जाळावया !
लागे त्याचमुळें अहा ! दगडही चिंतामणी व्हावया !
माझ्या दृष्टिगुणें यशस्विनि ! जिथें अंगारवृष्टी घडे
होतें सांप्रत पुष्पवर्षण तिथें उन्मादकारी गडे ! २१९

देवी ! नित्य नवीं नवीं तुजवरी स्तोत्रें किती वाहिलीं
सांगें व्यक्त कृतज्ञता तरि कशी होईल चित्तांतली ?
माझी दुर्बळता, तुझी अतुल ही येतां मनीं थोरवी
नेत्रांनींच तदा गडे विरचितो निःशब्द गाणीं नवीं ! २२०

* * *

अल्प स्पर्शनही यदीय शमवी संतप्त चित्ताप्रती
ऐसे कोमल रश्मि जो पसरितो, ज्या सत्कवी वर्णिती;
तो हा तारक सारखा भटकतो व्योमांगणीं प्रेमले !
विश्रांतिस्थल त्याजला अजुनही नाहीं कुठें लाभलें ! २२१

हा रात्रंदिन धांवधांवुनि विधू व्यापून गेला क्षयें,
जो भेटेल तया सदा बुडविलें पीयूषपूरीं तयें;

केलें सर्व परंतु तो न अजुनी पूर्णांश झाला दिसे,
थांबाया क्षणमात्र सुस्थळ असें त्याला मिळालें नसे ! २२२

ज्या नाहीं घरदार, नित्य भटके जो दीन रानींवनीं
त्या वेड्या उधळ्यापरी भ्रमतसे हा वायु रात्रंदिनीं
जेथें स्वस्थ बसून शीण सगळा न्यावा हरोनी असें
नाहीं स्थान तयासही गवसलें अद्यावधी राजसे ! २२३

पाहें सिंधुतरंग हा खवळुनी फोडूनिया गर्जना
वेगें आदळतां प्रचंड गिरिही पावे कसा कंपना;
नाहीं त्यासहि लाधलें स्थळ असें टेकून डोकें जिथें
घ्यावी झोप सुखें श्रमापहर, हें ठावें मला देवते ! २२४

होतें वादळ चाललें अजवरी माझ्याहि चित्तांतरीं
सों सों गर्जत वात नर्तन करी सोन्माद त्याच्यावरी
भूकंपापरि सारखे कितितरी धक्के बसोनी गडे
गेले कोसळुनी अहर्निश अहो ! सौख्याचलाचे कडे ! २२५

'येथें शांति मला नसेल मिळणें, दे ती परत्रीं तरी !'
ऐसें ढाळित अश्रु मीं विनविलें विश्वंभरा अंतरीं;
देवी ! दृष्टि तुझी कृपामृतकणां वर्षून माझ्यावरी
चित्ता शांति मिळून मीच सुखभाक् झालों जगाभीतरीं ! २२६

*   *

# कादंबरी–रूपांतर.

केलीं भैरव विक्रमें अरिकुलें उध्वस्त युद्धांगणीं
दिग्दंतीहि यदीय कीर्तिपटहध्वानें समुत्कंपले;
देई नित्यविकास पूर्ण शशिसा जो सन्मनःकैरवां
चंद्रापीड पुढें सुवर्णनगरीं सेनेसवें पातला. १

कैलासाद्रि समीप नीलगगना भेदीत होता उभा,
कंठीं निर्झरहार घालुनि मुदा रम्या वनश्री हंसे,
युद्धक्लांत मनोविनोदनपटु स्थानास त्या देखुनि
आनंदें क्रमिले ससैन्य नृवरें तेथेंच कांहीं दिन. २

उद्यद्भास्करसस्पृहेक्षित अशा इंद्रायुधीं बैसुनी
चंद्रापीड निघे सभृत्य मृगयाकामें वनीं एकदां
मार्गीं किन्नरयुग्म एक तंव त्या होऊन दृग्गोचर
झालें मुग्ध अपूर्व कौतुकभरें वेढावलें तन्मन. ३

पिटाळी अश्वाला नरपति धराया युगल तें
शिरे दूरप्रांतीं अनुचरगणा सोडुनि दुरी
पळे ऊर्ध्वश्वासें हयमुखयुग त्रस्त पुढतीं
तदुद्देशें धावें निबिडवनिं इंद्रायुध जवें. ४

गिरिश्रेणी गेल्या कितिक तरी विस्तीर्ण गहनें
दरी झाल्या तैशा तुरगपदनादाकुल किती
तरी नाहीं झाला युवनृपति सिद्धार्थ अजुनी
समारोही अंतीं युगल अचलोत्तुंग शिखरीं ५

गती होतां रुद्धा नगगत महाग्रावशकलीं
निराशेनें दृष्टी वळवुनि उभा राहि नृपती

श्रमस्वेदखिन्न स्वतनु निरखोनी तुरगाहि
हंसोनी उद्वेगीं हळु हळु वदे आत्मगत तो. ६

“ केला शिशूपरि वृथा श्रम हा किमर्थ
कां पोषिली विफल किंनरयुग्मवांछा
होतें प्रयोजनच काय मला तयाचें
हा होय सर्व परिपाक विमूढतेचा ! ७

सारी बालिशता! वृथैव धरिला मी क्षुद्रकर्मादर
केलें आज हठें प्रयत्न विफळ व्यापार साधावया
आलों साधुफल क्रिया विसरुनी गूढ प्रदेशांत या
व्यामोहें मम संप्रती विफल सत्कर्तव्य झालें खरें! ८

झालें अजून उपपन्न न मित्रकार्य
आहे अपूर्णच मदीय नृपालधर्म
प्रारब्ध मज्जनक हेतु न पूर्ण झाला
आहे तशीच असमाप्त जगज्जिगीषा ! ९

सोडून दूर अपुला परिवार सारा
आलों कशास असल्या भलत्याच ठायीं
कां धांवलों विफल किंनरयुग्ममोहें
माझेंच ये मज हंसें बहु तत्स्मृतीनें ! १०

आलों विदूर कुठल्या विषम प्रदेशीं
आहे कठें बल मदीय न तेंहि ठावें
इंद्रायुध प्रजवशालि निमेषमात्रें
दुर्लंघ्यहि त्वरित आक्रमि दीर्घभूमि ! ११

पर्णावकीर्णतल वृक्षलता प्रगूढ
विस्तारली गहन काननभूमिका ही

राहून किंनरयुगैकनिबद्ध दृष्टि
मन्मार्गही तुरगवेगवशें न जाणें ! १२

या दुर्गम स्थलिं करूनहि यत्न मोठे
नाहीं कदा मनुज एकहि भेटणार
आतां सुवर्णपुरमार्ग कुणा पुसावा
मी भेटणार परतून कसा स्वसैन्या ! १३

पृथ्वीची म्हणती सुवर्णपुर ही सीमांतलेखा असे
आहे कानन निर्मनुष्य पुढतीं कैलास लागे पुढें
हा कैलास दिसे तरी हळुहळू मागें फिरावें अतां
दोषाचें फल आपल्या नियत ये भोगावया आपणा. १४

अश्वाला फिरवून तो पुनरपि साकूत चिंती मनीं
" ये मध्यावरि संप्रती रवि दिनश्रीमेखलारत्नसा
यत्नें श्रांत तुरंगमास अधुना चारून दूर्वातृण
पाजावें जल शीत, न्हाणुनि झरीं किंवा तडगामधें १५

तृष्णा अदम्य हरुनी मधुरांबुपानें
घ्यावाच्च आपणहि वृक्षतलीं विसावा ! "
योजूनियां मनिं असें बघुनी सभोंतीं
तो लागला सलिलशोध करावयाला. १६

क्रीडोनी नवपद्मगंधित जलीं स्वच्छंद, जातां वनीं
आच्छन्ना गजपादपंकपटलीं झाली धरा सर्वतः
शुंडाकृष्ट मृणालनालकमलें खालीं गळालीं कुठें
सांडोनी नव शैवलें मधुरशी आली कुठें श्यामता; १७

कोठें अंबुजकुड्मलें पसरलीं, उत्खात कंदावलि
कोठें खंडित पुष्पगुच्छ अथवा सत्पल्लवें कोमळ
उच्छिन्ना पडल्या लता अलिकुलें तत्सौरभीं गुंगती
गंधोद्दाममदांबुसिंचित पथीं ये श्रांत भूपाग्रणी. १८

जातां उत्सुक या पथें नृपति ये कैलासपादस्थलीं
शोभा देखुनि तेथली विसरुनी तो जाय तृष्णाव्यथा
छत्राकार बिशाल साल भरले निःशाख सर्व स्थलीं
कोठें पिंगल वालुका पसरली जी मोहवी लोचना. १९

होऊनी द्विपदंतमर्दित शिलाधूली उडाली कुठें
कोठें अल्पचि शोभती तृणलता पाषाणखंडांमुळें
कोठें कांचनचूर्ण मूषकबिलापासून बाहेर ये
कस्तूरीमृग—पादचिन्हित दिसे सर्वत्र तें सैकत. २०

स्वच्छंदें वनमानुषें गिरिगुहाद्वारीं कुठें बैसली
वायू गंधशिलासुगंधित कुठें तो गाववी कीचका.
या मार्गे नृप चालतां हळुहळू विस्तीर्ण वृक्षावलि
हो दृग्गोचर त्यास अंबुद—तमःपुंजापरी श्यामल. २१

पुष्पामोदितवीचिशीतल पुढें येऊन मंदानिल
भूपा मंगल दिव्य चंदनरसीं त्यानें मुदा तर्पिलें
चंद्रापीड शिरे समुत्सुकमनें त्या वृक्षराजीमधें
आनंदें मधुमत्तहंसततिच्या मंजुस्वनस्वागतीं ! २२

झाला विस्मित मोदनिर्भर पुढें पाहोनियां भूपती
नेत्राल्हादन चित्तमोहन महा अच्छोदनामें सर.
रत्नादर्शच निर्मल त्रिभुवनश्रीचा असे काय हा ?
किंवा स्फाटिककेलिमंदिर असे हें मेदिनी देविचें ! २३

आहे निर्गममार्ग काय अथवा एथें समुद्रांबुचा
कीं साऱ्याहि दिशा द्रवून सहसा एकत्र झाल्या इथें
दीर्घ व्योमच या स्थलीं अवतरे कीं अंशरूपांतरीं
किंवा हैमगिरीच हा वितळुनी आहे जणो सांचला ! २४

ज्योत्स्ना रम्य, हराट्टहास अथवा झाला असे विद्रुत
कीं पुण्येंच जगत्रयांतिल पयोरूपें इथें पातलीं !

हा वैडूर्यगिरी द्रवून सलिलाकारीं जणों राहिला
कीं सारें शरदभ्रवृंद विरुनी एकस्थळीं वर्षले ! २५

साधूंचीं हृदयें, मृगाक्षिसुषमा, मुक्ताफलांचीं प्रभा
यांहीं निर्मियला विशाल वरुणादर्श स्वयें सृष्टिनें.
अंतःस्पष्ट तलस्थिती विमलतायोगें दिसे त्यामुळें
आपर्यंत असून पूर्ण सर हें वाटे मना रिक्तचीं ! २६

वातोद्धूत तरंगशीकरकणांपासून जीं जन्मलीं
आहे त्या नव इंद्रचापनिकरीं संरक्षिलें हें सदा
नक्षत्रग्रहशैलकानन जलीं बिंबोनि भासे मना
सारें विश्वच पद्मनाभ हरिसें हें सांठवीं अंतरीं ! २७

वारंवार मुदा महेश्वर सदा स्नानें करीं या सरीं
तेणें एथ सुधा शिरोगत गळे बालेंदुखंडांतुनी
जाणों ती नव अंबुकेलिसमयीं वामाकपोलप्रभा
होऊनी जलधौत मिश्रित सरस्तोयांत झाली असे ! २८

आच्छादून जला तमालविपिनच्छायांधकारच्छटा
होतो भास कुठें रसातल–मुखें विस्तारलीं हीं जणों !
आलक्षून सरांत या पसरलीं नीलोत्पलांचीं वनें
जाती सोडुनि चक्रवाकमिथुनें रात्रिभ्रमानें दिवा ! २९

संध्योपासन या सरींच करिती सानंद नाना मुनि
घेती देववधू सहस्र कमलें तोडून पूजेस्तव
सिद्धांच्या रमणी धुतात अपुलीं कल्पद्रुचीं वल्कलें
झालें तोय म्हणून पावन तसें सप्तर्षिंच्या मज्जनें ! ३०

या स्थानीं जलकेलिदोहदवशें येती कुबेरास्त्रिया
तैसे वारुणहंस अंबुजमधू अत्यादरें सेविती
कोठें दिग्गजमज्जनें विचालिता होते मृणालावलि
कोठें खंडित जाहल्या तटशिला नंदीशशृंगामुळें ! ३१

कोठें फेनलता कृतांतमहिषें विक्षेपिली सर्वतः
कोठें पाटित इंद्रनागदशनीं पद्मावली जाहलीं
याला शोभविती मृणालवलयें, उत्फुल्ल पद्में तशीं
हंसाचा तटि पक्षनाद उठतो, आक्रोशती क्रौंचहि. ३२

उल्हासें तटतुंगनीपविटपीं संक्रीडती वानर
पाहोनी प्रतिबिंब शुद्ध सलिलीं घेतीं उड्या कौतुकें
भूमिप्राप्तघनभ्रमें बघुनिया नाचें मयूरावलि
होतां दर्शन दृष्टिही न मिटतें जैशी पडे मोहिनी. ३३

विस्तारून चिरप्रफुल्ल कमलें आच्छन्न झालें जल
तींही तन्मधुलुब्ध भृंगनिकरीं झांकून गेलीं पुरीं
यत्नानें जणुं हीं अनेकहि वरी आच्छादनें घालुनी
आहे रक्षियला निधीच अपुला यांच्या तलीं सृष्टिनें ! ३४

ऐसा तो रमणीयरत्न अतुल प्रेक्षून तोयाशय
चंद्रापीड पथश्रमा विसरूनी सानंद बोले मनीं
"मोहें किंनरयुग्म देखुनि वनीं मी धांवलों निष्फळ
ते सारे श्रम पूर्ण सार्थक इथें झाले असें वाटतें ३५

रम्यांचें दिसलें निधानफल हें मद्दृष्टि धन्या खरी !
दृश्यांचें अवसान हेंच गमतें, आल्हादनीयावधि,
प्रीत्युत्पादकता इथेंच सरली निःशंक वाटे मना
झाली या स्थलिं माधुरी परिणता, चारुत्व सीमा तशी ! ३६

या निर्मून सरोजलास विधिनें पीयूष कां निर्मिलें
शीत, स्वादु, सुगंध, निर्मलहि हें सर्वेंद्रिया तोषवी
याची दर्शनलालसाच धरुनी वाटे मना निश्चयें
कैलासाद्रिवरी महेश अजुनी आहे जणो राहिला ! ३७

पूर्वीं हें असतें सरोवर जरी सुस्वादुगंधोत्कट
कां निद्रा हरि रुक्ष खारट अशा घेतां समुद्रामधें

कां कल्पांतवराहभीति वसुधा सोडूनियां हें सर
होती मग्न अगस्तिपीत जलधीमध्यें विनष्टाश्रया ? ३८.

घेऊनी जल हेंच दुर्दिनतमीं दाही दिशा व्यापुनी
ब्रम्हांड प्रलयांबुवाह करिती सर्वत्र तोयाकुल !
होतें जें जलरूप विश्वच पुरा एकत्र तें होउनी
या अच्छोदसरोमिषें गमतसे आहे इथें राहिलें !” ३९.

चंद्रापीड सरोविलोकनसुखें कल्पीत ऐसें मनीं
मोदें दक्षिणतीरदेशिं उतरे अश्वावरोनी त्वरें
होती विस्तरली कठोर सिकता तेथें शिलाखंडशी
येऊनी जलमानुषें रविकरीं तीरावरी बैसलीं. ४०.

लिंगेंही दिसलीं सनाल कुमुदीं विद्याधरीं अर्चिलीं
अर्घ्यांतील फुलें गळून पडलीं देवांगनापूजनीं;
हीं स्नानागत–मातृमंडल–पदें झालीं कुठें अंकित
कोठें भस्म इतस्ततः पसरलें होतां गणोद्धूलन. ४१.

येऊनी गणनाथ एथ सलिल क्रीडा करायास्तव
त्याच्या गंडगलन्मदें सकलही संसिक्त झाला पथ
आलक्षून अतीव दीर्घ चरणन्यासा गमे निश्चयें
ये कात्यायनिचा मृगेंद्र नियमें एथें पिपासाकुल ! ४२.

शोभा पाहत ही अपूर्व असली नेऊन अश्वा सरीं
पाजोनी जल न्हाणुनी मग तटीं आणून त्या बांधिलें
घाली त्यापुढती सुकोमल तृणें तैशींच दूर्वादलें
चंद्रापीड समुत्सुकांतर मग स्नानार्थ गेला सरीं. ४३

हस्त क्षालुनि सेवुनी मधुजला झाला विनष्टश्रम
आस्वादी बिसखंड कौतुकभरें स्पर्शी दलत्कैरवें

सेवी मंद तरंगशीत पवना वक्षीं धरी पद्मिनी
घेऊनी करिं शीकरार्द्र कमलें बाहेर ये भूपती. ४४

अध्वक्लेशनिवारणार्थ मग तो एका लतामंडपीं
दार्घाकार शिळातलीं पसरुनी अंभोज पत्रावलीं
आनंदें निरखीत अंबुलहरिक्रीडा सरी चालतां
स्वच्छंदें पडला पहात मधुनी सस्नेह इंद्रायुधा. ४५

तो विश्रांतिसुखीं असा पहुडुनी झाला न अल्पावधी
तों वीणारवमिश्र तच्छ्रुतिपुटीं ये दिव्य गीतध्वनी
खाणें सोडुनि कर्ण निश्चल करी उद्ग्रीव इंद्रायुध!
मोहोनी युवराज जाय अगदीं त्या गायनाकर्णनें! ४६

येतो कोठुनि निर्जन स्थलिं अशा गानध्वनी मंजु हा
चंद्रापीड शिलेवरून उठुनी पाही महाकौतुकें
यत्नानें निरखूनही न दिसलें कांहींच त्याला तिथें
येई गायननाद मात्र कुठल्या दूर प्रदेशांतुनी. ४७

हें अत्यद्भुत गान कोण करितें जिज्ञासुनी हें मनीं
अश्वाधिष्ठित भूप पश्चिम वनीं चाले समुत्कंठित
वेगें मंजुळनादलुब्ध पुढती धांवे कुरंगावली
नाहीं होत विमुग्ध कोण जगतीं गीतध्वनी ऐकुनी? ४८

वाहे गंध महा लवंगलवली-लोल-प्रसूनांतुनी
सारा काननभाग तो अलिकुलीं आच्छादुनी टाकिला
मेघश्यामल ते तमाल तरुही नीलांबरा भेटले
वाटे काय पुढें दिगंतकरिंची वाहे मदश्रेणिका! ४९

श्रीभूतेशशिरस्थ इंदुकिरणीं मंदाकिनीच्या कणीं
झाला शीतल पूर्ण पावन तसा अंबातनुस्पर्शीनें
कैलासानिल तो फुलें पसरुनी मार्गावरी सर्वत:
गंधोद्दाम वनप्रदेश करुनी भूपास आल्हादवी. ५०

आनंदें कुतुकें हिमाचलवनश्रीवैभवें पाहत
चंद्रापीड सुगीतिलुब्ध हृदयें गेला वनांतःस्थलीं
नाना अंबरचुंबि पादपगणीं संव्याप्त होऊनिया
वाटे शैवलगुप्त पुष्करिणिसा विस्तीर्ण भूभाग तो ५१
वातें चंचल हालतां तरुशिरें कल्लोळशी भासती
नव्योद्भिन्न अनंत शुभ्र कुसुमें तीं बुद्बुदांच्या परी
शार्दूलादिक शोभती वनपशू विक्राळ नक्रासम
भासे एथ विशाल काय हरिता ही वाहिनी धावते ५२
पर्णें पादतलीं सभोंवति तशीं पर्णेंच शीर्षावरी
होती मारकत प्रभा पसरली सर्वत्र चेतोहरा!
सारें कानन टाकिती भरुनिया मंजुस्वनें कोकिल
ये प्रत्येक फुलामधून अलिचा सर्वत्र गंजारव. ५३
झाला रंजित भाग चंपकरजोराशी गळोनी कुठें
वाटे काननदेविनीं विरचिली ही रंगवल्ली जणों.
होती मुग्ध तमालखंड बघुनी मेघभ्रमें चातक
उन्मादें लवलीलतावलयिंहीं नागावली क्रीडते. ५४
देती ताल सुकोमलांग कदली कोठें मयूरिवा
कैलासाद्रितरंगिणी पसरिती तंगे मिंमाला कुठें

*　　*　　*

सारें कोमलपल्लवारुण दिसे विस्तीर्ण तें कानन
वाटे कीं वनदेविची विखरली आहे कपोलप्रभा ५५
वृक्षाग्रीं नव कुड्मलें विलसती बालांगुली ज्यापरी
वल्ली पादपकंधरांत दिसती या पत्रमाला जशा
पाहोनी घनपल्लवद्युति महा होऊन संमोहित
येतां भूमितलीं न सूर्यकिरणें त्याच स्थलीं क्रीडती. ५६
ऐशा त्या निबिडाटवींत शिरतां गानानुरोधें पुढें
आला भूपति इंदुकांतिधवला कैलासपादस्थळीं

तेथें निर्जन एक त्यास दिसलें श्रीशंभुचें मंदिर
होती वाहत दिव्यगायनमय स्रोतस्विनी तेथुनी. ५७

वर्षे केतकरेणुपुंज वरुनी वामांगरागापरी
जातां आयतनीं तयास दिसला श्रीशंभुगौरीपति
होता पूजियला वियत्तटिनिच्या उत्फुल्ल शुभ्रांबुजीं
आहे विस्तरिली जणों प्रभुशिरीं मुक्ताकिरीटप्रभा ! ५८

त्याच्या संमुख मंजुगानलहरी गंगातुषारांपरी
होती वर्षित एक तेथ बसली दिव्याकृती कन्यका
चंद्रापीड शुचिव्रता बघुनि ती सौंदर्यसारापगा
झाला विस्मयमुग्ध, पूर्ण भरलें तच्चित्त भक्त्यादरें. ५९

यत्नें क्षीरपयोधिची जमवुनी एकत्र फेनावलि
किंवा आयतकालसंचित तपोराशीच संपादुनी
स्वर्गंगाजलबिंदु शुभ्र अथवा बालेंदुखंडप्रभा
यांहीं निर्मियली असे तनु इची वाटे मनोल्हादिनी ! ६०

कैलासाचल आज शुभ्रतर हा झाला इच्या कांतिनें
तें राहो, हरिता लताहि बनल्या संशुभ्र पुष्प-स्थलीं
हींची पावन दिव्यदृष्टि पडली पाप्यावरीहि तरी
त्याचें तें मलपूर्ण दुष्ट मनही होई क्षणें निर्मल ! ६१

आहे स्फाटिक मंदिरांत बसली, क्षीरार्णवीं लोपली,
हो आदर्शतलांत बिंबित, शरन्मेघांत वा झाकली
विस्तारून अतीवशुभ्र सुषमा देहावरी सर्वतः
होती न स्फुट कोमलावयव ते सामान्य दृष्टीप्रती ! ६२

जाणों शुभ्ररसेंच काय घडली आहे विधीनें स्वतः
दिव्याकार बघून वाटत, नसे ही पंचभूतात्मिका

शंभूचें स्मित अंगभूति अथवा रम्या शरच्चंद्रिका
गौरीची अतुळा मनोविमलता प्रत्यक्ष झाली जणों ! ६३

राहे मूर्तिमतीच शुभ्र कुसमश्री एथ कैलासिंची
घात्याची अवनीवरी अवतरे किंवा तपःसिद्धि ही
झाली श्रांत अहर्निशीं फिरुनिया विश्वांतरीं, संप्रती
साधूंची शुभकीर्ति कीं निवसली या शांतरम्यस्थळीं ! ६४

कीं झाली वनवासिनी कलियुगें ही काय वेदत्रयी
किंवा मूर्तिमतीच होय मुनिंची ही ध्यानलक्ष्मी जणों
स्वर्गंगागत देवदंति सुषमा एथें गळाली असे
किंवा रावणभीत या स्थलिं वसे कैलासशोभाचही ! ६५

आहे नूतन सांचली शरदिंची ही काशपुष्पप्रभा
आली शेषशरीरकांति वरती भेदूनियां भूतला
कीं पुंजीकृत जाहली गमतसे ही शुक्लपक्षद्युति
कीं मुक्ताफलकांति एकवटुनी साकार झाली इथें ! ६६

झाली स्नात समंततः पसरुनी कुंदप्रसूनच्छवि
किंवा भूषित होय तत्तनु सुधाफेनांगरागें जणों
लावोनी शशिखंड चूर्ण अथवा ही शुभ्रता लाधली
या देहा उपमान रम्य दुसरें नाहींच नाहीं जगीं ! ६७

विद्युद्दीप्तिसमान दिव्य अथवा बालार्कबिंबप्रभ
होती कुंतलराजि लोळत तिच्या स्कंधावरोनी पुढें.
सद्यःस्नानतुषारबिंदु गळती केशांतुनी खालती
वाटे विद्रुत होत ही शुभगुणा गौरीशभक्तीमुळें ६८

शोभे तारकचूर्णनिर्मल अशी भाळीं विभूती तिच्या
जाणों चंद्रकलाच शैलशिखरीं संलग्न झाली असे.

दृष्टी लावुनि बैसली सुरुचिरा भूतादिनाथावरी
आहे वर्षित काय शुभ्र कमलें त्याच्यावरी शोभना ! ६९
गानप्रस्फुरिताधरा विखरुनी दंतप्रभा पावन
घाली स्नान जणों विनीतहृदया मृत्युंजया आदरें
कंठीं मौक्तिकमालिका विलसते देवांगनाश्रूंपरी
नक्षत्रावलिनें सुधांशुकलिका आहे जणों वेढिली ! ७०

भासे निर्मल पूर्णचंद्रवदना ही पौर्णमासी निशा
गंगा—तीरशिलातटीं मृदुमृदू कीं चालली गात ही
होतें शोभत दिव्य कल्पतरुचें अंगावरी वल्कल
झाला देह पवित्र शुभ्रतमशा यज्ञोपवीतामुळें ! ७१

अंगीं यौवन दाटलें पण दिसे अक्षुब्ध सिंधूपरी
लावण्यें तनु शोभली शुभकृतें कीर्ती मनोज्ञा जशी
वाटे शांत मृगापरी सदनिंच्या सौंदर्यराशी महा
वस्तू शोभनशील संयत गमे झाल्या इच्या संगमें. ७२

होती आयतनीं भरीत ललिता वीणाध्वनी मंजुळ
वाटे मूर्तिमतीच एथ बसली गंधर्वविद्या जणों.
तच्छायामणिमंडपीं चहुंकडे होऊनिया बिंबित
वाटे तत्सदृशाकृती सहचरी-वृंदें असे वेष्टिली ! ७३

ऐकोनी श्रुतिरम्य गानलहरी होऊन संमोहित
येती धावुनिया मृगादिक पशू दूर प्रदेशांतुनी
वाटे पार्थिवभाव शून्य उतरे ही एथ देवापगा
किंवा साम्प्रत सुप्रसन्न विलसे रत्नाकरश्रीच ही ! ७४

ऐशी ती परमेशमग्नहृदया पावित्र्यतेजोमयी
शांतीची चिरकेलिभूमि रुचिरा दैवी गुणांची खनि,

पाहोनी कुतुकादरें उतरला अश्वावरोनी नृप
विश्वेशालयिं जाउनी सुविनयें वंदी तया भक्तिनें. ७५

दिव्यांगना पुनरपी निरखूनिया ती
सौंदर्यशांति सुषमा बघुनी तदीय
आश्चर्यमग्न युवराज कुतूहलानें
चिंती मनीं स्मरुनिया निज पूर्ववृत्त. ७६

ज्याची नसेल अपुल्याप्रति कल्पनाहि
लोकीं अशी कितिक येति घडून वृत्तें
आलोकिला मनुजदुर्गम मीं सुदैवें
तो रम्य दिव्यजनसंचरित प्रदेश.

तेथें मनोज्ञ सर सिंधुपरी विशाल
कैलासासिद्धजनसेवित देखियेलें
ऐकून तत्तटिं अमानुष गीतनाद
येतां इथें दिसत ही मज दिव्य कन्या ! ७८

देखून उज्ज्वल अलौलिक दिव्यता ही
वाटे न ही खचित मानववंशजाता !
गांधर्वगानरव पार्थिवभावशून्य
हा होय का श्रवणगोचर मर्त्यलोकीं ? ७९

झाली तिरोहित जरी न बघून मातें
कैलासशैलशिखरीं न जरी पळाली
गेली उडून अथवा न जरी नभांत
जाणून घेइन इचा इतिहास सारा. ८०

आहे जणों स्थलाचि हें बहु कौतुकाचें
ठावें न काय अणखी दिसणार आहे !

कल्पीत भूप मनिं, गीतसमाप्तिकाल.
बैसे प्रतीक्षितचि त्या मणिमंडपांत ८१

बाला पुरे करुनि गायन अल्पकालें
गौरीप्रिया नमुनि पाहि वळून मागें
दृष्टी तिची विमल गांगपयःपवित्र
गेली नृपावरि सुदीर्घ तपःप्रगल्भ. ८२

ती सर्वतः करित वृष्टि सुधाकणांची
माधुर्यसारवचना वदली तयाला
" आनंद विस्मयहि होय महानुभावा
पाहोनिया मनुजदुर्गम या प्रदेशीं ८३

मार्गश्रमें दिसत शुष्क तुझी मुखश्री
आतिथ्यसेवन करी, चल, ऊठ आतां. "
मानून धन्य अपुल्यास तिला नमून
शिष्यापरी अनुसरें युवराज तीते. ८४

जातां चालुनि मार्ग अल्प दिसली त्याला गुहा एकली
जाणों रात्रि तमालवृक्षनिकरीं नांदे तदग्रस्थलीं
वेगें प्रस्रवण प्रचंड पडुनी पाषाणखंडांवरी
विस्तारून तुषारजालक जणों झाली हिमाच्छन्न ती ! ८५

द्वारीं चामरवृंदसे उभयतः संवर्षेती निर्झर
कीं मंदारतरु प्रसूतललिता झाली वनश्री इथें
सौगंध्योत्कट मौक्तिकावलि जणों भूमीवरी वर्षुनी
पावित्र्येंच इतस्ततः पसरुनी गेली असें वाटतें ! ८६

भूपा गुहामुखिं शिलातलिं बैसवून
वीणाहि वल्कलिं हळूच सती निवेशी

जाऊन ती त्वरित नंतर निर्झराचें
घेऊन अर्घजल पर्णपुटांत आली. ८७

संकोच पावुनि तिला युवराज बोले
" घेतेस कां भगवति ! श्रम हे वृथा तूं ?
आलोकनेंच तव धन्य पवित्र झाला
त्या या जनाप्रति समादर हा कशाला ? " ८८

अत्याग्रहें परि तिच्या युवराज तेव्हां
आतिथ्यसेवन करी विनयादरानें
बैसून नंतर समीप शिलातलीं ती
पूर्वेतिवृत्त युव भूपवरा विचारी. ८९

सानंद तोहि तदनुग्रह मानुनी हा
सारें चरित्र अपुलें तिजला निवेदी;
आलों कसें बघुनि किन्नरयुग्म एथें
तेंही तिला विशदसें कथिलें तयानें. ९०

वृत्तांत ऐकुनि तदीय शुचिव्रता ती
भिक्षाकपाल करिं घेउनि चारुशीला
अल्पावधी तरुतलीं विचरे समंतात्
तों पात्र ते च्युतफलांहि भरून गेलें ! ९१

ठेवूनियां मधुफलें नृपतीपुढें तीं
तत्सेवनार्थ सुभगा विनवी तयाला
आश्चर्यमुग्ध युवराज वदे स्वतांशीं
'कांहीं तपास जगतांत असाध्य नाहीं ! ९२

निर्जीवही तरु इची करितात सेवा
भक्त्यादरें वितरिती सुफलें इयेला

होतें सजीव जडजातहि सत्प्रभावें
हें देखिलें नवल एथ अदृष्टपूर्व' ९३

अत्यंत विस्मित उठून नृपाल तेव्हां
त्याच स्थलीं तुरग आणुनि शीघ्र बांधी
सुस्नात होउनि समीपजलप्रवाहीं,
भक्षी फलें, सलिल सेवि तुषारशीत. ९४

सेवून तीहि फलमूलजलादि साध्वी
संपादुनी विहित सांध्यविधी समस्त
विश्रब्ध पाहुनि शिलातलीं बैसलेली
गेला तिच्याजवळ भूपति आदरानें ९५

बैसून संनिध तिला विनयें वदे तो
"वाढे कुतूहल मदीय तव प्रसादें
हा प्रश्न साध्वि ! म्हणुनी करितों तुला मी
भीरूसहि प्रभुकृपा करिते प्रगल्भ. ९६

अत्यल्प कालहि जरी सहवास झाला
आत्मीयता उपजते तरि अंतरंगीं
होणार नाहिं जरि तूज अतीव खेद
सांगूनिया मम समुत्सुकता निवारीं. ९७

दिव्याकृती असिसि काय सुरप्रसूता ?
गंधर्ववंशजनिता रुचिरस्वना तूं ?
कीं पावनी ! असिसि सांग मुनींद्रजाता ?
कीं अप्सरःकुलिंच जन्मासि शोभनांगी ! ९८

केलेंस धन्य जननें कुल कोणतें तूं ?
केलें व्रतग्रहण कां नवयौवनांत ?

लावण्य, रूप, वय हें मधुरांगि कोठें
कोठें तशी कठिण तीव्र विरक्तता ही ? ९९

दिव्याश्रम त्यजुनि योगिजनैकसेव्य
या निर्मनुष्यवनिं राहसि एकली कां ?
ही पंचभूतजनिताच तनु त्वदीय
नांदे अपूर्व धवलत्व परंतु केवीं ? १००

आश्चर्य हें गमतसे मजला अतीव
कोठें पुरा न दिसलें नच ऐकिलें वा
साध्वी ! निवेदुनि समग्र तवेतिहास
माझी करीं सफल तीव्र कुतूहलेच्छा. !" १०१

ऐकून ही विनयरम्य नृपालवाणी
स्तब्ध क्षणैक बसली विनतानना ती;
शोकच्छटा पसरुनी वदनीं तियेच्या
नेत्रांतुनी उसळल्या प्रबलाश्रुधारा. १०२

हे अश्रु वर्षति मनोविमलत्व काय
कीं मूर्त वाहविति दीर्घतपःप्रसाद;
कीं गाळितात सकलेंद्रियशुद्धिसार
कीं निर्मल स्रवति लोचनशुभ्रता वा. १०३

मेघांतुनी पडति या करकाच काय ?
कीं तारका गळति या नयनांबरींच्या ?
ध्वंसावया प्रबलपातकतुंगराशि
गंगाच ही अवतरे दुसरी जगांत । १०४

निःशब्द रोदन तिचें बघुनी नृपाल
होऊन खिन्न कुतकाकुल चित्तिं चिंती

" आहे अवार्यच अहो ! व्यसनप्रभाव
ही जाहली दलित दिव्य शुचिव्रताहि ! १०५

झाला न आजवरि कोण शरीरधर्मा
दुर्लंघ्य--देहविकृतिज्वलनप्रदग्ध ?
आहे अति प्रबल दुःखसुखप्रभाव
कोणी तयांतुनि सुटे न समस्त विश्वीं ! १०६

पाहून बाष्पजलपात इचा असा हा
पावे कुतूहल मदीय विवर्धनातें
मूर्ती अशा विकल होति न अल्प शोकें
क्षुद्रप्रहार पतनें वसुधा न हाले ! १०७

शोकस्मृती करुनि कष्टविलें तयेला
हा आपलाच अपराध असें गणून
क्षाळावया तिजसि तन्मुख अश्रुसिक्त
ये निर्झरांबु नृप घेउनि अंजलीनें. १०८

शोकातुरा तदनुरोधवशें सती ती
आरक्त अश्रुजलपूर्ण धुऊन नेत्र,
होऊन शांत, पुसुनी मुख वल्कलानें
निश्वासुनी हळुहळू वदली तयाला. १०९

"कुमारा ! ही पापा अदयहृदया दैवदलिता
इचा दुर्वृत्तांत श्रवुनि फल तें काय तुजला ?
परंतु प्रेक्षोनी ममचरितकौतूहल तुझें
महाभागा ! सांगे नियतहृदयैक स्मृति--कथा ! ११०

असे गंधर्वांचें विदित सकला वंशयुगल
कुलीं एका झाला शुभगुणनिधी चित्ररथ हा

सुहृच्छब्दें त्याचें अमरपतिही गौरव करी
भरी शौर्यानें तो हिमगिरिशिला शत्रुरुधिरीं. १११

गंधर्वांचें सहज मिळवी शैशवीं आधिपत्य
आहे त्याचा जवळ इथुनी हेमकूटीं निवास
गंधर्वांचीं कितितरि कुलें आश्रयानें तयाच्या
आनंदानें करिति वसती त्या स्थलीं खेदमुक्त. ११२

सुरेंद्रस्पर्धेनें मधुर वन हें नंदनसम
सुविस्तीर्ण क्षीरार्णवसदृश अच्छोदसर तें
महायत्नें निर्मी अचलमति तो चित्ररथचि
रची प्रेमें तैसें मणिखचित देवायतन हें. ११३

दुजा वंशीं हंसा जनन घडुनी बाल्यसमयीं
तयाला गंधर्वाधिपति वितरी राज्यपदवी.
वसे तोही तेथें अपरिमित गंधर्वसहित
दिगंतातें त्याचा सुरभित यशःसौरभ करी ! ११४

ख्यात स्वर्गीं असति चवदा सत्कुलें अप्सरांचीं
गंधर्वांचीं अभिमत कुलें दोन हीं त्यांतलींच
शुभ्रज्योत्स्नारसविरचिता जन्मली अन्य वंशीं
गौरीनामें भुवनललिता काय गौरी द्वितीया. ११५

करी त्या दिव्येला विबुधनुत हंस प्रणयिनी
जणों झाला क्षीरार्णव सुरनदीमोहविवश !
रति प्रद्युम्नाशीं, शरदृतुसवें ती कमलिनी,
तशी गौरी हंसासह अतुलरूपा विलसली ! ११६

महा हर्षा पावे सदृशगुणसंबंध घडुनी
स्वरूपश्रीनें हो प्रमुख निखिलांतःपुरिं सती.

तयां पुण्यात्म्यांच्या उदरिं तनया एकलिच मी
जहालें त्यां शोकप्रद सकलदुःखैकनिलया ! ११७

असंतानत्वें मज्जनक सुतजन्माधिक असा
करी माझ्या जन्मास्तव नव महा उत्सव मुदें
महाश्वेता त्यानें मम तनुलताकांति बघुनी
महाश्वेता ऐशी मजसि अभिधा सार्थ दिधली. ११८

पिता माझ्या लीला निरखुनि चढे हर्षशिखरीं
जशी इंदुज्योत्स्ना जलनिधिस उद्बंधन करी
गृहीं ताताच्या मी मधुररव वीणेपरि अशी
सदा गंधर्वांकीं बसुनि सरलें शैशव मम. ११९

वसंतीं चैत्राचें समुदयन, चैत्रीं किसलयें,
तिथें पुष्पश्रीचें विलसन सुगंधोत्कट असें
मुदें पुष्पीं येती अलि, अलिकुलीं उन्मद भरे
तसें माझ्या देहीं पुढति पडलें यौवनपद; १२०

ये वासंतिक काल मस्तकिं फुलें खोवोनिया एकदां
पद्में सस्मित जाहलीं, विलसले आम्रावरी कोरक,
वाहे गंधित मंद मंद पवन स्वच्छंद कुंजांतुनी
उत्कंठाबकुलप्रसूनपतनें वाढे वियुक्तांतरीं १२१

शोभा देति अशोक पादपशिरा आरक्तबालाधरं
पुष्पस्तपद्मगृहांत गान करिती कृष्णाभ गंधर्वही
वर्षोनी सुमनःपराग सतत श्वेता धरा शोभली,
झाली शुभ्रजपाप्रसूनततिही भृंगांमुळें श्यामल ! १२२

सत्पुष्पासव पानमुग्ध डुलती भृंगे लतादोलकीं
भासे कीं मकरंदबिंदु गळुनी सर्वत्र हो दुर्दिन.

येती या सुखकालिं धावुनि गृहा दूरस्थ उत्कंठित
होती वल्लभदर्शनार्थ विरहत्रस्ता वधू आतुरा ! १२३

उन्मत्ता अभिसारिका विहरती सोडून भीतित्रपा
होती नूपुरशब्दनादित किती एकांत कुंजस्थलें
येवोनी मलयाद्रिवायुलहरी हाले अनंगध्वजा
निःसीमा सुखलालसा युवजनीं निर्बंधना वाढली. १२४

ऐशा सर्वजनप्रमोदकर त्या वासंतकालामधें
अच्छोदावरि पातलें सहज मी स्नानार्थ मातेसवें
होओनी मधुमासवैभव तिथें सर्वत्र विस्तारित
होती हांसत भिन्नवर्ण कमलें तोयांत कौतूहलें १२५

भृंगांचा समुदाय, सेवुनि मधू ज्यांचा, रते गायनीं
ऐशा पुष्पसमूहिं जाय भरुनी तो हा लतामंडप;
फोडोनी स्वनखांहिं कोकिलगणें ज्यांचीं नवीं कुड्मलें
केली सिक्त मधुप्रवाहिं वनभू तो आम्र हा पुष्पित; १२६

गेले सोडुनियां अही श्रवुनिया उन्मत्त केकीध्वनी
तीही चंदनवीथिका विलसते गंधान्विता शीतला
आंदोलीं वनदेवता बसुनिया स्वच्छंद संक्रीडती
त्यायोगें सुमपुंजपातललिता शोभे लतादोलिका; १२७

गेलें पुष्परजःकणांहिं भरुनी हंसावली त्यावरी
क्रीडे सुंदर तीरवक्षतल हें दृष्टीस आल्हादवा.
ऐसें बोलत मी सखीसह तदा होतें वनीं चाललें
पाहाया मधुरस्थळें नवनवीं सौंदर्यमोहामुळें. १२८

# शांतिसोपान.

## श्लोक.

डोळे झांकुनि चालणार पडतो खड्ड्यांत केव्हां तरी,
सारासार बघून टाक पद तूं संसारमार्गावरी;
' आतां ' ला भुलतां न काल कसला येणार आहे उद्यां
हें पाहीं, नुरती निदाघसमयीं वा पावसाळी नद्या ! १

हें ब्रह्मांड किती प्रचंड विलसे, या भव्य नीलांबरीं
हा श्रीमान् रविही उगाच बसला बाजूस कोठें तरी;
आहे क्षुद्रच बिंदु जीव म्हणजे विस्तीर्ण सिंधूतला,
अल्पज्ञानबलें परी अहह ! तो आहे किती माजला ! २

मानी जो अपुल्यास सुज्ञ, न तयाऐसा दुजा मूढधी,
स्वीयाज्ञान जयास पूर्ण कळलें तो मानिलासे बुधीं;
कोणीही न अशेषसद्गुणनिधी त्या ईश्वरावांचुनी
हें येतां समजून, दर्प न कसा जाणार विध्वंसुनी ? ३

बालेच्या तनुला जशी रुचिरता येते दुकूलें अती,
किंवा कोमल पल्लवांहिं लतिका रानीं जशा शोभती,
तैशी ये विनयामुळें सुपुरुषा शोभा किती आगळी,
कोणाला न विमोहिते विकसली अर्धीच जी कां कळी ? ४

ज्याला पूर्णच धर्मतत्त्व कळलें—आहे असा कोणता ?
ज्याला भूतभविष्य सर्व समजे—आहे असा कोणता ?
ज्या सत्यें करबिल्वशीं उमगलीं—आहे असा कोणता ?
कां अल्पज्ञ विमूढधी मग असे दर्पान्ध होती वृथा ? ५

ज्यामाजीं रत्नमुक्तानिकर विलसती ज्ञानसिंधू दुरी तो,
तीरींच्या वाळवंटीं धडपड नर हा गर्वभारें करीतो;
शिंपा घेऊन कांहीं हरहर ! फुटके शंखही वेचुनीया
रत्नप्राप्तिभ्रमानें विहरुनि सुजनां दाखवी डौल वाया ! ६

हा पाहे वस्तुजाता–पण नच कथवे पाहतां ये कसें तें,
हा सेवी स्वादु अन्नें–पण विदित नसे काय त्यांचेंच होतें;
आहे अज्ञानजाळीं चहुंकडुनि पुरा जीव वेढून गेला,
हा ! हा सर्वज्ञतेचा प्रबळ परि तया कोठला मोह झाला ! ७

गेलेला क्षण केधवांहि फिरुनी येणार नाहीं करीं,
उद्याचाहि तसा नसे भरंवसा, जाणून हें अंतरीं—
घेतो जो बुध वर्तमानघटिका हातांतली साधुनी
जातो वैभवपर्वतीं चढुनिया तो एकला या जनीं ८

घे विश्रांति न केधवां क्षणभरी तेजोनिधी भानु हा,
या गंगादि तरंगिणी न रमती कोठेंहि तापापहा;
सृष्टीचें प्रभु चक्र चालवि सदा आलस्य ठावें नसे,
मूढात्मे नर मात्र हे चुकविती कर्तव्यतेला कसे ! ९

अभ्रांची दिसली न तों भरभरा जाते दुरी सावली,
निर्गंधी कुसुमें कितीक फुलुनी झाडावरी वाळलीं;
कांहीं लोकमनावरी शुभ असा संस्कार केल्याविणें
होतो मानव मूढ कालवश जो धिक् धिक् तयाचें जिणें ! १०

रत्नें उज्ज्वल पाहिजेत–नलगे खाणी खणाया परी,
ताजीं गोड फळें हवींत–परि तीं जातां न झाडावरी,
लागे फार तृषा-परी न उतरे वापीमधें आळसें,
आशापूरण होय वत्सरशतीं ऐशा नराचें कसें ! ११

लागे आग घरास ती न विझवे आणून पाणी त्वरें,
अंगीं क्रूर अही वरून पडला तो लोटवेना करें;

पाहीं भावि अनर्थ, वारण परी त्याचें न होतें जया,
तो आलस्यपरायणाग्रणि असे दुःखेंच भोगावया ! १२

लीलानृत्य करो सुकीर्ति अपुली दिङ्नागगंडस्थलीं,
तैसा सद्गुणनाद गर्जन करो सर्वत्र भूमंडलीं,
वा होओ विदित स्वनाममहिमा सर्वांस सूर्यापरी,
इच्छा ही तुज मानवा ! तर तसें कर्तव्य कांहीं करी ! १३

भूमीच्या उदरांत होति पडुनी जी क्षुद्र बीजावली
त्यांचीं हीं फलपुष्पशोभित कशीं झाडें पहा जाहलीं;
ईर्षा जो धरितो तशी, प्रबळ ज्या आहे महत्त्वस्पृहा,
तो हीन स्थितिंतून उन्नतपदीं जातो स्ववीर्यें अहा ! १४

वाटे गोष्पदसा विपज्जलनिधी ईर्षेमुळें मानवा,
कार्यें दुष्कर साधुनी जनमुखीं तो मेळवी वाहवा;
ईर्षेनें बलहीन देह सहसा वज्रापरी होतसे;
येतां पंख जसे क्षणांत गरुडा कांहीं नसे दूरसें ! १५

नैर्मल्य त्यजुनी गढूळ अगदीं होतीं मनें मत्सरी,
जाती नाशुनि तीं स्वदोषनिकरें गंजून लोहापरी;
अन्योत्कर्ष बघून आग अगदीं त्यांच्या मना लागते,
श्रेष्ठांतें अवमानितात, निरयस्वामी ' महाभाग ' ते ! १६

सारेही परदोषवर्णनसुखें होतात बेफामसे,
केव्हांही परि आत्मदोषपटलीं दृष्टीच त्यांची नसे;
लोकांच्या नयनांतला कणहि हो ज्यांना दिसे सत्वरी
त्यां ठावी नयनांतली न आपुल्या मातीहि खंडीभरी ! १७

जो हांसे पतिता, क्षणांत पडतो तो ठेंच लागूनियां,
रोगी गर्जति वैद्यकांतिल महापांडित्य दावावया,
दोषांचे पुतळेच तप्त उठती पाहून दोषांशहीं,
गेलीसे भरुनी पदोपदिंच ही ऐशा विरोधें मही ! १८

जिव्हा स्वैर असे यदीय, पडती त्याच्यावरी आपदा,
थोरांनीं कथिलें, असे बहुत ही वाचाळता तापदा;
आहे स्वस्तुतिगर्भ भाषण तरी तें काळकूटापरी,
वा रत्नावलितुल्य सद्गुणतती मातीपरी तें करी. १९

हातीं ये धनराशि थोर, न परी केला विचार व्ययीं,
जातें वैभव नष्टुनी तर, शिरे शोक प्रमोदालयीं;
रक्षी तोय तडाग त्यांतिल जळें केव्हांहि ना आटती,
या संशुष्क विचारहीन सरिता होती निदाघीं किती. २०

आहे हा अमका उगीच बसला—कर्तव्य का त्या नसे ?
तो पापीं रतला—न त्या कळत का होईल लोकीं हंसें ?
नाहीं ज्ञान मुळींच, होइल कसें गोमाजिचें त्या पुढें ?
सोडोनी निजकार्य मूढ भलत्यासाठीं सदा हा रडे ! २१

सद्धर्म त्यजिला तयें—धर परी तूं धर्मनिष्ठा मनीं,
तो नीती तुडवी पदीं—निरत तूं हो नीतिसंवर्धनीं;
ता निंदी सुजनांस—संयत परी वाणी करीं आपली,
व्हावें मग्न न अन्यदोषकथनीं, ही रीत नाहीं भली. २२

आलें वैभव थोरलें म्हणुनि तूं व्हावें न मत्तापरी,
तैशी तीव्रदरिद्रतासमयिंही शांती असावी घरीं;
या चक्रीं फिरतात देवहि सदा खालीं वरी सारखे,
नाहीं एकहि जीव—नित्यच असे जो वेढिलेला सुखें. २३

सन्मार्गीं विपदा असोत कितीही त्यांची न माना क्षिती,
दुर्मार्गीं सुखही दिसो, परि करा दूरून त्याला नती;
आला मृत्युहि जान्हवीतटिं जरी तोयाविणें, तो बरा !
का रथ्याजलसेवना करिल तो केव्हांहि मानी खग ! २४

नाहीं संकट पातलें अजवरी कोणावरी या जनीं ?
झाले दुर्विधिदावदग्ध न, असे सांगा किती मोजुनी ?

सोडावें न परंतु धैर्य अपुलें प्रज्ञाबळें केधवा,
टाकावें पुढतीच पाउल नरें चिंतून लक्ष्मीधवा ! २५

तेजस्वी नर होय हृष्ट न मनीं दैवानुकूल्यें कदा,
किंवा तत्प्रतिकूलता बघुनि तो मागें न घेतो पदा;
गर्जो मेघ, असो वसंत, उदया ये भानु नित्यक्रमें,
होओ क्षुब्ध पयोधि, सुस्थिर परी राहे, न शैल भ्रमे ! २६

" ते नाहीं मजला, प्रयत्न अमुचे कां जाहले व्यर्थ ते ?
आहे क्रूरच देव ! हेतु पुरले केव्हांतरी कोणते ? "
बोलावें न असें—न बाभळिस रे येती गुलाबी फुलें.
सर्वांना उचित स्थितींत अगदीं देवें असें ठेविलें ! २७

मूत्रोत्सर्ग घरीं करून विधिला कां दोष द्यावा नरें ?
पाहावें निज दुःखमूल आपुल्यापाशीं तयें हें बरें.
पक्वान्नें असुनी रुचिप्रद बघे रोगी न त्यांच्याकडे,
आहे स्वच्छ नभापरी प्रभुकृती, जीव स्वदोषें रडे ! २८

रत्नें उज्ज्वल पाहतात सगळे राजेशकंठांतलीं;
त्याची गूढ विवंचना पण असे कोणीं तरी देखिली ?
पानें तीनच लागतात पळसा कोठेंहि जा भूवरी,
होईं खिन्न न, मान निश्चित मनीं आहे स्थिती ती बरी ! २९

दुरुनि दिसति शृंगें साजिरीं पर्वतांचीं,
दुरुनि गमति चित्रें चित्तहारी वनांचीं;
मनुज जवळ जातां पालटे सर्वही तें,
' सुख ' ' सुख ' गणिलेलें तेंहि तैसेंच होतें ! ३०

कुणाच्या हे दारीं झुलति मदमत्त द्विप पहा,
कुठें मुक्तारत्नें चरणतलिंही लोळति अहा !
परी ज्याच्या चित्तांतरिं अढळ संतोष विलसे
तुलाया त्याच्याशीं उचित नृप वा इंद्रहि नसे ! ३१

नक्षत्रें गगनांतलीं, सुरधनू येतील हातीं कधीं ?
ऐशी ही भलतीच हाव धरिली केव्हांहि नाहीं बुधीं,
आहों आपण कोण, तेविं अपुलें सामर्थ्य आहे किती,
हें पाहून महामती तदुचिता आशा मनीं ठेविती. ३२

कोणी आजच सर्वही उधळुनी राहे उपाशी उद्यां;
कोणी आज मरे, उद्यांस जपुनी ठेवी सुखाच्या नद्या;
वंद्यावें दुरुनी तयांस, असती दोघेहि वेडेच ते,
सौख्यार्थी जपुनीच वागति सदा लोकांमधें जाणते. ३३

झंझावात जवें लतातरुतती टाकी समुत्पाटुनी,
भूकंपें पडतात शैलशिखरें उत्तुंग उन्मूलुनी;
वेगें क्षुब्ध दवाग्नि दग्ध करितो ज्वालांहिं रानेंवनें,
तैसा क्रुद्ध नर क्षणोक्षणिं अहा ! पाडी प्रपंचीं रणें ! ३४

फुलें पानें ताजीं तरुवरि वसंतीं पसरती,
घनाच्या वृष्टीनें अवनिवरि शस्यें विलसती,
प्रकाशें इंदूच्या रुचिर कुमुदीं हास्य खुलतें,
दयादेवी तैसी विधिदलित दीनां सुखवितें ! ३५

कशाला या तारा गगनिं नव तेजें चमकती ?
कशाला तीं रत्नें नरवरकिरीटीं झळकती ?
वृथा मुक्तामाला नवयुवतिकंठांत रुळती,
दयेचे दिव्याश्रू अतुल असतां भूमिवरती ! ३६

किती अन्नासाठीं भटकति मुलें दीनवदनें
निराधारा हा ! हा ! रडति विधवा जीर्ण वसनें;
प्रभो ! या रुग्णांचे नच बघवती हाल नयनीं,
सुखेच्छा जीवांची तरिहि वसते केविं अजुनी ! ३७

आमोदाविण पुष्प काय जगतीं कोणीं तरी पाहिलें !
कीं केव्हांतरि दिव्य तेज विधुला सोडूनियां राहिलें ?

कीं तोयांश कुठें तरी गवसला कोणास शैत्याविणें ?
सत्कृत्यीं असती तशीं रत सदा बा सज्जनांचीं मनें ! ३८

येती जे उदयास तारक नभीं अस्तास जातात ते,
हांसे जें लतिकेवरी कुसुम तें कांहीं क्षणीं वाळतें;
जें जें वस्तु दिसे विनाश चुकणें नाहीं तयाला कधीं,
सांगा हो मग मृत्युलागिंच असें भ्यावें वृथा कां बुधीं ! ३९

आहे सत्य उषःस्मितापरि मुली ! तारुण्य हें चंचल,
हें सौंदर्यहि नष्ट निश्चित तडित्तेजापरी होइल;
शीलानें दिपवून दुष्कृतिपरां, दे त्यां धडा घालुनी,
आहे सद्गुणकीर्ति सुस्थिर जगीं, हें नित्य ठेवी मनीं. ४०

वागें नम्र परी कधींहि न करीं तूं तोंडपूजेपणा,
आणावें सुपथीं सयत्न पतिच्या उन्मार्गवर्ती मना;
आहे प्रेमच एकमात्र भुवनीं योषिज्जनां भूषण
हें तों सत्य, परी अतीव मृदुता देते तया दूषण. ४१

आली जों रजनी न, तों उडु रता होती स्वकार्यावरी,
नाहीं जों दिसली उषा, विकसते पद्मावली तों सरीं;
धाकानेंच जिच्या तसे न चुकती कार्यीं जिचे सेवक
ती सच्छीलवती सती बघुनियां होती मुके निंदक ! ४२

होवो क्षीणकला, न इंदुकलिका हो अप्रसन्ना परी,
रेखामात्रच राहिली सुरनदी अस्वादु हो का तरी !
तैशी शील न आपलें त्यजितसे आपन्नकालांतरीं
ती वंद्या गृहिणी महागुणवती, धन्याच लोकीं खरी ! ४३

ठावा ज्यास उणेपणा न अपुला तो होतसे उद्धत,
गर्वानें उथळ प्रवाहसम तो चाले सदा गर्जत;

नाहीं मौक्तिककांति ज्यास विदिता तो वाळवंटीमधें
शिंपा वेचित कौतुकें अनुदिनीं आयुष्य नेतो मुदें ! ४४

पद्में जन्मति कर्दमीं, विलसतो आकाशभागीं रवी,
प्रेरोनी कर आपुले परि तया तो नित्य आल्हादवी;
तैसा दीनजनार्तिवारण करी वेगें उदाराग्रणी,
पात्रापात्रविचारणा न शिरते केव्हांहि त्याच्या मनीं. ४५

लोकांच्याच हितार्थ इंदु उगवे व्योमीं प्रभा फेंकित,
लोकांच्याच हितार्थ वृक्ष फळती, जाती नद्या वाहत;
लोकांच्याच हितार्थ गंधकुसुमें वेलींवरी हांसती,
सारें लोकहितार्थ अर्पुनि जगीं होतात साधू कृती ! ४६

# रतिविलाप.

( महाकवि श्रीकालिदासकृत कुमारसंभवाच्या आधार. )

## श्लोक.

होवोनी विव्हला ती पुनरपि पडली भूतलीं शोकभारें,
धूलीनें अंग गेलें भरुनि, विखुरलें तेधवां केश सारे;
ढाळी अश्रू, विलापे अति करुण रवें आठवोनी पतीला,
शोकानें प्रांतही तो तिजसम सगळा व्यापुनी पूर्ण गेला ! १

" सौंदर्याचा निधी तूं अनुपम जगतीं, साम्य पाहावयातें
प्राणेशा ! कौतुकानें सकल तुजकडे बोट दावीत होते;
देहाची त्या तुझ्या या स्थिति बघुनि अशी चित्त माझें फुटेना,
आहे पुष्पापरी स्त्रीहृदय मृदुल हें दुर्भगेला पटेना ! २

फोडोनी सेतुबंधा, त्यजुनि कमलिनी धांवतो वारिराशी,
तैसा ही दीन दासी त्वदनुरत कुठें टाकुनी सांग जासी ?
नाहीं आधार मातें तुजविण दुसरा–हें तुला ज्ञात आहे,
कां पूर्वप्रेम सारें विसरसि दयिता ? योग्य हें कार्य नोहे ! ३

नाथा मन्मानसातें किमपि दुखविलें तूं नसे केधवाही,
ठावें हें का न, मींही अवगणुनि तुझा मोडिला हेतु नाहीं !
आक्रोशें व्याप्त आतां करित विपिनभू सोडितें अश्रुधारा
या दीनेला तरीही मुख नच अपुलें दाविसी कां उदारा ? ४

एकांतीं कौतुकें मी रति तुज करुनी जाहलें पुष्पधन्वा,
त्याचा ये राग कीं–जो तुज दृढ घडला मेखलाबंध तेव्हां ?
किंवा कर्णावरीचें कमल तुजवरी फेकिलें मी सरोष,—
धूली गेली तयाची नयनिं, म्हणुनि का जासि देऊन दोष ? ५

"हृद्देशीं माझिया तूं निवससि !' मज हें बोलुनी हर्षवीलें,
हा ! हा ! नाथा तुझें तें प्रिय वचन कसें संप्रती व्यर्थ झालें ?
दुर्दैवें शंभुकोपज्वलनिं वपु तुझें दग्ध होऊनियां तें
गेले नाहींत कां रे असु वद अजुनी सोडुनी या रतीतें ? ६

घाई केलीस कां ही त्यजुनि मज इथें दिव्य लोकास जाया ?
होती येणार मागें तुज अनुसरुनी ही तुझी दीन जाया !
केला कीं घात दैवें अवचित परि हा, वंचिलें दुर्भगेला,
हा ! हा ! ऐसा कसा हो सकलसुखनिधी सोडुनी नाथ गेला ! ७

रात्रीच्या अंधकारें पुरपथ सगळे व्याप्त होऊन गेले,
मेघांच्या गर्जनांनीं गगनहि अगदीं नादसंक्षुब्ध झालें,
ऐशा कालीं प्रियांना रमणवसतितें पोंचवायास काय
आहे लोकांत कोणी तुजविण दुसरा संप्रती हाय ! हाय ! ८

झालीं आरक्त नेत्रें तरल विहरुनी मोहिती कामुकास,
हो वारंवार शब्दस्खलनहि, विलसे कारणावीण हास,
ऐसा तो वारुणीचा मद किति दयिता ! शोभवी अंगनांतें !
आतां तो कासयाला अशुभकर, जरी तूंच नाहींस येथें ! ९

प्राणेशा ! नाश झाला तव परिसुनि हें वृत्त चेतोविदारी
मानोनी स्वोदयातें विफल, विधु पहा जाहला खिन्न भारी !
गेला तो कृष्णपक्ष, प्रिय सुहृद तुझा हा तरी क्लेशभारें
पावेना कीं अजूनी नवरुचिरकलापूर्णतेला पहा रे ! १०

नाथा ! जातील सारे तरुवर भरुनी कोवळ्या पालवीनें,
होईल व्योमही तें निनादित सहसा कोकिलांच्या ध्वनीनें,
जातां तूं दिव्यलोका परि नव कुसुमें रम्य चूतद्रुमाची
कोणाच्या तीं शरत्वा वरितिल ? सुकुनी व्यर्थ तीं जावयाचीं ! ११
भेदाया कामुकांचीं अवचित हृदयें आपुल्या बाणघातें
भृंगांच्या पंक्तिचा तूं दृढ गुण करुनी योजिलें कार्मुकातें;

शोकानें बैसलें मी तव चिरविरहें अश्रु ढाळीत आतां
पाहोनी हें करीते अतिकरुणरवें तीहि[1] आक्रोश नाथा ! १२

बेसोनी ही रसाळीं मधुमधुररवें कोकिला गात आहे,
नादस्रोतीं तियेच्या बघ वन सगळें मग्न होऊन राहे;
घेवोनी आपुला तो सुललित दयिता ! देह तूं ऊठ वेगें,
तीतें संदेशदूती करुनि मजकडे प्रेष गाढानुरागें ! १३

एकांतीं कोप माझा मृदुमधुवचनीं वल्लभा ! घालवून
चुंबोनी मन्मुखातें दृढ मज धरिलें बाहुपाशीं हंसून,
केल्या प्रेमोत्सवें तूं मधुर मजसवें ज्यां तदा प्रेमकेली
त्याचें होऊन आतां स्मरण, सकलही शांति अस्तास गेली ! १४

गुंफोनी प्राणनाथा ! नव वनकुसुमें धुंडुनी सर्व रानें,
त्यांचीं आभूषणें हीं मम तनुवरि तूं घातलीं कौतुकानें;
नाहीं कोमेजलीं तीं परिमल न उणा होय त्यांचा अजून,
तों तूं गेलास कालज्वलनमुखिं कसा या रतीला त्यजून ? १५

लाक्षारागें प्रिया ! तूं मम पद असतां मंदिरीं रंगवीत
केला पाहून तूंते अदय सुरगणें सर्वथा घोर घात !
नाहीं कां कार्य त्यांचें अजुनिहि घडलें ? ये इथें शीघ्र आतां,
हा माझा वाम पाद स्वकरिं धरुनियां रंगवी प्राणनाथा ! १६

अग्निज्वालांतरीं ही तनु मम करुनी दग्ध आलेंच मीं ही,
प्राणाधारा ! त्वदंकाविण मज जगतीं अन्य आधार नाहीं;
स्वर्गीं देवांगना त्या झटतिल चतुरा त्वन्मना मोहवाया,
हें जाणूनीहि केंवी अवनितलिंच ही सांग राहील जाया ! १७

‘ गेला सोडून देह स्मर अवचित तो दिव्य लोका निघून
त्याच्यामागें रती ही क्षणभर तरि कीं राहिली जीवमान ? ’

---

1 भृंगमाला

ऐशीं हीं क्लेशकारी मिळतिल मजला लोकनिंदाप्रदानें
आहें येणार आतां अनुसरुनि तुला मी जरी निश्चयानें ! १८

झाला नाहीं अहा ! जों कुसुमशर ! तुझ्या जीविताचा विनाश
तों गेली त्याच वेळीं तैव ललित तनू केंवि रे नष्टतेस ?
सारे संस्कार व्हावे सविधि मम करीं ते तुझें अंत्यकाळीं
दुर्दैवं का नसावें हर ! हर ! दयिता ! माझिया हेंहि भालीं ? १९

लावोनी आपुल्या तूं त्रिभुवनविजयी कार्मुका पुष्पबाण
विश्वातें विद्ध केलें मम मनिं विहरे तें तुझें रम्य ठाण;
तैशा झाल्या वसंतासह रुचिर कथा ज्या तुझ्या आज त्यांची
हा ! हा ! होते असह्य स्मृति मजसि तशी त्या अपांगेक्षणांची ! २०

नाथा ! कोदंड ज्यानें तव नव कुसुमीं निर्मिलें कौतुकानें
गेलासे तो वसंत प्रिय सुहृद् तुझा आज कोठें न जाणें !
किंवा क्रोधें महेशें स्वनयनदहनीं त्वद्वपू दग्ध केलें
तेव्हां त्याच स्थितीला शिव ! शिव न कळे काय त्यालाहि नेलें ? "२१

हीं तीचीं शोकवाक्यें परिसुनि अगदीं खिन्न झाला वसंत
जाणों त्या वाटलें कीं विषमय शर ते खाचले अंतरांत ।
सांगोनी चार गोष्टी हळुहळु तिजला द्यावया धीर कांहीं
शोकावेगें तदा तो तिजपुढति उभा येउनी शीघ्र राही. २२

त्याला पाहून झाली रति अति विकला, लोटल्या अश्रुधारा,
वक्षा हस्तीं पिटोनी करुण विलपनें; नादवी प्रांत सारा;
आप्ताच्या दर्शनानें उसळुनि मनिचें दुःख होतें तुफान !
होती ती मंदभागा रति तर अगदीं मार्दवाचें निधान २३

स्फुंदस्फुंदोनि बोले स्वमुख करतलीं झांकुनी शोकभारें
" झालें हें काय आजी बघ तरि तुझिया बंधुचें माधवा रे !
विश्वीं जें मानिलेलें अतुल सुभग हें तद्वपू भस्म होय
जातें मंदानिलें तें कण कण उडुनी भोंवतीं हाय ! हाय २४

प्राणेशा ! शीघ्र दावीं स्मितयुत मुख तें आपुलें एकदांही
आहे त्वद्दर्शनां हा सुहृद् मधु उभा एथ सोत्कंठ पाहीं.
जाणें मी, अंगनांच्यावरि चल असतें प्रेम कीं पूरुषांचें;
नाहीं मित्रांवरीचें क्षणभरिहि परि नष्ट तें व्हावयाचें ! २५

घेवोनी चाप हातीं मृदुतर कुसुमें लावुनी बाण त्यास
मौर्वी आकर्ण जव्हां दयित ! बिसमया ओढुनी राहिलास—
तेव्हां या माधवानें त्रिभुवन सगळें आपुल्या कौशलानें
पाडोनी मोह, केलें विनत तुजपुढें, काय हें मी न जाणें ? २६

गेला कोठें वसंता ! तव सुहृद्, न तो मागुती यावयाचा,
झाला झंझानिलानें अवचित अजि तो दीपसा नष्ट साचा !
मागें संजातधूमा अहह ! विगतभा वर्ति त्याची रहातें
तैशी मी तीव्र दुःखाकुल पतिनिधनें ढाळिते दृग्जलातें ? २७

मारोनी मन्मथातें हतविधि मजला एकली एथ ठेवी,
या त्याच्या क्रूरतेला त्रिभुवनिं तुलना काय आतां वदावी ?
केला नित्याश्रयाचा तरु मदकरिनें नष्ट शुंडार्गलानें
जातें धूळींत त्याच्यासह पडुनि तरी वल्लरी निश्चयानें. २८

आहे ही आज घोर व्यसनिं गवसली माधवा ! मित्रजाया,
कोणी लोकीं दिसेना तुजविण दुसरा वा हिला उद्धराया;
प्राणेशावीण झाले अतितर विवशा, शीघ्र अग्निप्रवेश
या दीनेला वसंता ! करवुनि पतिच्या पोंचवावें पदास ! २९

जातां अस्ताचलातें हिमकर सहसा चंद्रिका नष्ट होते,
तैशी मेघासवें ती झडकरि गगनीं वीज लोपून जाते,
विश्वीं सर्वत्र योषा सकलहि करिती कांतमार्गावलंब,
कैशी आतां करूं मी वद मग पतिच्या दर्शनातें विलंब ? ३०

भूभागीं मत्प्रियाच्या सुलालित वपुचें भस्म हें येथ पाहीं
चर्चोनी अंगरागापरि झडकरि तें माझिया सर्व देहीं—
झोंपावें कौतुकानें मृदुल किसलयें तल्पशी आंथरून
अग्निज्वालांत आतां चिरशयन तसें माधवा! मी करीन! ३१

केलें साहाय्य मागें बहुपरि अमुची पुष्पशय्या रचाया,
साधो! आलस्य केव्हां लवहि न वरिलें आमुतें रंजवाया;
शोकार्ता ही वसता! तुजसि विनविते जोडुनी हात आतां
आणोनी शीघ्र काष्टें विरहित रतिला भेटवीं प्राणनाथा! ३२

तापाग्नी तो चितेचा भडकवि मलयप्राप्तवायुप्रभावें,
कीं एकाच क्षणार्धे हतवपु रतिचें दग्ध होऊन जावें!
आहे ठावें तुला हें—क्षणहि मजविणें राहवें न प्रियाला,
तूंही केलीस कार्यें बहुत अजवरी तोषवायास त्याला ३३

धाडोनी दिव्य लोका मजसि अपुलिया बंधुच्या दर्शनातें
तोयाचा अंजली तूं मग गुणनिलया! एक द्यावा अह्मांतें;
तेथें माझ्यासवें तो मदन तव सखा पान त्याचें करून
नाना देईल आशी तुजसि निजकरीं अश्रु माझे पुसून. ३४

प्रेमें तूं अंत्यकर्मावसरिं बुधवरा! आठवून स्वमित्रा
द्यावी चूतद्रुमाची बहुलपरिमला मंजरी लोलपत्रा
कीं त्याला आम्रपुष्पें प्रियतम गमती—हें न तूतें कथावें,
होतें सौहार्द त्याच्यासह तव किति हे काय मातें न ठावें?" ३५

# विज्ञानसार.

[ भर्तृहरीच्या विज्ञानशतकावरून. ]

## श्लोक.

केव्हांच कालवश पूर्वज सर्व झाले,
लोकान्तरा तव कलत्रसुतादि गेले;
लावी जरा शिरिं तुझ्याहि पहा ध्वजेला,
अद्यापि गर्व तनुचा धरिसी कशाला ? १

आलें दैवबलें करीं अवनिचें साम्राज्य निष्कंटक,
व्हायाचें न तथापि एक दिनही स्वप्नींहि कोणा सुख;
हें निःसंशय जाणुनी त्यजुनियां ऐश्वर्य सारें अहा
हा कैलासपती सभार्य करितो आहे तपस्या पहा ! २

हें भूमंडल पावते लय, पुन्हां निर्माण तें होतसे,
जाई शीघ्र विनाशुनी पुनरपी कालक्रमें हो तसें.
सारें विश्व असें फिरे सतत हें ब्रह्मादिकांसंगतीं
या जीवांस कधींच काय मिळणें नाहीं सुखाची स्थिति ? ३

प्राशोनी कल्पवल्लीमधुरमधुरसा नंदनीं काल नेती,
क्रीडा दिव्यांगनांशीं करिति सुरहि ते कालगर्भांत जाती;
संसारीं मग्न झाले, जडविषयशतीं दंगलें चित्त ज्यांचें,
मूढात्मे नाचती हे, हर हर ! न कळे काय होणार त्यांचें ! ४

नाहीं दाता त्रिलोकीं मजसम दुसरा, मी निधी सद्गुणांचा,
मी द्रव्याधीश मोठा, करिल कवण तो रोध माझ्या बळाचा,
ऐसे दर्पान्ध वेडे बडबड करिती बैसुनी या स्मशानीं,
केव्हां होतील कालानलकणिं न कळे दग्ध देहाभिमानी ! ५

महोल्लासें होती सुरहि रत यत्पाद्कमलीं,
विलोकोनी ज्याला स्तवनरत गीतें विरमलीं,
अशा कृष्णा, मूढा त्यजुनि धरिसी कीं जडरति ?
कशी होईना रे अजुनि तुज संसारविरति ? ६

नाहीं आकार ज्याला, बुधजन वदती जें गुणातीत आहे,
जाते वाणीहि ज्याच्याजवळ न अथवा, ब्रह्म तें कोण पाहे ?
नाहीं सामर्थ्य तैसें तुजसि तरि मना ! सत्वरी एकभावें
सोडोनी मोह सारे अविरत हरिच्या पादपद्मां भजावें. ७

चालोनी पथ सारखा विषम हा मी श्रान्त झालों अती,
द्रव्याकांक्षमनें कुभूपवदनें देखीयलींही किती;
कांहीं सेवुनियां कदन्न भलतें वारूनियां ही क्षुधा
वाटे सांप्रत कोठल्याहि विपिनीं देवा ! रहावें सदा ! ८

होता तो अज्ञ बाल ध्रुव, तरि करुणा येउनीं देवरावें.
व्योमीं प्रेमें तयाला अढळपद दिलें हें न कोणास ठावें ?
प्रल्हादातेंहि त्यानें परम पद अहा ! अर्पुनी तोषवीलें,
कोणाचीं–ध्वंसि ना तो सुरनुत भगवान् लीलया क्लेशजालें ? ९

नीचाराधनिं अल्पसें धन महाकष्टें मला लाधलें,
तें मीं तस्करभीतिनें पुरुनियां भूमीमधें ठेविलें;
कोणी मूषक तेथुनी बिलगृहीं ने तेंहि कोठें तरी.
होतां दैव सरोष दूर पळतो लब्धार्थही सत्वरी ! १०

वृथा गेले माझे बहु दिन धनेच्छेस भुलुनीं
कुसंगें भ्रष्टोनी मति अधमभूपालसदनीं !
बसावें श्रीविष्णुस्मरणरत, वांछा मन करी,
अहा ! गंगातीरीं तरुणतुलसीसौरभभरीं ! ११

जिच्या वीचीमाला उसळुनि मनाला रमविती,
असे जी संसाराम्बुनिधितरिणी साधु कथिती,
कधीं त्या गंगेच्या तटिं निबिडकुंजांतरिं वशी
बसोनी एकाकी स्थिरहृदय चिंतीन हरिसी ! १२

मुदें गाती हंसी, लहरि उधळी देवसरिता,
अहा ! होते सारी रुचिर तटभूमी मुखरिता,
तिथें उल्हासें मी विजनित निकुंजीं निवसुनी
कधीं ‘ गोविंदा ! ’ हें अमृतवच सेवीन वदनीं ! १३

नित्यानित्यविवेक नित्य करुनी सत्संगती जो धरी,
बोले भाषण अल्पसें, हितमिताहारी, न गर्वा करी,
ठेवी दीन जनीं कृपा, सुखिजनीं प्रीती सदा अंतरीं,
तो धन्य प्रभुपादसेवक, महा प्राया तपा आचरी ! १४

गेले ते मित्र कोठें गुणगणिं अमृतस्वादही लाजवीते ?
ते भूपाधार धीर प्रथित रणमुखीं मृत्युला कापवीते ?
राजे संसारभीरु प्रभुपदरत ते काय झाले प्रभावी ?
हा ! हा ! लोकत्रयींही सुखलव न कुठें ! मद्गती काय व्हावी ! १५

वाळी भूवलयासभोंवतिं सदा फेरे रवी अंबरीं,
राहुग्रासभयें कलानिधि विधू खेदावतो अंतरीं;
ती गीर्वाणनिवासभूमिहि सदा वाढे उणी होतसे,
धिक् संसारिजनाधि जेथ हरती न स्थान कोठें असें ! १६

संसारीहि असे परोपकरणीं प्रख्यात ज्यांचें व्रत,
लक्ष्मीमंडित सद्विवेकपटुही जे ईशपादीं रत,
हा गंभीर भवाब्धि, जन्ममरणग्राहादिकांचें भय
सोडोनी, तरतात ते नवनवव्याध्याधिवीचीमय. १७

रे चित्ता ! वसुनी असें अनुदिनीं संसारकारागृहीं
मोहानें धरिसी धनावनरती, मूढा ! नसे योग्य ही,
झालें बद्ध शरीरमोहनिगडीं, त्या दुर्मतीचें धन
देवब्राह्मणभिक्षुकादि बघती स्वप्नींहि केव्हांच न ! १८

मोठे दुर्दांत, कोपें धरिति करतलीं सर्वदा खड्गपाश,
दंष्ट्रा ज्यांच्या कराला, भिवविति नखज्योति मृत्युंजयास !
ते आले कालदूत प्रबळ न जवळीं सोड तो द्रव्यमोह,
सत्पात्रीं अर्पुनीयां निजधन कृपणा ! लाव्हि शांतिप्ररोह ! १९

मित्रा ! निश्चित एकदां इथुनियां सर्वांस जाणें असे,
नाहीं कालमुखांत जो गवसला कोणीच ऐसा नसे;
संसारावरचें गड्या ! नियमुनी हें प्रेम थोडें तरी
चित्ता चंचळ लौकरी स्थिर करीं श्रीकृष्णपादांवरी ! २०

साधो ! हें कालसर्पे विकल दिसतसे जाहलें विश्व सारें,
आतां उद्धार त्याचा वद वद सदया ! शीघ्र व्हावा कसा रे ?—
एका भावें करावें सुचिर मुररिपुध्यानपीयूषपान
नाहीं निःशंक लोकीं विदितच सुजनां रक्षणोपाय आन ! २१

जो चंद्रापरि हर्षवी अनुदिनीं लक्ष्मीमनःकैरवा,
झाला धन्य महेश सेवुनि मुदें यन्नामपद्मासवा,
मेघश्यामल त्या हरीस हृदयीं चिंतीं अहर्यामिनी,
जीवा ! संसृतिसागरास सहसा जाशील उल्लंघुनी ! २२

प्रेमें मानितसे महेश्वर जिला आरामभूमी मनीं,
सारें देवहि ज्या स्थलीं निवसले अत्यंत आनंदुनी;
जीचें दर्शन दिव्य, ग भवसतिक्लेशा निवारी त्वरें,
कां दुःखज्वलनीं वृथा शिणसि ती काशी असूनी बरें ! २३

आतां कोणा भजावें भवविषमपथीं मित्र कोणा गणावें !
कर्मेंही आचरावीं, न कळत, कसलीं सर्वही एकभावें ?
संसारोन्मूलनाची अनुदिन सखया व्यर्थ चिंता वहासी,
साधूंची संगती बा विदित न तुजला काय ती दिव्य काशी ? २४

जेथें भुक्ति न मुक्ति तेथ, अथवा भुक्ती न मुक्ती तिथें,
नित्य द्वंद्व परंतु तेंहि मिळुनी काशीमधें नांदतें.
एथें उत्तममध्यमाधम जनां श्रीशंभु तो उद्धरी,
गंगेची पसरी सुशीत लहरी आनंद खिन्नांतरीं. २५

आहेत द्वारकादि प्रथित महिवरी देवताराजधानी,
स्तोत्रें आलीं तयांची कितितरि अमुच्या आजपर्यंत कानीं;
जेथें गंगोर्मिमाला परिहि उसळती, जी सदानंदभूमी,
ती काशी शांतिदात्री अमरगणनुता आदरें वंदितों मी. २६

गंगेच्या उसळून तुंग लहरी तीरप्रदेशावरी
जाते सुंदर बिंदुमौक्तिकतती शोभून कंठांतरीं;
कासारीं कमलें किती विकसलीं तद्गंध जातो दुरी,
गुंजाराव करीत भृंग झुलती ती हीच काशीपुरी ! २७

नांदे जी शंभुशीर्षी, सकलहि भुवनें वंदिती ज्या शुभेला,
विश्वींचीं सर्व तीर्थें मिळुनिहि न कदा येति जीच्या तुलेला,
संसारव्याधिनाशा सलिलकण जिचा एकही शक्त आहे,
त्या श्रीभागीरथीचा त्यजुनि तट मना ! दूर आतां न राहें ! २८

नित्य स्वाधीन आहें, जवळहि, भरलें ज्ञानपीयूष ज्यांत,
मूढ स्नानें न होती शुचितम, भुवनख्यात या मानसांत;
जाती तीर्था विवेक त्यजुनि अनुदिनीं भोगित क्लेशराशी,
हा ! हा ! कोठें तरी जे सतत भटकती बोलणें काय त्यांसी ? २९

शास्त्रें अभ्यासिलीं ना, नच युवतिवशीकारकोपाय कांहीं,
गानीं न ध्यान, काव्यें सरस न रचिलीं, जाणिलीं नीति नाहीं;

सांगे बा याचकाची मग तुज कुठुनी चातुरी यावयाची,
लोकाचार त्यजोनी अनुसर सखया ! पावलें श्रीहरीचीं. ३०

अर्थें कोसळती अनर्थ भलते जीवावरी येउनी,
आले सांगत साधु हेंच सकलां, हें ज्ञान आहे जनीं;
लक्ष्मीवल्लभपादपंकज परी सोडूनिया दुर्मति !
हा ! हा ! आवरितांहि तीव्रगरलस्वादा कसें धावती ! ३१

संसारव्याधिनाशा क्षितितलवलयीं धुंडिती स्थान कोणी,
कीं राहावें तिथें श्रीहरिपदकमलध्यानकामें बसोनी;
कोणी नैदाघतापीं बसुनि गिरिगुहेमाजि एकाग्रचित्तें
कोणी ते वृक्षमूलीं दृढतर नियमीं आचरीती तपातें; ३२

केदारीं जाति कोणी रुचिर करि उमा ज्या स्थलीं नर्तनातें,
जाती नारायणाच्या सुविदित बद्री—आश्रमातें कुणी ते;
कोणी जाती प्रयत्नें हिमगिरिवरती दिव्य तीर्थें बघाया,
सारे हे मोक्षकामी धडपड करिती पापपंका हराया ! ३३

स्थानें व्यर्थ कशास धुंडिसि नरा ! श्रीविष्णुपादार्चना,
वाटावें विषदिग्धभोगविषयीं वैराग्य आधीं मना;
हो निर्मूलन वासना, भटकतें त्वाच्चित्त सारें जरी,
मूढा ! व्यर्थच बैससी सुरधुनीतीराद्रिकुंजांतरीं ! ३४

मोठें शस्त्र स्मराचें, दुरुनिहि बघतां लोकचित्ता विदारी
लीलेनें त्या स्त्रिया या करिति सकलिका मग्न संसारपूरीं;
आहे त्यानेंच झाला भवजलनिधि हा क्षुब्ध, रुद्रस्वरूपी,
जाती ते पैलतीरा तरुनि सुजन जे रंगले ईशरूपीं. ३५

बाला ही हास्यलीलारत, अधरदलें लाजवीते प्रवाला,
फेकी दृष्टी विशाला, भुलवुं बघतसे दावुनी रम्य लीला;

क्रीडा झाल्या असारा, सकलहि जगिंचा सोडिला मी पसारा,
वाटे संसार कारागृह, हरिचरणीं ठेविला भाव सारा ! ३६

विद्यामंडित तेविं साधुजनही मोहभ्रमीं पाडिले
ऐसें स्त्रीविष हें कशास विधिनें आहे जगीं निर्मिलें ?
जातें द्रव्य विनाशुनी सकल, ये प्राणावरीही गदा,
तत्प्राप्तीस्तव कष्टती जडमती गाढानुरागें सदा ! ३७

जाते कांती सरोनी, विदलित मतिचा होय उत्साह सारा,
स्वप्नेंही यौवनींचीं त्यजुनि बल तसें दूर जातें भरारा;
पश्चात्तापाविणें न क्षणहि अनुभवा येत आयुष्य नाहीं,
हें जाणून प्रपंचीं विरतिच धरिली सर्वदा सज्जनांहिं, ३८

आहे पद्मेक्षणा ही, स्मितमुख विलसे पूर्ण चंद्रासमान,
मोत्यांची पंक्ति दंतावलि, अधरदला या तुला एकही न;
स्त्री नानानर्थमूला, परि तिज कुमती वर्णिती कौतुकानें,
सारें आयुष्य फोलापरि हरहर ! हें घालवीती भ्रमानें ! ३९

श्रीगंगेसम भूमिमंडल जिनें केलें असे पावन,
विश्वा उद्धरि सद्गुणी तनयही पोटीं जिच्या येउन,
ती साध्वी जगदेकवंद्यचरिता निंदील कोणी तरी ?
चूडेतें सुरनाथही नत करी तत्पादकंजांवरी ! ४०

येतो प्रत्यय सर्वदा भुवन हें आहे किती भंगुर,
भ्रांतीचा पट बैसला दृढ परी हा लोकचित्तावर;
मायाजाल कळे, अनर्थ दिसती द्वैतामधेंही अती
'मी' मी, बोलुनि पापदूषित पथीं दर्पांध हे नाचती ४१

सांगोपांग श्रुतींचें बहुपरि झटुनी जाणिलें ज्ञान कोणीं,
कोणीं पांडित्य केलें परमतदलनीं, होय तत्त्वज्ञ कोणी;
सारे हे तीर्थयात्राभ्रमणरति पर आदरितात केवीं ?
हा ! हा ! ज्ञानप्रभेची तदुपरि लवही न छटा कां पडावी ? ४२

तीर्थीं वास करून पुण्य न घडे, वा पाप न ध्वंसते,
आहे निर्गुण आत्मरूप अपुलें हें सांगती जाणते.
सच्चिन्मोदमयास त्या मग कुणी आनंदवावें बरें ?
तीर्थीं धांवति पामरें परिहि, हें आश्चर्य आहे खरें ! ४२

उदास[1] श्रीशंभू हरहर ! दिसे सज्जनकुलीं,
भ्रमीं पाडी अज्ञां निजविलसितें, क्रीडत कली;
असे म्लेच्छाक्रांता उभयतटदेशीं सुरनदी
कुठें बंधो ? आतां वससिल बरें निर्भय पदीं ? ४४

भूमी होय असार सर्व, फिरती उन्मत्त येथें करी,
शौर्याग्नी उसळे सभोंवति, जनां हा जाळितो अंतरीं,
म्लेच्छांच्या रथवाजिपत्तिनिवहें व्यापून गेली मही,
विद्या राहिल केवि मानसिं वसे चिंता महा एक ही ४५

गेले ब्राह्मण जाणते म्हणुनियां निर्वेद पावे श्रुति,
व्यासाची मधुरा गिराहि शुचि ती ऐकूं न ये संप्रति
भूमीतें यवनेश शासि, मग हा राही कसा धर्मही
व्हायाला भवबंधमुक्त भुवनीं गंगा असे एक ही. ४६

गंगेचें नामही जो श्रवण करि मुखें घेत वा एकदांही
तो राहो दूर, त्याचीं सकलहि दुरितें ती स्वलीलांहिं दाही;
ती गंगा मोक्षदात्री विषम भवपथीं कोण ना सेविणार ?
विश्वोद्धर्त्री करी जी त्रिपुरहरजटामंडलींही विहार ! ४७

---

१ या आणि पुढील दोन श्लोकांत भर्तृहरीच्या वेळच्या देशस्थितीचा बोध होतो. भर्तृहरी सातव्या शतकाच्या आरंभीं झाला आहे. तेव्हां येथें वर्णिलेला यवनराजा कोण असावा याविषयीं वाद आहे. आलबिरुनी नांवाचा प्रवासी राजा या राजाचें नांव देऊन त्याला एतद्देशीय लोक आर्येतर समजत असल्याचें लिहितो.

शुद्धाचारनिमग्न साधिति तपें भक्षून मूळें फळें
ऐसे साधु अहंपणा त्यजुनियां जीच्या तटीं राहिले
लीलेनें करबिल्वतुल्य वितरी कैवल्य जी त्यांजला
ती गंगा अतुला जगीं प्रिय नसे कोणा बरें ऊर्मिला ? ४८

संसाराग्निकणांतरीं निवसुनी जे जाहले तापित,
तीर्थांच्या अवलोकनीं सुजन ते होतात उत्कंठित;
सर्वत्र भ्रमती अतीव कुपथक्लेशांसही पावुनी
जों नाहीं दिसली महेश्वरजटाजूटीं रता स्वर्धुनी ! ४९

जीचें रम्य तरंगखेलन अहा पाहोनियां लोचनीं,
नाहीं एकहि जीव उल्लसित जो होणार नाहीं मनीं;
होते संसृति तापदायक परी ज्याला सुखाची झरी,
ती गंगा सुरवृंदसेव्यसलिला पाहीन केव्हां तरी ! ५०

जीचें दर्शन पातकावलि हरी, जी वंदिली सज्जनीं,
व्यासादि स्तविती जिला, शिव शिरीं जीतें धरी हर्षुनी,
वाहे शारदचंद्रकांतिसमही रम्यांबु जीचें सदा,
कां ती ही गिरिराजिराजतनया अव्हेरिसी दुर्मदा ! ५१

कुठें हंसश्रेणी मधुर कलनादें सुखविते,
कुठें खिन्नात्म्याला रमवि पुलिनीं मंथरगतें,
अशी श्रीगंगा ही विलसत इथें कल्पलतिका
मना स्नानें आतां सकल मिळवीं पौरुषसुखा ! ५२

जों आहे चित्त गेलें नव नव दुरितीं व्यापुनी मानवाचें,
जों पुत्रद्रव्यकांतादिक विषयशतीं चालले यत्न त्याचे,
कैवल्यप्राप्ति त्याला खचितचि न कधीं तोंवरी व्हावयाची,
अंतःशुद्धी न झाली तरि मग विफला हांव तीर्थाटनाची.

" आहे पूर्वजसंचितार्थ पुरुनी गुप्त स्थळीं ठेविला,
मींही वाढविला झटून, जपुनी तूं पाहिजे राखिला "
ऐसें वृद्धपणींहि मानव सुता मोहांधसा बोधितो,
या संसारनिबंधनाप्रति कसा केव्हांहि भेदील तो ? ५४

जाणोनीहि करी अकर्म भलतें, दुःखीं पडे जाउनी,
जीवा मोहच आवरे न कसला, हें ज्ञात आहे जनीं.
सूत्रें चालवि सूत्रधार, न दिसे या चर्मचक्षूंस तो,
' मी ! मी ! मी ! ' म्हणुनी परंतु नर हा दर्पांधसा नाचतो. ५५

ज्यानें निर्मुनि विश्व हें निजकृपालीलाभरें रक्षिलें,
आज्ञेनेंच यदीय हे जलनिधी सीमांतरीं ठाकले,
नाहीं क्षुद्रहि कर्म होत जगतीं इच्छेविणें ज्याचिया,
त्या ईशासचि सिद्ध दुर्जन कसे होतात निंदावया ! ५६

शास्त्रज्ञांचीहि बुद्धी, सुवचनपटुता ज्यापुढें शुष्क होते,
नाना गंभीर तत्त्वें वितरुनि सहसा हर्षवी जो जगातें,
पोटाची आग हा ! हा ! भ्रमवि अनुदिनीं नीचसेवेंत त्याही
कांहीं यावीण कष्टप्रद दुरित अहा ! या जगीं अन्य नाहीं ! ५७

मूढात्मा गुणहीनही नर परी हो सेव्य विद्वज्जनीं,
त्याचें दुर्मुख कौतुकें निरखिती उत्कंठिता कामिनी !
दुष्कीर्तीहि तदीय ' निस्तुल जगीं ! ' वर्णी धनार्थी कवी,
आहे काय असें धनेंहि न जना जें लाभतें या भवीं ! ५८

कर्तव्यास वळून पाठ, तुडवी आप्तोपदेशा पदीं,
कामाकर्षित मूढ पूरुष पडे जाऊन घोरापदीं;
स्वार्थें होउनि अंध होय रत तो दुष्कर्मजालांतरीं
विश्वाला नरकस्थिती वितरिली कामेंच आहे खरी ! ५९

सारा सोडुनि काम, पातकरजोराशीहि विध्वंसुनी
एकांतप्रिय आत्मचिंतनिं सदा जे मग्न झाले मुनी,

शांतीचे निधि पावतात अतुला आनंदधामास ते
संसारार्णविं केधवांहि मग या येती न ते मागुते ! ६०

लक्ष्मीनाथपदांबुजीं अजवरी भक्ती महा ठेविली,
वेदांतांतिलही उदात्त वचनें निष्ठाभरें ऐकलीं,
' मीच ब्रह्म असें ' असें स्थिर वसे हें एवढें मन्मनीं,
संसारीं मजला नसेच दुसरें कर्तव्य यावांचुनी. ६१

' असें मीच ब्रह्म, ' स्फुरण जरि हें होइल नरा;
तरी पुण्योद्रेकें अतुल जगिं तो होइल खरा.
अविद्येचें सारें पटल सहसा जाइल दुरी,
न संसाराधीही भिवविल तयाला क्षणभरी. ६२

नेला ओढुनि कालकर्कशशरीं, जो बाल्यसीमेवरी–
होता क्रीडत, त्या सुतास बघुनी हा शोक कोणी करी;
नाचे नर्तकनर्तकी जमवुनी हर्षोत्सवें तो कुणी;
सांगें संसृति दु:खपूर्ण अथवा गेली सुखें व्यापुनी ? ६३

" चाले औषध एकही न अगदीं अन्नांशही ना पचे,
नाहीं शक्ति उठावयासहि, जरायोगें न कांहीं रुचे;
कांहीं वस्तु न लोचना निरखवे, माझा भरोंसा नसे, "
बोले मूढ सचिंत " या जगिं तुझें होईल पुत्रा ! कसें ? " ६४

अन्नाशा धरुनी घरोघर मुलें जाती भिकाऱ्यापरी,
ये बाहेर न अंगना बहुपरी लाजून जीर्णांबरीं;
खालीं घालुनि मान आप्तसुहृदीं ने आयु कैसें तरी,
वाटे विस्मय हा–विरक्ति न कशी जीवास होते परी ! ६५

मोठा वंश मदीय, मीहि गुणधी, ऐशी करी स्वस्तुती,
सेवी नीचजनांसही प्रतिदिनीं, त्यांची करी आरती
ज्यानें अल्पधनार्थ लाज सगळी गुंडाळुनी ठेविली;
लोभी भिक्षुक तो सदैव विजयी होतो महीमंडलीं ! ६६

आशापाश पडून तीव्र हृदयीं, व्यापून मोहज्वरें,
यत्नें मीं प्रिय वस्तु जी मिळविली हिंडून नाना घरें,
तीच ध्वंसुनि ठेविलें मज जराग्रस्तास मागें जयें
त्या कारुण्यविहीन कालपुरुषा मीं कैंवि वंदूं नये ? ६७

आयुर्वेद निराश होउनि करां ज्याच्यापुढें टेंकितो,
हा ! हा ! वैद्यतनूहि रोगनिवहें दुर्धर्ष जो व्यापितो,
विश्वें सर्वहि ज्याचिया रगडुनी दंष्ट्रांतरीं चाललीं,
त्या कालापुढती वृथैच ठरते सारी उपायावली ! ६८

हर्षें देवतरंगिणीतटशिलाखंडावरी बैसुनी
नेती काल सुखोत्सवीं हरिकथापीयूष जे प्राशुनी,
देह त्यागिति पूर्ण मग्न असतां जे आत्मरूपांतरीं
शांतीचे पुतळेच, धन्य जगिं ते त्यांचा सखा श्रीहरी ! ६९

हे पुत्रा ! जननीसवें परत जा आतां गृहातें त्वरें,
रागद्वेषमदादि हो ! निजपथा तुम्हीहि लागा बरें !
ही श्रीशैलसुतातरंगललिता काशीपुरी पाहिली,
आतां राहुनि एथ सारिन दुरी संसारतापावली ! ७०*

---

भर्तृहरीचें हें विज्ञानशतक प्रथमतः नागपूरचे श्रीयुत कृष्णाशास्त्री घुले यांनीं १८९७ सालीं प्रसिद्ध केलें. यांत एकंदर १०३ श्लोक आहेत. त्यांतील मला आवडले तेवढ्याच श्लोकांवरून मी वरील श्लोक लिहिले आहेत. यांतील कित्येक श्लोक शुद्ध भाषांतररूप आहेत, कित्येकांना मुळांतील कांहींसा आधार आहे, आणि कित्येकांत तर नुसतीच भावना आहे. अर्थात् वरील काव्य मुळाशीं ताडून पाहण्याचा कोणी प्रयत्न केल्यास त्याची निराशा होईल हें सांगितलें पाहिजे. वाचकांनीं या काव्याकडे स्वतंत्र दृष्टीनें पहावें आणि माझ्याकडे परतंत्रपणाचा वांटा द्यावा.

# श्री अवधूतगीता.

करी प्रभु जें सदनुग्रहातें
अद्वैतवांछा मनुजास होते;
महद्भयापासुनि तीच तारी
लोकीं परी दुर्लभ होय भारी. १

जें केवलात्मविभवें जड वस्तुजाता
संव्यापुनी मिरवितें स्थिर आत्मसत्ता,
जें नित्यमंगल, अभिन्न, न रूप ज्याला,
कैसें करूं नमन त्या अज अव्ययाला? २

हें पंचभूतात्मक विश्व सारें
मरीचितोयासम भासणारें;
विराजतों केवल मी निरंजन
आतां करूं केंवि कुणास वंदन? ३

आत्माच केवल असे नयना दिसे तें?
न स्पर्शती कधिंच भेद अभेद त्यातें,
तें सत्य होय अथवा न कसें म्हणावें
कां विस्मयाकुल मदीय न चित्त व्हावें? ४

वेदान्ताचें सारसर्वस्व जें कीं
आहे ख्यात ज्ञानविज्ञान लोकीं,
सर्वव्यापी, जो निराकार आत्मा,
तो मी आहें सच्चिदानंदधामा. ५

सकलांतरवासि, निष्कल,
गगनातुल्य, पवित्र, निर्मल,

सतत प्रचुर प्रभान्वित,
प्रभु तो व्यापक मीच निश्चित. ६

केव्हांहि व्यय मजला न मी अनंत,
ज्ञानात्मा विलसत सर्वदा स्वतंत;
कोणाही नव सुख दुःख केंवि होतें,
मी केव्हां किमपि न जाणतों तयातें. ७

नोहे शुभाशुभहि मानस कर्म माझें,
नोहे शुभाशुभहि कायिक कर्म माझें,
नोहे शुभाशुभहि वाचिक कर्म माझें
मी ज्ञान, निर्मल, अतींद्रिय हा विराजें. ८

नभोरूप हें चित्त, या बंध नाहीं
न कांहीं कदा होत तत्कल्पनाही
मनोरूप हें भासतें दृश्यजात
परी निश्चयें चित्त आहे असत्य. ९

असें सतत एक मी, सकल विश्वही मी असें,
निरंतर, भरूनियां वितत अंबराही वसें;
अहा! मग कसा करूं तरि मदीय रूपेक्षण ?
कसा करुं अदृश्य वा प्रगट आत्मसंदर्शन ? १०

सचित्स्वरूप सुखदायक, तूंच एक
सर्वत्र वास तव, अव्यय तूं विशंक,
तूं ज्ञान, तूं अज, अनंत, अभेद होसी
कां सत्य सांग गणिसी दिन यामिनीसी? ११

सर्व स्थानीं तूंच आहेस नित्य—
आत्मत्वानें एकला, जाण सत्य
मी ध्याता तें ध्येय हा भेद तेथें
यावा कैसा केवलीं प्रत्ययातें? १२

नाहीं तुला जनन, मृत्युहि तूज नाहीं
वा नामरूपतनुही न तुला कदाही
ब्रह्मस्वरूपच सदा विलसे जगांत
हें मुक्तकंठ बहुधा श्रुति सांगतात. १३

सर्वत्र अभ्यंतरबाह्य देशीं
तूं सर्व कालीं शिव नांदतोसी
इथें तिथें धावसि कां भ्रमानें
मूढा ! पिशाचापरि आग्रहानें ? १४

संयोग वा होत वियोग नाहीं
कदा कुणाशीं तुजला मलाही
तूं, मी, जगत्, सत्य न हा प्रभेद
आत्माच हा केवळ निर्विवाद ! १५

शब्दादि पंचक तुझें नहि, तूं न त्याचा,
सत्तत्त्व तें परम, मंगल, तूंच साचा
कां सांग नित्य करितोस वृथैव खेद ?
दुःखांत कां पडसि कल्पुनि निंद्य भेद ? १६

जनन मरण तैसे बंधमोक्षादि कांहीं
शुभ अशुभहि चित्ता केधवां तूज नाहीं
करिसि विफल कां रे सर्वदा क्रंदनातें
तुजसि नसति किंवा नामरूपादि मातें. १७

संभ्रांत होऊन मना असा कां
पिशापरी धांवसि, सोड शंका,
अभिन्न आत्मा निरखून नित्य
वैराग्य लाभे वर सौख्य सत्य. १८

तूं आत्मरूप, तुजला न विकार कांहीं
निर्मुक्त, केवल, सुनिश्चल तूं सदाहि
नाहीं कदापि तुज राग विरागभाव
कां कामलालस असा शिणसी वृथैव ? १९

सम अव्यय, संशुद्ध, गुणातीत, निराकृति
वर्णिती श्रुति जें तत्त्व तें होसी तूंच निश्चिती. २०

साकार जें दिसत जाण असत्य सारें
आहे निराकृति निरंतर राहणारें,
हें तत्त्व संतत धरीं दृढ अंतरंगीं
जाशील तूं नच पुनर्जननप्रभोगीं. २१

सर्वत्र आहे सम तत्त्व एक
आत्मज्ञ ऐसें वदती विशंक
झाला विरागोदय जेथ पाहीं,
न द्वैतभावात्मक चित्त राही. २२

अनात्मरूपीं कसला समाधि
आत्मस्वरूपीं कसला समाधि
असे नसे हा कसला समाधि
आहे जरी मुक्तच सर्व आधीं. २३

तूं शुद्ध, अव्यय, विदेह न जन्म तूतें
व्यापून भूति तव राहत सर्व भूतें
' मी जाणतोंहि अथवा नच आत्मवस्तु '—
वा सांग कोंवि मग बोलसि शब्द हे तूं ? २४

तें तूंच एक असती असल्या वचांहीं
स्वात्मा असे कथियला विशद श्रुतींहीं

तैसेंच ‘ नेति ’ वचनीं कथिलें अनित्य
हें पांचभौतिक समस्त असे असत्य ! २५

तूं आत्मरूपें जडजंगमास
निरंतर व्यापुनि राहिलास
ध्याता न वा ध्यान मन त्वदीय
ध्यान क्रियाही मग कोंवि होय ? २६

मी जाणतों न शिवरूप कसें वदावें
वा जाणतोंहि शिवरूप कसें वदावें
आहें जरी शिवच मी सदसद्यतीत
आकाशतुल्य समरूप जडाजडांत ! २७

# नीतिमण्डन.

नं. ... ता. ... बा. ले.

## आर्या.

भवनाशन प्रभुस्मृति करिते साधन जगात अन्य नसे
घोरदवानलतापध्वंसकुशल अम्बुवाह एक असे ! १.

साधु प्रवीण केवळ आहे सद्‌गुणसुधारसस्तवनीं
अभिनवरसालकलिकास्वादकुशल एक कोकिलचि भुवनीं ! २.

होतो दोष प्रस्फुट मनुजाचा विशद गुण न होय तसा
शरदिन्दुचा कलंक स्पष्ट दिसे न प्रसन्नता सहसा ! ३.

सदसद्विवेक केवल सबल असे व्यसनजाल वाराया
चण्डांशु क्षम आहे भीषण रजनीतमासि साराया. ४

सुजनचि यत्नें करिती लोकीं विख्यात सुजनगुणनिवह
कुसुमाचें सौरभ्य प्राया प्रसरी दिगन्तिं गन्धवह. ५.

सामान्य मनुज करितो उपकार जसा तसा न थोर करी
काय वृथाचि करावा अम्बुनिधी ? तृषितदुःख कूप हरी ! ६.

आहे सच्छील तरी अन्यगुणव्रात शोभती फार
यौवन असतां जैसे रमणीचे विलसती अलंकार ! ७.

क्लेश न उत्तम धैर्यें गणितो, क्षणही टिके न सामान्य
शाणोल्लेखक्षम मणि ! होइल मृत्कण तिथें कसा मान्य ! ८

सुजनांच्या उत्कर्षें दुर्जन दुःखित अतीव होतात
रजनीवल्लभ येतां उदया, कमलें जलांत मिटतात ! ९

स्पृहणीय सद्‌गुणानें होतो मानव न रूपविभवानें
रमणीयहि कुसुम करीं धरिलें सौगन्ध्यहीन तें कोणें ? १०.

दुर्जनसंसर्गेंही सज्जन अपुला स्वभाव न त्यजिती
काकप्रसंग घडला तरि कोकिल रंजवीत मञ्जु रुतीं ! ११

ऊर्जित सुजनां व्यसनीं पाडाया रुष्ट दुष्ट बहु झटती
पुनरपि भक्षि विधुन्तुद फिरतां स्वच्छन्द गगनिं रजनिपती ! १२

आपत्समयहि करितो भुवनिं जनश्लाघनीय सत्पुरुषा
राहुग्रस्तहि विधुला पाहुनियां लोक पावती हरुषा ! १३

कार्यापेक्षी मनुज प्राया अन्यांस दावितो प्रेम
दुग्धार्थ धेनुला जन कोमल तृण घालितात हा नेम ! १४

स्वाभाविकरमणीया वस्तुसि नलगेचि अन्य संस्कार
मुक्तेस शाणघर्षण करुनी लाभेल कोणतें सार ! १५

श्रेष्ठहि वस्तू सुलभा होतां आदर न लेशही उरतो
भार्या असुनी सदनीं परदारार्थेंचि मूढ नर फिरतो ! १६

गुणवान् सुचिरस्थायी देवहि अद्याप जाहला नाहीं
पूर्ण श्रीमान् इन्दू तो केवल एक यामिनी राही ! १७

लोभ समर्थ महा हा स्वबळें श्रेष्ठांस याचना करवी
कौस्तुभमोहें हरिही सिन्धुपुढें हात खालती लववी ! १८

समचि प्रयत्न होती, मिळतें फळ परि असे जसें दैवीं
क्षारोदमथन करुनी असुरीं न प्राशिली सुधा, देवीं ! १९

पूज्यत्वा गुण कारण होय कदापी न एक कुलिं जनन
भूषवि विधु शिवचूडा, झाला उच्चैःश्रवा द्युमणिवहन ! २०

करिती लोक असम्भवगुणवर्णन, लाभ काय परि त्यांस
‘ बहु गन्ध कर्णिकारीं, म्हणतां कोण न करील परिहास ! २१

स्तवनें केवल होतो उत्तम संतुष्ट, अधम धनदानें
देव प्रसन्न होती जयशब्दें, भूतयक्ष ते बलिनें ! २२

निजजातिच्या विघाता हरहर ! नर शक्ति वेंचिती सारी
सोडुनि भुजंगमातें श्यैन क्रौर्यें विहंगकुल मारी ! २३

होतां महाजनांचा अभ्युदय क्षुद्र लोपती सारे
पडतां चण्डमरीचिप्रकाश नभिं अस्त पावती तारे ! २४

यत्न व्यर्थचि होती, संस्कारोचित जगीं विरल लोक
असती कितिक विहंगम, परि तो शुक मात्र बोलतो श्लोक. २५

कालक्रमें जगांत क्षुद्रहि चढतात थोर पद्वीस
अम्बुदबिंदु विभूषवि मौक्तिक होऊन कम्बुकण्ठास. २६

उपकाररत महाजन विरल, अमित तापदायि खल असती
चिन्तारत्नचि दुर्मिळ, अगणित पाषाणशकल पथिं दिसती ! २७

विनयेंचि कार्य साधे शत्रुहि विनयेंचि जिंकिती ज्ञानी
होऊन नम्र आधीं शौर्यें करिला वधी हरी मानी ! २८

व्यसनीं सज्जन पडला तरिहि गुणोत्कर्ष अधिक तो दावी
पसरी निजसौगन्ध्य श्रीखण्ड जरीहि गावला दावीं ! २९

जातिप्रभेद नसतां वैरी न कदापि जिंकिला जाय
वज्रमणीवांचुनि तो मुक्तामणि भेद्य जाहला काय ! ३०

एकास मित्र वाटे तोच दुज्या शत्रुसा गमे हृदयीं
अम्भोजवृन्द विकसे संकोचे कुमुदवृन्द रव्युदयीं. ३१

तज्ज्ञासि गुणपरीक्षा होते, हो तेथ इतर जन अन्ध
व्यर्थचि सुन्दर लोचन ! समजे घ्राणासि मालतीगन्ध ! ३२

मनुजाचा सहजहि गुण अन्यगुणानें अतीव शोभतसे
काञ्चनभूषण मिळतां निसर्गरमणीय रत्न रम्य दिसे ? ३३

मध्यम कालविशेषीं, उत्तम उपकार सवदा करिती
अन्य तरू कुसुमसमयिं चन्दन गन्धें दिशा सदा भरिती. ३४

पसरो कीर्ति कितीही परि केव्हां नष्ट होय तें न कळे
शरदिन्दुकान्ति लोपे अवचित जरि तो अकालमेघ वळे ! ३५

भोगेच्छा उपभोगें भोगिजनांची न होतसे शमित
घृततैलवृष्टि केली अनलज्वाला तरी उठति अमित ! ३६

उद्योगावांचुनि जन सम्पत्फल भोगितील कोठून
पीयूषप्राशन सुर करिते झाले समुद्र मंथून ! ३७

जन्मस्थानीं आहे काय ? मिळवि जनचि उत्तमाधमता
कस्तूरि असे मृगमद, निघे महाविष पयोनिधी मथतां ! ३८

श्रेष्ठ कितीहि असो जन, गुणसंगें दोषही असायाचा
सिन्धुमथनिं लाभ सुरां झाला अमृतासवोंचि गरलाचा ! ३९

गर्वास्पृष्ट कुणाचें मानस सांगें धनागमीं राही ?
जलसञ्चय होतां ध्वनिविकम्पिता घनहि करि दिशा दाही ४०

सिद्धी समीप असतां दुर्विधिहत मनुज अपयशें मळतो
कर्दमनिमग्न हस्ती सलिलार्थ सरित्तटींच तळमळतो ! ४१

योजी शक्ति विचारें न तरि शिरीं कोसळे विपन्निकर
उचित पथीं विष हितकर होतें हो तेंच उलट हानिकर ! ४२

क्षुद्र अनेक मिळाले तरि न श्रेष्ठाभिभव घडे खास
बा जिंकवेल सबल श्येन कसा शत कपोतपोतास ! ४३

नैसर्गिकरम्य गुणहि कालविशेषींच पावतो मान
लावण्य मधुर यौवनिं रसिकाचें हरवितें सहज भान ! ४४

गुणवान् असो कुठेंहि स्वगुणें शोभाचि नित्य तो पावे
मोहवि रत्न शिरीं वा कण्ठि भुजीं पादपीठिं ठेवावें ! ४५

बा स्थानवैपरीत्यें गुणही होतात दुर्गुणां ऐसे
लोचनभूषण अञ्जन वदनीं दूषणाचि होतसे जैसें ! ४६

अवाचित धनागमानें होतो सन्तोषनाश मनुजाचा
वळतां अकालजलधर होय सरःकूलभेद तो साचा ! ४७

कालविलासें लोकीं कालविला शोक जाय मोदांत
उद्यान आज दिसतें स्मशानसें तेंच कीं उद्यां होत ! ४८

---

# गंगालहरी.

## श्लोक.

सौभाग्य जें रम्य विस्तीर्णि या मेदिनीचें न ये ज्यास वर्णावया,
श्रीशंभुचें जें महैश्वर्यही होय–सारें रची विश्व जो लीलया,
सर्वस्व जें कीं श्रुतीचें, जणों पातलीं मूर्त हीं देवपुण्यें इथें,
गंगे! सुधास्वादु तें हें तुझें तोय अर्पो सदा मंगलें आमुतें! १

शैलात्मजे! सांगतों सत्य, जो देखियेला असे एकदांही जरी,
सारी दुरी रंकदैन्यें, करो चूर पापें त्वरें दुर्मनांचीं तरी.
टाकी महावेगशाली जवें जो अविद्या-महावृक्ष उत्पाटुनी
अंबे! तुझा रम्य तोयौघ तो हा अम्हां हर्षवो मंगला वर्षुनी. २

फेकी यदा छद्मयोगें उमा ती कटाक्षांप्रती मत्सरव्याकुला,
पाहोनियां ते अकस्मात् महाक्षोभ जीच्यामधें तेधवां जाहला;
श्रीशंभुच्या मस्तकीं कंपिता नाचणारी तुझी ती तरंगावली,
गंगे! हरो पाप, वारो भयें सर्व, ठेवो आम्हां सर्वदा मंगलीं! ३

माते! तुझ्या आश्रयाला सदा राहुनी जाहलों गर्वराशी महा,
सारेहि ते देव धिक्कारिले मी न कोणापुढें नम्र झालों पहा.
आतां जरी तूंच होसी अशी ही उदासीन या दीन दासावरी,
कोणापुढें मी रडावें तरी सांग आधारही ज्या न विश्वांतरीं! ४

चंडांशुच्या दिव्य तेजें तमें लोपती रात्रिचीं गाढ सारीं जशी
माते! तुझी मूर्ति येतां मनीं ध्वंसिते दुष्कृतें पातक्यांचीं तशीं
भक्त्यादरें देव सारे जिचें तोय सेवूनियां धन्यता मानिती
ती तूं दुरी ताप माझा करीं सर्वही संहरीं पातकांची तती! ५

सोडूनियां थोर राज्यें तशीं वैभवेंही तृणासारखीं मानुनी
गंगे ! किती लोक हर्षें तुझ्या तीरदेशावरी राहती येउनी;
तोयें सुधेहून सुस्वादु हीं प्राशुनीयां तुझीं तुष्ट होती अति
त्वद्वैभवाकृष्ट सारेहि ते मुक्तिसौख्यासही जाण अव्हेरिती. ६

भूपांगना रात्रिं कस्तूरिका लाविती आपुल्या चारु वक्षावरी
प्रक्षाळुनी स्नानकालीं प्रभातीं मिळे ती तुझ्या या प्रवाहांतरीं,
श्रीजन्हुजे ! तों कुरंगावली स्वर्ग्य वैमानिकीं वेष्टिता होउनी
स्वच्छंद गे दिव्यदेही जवें भव्य तेजस्विनी जातसे नंदनीं ! ७

होती तुझी एकदांही स्मृती क्षुब्ध चित्तास ती शांतवी सत्वरी,
गातां तुझें नाम पापासवें संसृतीचीं भयें सर्वही संहरी,
गंगे ! तुझी चारुमूर्ती वसो अंतकालींहि ती गाढ माझ्या मनीं
तैशीच ही रम्य नामावली नर्तनातें करो माझिया आननीं. ८

ज्या या तुझ्या तीरदेशावरी क्रीडणारे महा हर्षुनी कावळे
इंद्राचियाही पुरीची स्पृहा बाळगीती न ते केधवां ऊर्मिळे।
देवी ! जिथें वास होतां भयें, जन्ममृत्यू तसे शीघ्र होती दुरी
तें हें तुझें तीर सारे श्रम ध्वंसुनी आटवो पातकांची झरी ! ९

नाहीं जया पूर्ण वर्णावया शक्ति वेदांसही निश्चयें स्वर्धुनी !
जेथें कदाही कुणाच्या न गे वाङ्मनाची गती पोंचते जाउनी।
आकारही ज्यास कांहीं नसे, नित्य जें, तामसा स्वप्रकाशें हरी,
संशुद्ध तें तत्त्व गंगे ! तुझ्यावीण नाहीं दुजें वैखरी ही खरी ! १०

ध्यानीं रती ठेविली, अर्पिलीं थोर दानें, क्रतूही महा साधिले,
दुःसाध्यशीं आचरीलीं तपेंही, न कोणासही जें परी लाभलें,
तें विष्णुचें स्थान सर्वांसही अर्पिणारी जगीं तूंच लीलाभरें
कोणासवें सांग आतां तुझी मी करावी तुला जन्हुकन्ये ! बरें। ११

शैलोद्भवे ! दृष्टिमात्रें करी संसृतीचीं भयें जी नरांचीं दुरी
ती मंगला तूं ! तुझें वर्णवे थोर महात्म्य का सांग कोणा तरी।

क्रोधामुळें म्लान झाली उमा, तप्त ताच्चित्त ना शांतवीतां परीं
प्रेमोत्सवें देवकल्लोलिनि । श्रीमहेशें तुला ठेवियेलें शिरीं ! १२

उन्मत्तही निंदिती ज्यां सदा, पातकीही पळे दूर ज्यांपासुनी,
न मात्यही काढिती जीं मुखीं, त्यागिलीं सर्वदा जीं महादुर्जनीं;
पापें अशीं मानवांचीं किती ध्वंसिसी एकली तूं सुधारूपिणी !
होसी परी केधवांही न गे श्रांत, धन्या खरी तूंच गंगे जनीं ! १३

स्वर्गीतुनी शोकसंवारणा शीघ्र येतां तदा भूमिभागावरी
केलें तुला बद्ध देवापगे ! श्रीमहेशें जटाजूटजालान्तरीं !
निर्लोभही लोकचित्तान्तरीं निर्मिती लोभ जे यापरी देवते !
त्या या तुझ्या सद्गुणीं नांदतो दोष मोठाच हा मन्मनीं वाटतें. १४

# शंकर विजय.

## श्लोक.

आहे श्रीगुरुला पुराण कविंनीं वाग्वैभवें वर्णिलें,
माझेंही स्तुतिगीत हर्षविल त्या ऐसें मना वाटलें;
राहे क्षीरपयोनिधींत भगवान् तो सर्वदा श्रीहरी
प्रेमें काय न सेविलें पय तरी त्यानें व्रजाभ्यंतरीं? १

वाङ्निष्यंद यदीय रम्य, ठरवी हीना सुधा माधुरी,
ज्यानें वक्तृगुणें ध्वजा उभविली नागाधिपाही वरी;
कल्याणप्रद शंकराभिद गुरू जो या जगाचा असे
इच्छीं चित्तमलापहारक महा वर्णावया तद्यशें. २

कोठें शंकरसद्गुणावलि जिनें दाही दिशा व्यापिल्या,
गेला नूतन जातिगंधहि अहा लोपून जीच्यापुढें,
कोठें मी मतिमंद, सद्गुरुकृपापीयूषपानें परी
आहें तत्स्तुतिपुष्पहाररचनीं उद्युक्त हा जाहलों. ३

पापांचे पुतळेच, ज्यां न शिवली केव्हां विवेकच्छटा,
द्रव्योन्मत्त नराधमावरि अशा काव्यें किती लेखिलीं;
त्यानें पातकलिप्त ही अजवरी माझी गिरा जाहली
ती श्रीशंकरकीर्तिपावन झरीं प्रेमें धुतों आज मी! ४

झाली दुर्जनसंगती अजवरी कल्याणदायी कुणा?
नीचांच्या गुणकीर्तनांहिं मजला पुण्यें मिळावीं कशीं?
राहो तें, घडले प्रमाद कितिही अज्ञानयोगें पुरा,
वाणी सांप्रत जाहली रत असे श्रीच्या यशःसौरभीं. ५

व्योमीं इन्दुकला बघून डुलते हर्षें चकोरावली
किंवा पाहनि फुल्लकल्पलतिका आनंदती निर्जर
तैशी ही नव–कालिदास–कविता प्रौढिप्रकर्षान्विता
आतां सद्रसिकाग्रणींस सहसा टाकील सम्मोहुनी. ६

जीतें सादर वंदिलें मृगमदें, जी चंदनीं वर्णिली,
मंदारीं अभिनंदिली, नमियली काश्मीरजीं कौतुकें
वाणी ही मम दोषशून्य, करिती निन्दास्पदा दुष्कृति
म्लेच्छांनीं करुणा त्यजून ललिता धेनू वधावी जशी. ७

किंवा चिंतन हें कशास, असतां नानारसज्ञाग्रणी,
निर्मात्सर्य परोक्तिमौक्तिक शिरीं सानंद ते ठेविती
या माझ्या कृतिनें क्षणैक तरिही होईल कोणा सुख
किंवा श्रीगुरु शंकराभिद तरी तो तुष्ट होईल ना ? ८

वर्णाया सजलों अजी निरुपम श्रीशंकराचे गुण,
वाणी दुर्बळ, रम्यकाव्यरचनासामर्थ्य नाहीं परी;
पाहोनी रमणीय इंदुकलिका व्योमीं सुधावर्षिणी
मी बाहू पसरून भूवरि तिला वेढावया धांवतों ! ९

परी क्षीराब्धीच्या मधुर लहरी जेविं उठती
कटाक्ष श्रीचे हे मजवरि सदा वर्षति तसे;
प्रभावानें त्यांच्या वदतिल मुकेही कुशलसे,
करीं मी हें काव्यग्रथन तरि आश्चर्य कसलें ? १०

श्री मृत्युंजय मस्तकावरि करी स्वच्छंद जी नर्तन
त्या भागीरथिच्या मनोज्ञ लहरीलीलेस जी लाजवी
ऐशी मद्रसनेवरी निजवचोधारा उदारा स्वयें
स्थापोनी गुरुवर्णनक्षम करो ती शारदांबा मला ! ११

कोठें श्रीगुरुचें चरित्र शुभ तें, मीही वराकी कुठें
कां माझीं सगळीं चिरार्जित यशें विध्वंसुनी टाकिसी ?

ऐसें बोलुनि धांवतां चपल वाक् यत्नें धरोनी तिला
श्रीकीर्तिस्तवनार्थ योजिति कवी, मी स्वस्थ राहूं कसा ? १२

हा ! हा ! नीरस चित्तबंधयमकप्रासादिकां मोहुनी
पद्यें निर्मिति रुक्ष हे कवि किती दुर्बोध दूरान्वय
केला दुर्गम मार्ग त्यांहिं, भिउनी माझी गिरा चालते.
जाळीं विस्तरिलीं किरातजनिं तीं देखून एणीपरी ! १३

जेथें मुख्य असे महेशाच दुजा श्रीशंकराचार्य तो,
शृंगारादि रसांस लाजवित ही शांती विराजे जिथें
ज्याचा पाठ पवित्र एकहि करी वेगें अविद्याक्षति
लोकीं धन्यच काव्य तें, सुकवि तो, काव्यज्ञही धन्य ते ! १४

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३६९६
ग्रंथ शाखा (स्थान)

# शिरक्यांची तारा.

दिनकर शिणलेला बैसला अस्तागिरीवरती
संध्यारागें ये सृष्टिच्या सौंदर्या भरती
दिव्यदीप्तिसरिता उसळली साऱ्या गगनांत !
तुषार उधळोनी शोभला वनराजिप्रांत !
डोंगर झलतेही न्हाणिले स्वर्णनदीपूरीं !
स्रोत मधुरतेचे वर्षले रानीं चौफेरी !
निरोप शेवटचा जणूं दिनराजा घेतांना
दे रत्नाभरणें कौतुकें स्वीय किंकरांना !

कांटेरी झाडें शोभली अभिनव सौंदर्ये
साध्या दगडांनीं दाविलीं रत्नांचीं कार्ये !
दुःखाचे स्फोट आणखी प्रेमाच्या लहरी
यांयोगें गेली हालुनी वसुंधरा सारी !
खिन्नपणा कांहीं आणखी औत्सुक्यहि कांहीं
विचित्र भेसळही पसरुनी खालीं वर राही !
गीतें विहगांचीं चाललीं गगनभरी स्वैर,
खळखळ ओढ्याची खालतीं उदास भेसूर !
अभ्रांचा नाच नभिं उठे नव्याच रंगांत,
खालीं सुसकारे चालले रानोरानांत !
खिन्न नदी पसरी शोकरव अस्फुट भंवताली !
स्तब्ध सृष्टि सारी भ्रांतिवट होउनियां ठेलीं !
थबकुनि वाराही चकितसा न वाहतां राही
कां कीं दिनराणा बुडाला काळ सिंधुडोहीं

प्रकाश संपून तमोयुग सुरू होय आतां
म्हणून खेदानें नमविला कमलांनीं माथा !

तिमिराची वृष्टी लागली हळूहळू व्हाया
दृष्टीचे विषय लागले सर्वहि लोपाया !
जड दृष्टी दुबळी, व्यर्थ हो, मग अंतर्दृष्टी
उघडुनियां सहसा दिसे तिज भव्य दुजी सृष्टी
भूतभविष्याचे लागती नाचूं देखावे
त्यांत स्वैरपणें सारखें अचपळ मन धांवे
प्रसंग हर्षाचे आठवुनि रोमांचित व्हावें
खडतर आपत्ती चिंतुनी अश्रू ढाळावे,
भयाण गत गोष्टी स्मरुनियां कांपावा देह,
आठवुनी दुसरें गमावा स्वस्थितिसंदेह !
मन हें ओढाळ धांवतें सैरावैरा तें,
प्रसंग अनुकूल पाहुनी भडकुनीच जातें !
अंधारी रात्र कुणीही जवळ न मैत्रिण
उदास शब्दांनीं कोंदिती रातकिडे रान
रडत झरा चाले संपला गीतांचा खजिना ?
दुबळ्या तारीच्या कसा भर नच यावा रुदना ?
अश्रूंचे लोट चालले मूकपणें नयनीं
किती वेळ रडली बिचारी स्फुंदस्फुंदोनी !
वसंत पूर्वींचे वृष्टिदिन घनमय आतांचे
आठवुनी सांगा फुटेना अंतर कोणाचें ?
हंसऱ्या पुष्पाचें हास्य हें एकच जिस ठावें
ती दुःखाश्रूंत बुडे हें विधिला प्रिय व्हावें !
कसलेंही दुःख सह्य हो प्रियजन सहवासें
पण तें विषवृत्त एकदम सांगूं मी कैसें !

असलीं दुःखाचीं निराशाग्नीनें जळलेलीं
वृत्तें सांगाया कळेना वाणी कां सजली ?
शोकाचीं गीतें अशीं कां आवडलीं तीतें
अश्रूंच्या सरिता तिला कां निर्माया रुचतें ?
हर्षोल्लासाची आणखी आशापूर्तीचीं
स्फूर्ती कां तिजला न होते गाणीं गायाची !
अश्रू ढाळीत रचावी शोककाव्यमाला,
काय लाभ यांत कळेना रडवुनि रसिकांला !

अपूर्ण हें विश्व धांवतें पूर्ण व्हावयाला
परंतु मार्गांत अडविती बंध किती त्याला,
किती वदा मडकीं भाजतां आव्यांतच फुटती !
तरुवरुनी खालीं न पिकतां किती फळें पडती !
अनंत जल बिंदू लोपती मौक्तिक नच होतां
किती तरी बीजें नाशती अंकुरहि न फुटतां !
जगांत सर्वत्र नांदते अपूर्णता नित्य
मिळवी एकादा चिरंतन पूर्णपणा सत्य
शोकाचीं गाणीं उसळती रेणूरेणूंत
हर्षाचा नाद कुठेंहि न ऐकाया येत !
मग आनंदाचीं सुखाचीं गावीं कां गाणीं
विरचूं संगीत शोकरव केविं दूर करुनी
अनुभव जो येतो आपणां आणिक इतरांना
सोडुनि तो सांगूं कशाला विफळ कथा नाना !
इंद्रजाल जगतीं भरोनी व्यर्थ, लाभ काय ?
सत्यस्थिति दिसुनी करपुनी अंतरंग जाय !
दुःखें झाकोनी सुखाशा कशास निर्मावी !
अजाण हृदयांना भुरळ कां व्यर्थच पाडावी ?

रुक्ष फत्तरांचा पसरला भंवताली ढीग,
कशास लिंपावें त्यावरी इंद्रचापरंग ?
अपूर्ण जग सारें पूर्ण हो न एकही आशा
लोभा गुंतवुनी उलट ती सकला छळि विवशा !
कशास तिजवरती रचावीं स्तोत्रें भलभलतीं !
गुंफावी झटुनी निरर्थक कां शब्दस्फीती ?

अपक्व मन होतें जगाची अनुभूति न आली,
तोंवरि उल्हासें सुखाची गानपंक्ति रचिली !
प्रेमोत्कटतेचीं गायिलीं मधु मेलनगीतें,
आशापूर्तीचीं निर्मिलीं अभिनव संगीतें !
परंतु या बागा उठाव्या कुठुनी मसणांत ?
जिथें चिताग्नीच्या भडकल्या ज्वाला दिनरात !
शोकाची आग पेटली, विषस्पर्श तीचा
किती वेळ सांगा उटीपरि तो वाटायाचा ?
अनुभव हा आहे विश्व कीं तुरुंग हा मोठा,
सौख्यप्रासाद मानिला अज्ञजनीं उलटा !
भलती समजूत धरुनि जे पाउल उचलीती
त्यांच्यावर नित्य लोटती खडतर आपत्ती !
सत्यस्थिति कळुनी अंतरीं भरेल वैराग
तरी खरोखर मी तयांना गणिन महाभाग !
पतंग हो वेडा पाहुनी ज्योती दीपाची
तीच पुढें मागें दुःस्थिती सकलां यायाची !
सावध ! सावध ! हा मंत्र मग कां नच गर्जावा ?
विश्वगोल सारा वाटतें हलवुनि सोडावा !
वेलीवर ताजें पाहुनी फुललेलें फूल
मनांत ये—गळुनी त्यावरी भरेल कीं धूळ !

तुफानही ओढे गर्जुनी धुंद धावतात
ग्रीष्मांतिल पात्रें तयांचीं मज आठवतात
चमचमती गगनीं क्षणीं त्या कोसळती तारा !
आटुनियां जातो विधूचा कांतिपूर सारा !
वनराजी वठते कोंवळ्या पानांनीं भरली,
जरठ होय बाला यौवनें मुसमुसुनी गेली !
प्रकार हे बघुनी कवीचें मन गेलें जळुन
पडदे मोहाचे उडाले झरझर त्यावरुनी
हास्य कुणाचेंही म्हणुनि त्या वाटे भेसूर
कां कीं दिसती त्या आंतले शोकाचे पूर !
प्रेमधुंद जीव पाहुनी कींवच ये त्यांची
हाय ! हाय ! यांना न जाणिव भावी कालाची !
कालाच्या सारे बैसुनी दाढेवर हंसती,
दुसऱ्या क्षणिं भोळे बिचारे चिरडुनियां जाती !

स्वैरपणें सारे चालती जगिंचे व्यापार,
त्यांवर विश्वसुनी नसावें सुज्ञें साचार !
एकच गिरिवरती कोसळति पयोद जलधारा,
एक झरा पळतो पश्चिमे, पूर्वेला दुसरा !
एक फूल चढतें प्रभुशिरीं, अन्य चितेवरती,
अपुल्या हातांत खरोखर नसेच ती नियती !
चालक विश्वाचा कुठेंसा झोंप घेत पडला,
म्हणुनि जगीं चाले आंधळा कारभार असला !
वागुनि न्यायानें आणखी नीतीला धरुनी
कां सुजनां लागे मराया सांगा झुरझुरुनी ?
आज हर्षपूर उसळतो जेथें, तो तेथें
उद्यांहि राहील हें कुणा सांगाया येतें !

सत्य वदायाची ज्या गमे चोरी वा भीति
म्हणोत ते कांहीं रीत ही न रुचे मज भलती !
जगांत न्यायाचें नीतिचें चीज होत नाहीं
सत्यस्थिति कैशी झाकुनी ही सांगा राही

शिरक्याची तारी रडत ही येथें बसलेली
हर्षानंदांत एकदां होती गढलेली !
कल्पितसुमसृष्टि पसरिली तिनें जगावरती
आज असे आली तियेच्या शोकाला भरती !
हंसतां हंसतांना तेधवां पुरे तिला झालें
आतां रडरडुनी तियेचे नेत्र सुजुनि गेले !
आशेचे वाडे कोसळुनि पडले धूळींत !
सौख्याच्या बागा जळाल्या नैराश्याग्नींत !
लहरी गीताची शोकरवविलीन कीं झाली !
पाहिली न कोणीं विधिची दुर्घटना असली !

आठवतो मजला दिवस तो पहिल्या प्रेमाचा,
प्रकाश भरलेला फुटोनी गोंडा दिवसाचा
ज्वारीचीं शेतें वांकलीं पिवळ्या कणसांनीं
वाऱ्यावर झुलतां हांसलीं हळूच खुदखुदुनी !
कार्तिकमासाची पसरली थंडी कडकडुनी
पण राहे कैसा शेतकरि आंथरुणीं पडुनी
भरलेलीं कणसें बघुनि मन हर्षानें भरलें
वाटे त्या आज श्रमाचें पूर्ण चीज झालें !
पडला पाऊस वाटला जसा हवा तैसा !
शेतें पिकलेलीं पाहुनी हर्ष हो न कैसा !
यंदा तरि नाहीं राहिलें भय दुष्काळाचें

टाकूं देऊन सर्वही देणें लोकांचें !
छचडद्या बाळांना द्यायचें तें अमकें तमकें !
मनिं येउनि ऐसें मुखावर हंसें गोड चमके !
साधुच्च शेतकरी वाटतो, ज्या पाप न ठावें,

—अपूर्ण—

श्री ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ता. ... वा. ...

# जाधवांची मंजुळा.

## प्रास्ताविक.

### वृत्त—माल्यभारा.

झुकली गगनांत पर्वताली
उसळे जेथ सदा तुफान वारा,
हिरवी पसरून दाट झाडी
भरला तो मधुर प्रदेश सारा; १

झरती प्रबलौघ निर्झरांचे
ध्वनि त्यांचे घुमती सभोंवतालीं,
उसळून तुषार वातवेगें
गमती ते जणुं रम्य मौक्तिकाली! २

उडतो खगवृन्द अम्बरांत
पसरे तेथ तदीय मंजु नाद,
भुलुनी वनदेवता तयांना
कुतकें खालुनि घालितात साद! ३

रविच्या किरणांसवें लताही
फुगड्या घालिति जेथ सर्व काल
गळुनी तळिं घर्मबिन्दु पुष्पें
स्थल तें आवृत होतसे विशाल! ४

बघुनी रमणीयता विचित्र
रवि तेथें क्षणमात्र लुब्ध होतो;

रजनीपतिही उदारतेनें
अमृतीं मग्न करी प्रदेश हो तो ! ५.

त्यजुनी गगनास तारकाही
रमल्या पुष्पमिषें सदैव तेथें
कुतुकें विपिनेंहिं या तयांना
दिधलें दिव्य सुगन्ध वैभवातें ! ६.

करितात मयूर नर्तनातें
पिक घेती नव रम्य रम्य ताना
हंसती गिरिवाहिनी प्रमोदें
तटदेशीं मृगशाव नाचतांना ! ७.

जयगायन गात भानुराया
नभिं चंडोल करी तिथें विहार,
भुलुनी दिननाथही सहास्य
वनदेवीस समर्पि रश्मिहार ! ८

स्थल हें बघतांच अम्बुवाह
द्रवुनी अन्तरिं जातसे नितान्त,
गळुनि प्रणयाश्रुपंक्ति त्याची
वनभू होय समार्द्र ही क्षणांत ! ९

फुललीं कुसुमें कितीक ताजीं
पसरे तन्मधुगन्ध भोंवतालीं;
सरसीहि परागवर्षणानें
जणुं रम्योज्ज्वल उत्तरीय ल्यालीं ! १०

स्थल हें रमणीय त्यांत वर्षे
वरि अस्तोन्मुख भानुरश्मिराग,
जननस्थल इन्द्रकार्मुकाचें
गमला तो अति दिव्य रम्य भाग ! ११

हिरवी घनगर्द रम्य झाडीं,
वरि सायंतन अम्बरप्रभा ते,
विलसे रविबिम्ब मध्यभार्गी
बघतां मोह पडे न तो कुणातें ? १२

तुरगा दुरि सोडुनी चराया
रमुनी अन्तरिं शीत शैलवातें
युव एक शिलातलीं बसून
निरखी सुन्दर सृष्टिवैभवातें. १३

कसुनी दृढ चोळणा कटीला
दिधला झोंकुनि ऐटबाज फेटा
समशेरहि शोभते करांत
दिसतो मानधन प्रभू मराठा. १४

चमके नयनांत शौर्यतेज
मतिमत्ता विलसे विशाल भालीं,
अधरीं स्मित नाचतें मनोज्ञ
करितें बद्ध कुणाहि मोहजालीं. १५

असतें स्थिर तेज तारकांचें
परि नाहीं तुलनाच मार्दवास,
अनुपम्य तदीय दृक्प्रभाव
सुखवी तो तरिही किती मनास ! १६

सजले चिर आर्तरक्षणातें
झटले दुर्मदलोकदण्डनातें
स्फुरलें रिपुमान भंजनातें
स्तवि ना कोण तदीय त्या भुजांतें ? १७

करुणा बळहीन दुर्भगांची
अनुकम्पा विधिदंडदण्डितांची
हृदयीं वसती तदीय नित्य
न वसे त्या स्थलिं अन्य कामनाची ! १८

लवली न कदापि मान याची
जगदीशाविण पाहुनी कुणाही,
गणुनी त्रिजगत्‌हि तुच्छ वाटे
जणुं दर्पोद्धत सह्यशैल राही ! १९

गगनीं रवि येत पूज्य व्हाया,
शिवशीर्षावर जाह्नवी वसाया,
नर हा उदयास तेंवि आला
जनवृन्दीं अधिकार चालवाया ! २०

पळतो जवळून एक ओढा
उधळी तो वरती तरंगमाला,
किति त्यावरि शीर्ण वन्य पुष्पें
करुनी नर्तन भूषिती तयाला. २१

श्रवणीं पडती विहंगगीतें
सुखवी स्पर्शुनि शीत मन्द वात,
विसरून गत प्रपंच ताप
नर तो हर्षित जाहला नितान्त. २२

परि दीन रवें क्षणें तयाचा
प्रचुरानन्दसमाधिभंग झाला,
बघतां पुढती कुतूहलानें
दिसली एक तयास खिन्न बाला. २३

न उणों लव रूपसम्पदेंत
गमली ती जणुं मूर्त सह्यदेवी
मृदुकल्पलताप्रसूनमाला
जड विश्वान्तरिं सम्भवेल केवी ? २४

वितताम्बुनिधींत जन्मणारी
नव मुक्ता डबकीं कुठून लाभे ?
धवलाम्बुज भव्य मानसींचें
न कधीं पंकिल पल्वलांत शोभे ! २५

रजनीहृदयीं चकाकणारी
मरुदेशीं उगवेल काय तारा ?
न कळे सहसा नव प्रभेनें
भरला कां मग हा प्रदेश सारा ? २६

उठुनी नर तेधवां झणीं तो
रमणीसन्निध जाय आदरानें
वदला "भगिनी ! वनांत ऐशा
वससी सन्तत काय कारणानें ? २७

स्थल हें जनवासयोग्य नाहीं,
वसती क्रूर पशू सदैव येथें;
त्यजुनी सुखमन्दिरें पुरींचीं
करिसी कां वद कालयापनेतें ? २८

असशी वद लेंक तूं कुणाची ?
तव माता पितरें कुठें रहाती ?
दिसते तव वन्दनीय मूर्ति
न अशा क्षुद्रकुलीं कदापि होती ! २९

सुखवैभवसेवनास योग्य
तव आकार दिसे मला शुभांगे !

मग कां दिसतेस खिन्न ऐशी ?
मज आर्ये ? तव दुःखहेतु सांगें. ३०

न जगीं दहनार्थ पुष्पमाला,
तुडवायास न तारका उदेल्या,
मृदुले ! तव या विशाल नेत्रीं
मग या अश्रुनदी किमर्थ ठेल्या ? ३१

विधिरोष असेल दुःखमूलीं
तर तो तीव्र विनिन्दनास पात्र;
नर कोणि असेल — दण्डितों त्या
रमणी ! सांग तदीय नाम मात्र ! ३२

तव पावनदर्शनेंच मातें
वश केलें — तव दास यास मान;
करुनी मन मोकळें खुशाल
वद सन्देश तुझा — मला प्रमाण ! ३३

तव सद्गुणबोध अल्प नाहीं
तव पादीं तरि चित्त लीन झालें;
बघुनी गगनीं उषःप्रभेला
फुलती सत्वर जेविं पद्मजालें ! ” ३४

वदली रमणी तदा तयास
करुनी एक उदास दृष्टिपात,
“ वनिं या जड आयु कंठणारी
अबला एकलि जाण ही अनाथ ३५

इतिहास इचा तुला कळून
वद आहे तरी फायदा कशाचा ?
विधिनें सृजिलें किती अभागी
प्रखराघात सहावया कशांचा ! ३६

गिळिल्या जलदीं कितीक तारा,
जळलीं दात्रकणीं फुलें कितीक;
बुडल्या किति कर्दमांत मुक्ता,
किति लोकीं करशील सांग दुःख ? ३७

गळती कुसुमें लतांवरून
वद कोणी चिकटून त्यांस ठेवी ?
सुख देइल कोण दुःखितांना
चुकतो भोग न जो असेल दैवीं ! ३८

पडती गगनामधून तारे
झरती फोडुनि मेघ बिन्दुमाला,
चिर सौख्यनिवास कोण भोगी ?
चुकवी का अवनी कधीं तयाला ? ३९

कळलाहि मदीय शोकहेतु
तरि कां दुःख मनांत तूं धरावें ?
सुकलीं कुमुदें जरी प्रभातीं
कमलांहीं निज हास्य न त्यजावें. ४०

रडती जगिं ते सुखें रडोत,
हंसणारे सुखपूरमग्न व्हावे !
न सुकेल मदश्रुवाहिनी ही
सदया ! येथुनि तूं सुखें निघावें. " ४१

पडतां श्रवणीं विरक्त वाणी
नर तेव्हां मनिं फार खिन्न झाला;
तिचिया वदनावरी स्वदृष्टि
करुनी तो स्थिर अल्पकाल ठेला. ४२

वदला मग "सुन्दरी! तुझ्या या
वचनीं स्पष्ट तव स्थिती जहाली;
सुखलेश न लाभतां क्षणैक
गमतें तूं शिणलीस दुःखजालीं. ४३

म्हणसी, न असत्य तें सुशीले!
परदुःखीं जग बेफिकीर आहे;
न गणीं मज त्यांतला परी तूं,
अधम स्वार्थ असा मनीं न वाहें! ४४

पुढतीं असतांहि शोकगीतें
नच संगीतसुखीं मला रहावें
गळतां अबलाश्रु धूलिमाजी
सुमुखी! केवि सुखांत मीं वसावें? ४५

मृतकैरव–शुष्कदेह–शय्ये–
–वरि नाचो रमणी! सुखें उषा ही
पर सौख्यचिता बघून नेत्रीं
स्वसुखासक्ति न मी धरीं कदाही! ४६

वद सर्वहि दुःख जीविंचें तूं
उपयोजी मज कार्यसाधनातें;
तव सेवक, बंधु, मित्र कांहीं
मज मानी, दुसरें कशास नातें?" ४७

क्षणमात्र विलोकुनी तयाला
वदली निश्वसुनी हळूच बाला
"सदया! मम वृत्त जाणण्याची
धरसी आतुरता वृथा कशाला? ४८

विधिलेख असेल जो ललाटीं
टळवे तो न कदापि मानवास
मग या मम शोककीर्तनानें
तुजला दुःखित मी करूं कशास ? ४९

न तवाग्रह मोडवे परी हा
ममही ये उसळून दुःख आजी;
नसतां कसलाहि हेतु चित्तीं
कथितें शोककथा समूल माझी. ५०

बघुनी जड रुक्ष पर्वतातें
द्रवुनी अंतरिं जाय मेघमाला
बसुनी क्षण एक त्याजपाशीं
करिते तुंबळ अश्रुवर्षणाला; ५१

सरिता पळतां वनोवनांत
करि वीरा ! हितगूज जें तटाशीं
असतो वद त्यांत हेतु काय ?
न मिळे तेथुनि तीस केवलाशी ! ५२

जगिं हा दिसतो असा प्रकार
पुसतांही न विकार धांव घेती
मग मी वद केविं रोधुं तीं जीं
गतदुःखस्फुरणें मनांत होतीं ? ५३

गळवी मृदुवात शुष्कपत्र
ठिणगीनें तृणपुंज पेट घेतो,
तव या वचनीं प्रसुप्त माझा
बघ जागा गुरुशोकभार होतो ! ५४

असतांहि न ऐकणार कोणी
रडती पर्वतवाहिनी सदा या;

मम शोक तसाच केवि राही ?
　　सदया ! तूं असतां पुढें पुसाया ! ५५
नसती जगिं दुःखमग्न थोडे,
　　करणारे विरळाच कींव त्यांची;
हंसऱ्या कुसुमांस लोभणारे
　　भरती फार असे जनीं अशांचा ! ५६
परदुःखविचारणाच त्यांना
　　न शिवे, ते असती सदा सुखांत !
बघुनीहि चितानलप्रभा ते
　　म्हणती—पोंहत विश्व चांदण्यांत ! ५७
भरले वृक या जगीं अनंत,
　　मिटती नेत्र अनाथ पाहतां ते;
सदया ! चुकुनी दयालु येतो
　　तुजऐसा विरळाच दृक्पथातें ! ५८
रुचतात तयांस शोकवार्ता
　　स्वमनोरंजन अल्पकाल व्हाया;
द्रवतें न तदीय चित्त लेश,
　　अधमांनीं भरलें असे जगा या ! ५९
गळतां रविबिम्ब हर्ष हो त्यां,
　　ग्रसितां इन्दुकला सुखें पहाती,
झरतां नव तारका निशीथीं
　　न मनीं दुःखित ते नृशंस होती ! ६०
सदया ! असल्या नराधमांचा
　　मज वारा नलगे कधीं म्हणून
वसतें विपिनांत या सदा मी
　　परि झालें सुखवंचिता फसून !” ६१

वदुनी इतुकें असह्य शोकें
रमणी स्फुंदुनि लागली रडाया,
गुरु–कौतुक–शोक–मग्न लागे
नर चित्रापरि तो तिला पहाया. ६२

तिमिरांत उषा जशी लपावी,
फुलतांही न कळी सुकून जावी
अतिशैत्यभरें नदी स्थिरावी,
स्थिति ही सह्य कशी कुणा गमावी ? ६३

करुनी स्मित, सर्व विश्व हा ! हा !
तरुणीनें स्मितपूर्ण ज्या करावें—
तिचिया नयनाम्बुजांमधून
गुरुशोकें चिर अश्रु कां गळावे ? ६४

होता जाउनि पोंचला दिनमणी केव्हांच अस्ताचला,
ज्योत्स्ना वर्षित इन्दुही हळुहळू पूर्वेकडे पातला,
चाले विश्वजड स्वकार्यरत तें यंत्रापरी तेथवां,
झाला विव्हल वीर मात्र असतां ढाळीत ती आसवां ! ६५

# वृत्तकथन.

हंसरी वसुधा क्षणांत झाली
　　तिमिरव्याप्त लयास भानु जातां,
तिज पाहुनि पातली हंसाया
　　नव तारावलि ही नभांत आतां १

सुजन व्यसनांत मग्न होतां
　　मिळती दुर्मति त्यास निन्दणारे;
विपिनीं दववह्नि पेटतां त्या
　　भडकाया सुटती तुफान वारे ! २

विरळा व्यसनांत धांवणारे
　　धरणारे अडवून निन्दनास;
पुसती रुधिराश्रु जे दयेनें
　　बुध ते पात्रच नित्यवन्दनास ! ३

बघुनी मुख दीन मेदिनीचें
　　तिमिरध्वंस झणी करावयाला
पसरीत कर स्वकीय शान्त
　　उदया अम्बरिं पूर्णचन्द्र आला. ४

वन तें नव ओघ चान्द्रिकेचे
　　उसळोनी सुखपूरमग्न झालें
हंसले तरुवृन्द आपलालीं
　　समयीं त्या हलवून पत्रजालें ! ५

गिरि, निर्झर, वृक्षमालिका ती,
घुमणाऱ्या सरिताहि कन्दरांत,
पसरून नव प्रकाश तेव्हां
गमलीं मोहक तीं मना नितान्त ! ६

उसळे स्मित काय अप्सरांचें ?
गळतो स्वर्गशुचित्वसार किंवा ?
उतरे अथवा नभःस्थ गंगा ?
झरतो नन्दनपुष्पगन्ध कीं वा ? ७

द्रव हा झरपून तारकांचा
बुडला त्यांत वनप्रदेश का हा ?
धवलाम्बुजवासिनी रमे ही
दृढ आलिंगुनि काय गन्धवाहा ? ८

गगनांतिल सान अभ्रखण्डें
बसलीं जाउनि दूर कोपऱ्यांत;
चढला वरि इन्दुराज वेगें
निज तेजें भगणांस लाजवीत ! ९

खिळली गगनांत शून्य दृष्टि
फिरवोनी तरुणावरी तदा ते
रमणी पुसुनी उदश्रुपंक्ति
वदली निःश्वसुनी असें तयातें:– १०

“ तरुणा असतील जावळीचे
तुजला ज्ञातच चंद्रराव मोरे;
असती हुकुमांत त्याचिया हे
भंवतींचे वनभूप्रदेश सारे. ११

बल दुर्दम, शौर्यही असीम
पसरी तो रिपुमण्डलीं दरारा,

दुखवून तयास, दुर्बलांना
न मिळे या जगतांत अन्य थारा ! १२

जन विक्रम पाहुनी तदीय
मनुजव्याघ्र तयास बोलतात;
सदया ! हतदैवखेलनानें
बनला व्याघ्रच तो खरा जगांत ! १३

तुलना न तदीय विक्रमाला,
न परी अन्तरिं आढळे दयांश !
नयनीतिविचार केधवांही
न सुचे अल्पहि त्या नराधमास ! १४

स्वसुखीं रत जाहला सदा तो,
नच चिन्ता वसते प्रजाहिताची,
सुखवैभवसाधनावलीतें
गणितो तो अधमेश आपुल्याची ! १५

धनराशि जगांतल्या समस्त
समजे तो निज सौख्यवर्धनास,
तरुणी नवयौवनोदयानें
स्फुरतां कामसुखार्थ ने तयांस ! १६

म्हणती परशासनीं जनांतें
नच लाभे सुखलेश केधवांही;
पण ही असली महानुभूति
इथल्या दीन जनांस येत नाहीं ! १७

त्यजुनी निजमंदिरें सुखाचीं
जन जाती यवनांचिया प्रदेशीं;
सुखवर्धक होतसे स्वराज्य
गमतें भाषण हें परोपदेशी ! १८

म्हणती यवनांस घालवून
    श्रमताहे निजराज्यवर्धनातें;
दिसतां परि चंद्रराव मोरे
    यश लाभेल कसें शिवप्रभूतें? १९

जनरक्षण हें वदावयाला
    मनिं राहे परि वैभवस्पृहाच;
गमतें सुजनां कितीक ऐसें,
    इथला हा बघुनी प्रकार साच! २०

नच भीति तशी विजापुराची,
    अथवा दुर्दम दिल्लिवल्लभाची,
परि त्या शिवराजयास आहे
    बहु या दुर्जन जावळीश्वराची! २१

करुनी दिनरात्र यत्न सत्ता
    यवनांची उलथून लाभ काय?
जरि हा मिळणार भूप ऐसा
    रतला जो अनयांत हाय! हाय! २२

शिरले जइं जावळींत मोरे
    हिरजी जाधव त्यांसमीप होता,
अति कौशल दावुनी तदा तो
    पसरी निस्तुल युद्धकीर्तिवार्ता. २३

बघुनी रणचातुरी तयाची
    करि सेनापति जावळीश त्याला,
गुणिगौरव जाहला असा तो;
    गतल्या सात पिढ्या तया कथेला. २४

नृप शासित जावळीस मोरे,
    विलसे जाधववंश सैन्यनाथ;

परि नन्तर कालदुर्विलासें
पडला दुर्विषबिन्दु हा ! पयांत ? २५

धनजी रणधीर शौर्यशाली
असतां जाधववंश भूषवीत
जमुनी विषम प्रसंग कांहीं
घडला शीघ्र तदीय वैभवान्त. २६

शिरके सरदार जावळीचे,
गिरजा एकुलतीच लेक त्यांची;
विधि सर्वहि होउनी तयांशीं
ठरलें ती धनजीस द्यावयाची. २७

अनुराग परस्परीं तयांचा
बसलेला सहवासगौरवानें
दृढ होयँ विवाहनिश्चयें तो;
उभयें एकच जाहलीं मनानें. २८

पुढतीं वनिं एकलीच गेली
गिरजा ती मृगया करावयास
दिसली चुकुनी तदीय मूर्ति
तिकडे दुर्मद जावळीश्वरास; २९

सहसा अधम प्रमुग्ध झाला,
विनया सोडुनि ये तिच्यासमीप;
मरणार्थ जणूं पतंग आला
जवळी पाहुनियां ज्वलत्प्रदीप. ३०

करुनी निजरूपवर्णनातें
स्तवुनी विस्तृतराज्यवैभवें ही

शठ तो मधुभाषणें तियेच्या
हृदया मुग्ध करावयास पाहीं. ३१

शरदागमनें विकास पावे
वनलक्ष्मी न कधींहि हर्षभारें,
हंसते सहकारमंजरी ही
न कधींही कटुकाकगीतपूरें ! ३२

नव हीरकचूर्ण अम्बरांत
जरि डौलें उधळीत चंद्र आला
तरि काय कदापि पद्मिनीच्या
वदनीं व्यक्त सुहास्यलेश झाला ? ३३

करिती अनुरात्र तुंग शब्द
परि पद्में फुलती न निर्झरीं या,
करितो किति सिन्धु आर्जवा त्या
परि वेला नच दे पुढें सराया ! ३४

श्रमला किति चन्द्रराव तेव्हां,
गिरिजेचें वळलेंच चित्त नाहीं;
वरती अपमान शब्द तीव्र
रमणी क्रुद्धमनें तयास वाही ! ३५

फुटतो गिरि जेविं वज्रघातें
हृदयीं होय विदीर्ण चन्द्रराव;
अधमावर त्या तदा असह्य
घडला दारुण मत्सरप्रभाव ! ३६

रचुनी भलत्याच दोषराशी
धनजीला खल लागला छळाया;
हरुनी पदवी, करीत आज्ञा
अपुलें राज्यहि सत्वर त्यजाया ! ३७

बघुनी भलता प्रकार ऐसा
धनजी अन्तरिं फार दुःख पावें;
कपटी जग सोडुनी सुखानें
गमलें त्या, वनिं जाउनी रहावें ! ३८

स्वसुखावर लाथ मारुनी या
झटला सात पिढ्या यदीय सेवे
बघुनी खलता अशी तयाची
फुटुनी अन्तर शीघ्र कां न जावें ? ३९

धनराशि जळो ! पुरे यशःश्री !
जनसम्बन्धहि यापुढें कशाला ?
करुनी दृढ निश्चय स्वचित्तीं
धनजी काननिं एकलाच गेला ! ४०

बसला दुरि जाउनी पयोधि
तरि राहे सरिताहि काय मागें ?
गिरि तुंग विलंघुनी तदर्थ
पळते सन्तत ती दृढानुरागें ! ४१

किरणावलि धांव घेत तेथें
घनकुंजीं रवि बैसतां लपून;
निघतांच वसन्त अन्य देशीं
पिकपंक्तीहि पळे तिथें उडून ! ४२

गिरजा गुणवृन्द–शील–भूषा
मधुरादर्शच ती सतीजनांचा
त्यजुनी धनजीस अन्य ठायीं
रत तच्चित्तचकोर व्हावयाचा ? ४३

धनवैभव सोडुनी तदा ती
गणुनी तुच्छ विलाससाधनांतें

विपिनांत पतीसवें निघाली
रघुराजासह जेविं जानकी ते. ४४

धनजी घनकाननीं शिरून
करि तेथें अधिवास वृक्षमूलीं
गिरजाहि नितान्त भक्तिभावें
रत त्याच्या पदसेवनांत झाली. ४५

तिमिरीं विधु फेंकिला तरी तो
भरितो कान्तिभरें दिशादिशांला ;
घनकाननिंही तसा प्रभाव
धनजीचा दिसुनी सुशीघ्र आला ! ४६

वनभूतल हा पहाड सारा
भरला शीघ्र तदीय विक्रमानें
गुरु तद्दल पाहुनी वनींचे
जन झाले वश त्या क्रमाक्रमानें. ४७

अधिकार अलंघ्य होय त्याचा
गणिला नायक त्यास मावळ्यांनीं;
बहु हर्षभरांत मानिला तो
नव आधाराचि दीनदुर्बळांनीं ! ४८

घुमले सुयशःस्तवें तयाच्या
भंवतीचे गिरिभाग तुंग सारे;
प्रचुरादरमग्न होउनी या
लतिका अर्चिति त्यास पुष्पभारें ! ४९

जयगीत तदिय गात गात
झुकल्या शैलतरंगिणी वनांत
ध्वनि मंजुगभीर ऐकुनी तो
उठला हास्यनिनाद गव्हरांत ! ५०

रणभैरववीरमण्डनाची.
तनया जाण तदीय मंजुळा मी;
उपजूनहि पावनस्थळीं त्या
वसतें साम्प्रत तीव्रशोकधामीं ! ५१

सरिता किति जन्मल्या इथेंच,
सुयशें विश्व तदीय पूर्ण झालें;
सुमनें किति जन्मलीं इथेंच
वन गन्धें भरुनी तदीय गेलें ! ५२

उगवून वनस्पती कितीक,
सदया ! एथच ईशवन्द्य झाल्या !
पण या हतभागिनी–ललाटीं
किति दुष्कीर्ति जमून हाय आल्या ! ५३

जननी गुणशोभना कुठें ती ?
अथवा पावन तातही कुठें तो ?
स्थिति हीन मदीय ही दिसून
नच हृद्भंग कसा अजून होतो ?" ५४

वदतां वदतांच सुन्दरी ते
बसली स्तब्ध, भरून कण्ठ आला,
गतचिन्तनमग्न होउनी भू
भिजवी वर्षुनि अश्रुबिन्दुमाला. ५५

गळते विधुमण्डलामधून
रुचिरा काय सुधातरांगिणी ही ?
अथवा वनवल्लरीवरून
पडती शुभ्र सुमेंच एथ का हीं ? ५६

द्रवुनी शुचि अन्तरंग तीचें
उसळे पावन जान्हवी दुजी का ?
अथवा विधुरश्मिसंगमानें
झरतो इन्दुमणी, न यांत शंका ! ५७

स्थिति पाहुनि दीन ही तियेची
पवन स्तंभित होय दुःखभारें,
लतिका, तरु, तुंग शैलशृंगें
समदुःखें दिसले उदास सारें ! ५८

फुटुनी विधुचेंहि अन्तरंग
घनशय्येवरि तो क्षणैक ठेला;
भरुनी अमरांगनाश्रुजाळीं
सहसा अम्बरभाग सर्व गेला ! ५९

शुण्डाघातें जहाली विदलित कुसुमाकीर्ण वल्ली वनांत,
किंवा मार्गांत गेलें सुमन चिरडुनी तीव्रपादप्रहारें,
त्यांतें पाहोनि होतो रसिक विकलसा, त्यापरी त्या नराची
झाली दुःखप्रमग्ना स्थिति, उचिताचि हें दीन कारुण्यवन्ता ! ६०

---

# जाधवांची मंजुळा.

———:०:———

## पूर्ववृत्त कथन ( पुढें चालू )

वृत्त—**माल्यभारा.**

पडदा दुरि सारुनी घनांचा
स्वपथा चन्द्र धरी क्षणाभरानें;
नयनांतिल आंसवें पुसून
तरुणातें अवलोकिलें सतीनें. १

मग दीनरवें वदे तयाला:—
" गत गोष्टी फिरुनी मनांत येतां
जळतें मन तीव्र शोकदाहें;
गमतें तो घडतो प्रसंग आतां ! २

विपिनांत मम प्रसूसमेत
असतां तात सुखें दिन क्रमीत
फिरुनी करि यत्न चन्द्रराव
पुरवाया अपुला प्रगाढ हेत. ३

धनजी नसतां निजोटजांत
सहसा चोरुनि चन्द्रराव आला;
जणुं रावण पातला हराया
बघुनी एकलि दीन जानकीला. ४

परि केंवि मिळेल अम्बरींची
मधु तारा कर उंचही करून ?
सुरकार्मुकदण्ड काय लाभे
प्रजवें हैमगिरीवरी चढून ? ५

रुळते जलवाहकण्ठभागीं
इतरांना न मिळे तडिल्लता ती;
विलसे अनुरात्र सिन्धुवक्षीं
वद ये केविं महोर्मिपंक्ति हातीं ? ६

न सुचे सुविचार दुर्जनास
कवळोनी धरि तो सुमेषु–बाणां;
खल तो अगदीं वहावला तैं
स्वकुलाचा विसरून सर्व बाणा ! ७

वदला ' तनु कोमला कुठें ही ?
स्थल हें कर्कश सुंदरांगि ! कोठें ?
बघुनी तुज एथ बोलवेना–
मम या अन्तरिं काय काय वाटे ? ८

खडकांतुनि वाहिनी वहातां,
फुलतां कण्टकिं पुष्प केतकीचें,
द्रवलें मन, या तव स्थितीनें—
शत झाले तुकडे परी तयाचे ! ९

पद जे मृदु कष्ट पावतील
सुमशय्येवरुनीहि चालतांना,
फिरसी पथिं या कठोर केंवी
गतिलास्यें शिकवीत या लतांना ? १०

मधुगन्धित दिव्य अंगरागें
सदनीं त्वत्तनु रम्य शोभली जी
सुमुखी ! गिरिधूलिका तियेला
करिते धूसर हाय ! हाय ! आजी ! ११

उठलीस तदा उषीं सर्खीच्या
        मृदु शब्दें; ध्वनि एथ वायसांचे!
मणिभूषणें भूषिलें जयांनीं
        अलकीं त्या अजि धूलिराशि सांचे! १२

झडलीं पुढतीं जिच्या सुवाद्यें
        तिज गीतें रुचतात भालुकांचीं;
त्यजुनी धनवैभवें गृहींचीं
        गणिसी केविं वनस्थिती सुखाची? १३

सुरसुन्दरि! शाप पावुनी तूं
        गमलें भूवरि पातलीस खास;
तिथुनी अधमें कुणीं पुन्हां गे
        तुजला शापुनि धाडिलें वनास? १४

उतरे गगनामधून गंगा
        तिज नेलें धरुनी भगीरथानें,
चुकला तव मार्ग, चाल भामे!
        मजसंगें नगरीं रहा सुखानें!' १५

असतां तिज आळवीत नीच
        करितां व्यक्तहि ती निषेधभावा
धनजी तंव पातला कुटीरीं
        सशशांकाम्बरिं जेंवि भानु यावा! १६

पडुनी गजगण्ड मौक्तिकांचा
        खच तारानिलयापरी दिसे जी—
वनराजगुहेंत ये शृगाल
        धरुनी धीर करावयास आजी! १७

मग दीनपणें धरून पाय
        करि याञ्चा खल जीवरक्षणार्थ;
धनजीहि करी क्षमा तयाला
        अतुलौदार्यनिधी असे समर्थ. १८

दिसला विधु दीन पूर्वदेशीं
        दिननाथें समुपेक्षिलें तयाला;
परि त्या अधमें वधून पद्में
        धरणीचा अतिमानभंग केला! १९

दिन तो सरुनी निशा उदेली
        तिमिरीं कानन झाकिलें निशीथें;
तंव सानुग चंद्रराव आला
        रिपुचा निर्दय सूड घ्यावयातें. २०

खल तो उटजास आग लावी
        बघुनी सुप्त मदीय तात माता;
परि जागृत शीघ्र होउनी ये
        धनजी शस्त्र धरून शत्रुहन्ता! २१

करि कर्कश वीर सिंहनाद,
        घुमलें तें वन तत्प्रतिध्वनीनें;
फिरवोनि असि प्रचंड वेगें
        भरिलें भूतळ शत्रुशोणितानें! २२

रविही इतका महा प्रभावी
        परि होतो घनमण्डलीं विलीन;
धनजी लढणार तो कितीसा?
        पण तो शत्रुपुढें न होय लीन! २३

श्री ग्रंथ संग्रहालय नं. ता.

बल जों असि चालवावयाचें
करिं होतें, तंव झुंजला गडी तो;
गगितो तनु तुच्छ, शत्रुपादीं
अभिमानी शिर काय वांकवीतो? २४

चुकुनी शिरिं घाव एक लागे,
पडला देह गतासु भूमिभागीं,
गवसे तइं हा! करीं खलाच्या
मम माता धवहीन ती अभागी! २५

शशिनें किति पाठलाग केला,
क्षणही विश्रम घेतलाच नाहीं,
तरि लाभत काय त्या दिनश्री?
तमिं दोषाकर तो सदैव राही! २६

अति तीव्र निदाघ भानुरश्मि
करिती तप्त, नभीं दिसे न मेघ;
तंव येति लतेस वांचवाया
नव गंगौघजलें जशीं सवेग– २७

जमुनी झणिं तेंवि मावळ्यांनीं
दिधलें हाकुनि जावळीश्वरास
पडुनी तइं शत्रुमस्तकांची,
भरला तो गिरिभाग, थोर रास! २८

पतिदुःख विमुक्तिहर्ष यांनीं
जननीचें मन युक्त एक कालीं
विलसे, असते जशी मही ही
चिर तेजस्तिमिरांहि वेढिलेली! २९

पण केतुमुखांत भानु जातां
नुरते भूवरती स्मितच्छटाही;

सुकलें जननीमनःप्रसून
वळुनी वात विषस्फुलिंगवाही! ३०

रडली किती धाय मोकलून
गतनाथस्मरणें अनाथिनी ती;
नच शोक तदीय रोधितां ये
कथुनीही व्यवहार-रुक्ष-नीती! ३१

कवटाळुनि देह तो पतीचा
बघुनी भ्रान्तिवटापरी सभोंती
विलपे करुणस्वरें, तदा ते
जन राहोत, शिळाहि दीर्ण होती! ३२

' दयिता! अबलेस एकलीला
त्यजुनी दारुण या वनप्रदेशीं
वद जासि कुठें असा निघून?
परतोनी मज कां न हांक देशी? ३३

त्यजिलें पितरांसही जयेनें,
तुजसंगें विपिनींहि पातली जी,
तिज निर्दय मानसें असा कां
सहसा सोडुनि चाललास आजी? ३४

त्यजुनी वद चंद्रिकेस मागें
विधु लोकांतरिं का कधींहि गेला?
अथवा वितरी वसन्त केव्हां
वद वर्षाकरिं आम्रमंजरीला? ३५

तुझिया मुखचंद्रदर्शनींच
धरिते जीवनहेतु दुर्भगा ही,

मग या चिरदुर्वियोगकालीं
क्षणही ती कशि जीवमान राही? ३६

भुलसी सुरलोकवैभवें का?—
न परी मोह पडे तुला धनाचा!
धरिला अमरांगनाभिलाष?—
न परी ओघ तसा तुझ्या मनाचा! ३७

न सहे वनवासदुःख, काय
करिसी घाइ म्हणून जावयाची?
परि संगरधीर तूं, कशी ही
मग शंका भलतीच यावयाची? ३८

अरिशीं लढुनी समोर दर्पें
रणभूधूलिकणांत लोळलास,—
न गमे मज दुःख, वीरजन्म
न कराया मणिमन्दिरीं विलास! ३९

रणमर्द मिठीच मारितात
सुममालेपरि खड्गवल्लरीतें,
हृदयीं रमणीकटाक्ष घाता—
परि घेती रिपुमुक्त सायकांतें! ४०

भरितां रुधिरीं शरीर सारें
गमतो शीतल अंगराग त्यांस!
मनिं मानिति तीव्र शस्त्रघाता
रमणीस्पर्शनतुल्य ते सहास! ४१

रणभैरव जे असे सुवीर
गमसी नाथ! तयांत तूं ललाम;

तनु फेकुनि रुक्ष या प्रदेशीं
जगतीं तूं ठरलास वीर्यधाम! ४२

तव वज्रकठोर मानसांत
पण कैसी न मम स्मृतीच आली ?
रविलोकपथोद्यता ! तुला मी
दिसलें काय न मग्न दुःखजालीं? ४३

विधु पूर्ण असो, असो क्षयार्त
असते त्यासह चन्द्रिका सदाही;
पतिसेवनसौख्य थोर आहे,
पण तें भाग्य कसें मलाच नाहीं ? ४४

त्यजुनी निजगेह जीवितेशा !
तव संगें विपिनींहि वास केला,
निघसी वद एकलाच कैसा ?
नच आधार जगीं दुजा इयेला! ४५

बसुनी कुतुकें घनांकदेशीं
हंसली उंच नभांत जी चढून
सहसा घन नष्टतांच कोठें
वद विद्युत् हृदयेश ! जाय दीन ? ४६

कुतुकें कितिदां विलोकिलें मीं
तुजसंगें रवि अस्तशैलिं जातां,
पण अस्त तुझाच पाहण्याचा
मज आला भलता प्रसंग आतां ! ४७

खुडिलीं कुसुमें किती लतेचीं,
भिववीले मृगशाव खेळतांना,

रचिला प्रतिबन्ध निर्झरांस,
फल ये हें कटु त्याच पातकांना ! ४८

भ्रमलें गिरिकन्द्रांत हर्षे,
बसलें बोलत या लतागृहांत,
चढलें गिरि-तुंग-शृंग भागीं
भ्रमतां फार तुझा धरून हात; ४९

रमलें गिरिवाहिनींत केव्हां,
तव देहावरि फेंकिले तुषार,
तव भूषित कण्ठभाग केला
कधिं घालून सुगन्धि पुष्पहार ! ५०

तुजला फसवून केधवा मी
बसलें त्या गिरिगव्हरीं लपून;
शिणतां मम शोधनांत, आलें
सहसा मी तुझिया पुढें हंसून ! ५१

तवपादसरोजलीन भृंगी
सखया ! त्वद्गतजीविताच होती
तुजवीण कशी जगेल आतां ?--
भरतां तीव्र दवाग्नि हा सभोंतीं ! ५२

तव संस्मृति जें न जागवील
न असें स्थानच या वनीं दयाला !
न विचारतरंगही मनांत
स्फुरतो ज्यांत तुझा न अंश आला ! ५३

वरुनी करि दग्ध दाववन्हि,
धुमसे पर्वत अग्निगर्भ खालीं,

मग काय करील ती वनश्री ?
स्थिति माझीहि तशीच आज झाली ! ५४

वरुनी दहतो निदाघभानु,
वडवाग्नी करि तप्त फार आंत,
वद काय करील सिन्धुलक्ष्मी ?
ममही दुःस्थिति होय तेविं नाथ !' ५५

पतिचें शव देखुनी पुढें तें
स्थिर राहे जगिं कोणती सती ती ?
द्रवुनी मन तीव्रशोकतापें
जणुं नेत्रांतुनि अश्रु ते वहाती ! ५६

सुजनीं उपदेश फार केला,
कथिल्या पूर्वकथाहि शान्त व्हाया,
तिचिया पण शोकमूढचित्ता—
पुढती सर्वहि यत्न होय वायां ! ५७

शिशुबन्धन शान्तवी सतीला
पति होतां गत, बोलतात लोकीं;
पण वृक्षनिपातनीं लतेला
स्थिरवी काय फल प्रसून वा कीं ? ५८

नव्हतें तिसऱ्याहि वत्सरांत
पद माझें पडलें तदा दयाला !
मम रोदन दीन ऐकुनीही
न तिचा निश्चयभंग अल्प झाला ! ५९

तिज मारुनियां मिठी तदा मी
रडलें, लोळण घेतली महीस;

पण केवळ मन्मुखावरी ती
बसली दृष्टिच लावुनी उदास! ६०

रडतां रडतांच थांबुनी ही
बसली स्तब्ध शिलेपरी अशी कां?
इतके जन भोंवती असून
नच आली भलती कुणास शंका! ६१

बघतां बघतांच चंद्रलेखा
घनकुंजांत जशी विलीन होते,
दिसतां दिसतांच इन्द्रचाप
गगनीं लोपुनि जेंवि शीघ्र जातें, ६२

पडतां पडतांच कर्णभागीं
लय वीणा मधुगीतिं जेविं पावे,
असतां असतांच सान्ध्य शोभा
सहसा कीं तिमिरोदरांत धांवे; ६३

असुनी जननी पुढें मदीय
क्षणमात्रीं गतचेतना जहाली,
उघडी असुनी तशीच दृष्टि
पडली तैं जड देहदृष्टि खालीं! ६४

जगतावर रक्तचन्दनाचे
करिं घालीत सडे उषा उदेली;
उठुनी खग चालले फिराया
नव गीतें गगनीं भरून गेलीं; ६५

फुलल्या कुसुमांवरून वात
करुनी नर्तन चालला मदानें;

उसळून परागरेणुपुंज
भरलीं गन्धभरें समस्त रानें; ६६

तिमिरीं दडवून ठेविलेले
दिसले मौक्तिकहार पर्वतांचे;
अलिगुंजन पूर्ण जाहले ते
नवपुष्पांकित कुंज माधवीचे; ६७

कुतुकें दिननाथही करीत
असतां स्वर्णरसाभिषेक त्यांना
दहिलें रचुनी चिता जनांहीं
पितरांना मम सद्यशोरतांना. ६८

गळुनी सहसा घनामधून
कणिका येउनि पल्लवीं पडावी;
घडला भलता प्रकार तैसा,
स्थिति माझी कळुनी कुणास यावी? ६९

मथुनी जलधी सुधांशु नेला
मग शून्यांबरिं ठेविलें तयास,
खुडुनी लतिकेवरून पुष्प
सजवावा मग जेंविं केशपाश, ७०

स्थिति होय मदीयही तशीच
गतकालस्मृति भेदिते मनाला;
वसलें कसल्या शुचिस्थलीं मी
कसला हा नशिबीं प्रसंग आला! ७१

---

## पूर्ववृत्त कथन ( पुढें चालू )

### वृत्त—माल्यभारा.

कृति ऐकुनि जावळीश्वराची
अति कोपें तनु तप्त हो शशीची;
सरिदम्बुतळीं बसे शिरून
न परी अस्थिरता हरे तयाची! १

द्रवुनी अति तीव्र दुःखभारें
गळले तारक अम्बरामधून;
क्षणही स्थिर राहतां न वायु
सहसा जाय वनांतरीं पळून! २

अति दुःखविमूढचित्त झाली
सरिता सत्वर तेथुनी पळाली;
पुढती तुटला कडा असून
शतधा कोसळली सवेग खालीं! ३

( अपूर्ण )

# बाष्पबिंदु.

## श्लोक.

सूर्याचीं किरणें सुवर्णमय हीं वा शारदेंदुप्रभा
तारामंडलमंडितांबर, लसद्देवेंद्रकोदंड तें·
संध्याकालिकरागरंजितपयोवाहभ्रमत्खंड ही
हा! हा! दग्धमनोविनोदन कसें यांहीं करावें बरं ?

तेजेगोल नभःस्थ सर्व दिसती निस्तेज मल्लोचनां
स्वश्यामानन लाजुनी लपविती मेघां करोनी पुढें!
आहे चित्त मदीय गाढ तिमिरें व्यापून गेलें पुरें—
बाहेरील वृथा प्रकाश जड हा त्यातें निवारी कसा?

गानें मंजुल काय होत मजला कल्लोलिनीची गडे!
विद्युन्नर्तन तारकाविलसन प्रेक्षोनि वाटे श्रम!
कुंजान्तीं अलिपुंजगुंजनमिषें गाती वनश्री किती
आकर्णून तयास शूल उठतो मन्मस्तकीं तीव्रसा!
सांगें दुःसह ही वियोगरजनी आहे अजूनी किती?
कंठावें वद नष्ट जीवित कसें गाळीत अश्रू सदा? १

वर्षाकालिं मदीय दुःख बघुनी दुःखाश्रू ढाळी घन
हेमंतीं तरुवृंद दीन दिसती गाळोनि पर्णें पहा!
ग्रीष्मीं प्रेयसि! पाहि कोमल मना जाती सुकोनी नद्या
मद्दुःखें जडली रडे मग गडे कां तूंच ही निष्ठुर?

हा! हा निष्ठुर मानुनी तुज वृथा देऊं कसा दोष मी?
आहे इंदुकरांहुनीहि मृदुल त्वच्चित्त हें जाणतों!

त्वत्प्रेमाचरणें पवित्र मधुरे! येतां मनीं मोहुनी
आनंदाश्रुतरंगिणी प्रियकरे! वाहे जवें लोचनीं!
नाहीं निष्ठुर लाडके! मन तव प्रीती असीमा असे!—
आहे दुःसह हा वियोग मजला झाला म्हणूनीच गे!
मेघव्याप्त निशीथकालिं सरला विद्युत् प्रकाशे क्षण
वाटे दारुण अंधकार मग तो, झाली तशी मत्स्थिति!
नाहीं हा विरह त्वदीय जर गे! होणार केव्हां दुरी—
घे हें प्रेम तुझें कसें! मज नको तें नित्य दुःखप्रद! २

हा! धिक् उन्मन होउनी प्रलपतों, घेऊ नको तें मनीं
प्रेमावीण तुझ्या क्षणैकहि कसें राहील हें जीवित?
अस्मन्मेलन तें कदापि न घडो आदेहपात प्रिये—
नित्य प्रीति परस्परांवरि करूं झाली जरी निष्फळ!
ती होईल परंतु निष्फळ कशी? प्रेमीं असिद्धी नसे!
प्रीती गे करणें प्रियावरि सदा प्रेमी गणी लाभ हां!
हे दुःखाश्रु पुसावया जवळ तूं नाहींस आतां तरी—
आहे याहि मला स्थितींत सुख तें लाभेल कोणास का?

हे निश्वास, उदासवृत्ति अथवा उष्णाश्रुबिंदुव्रज
यांहीं दुःख दिसे मदीय परि तें आहे बहु श्रेष्ठ गे!
स्वेच्छें पंकिलपल्वलांबुकणिका सेवून आनंदणें
हें सोडून तृषार्त चातक सदा कादंबिनी प्रार्थितो!
हीनानंद निमग्न होउनि वृथा जावें मनीं गुंगुनी
त्यापेक्षां मज उच्च दुःखहि गमे आहे सुखाचें खरें ३

नाहीं रूक्ष मदीय दुःख परी हें होतें मन व्याकुल
अश्रु श्रेष्ठ असोत गे किति, परि अश्रूच आहेत ते!
होणें जीव सरिन्निमज्जित दवज्वालावलीवेष्टित
आहे अंतर फार यांत सखये! मृत्यूच येतो तरी!

अर्धोन्मीलितरम्यपद्मनिभ तें हास्योल्लसत्त्वन्मुख
केव्हां पाहिन ?—चिंतनीं अहह! या, जगतीं अहर्यामिनी
वाक्पीयूषतरंगबिंदु सखये प्राशीन केव्हां मुदें ?—...
अश्रू धन्य मनोरमे! तव करस्पर्शें कदा होतिल?

ही केव्हां तरि गे सरेल तिमिरव्याप्ता निराशानिशा
सोन्याचा दिन मंगल प्रभुकृपें येईल सौख्यप्रद!
आशाबंधन हें जरी न असतें, होती निराशा पुरी,
घेता हा तव दास भग्नहृदय स्वर्गीं भरारी जवें!
प्रेमानंदसरोविहार करुनी तूं हर्षवीशी मला
केव्हां, केवि, खरेंच सांग, दयिते होशील दृग्गोचर? ४

शोभे मेघपरंपरेवरि कशी तेजस्विविद्युच्छटा
या पापी जगतीतलीं विहरसी तूं प्रेममूर्ती तशी!
नीलाकाश अनंत दिव्यविलसत्तारागणीं राजतें
तैशी ही हतमेदिनी तुजमुळें धन्या जहाली खरी!

स्वर्गा सोडुनि धावुनी सुरधुनी आली जशी खालती
तूंही सत्य तशीच जन्मुनि गुणें पृथ्वी अलंकारिली!
तूं देवी मम! शांतदृष्टिस तुझ्या होईन का आस्पद?
झाली दुःसह अल्पकालविरहीं दीना मदीया स्थिति!

नाहीं शोक करावयास मजला देवें गडे निर्मिलें
जाणें हें परि दुःख हेंहि मजला भासे महातीव्रसें!
प्रेमस्थानच नाहिं ज्यास असले आहेत लोकीं किती
माझ्याभोंवति सर्वतां उसळती प्रेमोर्मिमाला सदा!
सांगें गे पण काय ठाउक नसे येणार आहे रवि?—
होती म्लान तरी दिनान्तसमयीं अंभोरुहें लाडकें! ५

मी लोकव्यवहार पाहुनि करीं यत्नें मनःसंयम
केला फार विचार अल्पहि तरी नाहीं समाधान गे!
त्वत्प्रेमस्मृति होउनी विरह हा झाला न केव्हां उणा
गंगेच्या स्मरणें कदा न सरते तृष्णाकुलाची व्यथा!

प्रत्यक्षांत मिळेल जें सुख न तें ये कल्पनेनें कधीं
शांती केवि करील वास हृदयीं या त्वद्वियोगीं गडे?
आहे हा अविचार तूंहि म्हणसी, नाहीं म्हणावें कुणी?
वेडें प्रेम परी मदीय सरले! हें धावतें सारखें!

उत्कंठाज्वलनप्रदग्ध जन हा त्वद्दर्शनांबूविणें
कैसा होइल शांत? धन्य नयनें होतील केव्हां वद?
या दीना हसवीत इंदुकलिका येणार रम्या कदा?
केव्हां होइल शीतचंदनरसें ही मेदिनी सिंचिता?
प्रेमोत्कंठित दृष्टि लावुनि तुझ्या मार्गाकडे सारखा
आहे कंठित काल दुःसह तुझा हा भक्त कैसा तरी?

बाष्पांभःसरिता मदीय नयनापासून जी वाहते
सारें विश्व तिच्या प्रवाहिं सखये जाईल विध्वंसुनी!
लोकानंदन मी कवीच जर गे ढाळीत अश्रू बसूं
आशा प्रेमविलास हास भुवनीं उत्पन्न होती कसे?

ये, माझ्याकरितां नको, परि गडे लोकोपकारास्तव!
दावीं हास्यमुख त्वदीय, सुवचें वारून चेतस्तम।
होओत प्रियदर्शनें तव सदा गे धन्य मल्लोचनें
आनंदीं बुडवीन विश्व सगळें मी गायनें गाउनी!

श्याम व्योम विशाल सोडुनि जवें येतील तारे भुविं
रत्नें सुंदर लोळतील चरणीं पाषाणखंडापरी
सोत्कंठामरसुंदरी करितिल प्रेमें इथें नर्तन

पापेच्छा लवही न लोकहृदयीं राहील चेतोरमे!
स्वर्गाचें रमणीय रूप भुवना आणीन मी सत्वरीं
माझ्यासन्निध हासत प्रियकरे तूं मात्र राहीं सदा! ७

अंभोदावलि अंबरीं विलसते विद्युत्प्रभा भासुरा
हर्षें लास्य मयूरवृंद करिती सोत्कंठ तद्दर्शनें
तें तन्नर्तन पाहुनी चकित गे होतात भिल्लांगना
पाहोनी तुज, रम्य गान करितों, ऐकून डोले जगत्!
तूं मूर्त प्रतिभा न सन्निध कसें गाणें सुचावें मग?
गानाभाविं जगांत हास्य कुठलें उत्पन्न होईल गे?
तूं हास्योद्गम न प्रमोद तुझियावांचून कोणा मिळे!
झाली शुष्क पहा तुझ्याविण गडे ही सौख्यकूलंकषा!
तेजस्विप्रखरांशुतप्तपुलिनीं झाली तनु व्याकुल
दीनाला तुजवीण सांग दुसरा आहे कुठें आश्रय?
ये ये प्रेमसुधांबुवर्षिणि! तमःपुंजेंदुरम्य प्रभे!
आनंदांबुधिला चढोत मधुरे! वीची नभश्चुंबिनी!
देवांनीं स्वपुरास जें पळवुनी पीयूष नेलें पुरा
तें त्यांशीं झगडून संगरिं गडे आणीन या भूवरी! ८

भृंगांचें मज मंजु गुंजन गमे तें शोकगीतापरी
वाटे हा विकच प्रसूननिकर प्राणेश्वरी म्लानसा?
गाती निर्झर गान भासत मला तेंही विलापासम.
हा! हा! आज मनोज्ञ सृष्टि सगळी झाली विपर्यस्त ही!
होत्या हासत ज्या सदा, विलपती त्या आज या तारका
अश्रू ढाळिति, ते पहा दंवमिषें पुष्पांवरी सांडले!
सारी सृष्टि उदास दुःखित पहा झाली वियोगें तुझ्या
सिंधू वाढति, वाहतात तटिनी, अश्रूच हे सृष्टिचे!

शोकाच्या लहरींत विश्व सगळें गेलें बुडोनी दिसे
गेलें प्रेम लयास, खास गमतें आनंद झाला मृत !
आतां काय जगांत ? शून्य अवघें ! ढाळीत मी दृग्जला
चेतश्चंद्रकले ! कठोर मरणा प्रार्थीत आहे इथें !
झालें भग्न न हें मदीय हृदय, प्राणें न जों त्यागिलें
तों ये धांवत मानसैकललिते ! दे एकदां दर्शन ! १.

आहे दीन कशी त्वदीय विरहें झाली मदीय स्थिति—
हें ही कोमल शांत वायुलहरी सांगेल सारें तुला
चित्तीं आठवुनी तुज प्रियकरे ! अश्रू सदा गाळितों
तें तन्मार्जन हीच नित्य करुनी दावी दया निस्तुला !

झाली काय विशुष्क पूर्ण अहह ! त्वत्प्रीतिकल्लोलिनी ?
कां माझा बघतेस अंत ? तुजला येवो दया थोडकी !
माझे अश्रु बघून काय छलिके आनंद होतो तुला ?
ये ये सत्वरि गे विनोदसमय प्राणेश्वरी हा नसे

सांगें तीव्र वियोगकाल अजुनी आहे किती शोभने ?
केव्हां होइल रम्य दर्शन तुझें याला चिराकांक्षित ?
या जन्मीं दिन तो खरेंच सखये येईल का गे कधीं ?—
कीं तेव्हां विरह त्वदीय पळही होणार नाहीं मला !
आहे काय खरेंच भाग्य असलें माझें ? न वाटे खरें
ही आहे हतभागिनी वसुमती, ती स्वर्ग व्हावी कशी ? १०

होते ही अवनी प्रकाशतिमिरें कालक्रमें आवृता
संसारीं सुखदुःख तेवि सतत प्राण्यांवरी येतसे
आले सांगत थोर कीं, न टिकते केव्हांहि एक स्थिती
तेजस्वी दिन आणि गाढतिमिरा रात्रीहि जाते लया !

तत्वाची मधुरानुभूति मजला येईल या कँधवा ?
आहे मानसकैरवेंदुकलिके ! कीं शुष्क पांडित्य तें ?
केव्हां येइल ती सुरम्य उदया त्वद्दर्शनोषा प्रिये ?
किंवा राहिल ही वियोगरजनी प्राणावधी दुःसहा ?

सारी सृष्टि नितांतमोहक, दिसे झाली तमोमाज्जिता
या बाष्पाकुल लोचना न दिसते कोठेंहि अल्प प्रभा !
हा ! हा ! दर्शन दर्शनीय ललिते ! होई न जेथें तुझें
पाहूं काय दुजें भयाण जगतीं ? माझी वृथा दृष्टि ही !
प्रेमालाप तुझा न मंजुल तरी मत्कर्ण हे निष्फल
नाहीं स्पर्श तुझा तरी झडकरी हा देह जावो लया ! ११

तेजोभूषित, इंद्रकार्मुक करी या दिव्यनीलांबरा
मेघश्यामलमालिका सुहासिते ! आधीं तिथें उद्भवे
तूं नाहींस सुमंजुभाषिणि ! परी उत्साहसंवर्धिनी
वाटे विस्मय हाचि कीं, अजुनिही वास्तव्य माझें असे !

कर्तव्यच्युत होउनी निशिदिनीं ढाळीत अश्रू बसें
दुःखाची मम कल्पनाहि न जयां वेडा तयां मी गमें !
मी वेडाच असो, कधीं न मम हें जावो लया वेड गे
स्वार्थी ज्ञान नको मला विसरवी त्वन्मूर्ति जें प्रेमला !

अश्रू वाहुनि सर्वदा तनुहि ही जावो विरोनी गडे
किंवा या विरहानलें हृदय हें होवो कसे भस्मसात् !
आहा ! त्वद्गुणचिंतनांत असतां वृत्ती विलीना मम
आला मृत्यु तरी न धन्य दुसरा भूमंडळीं मत्सम !
होवो दर्शन गे त्वदीय, अथवा येवो कसा मृत्यु तो
हा ! हा ! तीव्र वियोग संप्रति परी झाला महा दुःसह ! १२

# पद्यपुष्पांजली. *

प्रेमाचियां बोला नाहीं पेसपाड
भलतैसे गोड करुनी घेई ॥ १ ॥

तुकाराम.

## श्लोक.

आनंदाश्रुपयःसमाकुल अहा मल्लोचनें जाहलीं
देहीं ही सखया! थरारुनि उठे सोत्कंप रोमावली!
भव्येच्छा तव चिंतुनी हृदयिं या प्रेमोर्मिमालाकुलीं
त्वन्मार्थी दयित त्वदीय उधळी हा पद्यपुष्पांजली! १

पीयूषद्युति चंद्रिकेसह अहा! शोभे जसा अंबरीं
गंगालिंगनसौख्य सेवुनि जसा उत्कर्ष सिंधू वरी
किंवा फुल्ल रसाल गाढ लतिकाश्लेषें विराजे जसा
त्वद्भार्येसह नांद तूं प्रियतमा! सानंद लोकीं तसा! २

फुल्लांभोरुहगंधिता विहरते वीची तडागीं जशी
क्रीडो सद्गुणशालिनी नववधू त्वन्मानसीं ही तशी!
राहीं रम्य तडिल्लता न पलही मेघा दुरी सोडुनी
तेवीं कांतदृढानुरक्तहृदया ही धन्य होओ जनीं! ३

प्रेमोद्गार असत्य होतिल न हे! ही 'देववाणी' असे!
स्वर्गींचा प्रणयामुळें जनमुखें संदेश यतो रसे!
भोगा सत्सुखकीर्तिवैभव, भरा सर्व प्रमोदें दिशा
युष्मत्प्रेम बघोनि होउत अहा! दिक्सुंदरीही पिशा! ४

---

* प्रिय मित्र वामन जनार्दन कुंटे यांस त्यांच्या विवाहप्रसंगीं केलेला आहेर.

काव्यस्वादुरसा पिऊनि हृदयीं जें प्रेम संगोपिलें
गाणीं गाउनिया किती अजवरी अज्ञांस जें बोधिलें
दावावें निजवर्तनीं विशद तें—तो काल हा पातला
संसार प्रणयाम्बुवाहसलिलें बा! पाहिजे सिंचिला ! ५

काव्यीं मोहक रूप ये दिसुनियां जें उज्ज्वलें प्रीतिचें
तें सारें ‘ कविकल्पनामय ’ गमे हा हा! न अज्ञा रुचे
स्वर्गीयप्रणयप्रदर्शन करीं त्वद्वर्तनें या जनीं
प्रेमालोक अशोक लोक करुनी टाको मनें मोहुनी ! ६

हा आनंदसुखप्रसंग, दुसरी वार्ता न यावी इथें
कर्तव्यस्मृति द्यावया वदतसें कांहीं परी सन्मते !
तूं आहेस विवेकशील, तुजला ठाऊक सारें असे
या कालीं तरि सांग शांत सखया प्रेमें रहावें कसें ? ७

ज्या सिंधूंत अनंत संतत सुधाकल्लोल हेलावती
गर्वे कांचनयुक्त शैलशिखरें उंचावुनी पाहती
तेजस्वी बहु लोळती किति तळीं सद्रत्नराशी महा
वाटे त्याहुनिही वरिष्ठ मजला प्रीतीच लोकीं अहा ! ८

जाओ काल किती परंतु न उणें नावीन्य होतें कदा
प्रेमोत्कर्ष घडे अहर्निश जरी आल्या मधें आपदा
उत्कंठा धरुनी अजूनहि मनीं आकाश चुंबी मही
होतो ऊर्मिविलासभूषित पहा अद्याप अंभोविही ९

वाहो क्षुब्ध मधें विशाल सरिता, आकाशही कोसळो,
उंचावोत महीध्र तुंग शिखरें वा वज्र तें आदळो !
प्रेमानें परि एकवार सखया जीं एक झालीं मनें
तीं केव्हांहि न भिन्न होतिल बरें कैशाहि आपत्तिनें ! १०

येतां दृष्टिपुढें परंतु सगळी सद्यःसमाजस्थिति
प्रेमाची बहु दुर्दशाच घडली आहे गमे संप्रती!
शुद्ध प्रेमविकार हाय! न कळे सज्ञानही पूरुषां
व्हावा ज्ञात महानसाकुलमती योषिज्जना तो कसा? ११

राहो प्रेम! परंतु हाय उचित स्वातंत्र्य विध्वंसुनी
ज्ञाना वंचियली नरांहिं वनिता जी सद्गुणांची खनी
नेली दूर दवाग्निदग्ध लतिका अंभोदवृष्टींतुनी
आला राहु मधें सुधा वितरितां इंदू चकोरीगणीं! १२

रम्या सृष्टि पुढें चमत्कृतिवती मित्रा! असोनी बरें
बांधावे नयन, त्यजूनहि दया, कीं डोळसाचे करें?
छे छे! ही न मनुष्यता! खचित हें मोठें नरां लांछन!
योषिद्दुःस्थिति पाहुनी पुनरपी शोकार्त होतें मन! १३

आहे सर्व जगत् स्वकीय सदनामध्येंच सामावलें
ऐसें कल्पुनि 'दासजीवित' अहा ज्यांहीं सदा वाहिलें
स्वापेक्षाविण ज्यांचिया न हृदया चिंता दुजी स्पर्शली
दुर्दैवें ललना कितीतरि अशा गेल्या लया भूतलीं! १४

झालीं शुष्क किती वनीं सुकुसुमें सौगंध्य गेलें वृथा
रत्नें गूढ कदर्यमंदिरतलीं झालीं वृथा तत्वतां
खड्गें तीक्ष्णहि भीरुसैनिककरीं गंजून गेलीं किती
हाहा! भारतवर्षि तेविं विषमा झाली स्त्रियांची स्थिती! १५

झाल्या हाय! 'गुलाम' आर्यमहिला ऐसें दिसे सांप्रत
मानावें दयितोत्तमा! परि तुवां 'सन्मित्र' भार्येप्रत
दैवानें दिधली लसद्गुणवती जी रत्नमाला तुला
धिक्कारें तुडवीं पदीं नच; तुवां कंठीं धरावें तिला! १६

सोडोनी सहसा त्वदर्थ अपुलीं माहेरचीं माणसें
झाली जी अनुगामिनी तव तिच्या प्रेमास सीमा नसे !
आली ही सुरनिम्नगा द्रुतगती भेटावयातें तुला
घे घे रे जवळी तिला जलनिधे ! भाग्या तुझ्या ना तुला. १७

कायावाङ्मन आजपासुनि तुला आहे हिनें वाहिलें
आतां तूंच तिचें शुभाशुभ सदा बा पाहिजे पाहिलें !
स्वार्थत्याग करून पूर्ण अपुलें कर्तव्य केलें तिनें
झाली ती 'तव' तूं 'तदीय' सहसा व्हावें शरीरें मनें. १८

तूं आहेस कवी सुशिक्षण तुला दैवें असे लाधलें
बोलावें न, परंतु शब्द वदनीं येती प्रसंगामुळें:—
स्वत्वा विस्मरुनी पतीस समजे सर्वस्व भार्या मनीं
निष्ठाप्रेमभर तयास गृहिणी सेवी अहर्यामिनी १९

स्वच्छंदें पतिराज वागति सदा लोकीं त्रिलोकीं परी
सांगूं रे तुज काय विस्मयकरा एकेक त्यांच्या परी ?
वागावें विगतत्रप स्वसदनाबाहेर हावें तसें
ध्वंसावी सुखलालसेंत शुचिता, शंकाहि कांहीं नसे ! २०

पातिव्रत्य वधूस मंडन, तसें तें एकपत्नीव्रत
आहे भूषण पूरुषांस जगतीं विद्वत्सदःसंमत
या दिव्याभरणा कुणी तुडविती दर्पें पदीं दुर्मती
मानुष्यांस कलंक लाविति महा दुष्कीर्ति संपादिती ! २१

मूढांचा पथ तो न वक्रनयनेंही तूं पहावा कदा
या पत्नीवर निश्चला जिवलगा ! प्रीती करावी सदा
राहो हें अथवा विकत्थन, असे जो प्रेममूर्ति स्वयें
दुःशंका धरुनी तयाप्रति असें केव्हांहि बोधूं नये ! २२

गेल्या होउनि योषिताहि विदुषी प्राचीन कालीं किती
विद्यातेज यदीय पाहुनि मनीं लाजेल वाचस्पती
आतां दुर्विधिलालसें प्रियकरा ! त्या आर्यसीमंतिनी
कृष्णांतील शशांककांतिसम रे निस्तेज झाल्या जनीं ! २३

अज्ञानांत न ठेवितां निजवधू नित्य प्रयत्नें तिला
सद्विद्यामृत पाजुनी सुखतरू तूं पाहिजे रोपिला !
जाणें मी मुळच्याच सद्गुणवती आहेत आर्यांगना
विद्येनें दयितोत्तमा ! तरिहि त्या लागेल वृद्धी गुणा ! २४

श्रद्धा उत्तम, पाहिजे, परि नको ती अंधभक्ती मला
अज्ञानोद्भव सौख्य सेवुनि कुणी आहे सुखी जाहला ?
अंधाला धन लाभलें बहु तमःसंकीर्णकालीं जरी
त्याचें काय महत्त्व ? होइलहि तें नष्ट क्षणाभीतरी ! २५

राष्ट्राचें अमुच्या खरेंच गमतें अर्धांग गेलें असे
अर्धांगें दुसऱ्या समुन्नतिपदा जाईल तें रे कसें
घे साहाय्य सदा तुझ्या गृहिणिचें कर्तव्य साधावया
सत्कीर्तिध्वज शुभ्र नित्य फडको जाऊन विघ्नें लया ! २६

ज्ञाते बोलति हा महासुखनिधी आहे गृहस्थाश्रम
अज्ञानें सखया, परंतु घडती लोकांस दुःखश्रम
स्वप्रेमाचरणें भरीं त्रिभुवनीं **आनंद, आशा, सुख**
पाहूं दे मज सद्यशोविमल तें हास्योल्लसत्त्वन्मुख ! २७

झालीं दोन मुलें म्हणून सगळा संसार आटोपला
मानावें न असें, पुमर्थहि तुवां कांहीं हवा साधिला
नाशावे स्वमनोविकार सगळे रोधून सर्वेंद्रियां
चेतोदुर्बलतेमुळेंच दयिता आनंद जाती लया ! २८

भार्येचे चलदृक्कटाक्ष अमृतस्यंदि स्मितें पाहुनी
विद्या जाय निघून शीघ्र मनुजा सोडून रागावुनी !
स्वाचारें सखया ! न देइं दृढता लोकप्रवादा अशा
होईं धन्य जगीं प्रयत्न करुनी संपादुनी सद्यशा ! २९

बाल्यापासुनि हेतु वाढवियले सोत्कंठ जे जे मनीं
संसारीं पडतांच सर्वहि अहा जातात विध्वंसुनी
नाहीं तें लटकें, परी जरि अशी झाली तुझीही स्थिति
हें शोभे कवितेप्रती न, मग कां अज्ञां सुधी हासती ? ३०

सांगावें तुज काय याहुनि ? असें सुज्ञात सारें तुला
बोधा कारण या नसेचि बघतां त्वद्वर्तना निर्मला
पुष्पा सौरभदान, रंग भरणें देवेंद्रचापा वृथा
ज्योत्स्नेला व्यजनें सुशीत करणें, ही मत्कृतीही तथा ! ३१

REFBK-0003696

REFBK-0003696

३६९६

# रेंदाळकरांचीं पुस्तकें.

| | | रु. आ. |
|---|---|---|
| १ | रेंदाळकरांची कविता प्रथम खंड. ( प्रति फारच थोड्या ) | २—४ |
| २ | रेंदाळकरांची कविता द्वितीय खंड. | १—८ |
| ३ | मोहिनी. ( प्रति फारच थोड्या ) ... | ०—५ |
| ४ | विरहणी राधा.... ... ... | ०—६ |
| ५ | अन्योक्ति मुक्तांजली भाग पहिला. | ०—३ |
| ६ | अन्योक्ति मुक्तांजली भाग दुसरा. | ०—२ |

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:—

( १ ) परचुरे पुराणीक आणि मंडळी.

माधवबाग, मुंबई.

( २ ) लक्ष्मण नारायण गोडबोले.

लक्ष्मी रोड, पुणें.